GIPE-PUNE-003836

# स्थानिक स्वराज्याचे कायदे

मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट (१९२३ चा मुंबईचा आक्ट ६ वा १९२५च्या मुंबई आक्ट २रा व १९२५चा १३ नें सुधारलेला) मुंबईचा प्राथमिक शिक्षणाबाबत आक्ट (१९२३ वा मुंबईचा आक्ट ४था) आणि मुंबईचा गांवपंचायतीबाबत आक्ट (१९२० चा मुंबईचा आक्ट ९वा, १९२४ चा मुंबईचा आक्ट १ ला व १९२५ चा १४वा ह्यानें सुधारलेला)

त्या त्या आक्टांखालीं झालेले नियम व कानू ह्यांसहित.

रचणार

**दत्तात्रय गणेश खांडेकर,**

लॉ पब्लिशर, पुणें.

हें पुस्तक द. ग. खांडेकर ह्यांनीं पुणें पेठ शनवार घ. नं. ५३० येथें आपल्या लॉ प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध केलें.

१९२७

किंमत अडीच रुपये.

# सन १९२५चा मुंबईचा आक्ट १३वा.

## सन १९२३चा मुंबईचा लोकलबोर्ड आक्ट आणखी सुधारण्याबाबत आक्ट.

ज्याअर्थी सन १९२३चा मुंबईचा लोकलबोर्ड आक्ट, यांत पुढें सांगितलेल्या रीतीनें आणखी सुधारणें योग्य आहे; त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. लहान सरनामा:—या आक्टास सन १९२५चा मुंबईचा लोकलबोर्ड आक्ट सुधारण्याबाबत आक्ट असें म्हणावें.

२. सन १९२३चा मुंबईचा आक्ट ६वा याच्या ९व्या कलमाची सुधारणा:—सन १९२३चा मुंबईचा लोकलबोर्ड आक्ट, याच्या ९व्या कलमांत—

[१] पोटकलम [१] यांत—

[अ] रकमा [क] व [ड] व [ड] रकमेचा खुलासा यांच्या बदला, पुढील मजकूर दाखल करावा.

तो येणेंप्रमाणें:—

"[क] [१] ज्याला कोणत्याहि फौजदारी कोर्टानें सहा महिन्यांहून अधिक मुदतीपर्यंत कैदेची शिक्षा देतां येण्याजोग्या अपराधासाठीं कैदेची किंवा फटके मारण्याची शिक्षा दिलेली असून किंवा काळेपाण्यावर पाठविण्याची शिक्षा दिलेली असून अशी शिक्षा नंतर फिरविलेली नसेल किंवा रद्द केलेली नसेल असा मनुष्य, अशी शिक्षा संपली नसेल तर व तोंपर्यंत, किंवा

[२] सन १८९८चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचें कलम ११० अन्वयें चालविलेल्या कामांत, सदरहू कायद्याचें कलम ११८ अन्वयें ज्या मनुष्याविरुद्ध हुकूम झाला असेल असा मनुष्य असेल, आणि असा हुकूम नंतर फिरविलेला किंवा रद्द केलेला नसेल तर, असा हुकूम अमलांत असेल तर, व तोंपर्यंत; किंवा

[३] ज्याला ३१व्या कलमाअन्वयें हुद्यावरून दूर केलें असेल, आणि अशा दूर करण्याच्या तारखेपासून पांच वर्षें लोटलीं नसतील तर,

अशी शिक्षा, हुकूम किंवा हुद्यावरून काढून टाकणें यामुळें उत्पन्न होणाऱ्या नालायकींतून, मुंबई सरकारी गॅझेटांत जाहीर केलेल्या सरकारच्या हुकुमानें, त्यास मुक्त करण्यांत आलें असेल तें खेरीजकरून, किंवा;"

[ब] रकमा [इ] व [फ] यांस [ड] व [इ] अशा नव्या संज्ञा अनुक्रमें द्याव्या.

[२] पोटकलम [२]मध्यें, '[फ]' हा कंस व अक्षर यांच्या बदला, '[इ]' हा कंस व अक्षर हीं दाखल करावीं.

# सन १९२५ चा मुंबई आक्ट २.

# सन १९२३ चा मुंबईचा लोकलबोर्ड आक्ट.

## सुधारण्याबाबद आक्ट. +

( १ ) कलम ८ बद्दल पुढें लिहिलेलें कलम दाखल करावें.

" ८. लोकलबोर्डाच्या निवडणुकीसाठीं जरूर असणाऱ्या लायकी.—या आक्टाच्या किंवा त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या दुसऱ्या कोणत्याही कायद्याच्या ठरावांस पात्र राहून,

( अ ) ज्या मनुष्याचें नांव एकाद्या तालुका लोकलबोर्डाचे मतदार संघासाठीं कलम ११ अन्वयें तयार केलेल्या यादींत दाखल करण्यांत आलें असेल अशा मनुष्यास अशा तालुका लोकलबोर्डाचे कोणतेहि निवडणुकीच्या वेळीं उमेदवार होतां येईल; आणि

( ब ) ज्या मनुष्याचें नांव एकाद्या डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाचे मतदार-संघासाठीं अशा तयार केलेल्या यादींत दाखल करण्यांत आलें असेल अशा मनुष्यास त्या डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डासाठीं होणाऱ्या कोणतेहि निवडणुकीच्या वेळीं उमेदवार होतां येईल. "

( २ ) सदर आक्टाचें कलम १४ चें पोटकलम २ यांतील " मेंबर निवडला जाण्यास किंवा " हे शब्द गाळावे; आणि पोटकलम २ नंतर पुढील पोटकलम दाखल करावें.:—

" ( ३ ) एकाद्या तालुका किंवा जिल्हा लोकलबोर्डाचे संघासाठीं होणाऱ्या एकादे निवडणुकीचे तारखेपैकीं शेवटीं प्रसिद्ध झालेल्या तपासलेल्या यादींत त्याचें नांव असल्यावांचून कोणाहि इसमाला त्या तालुका किंवा जिल्हा लोकलबोर्डाचे संघासाठीं निवडून येण्याची लायकी प्राप्त होणार नाहीं. "

---

+ या आक्टाचें अद्याप सरकारी भाषांतर छापून आलें नाहीं; परंतु वाचकांचे सोईसाठीं हें भाषांतर करून छापलें आहे.

( ३ ) कलम १५ पोटकलम १ यांत " तालुक्यांत " हा शब्द पहिल्यानें जेथें येतो, तेथें त्याचे बदला व पोटकलम (२) यांत "जिल्ह्यांत" हा शब्द पहिल्यानें जेथें येतो त्याचे बदला " मतदार संघांत " हा शब्द दाखल करावा; आणि

पोटकलम (३) यानंतर पुढील विशेष ठराव दाखल करण्यांत यावा, तो असा:—

" मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, एकाच तालुका लोकलबोर्डाच्या किंवा एकाच जिल्हा लोकलबोर्डाच्या एकापेक्षां अधिक मतदार संघाच्या निवडणूक करणारांच्या याद्यांत आपलें नांव रजिष्टर करून घेण्याचा कोणाही इसमास हक्क असणार नाहीं. "

# प्रस्तावना.

## मुंबईचा लोकल बोर्ड अॅक्ट.

मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट बरेच वर्षांपूर्वी म्हणजे सन १८८४ साली पास झाला. अलीकडे कांहीं वर्षे त्यांत कांहीं उणीवा दिसून आल्या आहेत, आणि लोकल बोर्ड जास्त स्वतंत्रता व जबाबदारी देण्यास योग्य आहेत असें व अधिक विस्तृत कार्यें करण्यास योग्य आहेत असें समजण्यास हरकत नाहीं अशी वेळ आहे.

हल्लींच्या आक्टाच्या मसुद्यानें लोकल बोर्डाचा आक्ट रद्द केला आहे आणि त्यांचे ठरावांत पुष्कळ फेरफार करून व जास्त मजकूर दाखल करून त्यांस कायद्याचें स्वरूप देण्यांत आलें आहे. तसेंच ह्या मसुद्यानें सन १८६५ चा सिंध लोकल फंड आक्ट व सन १८६९ चा मुंबईचा लोकल फंड आक्ट हे सुद्धां रद्द केले आहेत व त्या आक्टांचे ठराव ( भाषेंत जरूर त्या फेरफारानिशीं ) सामील करण्यांत आले आहेत. कारण लोकल फंड व लोकल बोर्ड यासंबंधींचे सर्व आक्ट एकत्र करण्यांत यावेत हें जास्त सोयीचें वाटलें आहे.

ह्या आक्टाच्या मसुद्यानें जिल्हा लोकल बोर्डांना सार्वजनिक पीडा बंद करण्यासाठीं कित्येक आरोग्यविषयक व इतर अधिकार मिळाले आहेत.

जिल्हा लोकल बोर्डास त्यांचीं वाढलेलीं कामें करण्यास लागणारा खर्च भागवितां यावा म्हणून ह्या आक्टांच्या मसुद्यानें बोर्डांना निरनिराळ्या तऱ्हेनें निर्बंधास पात्र ठेवून कर बसविण्याचे विस्तृत अधिकार दिले आहेत. कालव्यानें भिजविल्या जाणाऱ्या जमिनीवर बसविलेले पाणीपट्टीवर सेस बसवून व तालुका लोकल बोर्डाच्या ज्या उत्पन्नावर अद्यापपावेतों रकमा घेण्यांत येत नव्हत्या अशा कित्येक उत्पन्नाच्या साधनांवर रकमा बसवून त्यांचीं उत्पन्नाचीं साधनेंहि वाढविलीं आहेत.

लोकल बोर्ड हें " सोंपून दिलेली " बाब असल्यामुळें " गव्हर्नर इन् कौन्सिल " ही संज्ञा आतां यापुढें लोकल बोर्डासंबंधानें उपयोग करण्यासाठीं योग्य नाहीं, आणि सबंध आक्टामध्यें 'सरकार' ही संज्ञा त्याच्या बदला दाखल करण्यांत आली आहे.

पहिलीं लोकल बोर्डें स्थापन करण्याच्या वेळीं जरूर असलेले निरनिराळे ठराव गाळून टाकण्यांत आले आहेत व विद्यमान कायद्याअन्वयें असणारे अधिकार योजलेल्या कायद्यानें होणाऱ्या अधिकाऱ्यांकडे जाण्याकरतां ठराव करण्यासाठीं नवीन औपचारिक ठराव असणें जरूरीचें दिसून आलें आहे.

[ हेतु व कारणें ]

# मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट

## सन १९२३ चा मुंबईचा आक्ट ६ वा.

(गव्हर्नर जनरल यांची मंजुरी मिळाल्यानंतर मुंबई सरकारी)
गॅझेटांत तारीख १७ माहे मार्च सन १९२३ रोजीं
पहिल्यानें प्रसिद्ध केलेला.)

### लोकल बोर्डासंबंधाचा कायदा एकत्र करणें व सुधारणें याबावत आक्ट.

ज्याअर्थी लोकल बोर्ड व लोकल फंड यांसंबंधाचा कायदा एकत्र करणें व सुधारणें योग्य आहे आणि ज्याअर्थी हा आक्ट पास होण्याकरितां हिंदुस्थान सरकारसंबंधीं आक्टाचें कलम ८० (अ), पोट–कलम (३) याच्या रकमा (अ), (इ) व (ह) यांवरून जरूर असलेली गव्हर्नर जनरल यांची अगाऊ मंजुरी मिळविलेली आहे; त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

### बाब १ ली.—प्रारंभींचे ठराव.

१. (१) लहान सरनामा व व्याप्ति—ह्या आक्टास सन १९२३ चा मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट असें म्हणावें.

(२) तो मुंबई शहर व एडन हीं खेरीजकरून सगळ्या मुंबई इलाख्यास लागू आहे.

२. कित्येक आक्ट रद्द करणें—सन १८६५ चा सिंधचा लोकल फंडाचा आक्ट, सन १८६९ चा मुंबईचा लोकल फंडाचा आक्ट आणि सन १८८४ चा मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट हे यावरून रद्द केले आहेत; मात्र इतकेंच कीं, अशा रद्द करण्यानें कोणत्याहि मनुष्याच्या, सदरहू कायद्यांपैकीं कोणत्याही कायद्याअन्वयें तो देणें असलेली कोणतीहि रकम देण्याच्या पात्रतेस बाध येतो असें समजूं नये.

३. अर्थाचें कलम—ह्या आक्टांत विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर,

(अ) "सरकारचा पगारदार नोकर" या शब्दांत, ज्यानें सरकारी चाकरी सोडली असून ज्यास पेनशन मिळत असेल अशा नोकराचा किंवा जो सरकारचा पुऱ्या वेळाचा नोकर नसून ज्यास सरकारकडून वेतन किंवा फी मिळत असेल अशा इसमाचा समावेश होत नाहीं;

(ब) "तालुका" या शब्दाचा अर्थ, ज्या कोणत्याहि स्थानिक क्षेत्रा- साठीं तालुका बोर्ड स्थापला असेल तें स्थानिक क्षेत्र व त्या क्षेत्राचा कांहीं भाग त्या त्या वेळीं म्युनिसिपल डिस्ट्रिक्टांत किंवा लष्करी छावणींत असेल तो भाग- सुद्धां असा समजावा;

(क) "मामलतदार" या शब्दाचा अर्थ, सिंधमध्यें मुख्त्यारकार असा समजावा; आणि

(ड) ज्या कोणत्याहि शब्दाची किंवा संज्ञेची व्याख्या सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा यांत केलेली असून यांत मागें केलेली नसेल त्या शब्दाचा किंवा संज्ञेचा अर्थ, त्याचा किंवा तिचा जो अर्थ त्या कायद्यांत केला असेल तोच आहे असें समजावें.

## बाब २ री.—लोकल बोर्डांची रचना.

४. (१) जिल्हा लोकल बोर्ड व तालुका लोकल बोर्ड स्थापणें— सरकार सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा याअन्वयें वेळो- वेळीं रचलेल्या प्रत्येक जिल्ह्यासाठीं एक जिल्हा लोकल बोर्ड स्थापील आणि सदरहू जिल्ह्यांतील अशा क्षेत्रांसाठीं जितके तालुका लोकल बोर्ड त्यास योग्य वाटतील तितके स्थापन करण्याचा त्यास अधिकार आहे.

(२) लोकल फंडाची व्यवस्था ह्या आक्टाच्या ठरावांअन्वयें स्थापन झालेल्या लोकल बोर्डांनीं केली पाहिजे.

(३) जिल्हा लोकल बोर्डास व जिल्हा लोकल बोर्डाच्या अधिकारास पात्र राहून तालुका लोकल बोर्डास तो ज्या क्षेत्रासाठीं त्याचा जो भाग त्या त्या वेळीं म्युनिसिपल डिस्ट्रिक्टाच्या किंवा क्यांटोनमेंटाच्या हद्दींत असेल असा भाग खेरीज करून स्थापन करण्यांत आला असेल अशा क्षेत्रावर या आक्टाच्या कारणांसाठीं अधिकार असेल.

(४) सन १८८४ च्या मुंबईच्या लोकल बोर्ड आक्टाअन्वयें स्थापलेला आणि हा आक्ट अमलांत येण्याच्या लगत पूर्वी अस्तित्वांत असलेला कोणताहि लोकल बोर्ड ह्या आक्टाअन्वयें स्थापन केला आहे असें समजलें पाहिजे;

आणि सर्व मिळकत, कर्जें, जबाबदाऱ्या, करार, कबुलायती, दिवाणी व फौजदारी कामें आणि दुसरी कोणतीहि बाबत अगर गोष्ट यांसंबंधानें अशा कोणत्याही लोकल बोर्डाचे हक्क व जबाबदाऱ्या याप्रमाणें स्थापन झाला आहे असें समजण्यांत येणाऱ्या लोकल बोर्डाला प्राप्त झाल्या आहेत असें समजलें जाईल;

आणि कलम २ अन्वयें रद्द केलेले आक्ट खेरीज करून इतर कोणत्याही कायद्याअन्वयें, अगर ह्या आक्टाच्या ठरावांस जेथवर सुसंगत असेल तेथवर, अशा रीतीनें रद्द केलेल्या कोणत्याही आक्टाअन्वयें अशा कोणत्याहि लोकल बोर्डासंबंधानें केलेली, काढलेली अगर घातलेली कोणतीहि नेमणूक, जाहिर-नामा, नोटीस, कर, हुकूम, योजना, लैसेन्स, परवानगी, कानू, पोट—फायदा अगर नमुना अशा कायद्याअन्वयें किंवा या आक्टाअन्वयें केलेल्या किंवा काढ-लेल्या किंवा घातलेल्या नेमणुकीनें,जाहिरनाम्यानें,नोटिशीनें,करानें, हुकुमानें, कोण-त्याहि योजनेनें, लैसेन्सनें, परवानगीनें, कानूनें, पोट कायद्यानें अगर नमुन्यानें रद्द झाली नसेल तर व तोंपर्यंत या आक्टाअन्वयें याप्रमाणें स्थापन झाली आहे असें समजण्यांत येणाऱ्या लोकल बोर्डाच्या संबंधानें अनुक्रमें अशा कायद्याच्या किंवा या आक्टाच्या ठरावांअन्वयें करण्यांत आली अगर घालण्यांत आली असें सम-जलें जाईल.

५. (१) लोकल बोर्डाची रचना—प्रत्येक जिल्हा-लोकल-बोर्ड व प्रत्येक तालुका लोकल-बोर्ड हे—

(अ) निवडलेले मेंबर आणि

(ब) सरकार किंवा ज्या कोणत्याहि अमलदारास तें याबाबद अधि-कार देईल तो अमलदार वेळोवेळीं नेमील असे कांहीं मनुष्य असले तर ते मनुष्य,—यांस "नेमलेले मेंबर" असें म्हणावें—मिळून होतील.

(२) सदरहू अधिकारी सरकारच्या कोणत्याहि अमलदारास, त्याच्या फक्त हुद्याच्या नांवानेंच बोर्डाचा हुद्याच्या नात्यानें मेंबर म्हणून नेमण्यास मुखत्यार आहे. त्या त्या वेळीं हुद्दा धारण करणारा व मागून त्या जागेवर येणारे सर्व इसम हे नंतर बोर्डाचे अनुक्रमानें मेंबर होतील; मात्र इतकेंच कीं, बोर्डाचे मेंबर म्हणून अशा इसमांच्या हुद्याची संयुक्त मुदत हुद्याच्या नात्यानें असेल तें खेरीजकरून इतर रीतीनें मेंबर म्हणून नेमिलेल्या इसमाच्या हुद्याच्या मुदतीसाठीं या आक्टांत ठरविलेल्या रीतीनें मर्यादित असेल.

(३) निवडलेल्या मेंबरांची संख्या, सगळ्या बोर्डाच्या तीनचतुर्थांहून कमी असतां नये आणि नेमलेल्या मेंबरांपैकीं निम्याहून जास्त सरकारचे पगारदार नोकर असूं नयेत.

(४) जेव्हां सरकारच्यामतें लोकल बोर्डास पात्र असलेल्या क्षेत्रांत जो वर्ग सरकारच्यामतें अस्पृश्य वर्ग आहे असें असेल अशा कोणत्याहि वर्गाची संख्या लोकल बोर्डांत प्रतिनिधि असण्यास पुरेशी आहे व अशा वर्गाचा

एखादा इसम लायक असेल व बोर्डाचा मेंबर म्हणून नेमला जाण्यास खुषी असेल तेव्हां असा एक इसम सरकारनें लोकल बोर्डाचा मेंबर म्हणून नेमिला पाहिजे.

( ५ ) कोणत्याहि निवडणुकीच्या अगर पोटनिवडणुकीच्या वेळीं निवडलेल्या मेंबरांची पूर्ण संख्या निवडण्यास कसूर झाल्यामुळें रिकामी राहिलेली कोणतीहि जागा सरकारनें नेमणुकीनें भरावी.

६ लोकल बोर्डाचे निवडावयाचे मेंबर कोणीं निवडणें—लोकल बोर्डाचे निवडावयाचे मेंबर सामान्य व मुसलमान मतदारसंघांनीं निवडले पाहिजेत आणि अशा मतदारसंघांची संख्या व व्याप्ति आणि प्रत्येक मतदारसंघानें निवडावयाच्या मेंबरांची संख्या १३३ व्या कलमाच्या (अ) रकमेअन्वयें सरकारनें केलेल्या हुकुमांत ठरविल्याप्रमाणें असेल.

७ ( १ ) विशेष प्रसंगीं लोकल बोर्डाची रचना—सरकारास मुंबई सरकारी ग्याझेटांत कोणत्याहि वेळीं जाहिरनामा प्रसिद्ध करून असें फर्माविण्याचा अधिकार आहे कीं, कलमें ५ व ६ यांतील ठराव व या आक्टांतील नंतरच्या ज्या ठरावांचा त्या कलमांशीं संबंध असेल ते नंतरचे ठराव किंवा सदरहू ठरावांपैकीं कोणताहि एक किंवा अधिक ठराव कांहीं विशेष कारणांसाठीं ज्या कोणत्याहि लोकल बोर्डास अयोग्य आहेत असें सरकारास वाटेल ते अशा लोकल बोर्डास लागू नयेत, मात्र तीं विशेष कारणें सदरहू जाहिरनाम्यांत लिहिलीं पाहिजेत.

( २ ) सदरहू जाहिरनाम्यांत किंवा वर सांगितल्याप्रमाणें प्रसिद्ध केलेल्या नंतरच्या कोणत्याहि जाहिरनाम्यांत सरकार जो किंवा जे ठराव कोणत्याहि लोकल बोर्डास लागू नाहीं अगर नाहींत असें ठरविलें असेल त्याच्या किंवा त्यांच्या बदला जो किंवा जे जे ठराव आपणांस योग्य वाटेल किंवा वाटतील तो किंवा ते दाखल करण्यास मुखत्यार आहे आणि याप्रमाणें दाखल केलेला किंवा दाखल केलेले ठराव या आक्टांत दाखल केले असल्याप्रमाणेंच अशा बोर्डाचा संबंध असेल तेवढ्यापुरते चालतील.

( ३ ) (१) ल्या पोटकलमान्वयें प्रसिद्ध केलेला कोणताहि जाहिरनामा रद्द करण्यांत येईल तेव्हां ज्या लोकल बोर्डास तो लागू असेल तो लोकल बोर्ड, सरकार याबाबत जी तारीख ठरवील त्या तारखेपासून कलमें ५ व ६ यांअन्वयें आणि या आक्टांतील नंतरच्या ज्या ठरावांचा संबंध त्या कलमांशीं असेल ते ठराव यांअन्वयें रचला पाहिजे.

८ लोकल बोर्डाच्या निवडणुकीसाठीं जरूर असलेल्या लायकी—ज्या मनुष्याचें नांव एखाद्या लोकल बोर्ड मतदारसंघासाठीं कलम ११ अन्वयें तयार

केलेल्या यादींत दाखल करण्यांत आलें असेल अशा मनुष्यास ह्या आक्टाच्या किंवा त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या दुसऱ्या कोणत्याहि कायद्याच्या ठरावांस पात्र राहून अशा मतदारसंघांतील कोणत्याहि निवडणुकीच्या वेळीं उमेदवार होतां येईल.

९ (१) मेंबरांच्या सामान्य नालायक्या—जो कोणताहि मनुष्य—

(अ) वयानें २१ वर्षांहून कमी असेल किंवा

(ब) दिवाणी कोर्टाचा जज्ज असेल किंवा

(क) (१) ज्याला कोणत्याहि फौजदारी कोर्टानें सहा महिन्यांहून अधिक मुदतीपर्यंत कैदेची शिक्षा देतां येण्याजोग्या अपराधासाठीं कैदेची किंवा फटके मारण्याची शिक्षा दिलेली असून किंवा काळें पाण्यावर पाठविण्याची शिक्षा दिलेली असून अशी शिक्षा नंतर फिरविलेली नसेल किंवा रद्द केलेली नसेल असा मनुष्य किंवा

(२) सन १८९८ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचें कलम ११० अन्वयें चालविलेल्या कामांत सदरहू कायद्याचें कलम ११८ अन्वयें ज्या मनुष्याविरुद्ध हुकूम झाला असेल असा मनुष्य असेल आणि असा हुकूम नंतर फिरविलेला किंवा रद्द केलेला नसेल किंवा

(३) ज्याला सरकारी नोकरींतून बडतर्फ केलें असेल आणि अशी बडतर्फी मुंबई सरकारी गॅझेटांत जाहीर करण्यांत आली असेल किंवा

(४) जो प्लीडर असून ज्याची सनद हैकोर्टानें कायमची काढून घेतली असेल किंवा

(५) ज्याला ३१ व्या कलमान्वयें हुद्यावरून दूर केलें असेल

आणि अशी शिक्षा, हुकूम, बडतर्फी, सनद काढून घेणें किंवा हुद्यावरून दूर करणें ह्यांची मुदत संपण्याच्या तारखेपासून पांच वर्षें पुरीं झालीं नसतील. आणि ज्याला अशा शिक्षेमुळें, हुकुमामुळें, बडतर्फीमुळें, सनद काढून घेण्यामुळें किंवा हुद्यावरून दूर केल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या नालायकींतून मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केलेल्या सरकारच्या हुकुमानें मुक्त केलेले नसेल, तो मनुष्य लोकल बोर्डाचा मेंबर होऊं शकणार नाहीं किंवा जो कोणताहि मनुष्य—

(ड) प्लीडर असून ज्याची सनद हैकोर्टाच्या अखेरच्या हुकुमानें महकूब करण्यांत आली असेल तो, अशा महकुबीच्या मुदतींत,

खुलासाः—हैकोर्ट या संज्ञेंत सिंधमधील ज्युडिशिअल कमिशनराच्या कोर्टाचा समावेश होतो किंवा

(इ) लोकल बोर्डाचा पगारी अमलदार किंवा नोकर असेल, किंवा

(फ) ज्याचा लोकल बोर्डाच्या हुकुमानें केलेल्या कोणत्याहि कामांत किंवा लोकल बोर्डाशीं, लोकल बोर्डाच्या पोटीं, लोकल बोर्डानें किंवा लोकल बोर्डाच्या वतीनें केलेल्या कोणत्याहि करारांत किंवा सोंपलेल्या कोणत्याहि कामकाजांत स्वतःचा किंवा स्वतःच्या भागीदारामार्फत कोणताहि हिस्सा किंवा हितसंबंध प्रत्यक्ष किंवा पर्यायानें असेल,

तो मनुष्य लोकल बोर्डाचा मेंबर होऊं शकणार नाहीं.

(२) जो कोणताहि मनुष्य—

(अ) ज्याचा जी कोणतीहि जाइंट स्टॉक कंपनी किंवा सन १९१२ च्या सहकारी मंडळ्यांबाबत आक्टान्वयें नोंदलेली अगर नोंदलेली म्हणून समजली जाणारी कोणतीहि मंडळी लोकल बोर्डाशीं करार करील किंवा त्याकडून अगर त्याच्या वतीनें कामावर लावली जाईल त्या कंपनींत शेर किंवा मंडळींत शेर अगर हितसंबंध आहे; किंवा

(ब) ज्याचा हिस्सा किंवा हितसंबंध लोकल बोर्डाच्या कामकाजासंबंधाची कोणतीहि जाहिरात ज्या कोणत्याहि वर्तमानपत्रांत देण्यांत येईल अशा वर्तमानपत्रांत आहे; किंवा

(क) लोकल बोर्डानें अगर त्याच्या वतीनें उभारलेल्या कोणत्याहि कर्जांत डिबेंचर धारण करीत आहे किंवा इतर रीतीनें संबंध आहे; किंवा

(ड) लोकल बोर्डाच्या वतीनें लीगल प्राक्टिशनर म्हणून धंद्याच्या नात्यानें कामावर आहे;

तो मनुष्य याच कारणानें केवळ लोकल बोर्डाचा मेंबर होण्यास पोट कलम (१) रकम (फ) अन्वयें नालायक होणार नाहीं.

(३) जर कोणताहि इसम लोकल बोर्डात निवडण्यांत येईल किंवा नेमण्यांत येईल, आणि या कलमांत निर्दिष्ट केलेल्या नालायकींपैकीं कोणत्याहि नालायकीस तो पात्र असेल तर त्याची जागा रिकामी आहे असें समजलें पाहिजे, व ती रिकामी जागा, सोईनें होईल तितक्या लवकर प्रसंगाप्रमाणें, तेथें एखाद्या इसमाची निवडणूक अगर नेमणूक करून भरली पाहिजे, व तो ज्याच्या जागीं त्यास निवडण्यांत किंवा नेमण्यांत आलें असेल, तो बोर्डाचा मेंबर असण्यास लायक असता तर त्यानें ती जागा जितक्या वेळपर्यंत धारण केली असती तितका वेळपर्यंतच धारण करील.

(४) या कलमान्वयें कोणतीहि जागा रिकामी झाली आहे किंवा कसें असा कोणताहि प्रश्न, वाद किंवा संशय उत्पन्न होईल, तर कमिशनरचा हुकूम अशा प्रश्नाच्या, वादाच्या किंवा संशयाच्या निर्णयाच्या कारणासाठीं अखेरचा समजावा.

१०. मेंबरांची पुनः नेमले जाण्याची योग्यता—ज्या कोणा मनुष्यास एका किंवा अधिक प्रसंगीं बोर्डाचा मेंबर पूर्वी निवडलेलें असेल किंवा नेमलेलें असेल, तो जर एऱ्हवीं योग्य रीतीनें लायक असेल, तर तो कोणत्याहि वेळीं पुनः निवडला जाण्यास किंवा पुनः नेमला जाण्यास योग्य होईल.

११. (१) मत देणारांच्या यादी तयार करणें—कलेक्टरानें त्याच्या जिल्ह्यांतील प्रत्येक लोकल बोर्डाच्या प्रत्येक मतदारसंघाकरितां, लोकल बोर्डाच्या मेंबरांच्या निवडणुकीच्या वेळीं अशा संघांत मत देण्यास लायक असलेल्या मनुष्यांची एक यादी ठेवली पाहिजे.

(२) ज्या मनुष्यांच्या हुद्याची मुदत संपली आहे अशा मनुष्यांच्या जागा भरण्याकरितां मनुष्यांच्या कोणत्याहि निवडणुकीसाठीं तारीख नेमण्यांत आली असेल अगर अशी यादी कमिशनर तयार करण्याविषयीं फर्मावील तेव्हां तेव्हां कलेक्टरानें तयार केली पाहिजे, आणि ती यादी कलेक्टराच्या आणि त्याच्या हाताखालील अमलदारांच्या दफ्तरांत मिळण्याजोग्या असणाऱ्या माहितीच्या आधारानें व तसेंच सन १८८४ च्या मुंबईच्या लोकल बोर्ड आक्टाच्या २२ व्या कलमान्वयें किंवा १३ व्या कलमान्वयें कलेक्टरानें पूर्वी केलेल्या ठरावांच्या आधारानें केली पाहिजे.

१२. (१) सदरहू यादी प्रसिद्ध करणें—कलम ११ अन्वयें तयार केलेली यादी प्रसिद्ध करणें ती लोकल बोर्डाच्या आणि प्रत्येक मामलतदाराच्या व महालकऱ्याच्या कचेरींतील किंवा कचेरीजवळील कोणत्या तरी प्रसिद्ध जागेंत आणि त्या जिल्ह्यांतील प्रत्येक कसब्याच्या किंवा गांवाच्या चावडींत किंवा दुसऱ्या कोणत्या तरी सार्वजनिक इमारतींत सदरहू यादीची अगर अशा यादीचा जितका भाग अशा तालुक्यास, कसब्यास किंवा गांवास लागू असेल तितक्या भागाची नक्कल लावून, प्रसिद्ध केली पाहिजे.

(२) वर सांगितल्याप्रमाणें यादी प्रसिद्ध करणें ती, जिल्ह्याच्या देश-भाषेंत आणि ज्या मेंबरांच्या हुद्याची मुदत संपली असेल त्यांच्या जागा भरण्या-साठीं मनुष्यांची कोणतीहि निवडणूक करण्याकरितां तारीख नेमण्यांत आली असेल तेव्हां अशा तारखेपूर्वी निदान तीन महिने प्रसिद्ध केली पाहिजे.

१३. यादींची तपासणी—सदरीं सांगितलेली यादी प्रसिद्ध झाल्यानंतर एका महिन्याच्या आंत, कोणत्याहि वेळीं, लोकल बोर्डाच्या मेंबरांच्या कोणत्याहि निवडणुकीच्या वेळीं मत देण्याविषयीं लायक असल्याबद्दल दावा सांगणाऱ्या कोणत्याहि मनुष्यानें कलेक्टरास अर्ज केला असतां, त्या यादींतील कोणताहि चुकीचा मजकूर नीट करण्यास, किंवा ज्या कोणत्याहिं मनुष्याचा त्या यादींत नांव दाखल करण्याविषयींचा हक्क कलेक्टराच्या खालीलायक शाबित झाला असेल त्याचें नांव दाखल करण्यास कलेक्टर मुखत्यार आहे. कलेक्टरचा ठराव अखेरचा व निर्णायक असेल.

१४. (१) यादी अखेरची प्रसिद्ध करणें. निवडलें जाण्याविषयींच्या किंवा मत देण्याविषयींच्या हक्काचा यादी निरुत्तर पुरावा असणें—कलेक्टरानें, १३ व्या कलमांत ठरविल्याप्रमाणें यादी तपासल्यानंतर १२ व्या कलमान्वयें प्रसिद्धीच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आंत त्या कलमांत ठरविलेल्या रीतीनें ती पुन्हां प्रसिद्ध केली पाहिजे.

(२) कोणतीहि निवडणूक करण्याच्या तारखेपूर्वी शेवटीं प्रसिद्ध झालेल्या तपासलेल्या यादींत ज्या कोणा मनुष्याचें नांव नसेल, तो अशी यादी ज्या मतदारसंघाकरितां तयार करण्यांत आली असेल त्या संघासाठीं मेंबर निवडला जाण्यास किंवा मेंबराच्या निवडणुकीच्या वेळीं मत देण्यास लायक होणार नाहीं.

१५. (१) कोणते मनुष्य निवडणुकींच्या वेळीं मतदार असूं शकतील—ह्या आक्टाअन्वयें किंवा त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या दुसऱ्या कोणत्याहि कायद्याअन्वयें ते नालायक नसतील तर खालीं लिहिलेल्या मनुष्यांस अशा मतदारसंघांत तालुका लोकल बोर्डाच्या मेंबरांच्या निवडणुकींच्या वेळीं मत देण्यास त्यास लायकी देणाऱ्या ६ व्या कलमाअन्वयें ठरविलेल्या मतदारसंघाच्या यादींत आपलीं नांवें दाखल करविण्याचा हक्क आहे, ते मनुष्य बितपशीलः—

ज्या तारखेस ती यादी १२ व्या कलमाअन्वयें प्रसिद्ध करण्यांत आली असेल त्या तारखेच्या लगत पूर्वीच्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस ज्या मनुष्याचें त्या तालुक्यांत राहण्याचें ठिकाण असेल आणि ज्यानें—

(अ) (१) सिंधमध्यें ज्या जमिनीवर १२ व्या कलमाअन्वयें सदरहू यादी प्रसिद्ध करण्याच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या पांच महसुली वर्षांतील कोणत्याहि एका वर्षी, ८ रुपयांहून कमी नाहीं इतका आकार देण्यांत आला असेल अथवा जर ती जमीन दुमाला नसती तर देण्यांत आला असता अशी दुमाला किंवा बिनदुमाला जमीन सदरीं सांगितलेल्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस स्वतःच्या हक्कानें धारण केली असेल किंवा कायमचें कूळ म्हणून अथवा सरकारकडून पट्ट्यानें घेणारा म्हणून तिचा भोगवटा केला असेल; किंवा

(२) सिंध शिवाय करून मुंबई इलाख्याच्या दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं ८ रुपयांहून कमी नाहीं इतक्या जमीनमहसुलाची आकारणी केलेली किंवा आकारणी बसवितां येण्याजोग्या किंमतीची दुमाला अथवा बिनदुमाला जमीन सदरीं सांगितलेल्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस, स्वतःच्या हक्कानें धारण केली असेल किंवा ज्यानें कूळ या नात्यानें तिचा भोगवटा केला असेल; किंवा

(ब) सदरीं सांगितलेल्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस, ८ रुपयांहून कमी नाहीं इतका खालीलप्रमाणें तबदील करून दिलेल्या व मुंबई इलाख्यांत असलेल्या जमिनीसंबंधानें घ्यावयाचा खंड किंवा जमीनमहसूल घेण्याविषयींचा सरकारचा हक्क ज्याला तबदील करून देण्यांत आला असेल किंवा जो सदरहू इलाख्यांतील खोत असेल अथवा खोती गांवांतील हिस्सेदार असेल किंवा भागदारी अथवा नर्वादारी गांवांतील हिस्सेदार असेल अथवा तालुकदारी इस्टेटींतील तालुकदार किंवा हिस्सेदार असून ८ रुपयांहून कमी नाहीं इतका जमीनमहसूल देण्यास जबाबदार असेल; किंवा

(क) ज्याच्यावर ज्या सालीं १२ व्या कलमाअन्वये यादी प्रसिद्ध करण्यांत आली त्या सालाच्या पूर्वीच्या नगदी सालांत, (टोल किंवा आक्ट्राय खेरीज करून) एखाद्या लोकल बोर्डाकडून बसविण्यांत आलेला कोणताहि कर आकारण्यांत आला असेल.

(२) अशा रीतीनें नालायक नसतील तर, खालीं लिहिलेल्या मनुष्यांस, अशा मतदारसंघांतील जिल्हा लोकल बोर्डाच्या मेंबरांच्या निवडणुकींच्या वेळीं त्यांस मत देण्यास लायक ठरविणाऱ्या ६ व्या कलमाअन्वयें ठरविलेल्या मतदारसंघाच्या यादींत आपलीं नांवें दाखल करविण्याचा हक्क आहे; ते मनुष्य बिनतपशील :—

ज्या तारखेस ती यादी १२ व्या कलमाअन्वयें प्रसिद्ध करण्यांत आली असेल अशा तारखेच्या लगत पूर्वीच्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस ज्या मनुष्याचें त्या जिल्ह्यांत रहाण्याचें ठिकाण असेल, आणि ज्यानें—

(अ) (१) सिंधमधील कोणत्याही मतदारसंघाच्या बाबतींत, ज्या जमिनीवर यादी १२ व्या कलमान्वयें प्रसिद्ध झाल्याच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या पांच महसुली वर्षांतील कोणत्याही एका वर्षी, अपर सिंध फ्रांटिअर जिल्ह्यांत रु. १६ यांहून कमी नाहीं इतका जमीन महसुलाचा आकार आणि दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं ३२ रुपयांहून कमी नाहीं इतका जमीनमहसुलाचा आकार देण्यांत आला असेल अथवा जर ती जमीन दुमाला नसती तर देण्यांत

आला असता अशी दुमाला किंवा बिनदुमाला जमीन सदरीं सांगितलेल्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस सिंधमध्यें स्वतःच्या हक्कानें धारण केली असेल किंवा कायमचें कूळ म्हणून अथवा सरकारकडून पट्टयानें घेणारा म्हणून तिचा भोगवटा केला असेल; किंवा

(२) मुंबई इलाख्यांतील दुसऱ्या कोणत्याही मतदारसंघाच्या बाबतींत, पंचमहाल किंवा रत्नागिरी जिल्ह्यांत रु. १६ यांहून कमी नाहीं इतक्या जमीनमहसुलाची आणि इतर ठिकाणीं रु. ३२ यांहून कमी नाहीं इतक्या जमीनमहसुलाची आकारणी केलेली किंवा आकारणी बसवितां येण्याजोग्या किंमतीची सिंध शिवाय करून मुंबई इलाख्यांतील कोणत्याही जागीं दुमाला अथवा बिनदुमाला जमीन सदरीं सांगितलेल्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस स्वतःच्या हक्कानें धारण केली असेल किंवा ज्यानें कूळ या नात्यानें तिचा भोगवटा केला असेल; किंवा

(ब) सदरीं सांगितलेल्या जानेवारीच्या १ ल्या तारखेस, पंचमहाल अथवा रत्नागिरी किंवा अपर सिंध फ्रान्टिअर जिल्ह्यांत रु. १६ हून कमी नाहीं इतका आणि इतर ठिकाणीं रु. ३२ हून कमी नाहीं इतका, याप्रमाणें तबदील करून दिलेल्या व मुंबई इलाख्यांत असलेल्या जमिनीसंबंधानें घ्यावयाचा खंड किंवा जमीनमहसूल घेण्याविषयींचा सरकारचा हक्क ज्याला तबदील करून देण्यांत आला असेल किंवा जो सदरहू इलाख्यांतील खोत असेल अथवा खोती गांवांतील हिस्सेदार असेल किंवा भागदारी अथवा नर्वादारी गांवांतील हिस्सेदार असेल अथवा तालुकदारी इस्टेटींतील तालुकदार किंवा हिस्सेदार असून पंचमहाल अथवा रत्नागिरी जिल्ह्यांत किंवा अपर सिंध फ्रांटिअर जिल्ह्यांत रु. १६ हून कमी नाहीं इतका जमीन महसूल आणि इतर ठिकाणीं रु. ३२ हून कमी नाहीं इतका जमीन महसूल देण्यास जबाबदार असेल; किंवा

(क) ज्याच्यावर ज्या सालीं १२ व्या कलमान्वयें यादी प्रसिद्ध करण्यांत आली असेल त्या सालाच्या पूर्वीच्या नगदी सालांत (टोल किंवा आक्ट्राय खेरीज करून) लोकल बोर्डानें बसविलेला कोणताही कर आकारण्यांत आला असेल.

(३) मात्र इतकेंच कीं,—

(अ) मुसलमानखेरीज दुसऱ्या कोणत्याही इसमास मुसलमान मतदारसंघाच्या यादींत दाखल करतां कामा नये; आणि

(ब) सामान्य मतदारसंघाच्या यादींत मुसलमान असलेल्या कोणत्याही इसमास दाखल करतां कामा नये.

(४) या कलमाच्या कारणांसाठीं—

(अ) "धारण करणारा" या संज्ञेचा अर्थ जमिनीचा कायदेशीर रीतीनें कबजा असणारा मनुष्य असा आहे, मग असा कबजा प्रत्यक्ष असो अगर नसो;

(ब) "कूळ" या शब्दाचा अर्थ, पट्ट्यानें घेणारा असा आहे, मग तो एखाद्या लेखाअन्वयें अगर तोंडीं कबुलायतीनें धारण करीत असो, व त्यांत कुळाच्या हक्कांच्या कबजेगहाणदाराचा समावेश होतो;

(क) जेव्हां कोणतीहि मिळकत एकाद्या एकत्र कुटुंबाच्या इसमांनीं सामायिकपणें धारण केलेली असेल अगर त्यांचे भोगवटयांत असेल अगर पैसे दिले किंवा घेतले असतील तेव्हां जरूर ती लायकी आहे किंवा नाहीं हें ठरविण्यासाठीं तें कुटुंब एक व्यक्ति असें समजलें जाईल; आणि जर ती लायकी असेल तर अशा मिळकतीच्या अगर पैशाच्या संबंधानें कुटुंबाचा म्यानेजरच फक्त मत देणारा म्हणून लायक होईल;

(ड) जो कोणताही मनुष्य ट्रस्टीच्या नात्यानें कोणतीहि मिळकत धारण करीत असेल अगर ती त्याच्या भोगवटयांत असेल किंवा कोणताही पैसा देत असेल अगर घेत असेल तो अशा मिळकतीच्या अगर पैशाच्या संबंधानें कोणत्याही मतदारसंघासाठीं मत देणारा म्हणून लायक असणार नाहीं;

[इ] एकाद्या गांवांत आकारणी झालेल्या जमिनीवरील साऱ्याचा सरासरी दर अगर सदरहू गांवांत अशी जमीन नसेल तर, अशी जमीन असलेल्या अगदीं जवळच्या गांवांतील आकारणी केलेल्या जमिनीवरील साऱ्याचा सरासरी दर अशा गांवांतील आकारणी न झालेल्या जमिनीची सारा देण्याची किंमत आकारण्यासाठींचा दर आहे असें समजावें;

(फ) जमीन महसुलाची अगर कराची कोणतीही आकारणी अगर तो देणें यांच्या संबंधाच्या कोणत्याही यादींत दाखल करावयाचा कोणताही हक्क ठरविण्याच्या कारणाकरितां अशा आकारणीची अगर देण्याची रकम दिलेल्या कोणत्याही मुलकी अगर लोकल बोर्डाच्या दप्तरांतील नोंद अशा आकारणीच्या अगर देण्याच्या रकमेबद्दल निर्णायक पुरावा असेल.

१६. मत देणारांची सामान्य नालायकी—जो कोणताही मनुष्य वयानें एकवीस वर्षांहून कमी असेल त्यास आपलें नांव १५ व्या कलमाअन्वयें तयार केलेल्या यादींत दाखल करविण्याचा हक्क नाहीं.

१७. निवडी केव्हां करणें—ह्या आक्टाच्या कारणासाठीं करणें अवश्य असेल अशी प्रत्येक निवडणूक या बाबतींत कलेक्टर ठरवील अशा तारखेस केली पाहिजे.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, ज्या मेंबरांच्या हुद्याच्या मुदती संपल्या असतील त्या मेंबरांच्या जागा भरण्यासाठीं निवडणुकी करणें असतील तेव्हां अशा तारखा ज्या बोर्डासाठीं अशा निवडणुकी करावयाच्या असतील त्या बोर्डाच्या मेंबरांच्या हुद्याची मुदत सुरू होण्याच्या पूर्वी दोन महिन्यांहून अधिक लौकर नाहींत व एक महिन्याहून उशिरां नाहींत अशा असल्या पाहिजेत.

१८. (१) विवक्षित बाबतींत निवडणुकीसाठीं किंवा नेमणुकीसाठीं ठराव—या आक्टाअन्वयें एकाद्या लोकल बोर्डाच्या एकाद्या मेंबराची कोणतीहि निवडणूक करतेवेळीं हुद्दा पत्करण्यास राजी असलेल्या दोन किंवा अधिक मनुष्यांपैकीं प्रत्येकाच्या तर्फे मतें सारखीं पडतील तर, आणि एका मताची भर घातली असतां त्या मनुष्यांपैकीं कोणत्याहि मनुष्यास निवडला जाण्याचा हक्क मिळत असेल तर कोणत्या मनुष्यास अगर मनुष्यांस असें एक जादा मत देण्यांत आलें आहे असें समजावयाचें तें ठरविणें कलेक्टरानें किंवा ज्या अमलदारास तो याबाबद अधिकार देईल त्यानें, त्याला जी रीति योग्य वाटेल त्या रीतीनें चिठ्या काढून केलें पाहिजे.

[२] अशी कोणतीहि निवडणूक होईल तींत योग्य रीतीनें निवडलेला कोणताहि मनुष्य हुद्दा पत्करीत नाहीं असें म्हणेल, तर अयशस्वी उमेदवारांपैकीं सर्वांत अधिक मतें ज्याच्यातर्फे देण्यांत आलीं असतील व जो हुद्दा पतकरण्यास राजी असेल असा कोणी मनुष्य असल्यास तो मेंबर निवडला गेला असें समजलें पाहिजे.

[३] कोणतीहि चुरशीची निवडणूक होईल तींत मतें देण्यांत आलीं नाहींत किंवा कोणत्याहि कारणामुळें हुद्दा पतकरण्यास राजी अशी लायक मनुष्यांची जरूर ती संख्या निवडली गेली नाहीं असें होईल, तर तालुका लोकल बोर्डाच्या बाबतींत कलेक्टरानें, व जिल्हा-बोर्डाच्या बाबतींत कमिशनरानें, जे मनुष्य निवडले जाण्यास लायक झाले असते अशा मनुष्यांची जरूर ती संख्या नेमली पाहिजे,आणि याप्रमाणें नेमलेले मनुष्य अशा लोकल-बोर्डाचे मेंबर आहेत असें समजलें पाहिजे, जणुं काय ते योग्य रीतीनें निवडलेले होते.

१९. (१) निवडणुकी व्यवहारोपयोगी आहेत किंवा नाहींत याचा निर्णय : जज्जानें करावयाची चौकशी : काम चालविण्याची रीत—एकाद्या लोकल

बोर्डाच्या कोणत्याही मेंबराची कोणतीहि निवडणूक केली असेल ती व्यवहारोपयोगी नाहीं अशाविषयीं, किंवा १८ व्या कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याहि हुकुमाच्या किंवा चालविलेल्या कामाच्या कायदेशीरपणाविषयीं तक्रार असेल, आणि ज्या निवडणुकीसंबंधीं ती तक्रार असेल त्या निवडणुकीच्या वेळीं मत देण्यास लायक असलेल्या कोणत्याहि मनुष्याकडून ती केली जात असेल, तर अशा मनुष्यास, सदरहू निवडणुकीचा निकाल जाहिर रीतीनें सांगितल्याच्या तारखेनंतर, किंवा हुकूम केला किंवा काम चालविलें त्याच्या तारखेनंतर पंधरा दिवसांच्या आंत कोणत्याहि वेळीं, ज्या जिल्ह्यांत ती झाली असेल किंवा झाली पाहिजे होती त्या जिल्ह्याच्या जिल्हा जज्जास अशा तक्रारीचा निकाल करण्यासाठीं अर्ज करण्याचा अधिकार आहे.

(२) सरकारनें मुद्दाम त्या बाबतींसाठीं किंवा सामान्यत: अशा बाबतींसाठीं नेमलेल्या असिस्टंट जज्जाच्या दर्ज्याहून कमी दर्ज्याच्या नसलेल्या जज्जानें नंतर चौकशी केली पाहिजे; आणि असा जज्ज त्यास जरूर वाटेल अशा चौकशीनंतर निवडणुकीचा जाहीर केलेला निकाल, किंवा १८ व्या कलमाअन्वयेंचा कलेक्टरचा हुकूम कायम करणारा किंवा सुधारणारा किंवा निवडणूक रद्द करणारा हुकूम करण्यास मुखत्यार आहे. सदरहू चौकशीच्या कारणांसाठीं सदरहू जज्ज दिवाणी कोर्टाचे कोणतेहि अधिकार चालविण्यास मुखत्यार आहे आणि त्याचा निकाल निर्णायक असेल. जर तो निवडणूक रद्द करील तर नवीन निवडणूक करण्यासाठीं लागलीच तारीख नेमिली पाहिजे व जरूर ती तजवीज केली पाहिजे.

(३). (अ) जर अशी चौकशी केल्यानंतर जज्जास असें आढळून येईल कीं, एकाद्या उमेदवारानें सदरहू निवडणुकीच्या कारणासाठीं (४) थ्या पोट–कलमाच्या अर्थाप्रमाणें लांचलुचपतीची कृति केली आहे, तर त्या जज्जानें सदरहू उमेदवार त्या निवडणुकीच्या कारणासाठीं आणि (२) च्या पोट–कलमाअन्वयें जी नवीन निवडणूक करण्यांत येईल त्या निवडणुकीच्या कारणासाठीं नालायक आहे असें जाहीर केलें पाहिजे आणि असा उमेदवार निवडून आला असेल तर त्याची निवडणूक रद्द केली पाहिजे.

(ब) ज्या कोणत्याहि बाबतीस रकम (अ) लागू नसेल अशा कोणत्याहि बाबतींत दोन किंवा अधिक उमेदवार यांच्या दरम्यान निवडणुकीच्या कायदेशीरपणाबद्दल तक्रार असेल तर जज्जानें अशा प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या मतांची चौकशी व मोजदाद केल्यानंतर ज्या उमेदवाराला सर्वांत अधिक

कायदेशीर मतें मिळालीं असतील तो उमेदवार योग्य रीतीनें निवडून आला आहे असें जाहीर केलें पाहिजे.

मात्र इतकेंच कीं, अशा मोजदादीच्या कारणासाठीं कोणतेंहि मत कोणत्याहि माहीत असलेल्या किंवा माहीत नसलेल्या मनुष्यानें तें देण्यांत किंवा मिळविण्यांत कोणतीहि लांचलुचपतीची कृति केली आहे असें जज्जास आढळून येईल तर कायदेशीर म्हणून समजलें जाणार नाहीं.

(४) जो एखादा इसम—

(अ) कोणत्याहि उमेदवाराच्या बाजूनें मत देण्याकरितां किंवा न देण्याकरितां कोणत्याहि मतदाराचें मन वळविण्याच्या हेतूनें, कोणत्याहि इसमास कोणताहि पैशाचा किंवा मौल्यवान मोबदला देऊं करितो किंवा देतो किंवा वैयक्तिक फायद्याचें कोणतेंहि वचन देतो किंवा दुखापतीची धमकी देतो, किंवा

(ब) मत देणारा इसम नसलेल्या एखाद्या मतदाराच्या नांवानें मत देतो, मत मिळवितो किंवा तें देण्याच्या कामीं साह्य करितो,

त्यानें लांचलुचपतीची कृति केली आहे असें समजलें पाहिजे;

आणि, जर एखाद्या उमेदवाराच्या माहितीनें व संमतीनें किंवा निवडणुकीच्या संबंधांत अशा उमेदवाराच्या सामान्य किंवा विशेष अधिकारपत्राअन्वयें काम करीत असलेल्या एखाद्या इसमाकडून जर एखादी लांचलुचपतीची कृति केली गेली असेल, तर अशा उमेदवाराकडून लांचलुचपतीची कृति केली गेली आहे असें समजलें पाहिजे.

खुलासा.—" वैयक्तिक फायद्याचें वचन " या संज्ञेंत—

( १ ) लोकल बोर्डापुढें विचारासाठीं येणाऱ्या कोणत्याहि विशिष्ट ठरावाच्या बाजूनें किंवा विरुद्ध मत देण्याच्या वचनाचा समावेश होत नाहीं, परंतु

(२) त्यास पात्र राहून, खुद् त्या इसमाच्या फायद्यासाठींच्या किंवा ज्याशीं त्याचा हितसंबंध असेल अशा कोणत्याहि इसमाच्या फायद्यासाठींच्या वचनाचा त्यांत समावेश होतो.

(५) जर निवडणुकीच्या कायदेशीरपणाबद्दल, या बाबतींत कलम १३३ ची रकम (ब) याअन्वयें केलेल्या कानू अमलांत आणण्याचें काम दिलेल्या अंमलदाराकडून केल्या गेलेल्या एखाद्या चुकीच्या आधारावरच किंवा लांचलुचपतीच्या कृतीनें न घडलेला कोणताहि अनियमितपणा किंवा बिनपद्धतशीरपणा यांच्याच केवळ आधारावर तक्रार करण्यांत आली असेल, तर जज्जानें सदर निवडणूक रद्द करतां कामा नये.

(६) जर (३) च्या पोटकलमाच्या (अ) रकमेअन्वयें जज्ज एखादी निवडणूक रद्द करील तर तो, त्यास योग्य वाटल्यास, या कलमाच्या अर्थाप्रमाणें ज्याच्याकडून कोणतीहि लांचलुचपतीची कृति करण्यांत आली असेल असा कोणताहि इसम, पांचाहून जास्त नाहीं इतक्या वर्षांच्या मुदतीपर्यंत कोणत्याहि लोकल बोर्डाचा सभासद होण्यास नालायक असल्याबद्दल जाहीर करण्यास मुखत्यार आहे आणि जज्जाचा निकाल निर्णायक असेल :

मात्र इतकेंच कीं, अशा इसमास सरकारच्या त्याबाबतच्या हुकुमानें कोणत्याहि वेळीं अशा नालायकींतून मुक्त करण्याचा अधिकार आहे.

आणखी असेंहि ठरविण्यांत येत आहे कीं, कोणत्याहि इसमाचे बाबतींत अशा इसमास, अशा प्रकारचा जाहीरनामा कां केला जाऊं नये याबाबत कारण दाखविण्याची संधी दिली गेल्याशिवाय असा कोणताहि जाहीरनामा करतां कामा नये.

२०. लांचलुचपतीच्या कृतीबद्दल मत देणारा नालायक असण्याबद्दल —ज्या कोणत्याहि मनुष्यावर हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या १७१ ई किंवा १७१ फ कलमाअन्वयें अपराधाच्या शाबितीचा ठराव करण्यांत आला असेल किंवा ज्यास निवडणुकीच्या संबंधानें लांचलुचपतीच्या कृतीमुळें पांच वर्षांहून कमी नाहीं इतक्या मुदतीपर्यंत कोणताहि मत देण्याचा हक्क चालविण्यास नालायक ठरविण्यांत आलें असेल असा मनुष्य अशा शाबितीच्या ठरावाच्या किंवा नालायकीच्या तारखेपासून पांच वर्षेंपर्यंत लोकल बोर्डाच्या कोणत्याहि निवडणुकीच्या वेळीं किंवा कोणत्याहि म्युनिसिपल निवडणुकीच्या वेळीं मत देण्यास नालायक असेल.

२१. मेंबरांचीं नांवें मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध करणें—कोणत्याहि लोकल बोर्डासाठीं अखेर निवडलेले मेंबर असतील त्या सर्वांचीं नांवें, आणि त्याप्रमाणेंच त्यासाठीं कांहीं नेमलेले मेंबर असतील तर त्यांचीं नांवें, सोईस पडेल त्याप्रमाणें लवकर मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केलीं पाहिजेत.

२२. (१) अध्यक्षांची निवडणूक—बोर्डानें आपल्या मेंबरांमधून निवडलेला एक अध्यक्ष प्रत्येक लोकल बोर्डाच्या अध्यक्षस्थानीं असेल.

(२) उपाध्यक्ष—तसेंच बोर्डानें आपल्या मेंबरांपैकीं एका मेंबरास उपाध्यक्ष म्हणून निवडलें पाहिजे.

(३) अध्यक्ष व उपाध्यक्ष हे सरकारचे पगारदार नोकर असतां कामा नयेत—सरकारचा पगारदार नोकर, लोकल बोर्डाचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून निवडला जातां कामा नये, आणि अशा कोणत्याहि नोकराची अशी निवडणूक निरर्थक होईल.

२३. (१) अध्यक्षांचीं कामें—लोकल बोर्डाच्या अध्यक्षानें—

(अ) बोर्डाच्या सभांमध्यें प्रमुखस्थानीं बसावें;

(ब) बोर्डाचा जमाखर्च व कारभाराचें काम यांवर नजर ठेवावी व त्यासंबंधीं ज्या गोष्टींबाबद बोर्डाचा हुकूम अवश्य आहे असें त्यास वाटेल त्या सर्व गोष्टी बोर्डापुढें आणाव्या;

(क) कारभाराच्या बाबतींत आणि बोर्डाचे हिशोब व कागदपत्र यांशीं संबंध असलेल्या बाबतींत बोर्डाच्या सर्व अमलदारांचीं व नोकरांचीं कृत्यें व कामें यांवर देखरेख ठेवावी व अधिकार चालवावा; आणि बोर्डानें १२३ व्या कलमान्वयें केलेल्या त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या नियमांस अनुसरून सदर्हू अमलदारांची व नोकरांची चाकरी व त्यांचा पगार, विशेष हक्क व नेमणुकी यांसंबंधीं सर्व तक्रारींचा निकाल करावा; आणि

(ड) कलेक्टरास किंवा कलेक्टर या बाबतींत ज्या दुसऱ्या अमलदारास वेळोवेळीं नेमील त्यास बोर्डाच्या प्रत्येक सभेमध्यें झालेल्या प्रत्येक ठरावाची एक नक्कल व कामिशनर, कलेक्टर किंवा योग्य रीतीनें अधिकार दिलेला सरकारचा इतर अमलदार १२४ व्या कलमान्वयें वेळोवेळीं मागेल अशा बोर्डानें चालविलेल्या कामाच्या टिपणांचा कोणताहि उतारा किंवा दुसरा दस्तऐवज किंवा वस्तु दिली पाहिजे.

(२) अध्यक्षाचे निकडीच्या प्रसंगींचे अधिकार—लोकल बोर्डाच्या मंजुरीची ज्यास जरूर आहे आणि जें तावडतोब पुरें करणें किंवा करणें त्याच्यामतें सार्वजनिक उपयोगासाठीं किंवा सुरक्षिततेसाठीं जरूर असेल असें कोणतेंहि काम किंवा कृत्य पुरें करण्यास किंवा तें बंद करण्यास निकडीच्या प्रसंगीं फर्माविण्याचा लोकल बोर्डाच्या अध्यक्षास अधिकार आहे आणि असें काम पुरें करण्यास किंवा असें कृत्य करण्यास येणारा खर्च लोकल फंडांतून देण्यांत आला पाहिजे असें फर्माविण्याचा त्यास अधिकार आहे.

मात्र इतकेंच कीं,

(अ) कोणतेंहि विशिष्ट काम पुरें करण्याची किंवा कोणतेंहि विशिष्ट कृत्य करण्याची मनाई करणाऱ्या लोकल बोर्डाच्या कोणत्याहि हुकुमाचा भंग करून त्यानें या कलमान्वयें वर्तन करतां कामा नये आणि

(ब) त्यानें या कलमान्वयें केलेली तजवीज व तीबाबतचीं कारणें, स्टॅंडिंग कमिटीस तिच्या लगत पुढच्या सभेच्या वेळीं लागलींच कळविलीं पाहिजेत.

२४ उपाध्यक्षांचीं कामें—लोकल बोर्डाच्या उपाध्यक्षानें—

(अ) अध्यक्ष गैरहजीर असेल तेव्हां बोर्डाच्या सभांमध्यें प्रमुख स्थानीं बसावें;

[ब] अध्यक्षाचे जे अधिकार व जीं कामें अध्यक्ष त्याकडे वेळोवेळीं सोंपवील ते अधिकार चालवावे व तीं कामें करावीं आणि

[क] अध्यक्षाची निवडणूक होईतोंपर्यंत किंवा अध्यक्ष रजेमुळें गैर-हजर असेल तोंपर्यंत अध्यक्षाचे अधिकार चालवावे व त्याचीं कर्तव्यें करावीं.

२५ [१] अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष रजेवांचून गैरहजर राहिल्याचे परिणाम—लोकल बोर्डाचा जो अध्यक्ष तीन महिन्यांहून जास्त मुदतीपर्यंत आणि जो उपाध्यक्ष एक महिन्याहून जास्त मुदतीपर्यंत असा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष या नात्यानें आपलीं कामें करतां येत नाहींत अशा रीतीनें ज्या जिल्ह्याकरितां अगर तालुक्याकरितां लोकल बोर्ड स्थापण्यांत आला असेल अशा जिल्ह्यांतून अगर तालुक्यांतून गैरहजर राहील तर सदरहूप्रमाणें गैरहजर राहण्यास बोर्डानें अगर उपाध्यक्षाच्या बाबतींत अध्यक्षानें रजा दिलेली नसेल तर प्रसंगाप्रमाणें अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष असण्याचा बंद होईल.

[२] रजा देण्यासंबंधीं इयत्ता व अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या गैरहजिरींत करावयाची व्यवस्था—[१] त्या पोटकलमान्वयें द्यावयाची रजा सहा महिन्यांच्या मुदतीहून जास्त देतां कामा नये आणि जेव्हां जेव्हां अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास त्या पोटकलमान्वयें रजा देण्यांत येईल तेव्हां तेव्हां बोर्डानें अध्यक्षाचे अधिकार चालविणाऱ्या व कामें करणाऱ्या उपाध्यक्षाच्या बदला किंवा तो रजेमुळें गैरहजर असेल तेव्हां ज्या मुदतीपर्यंत अशी रजा देण्यांत येईल तींत उपाध्यक्षाचे सर्व अधिकार चालविण्याकरितां व त्याचीं सर्व कामें करण्याकरितां आपल्या मेंबरांपैकीं एक मेंबर निवडला पाहिजे.

२६ [१] अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या हुद्द्यांची मुदत व दूर केलें जाण्याची त्यांची पात्रता—प्रत्येक अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या जागेची मुदत म्हटली म्हणजे तो ज्या लोकल बोर्डाचा अध्यक्ष अगर उपाध्यक्ष असेल त्या बोर्डाचा मेंबर असण्याची त्याची मुदत संपली म्हणजे संपेल. मात्र असें ठर-विलें आहे कीं, तो अशा अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या जागेवरून गैरवर्तणुकी बद्दल किंवा आपल्या कामाच्या हयगयीबद्दल किंवा तो आपलें काम करण्यास असमर्थ असल्याबद्दल सरकारकडून दूर केला जाण्यास पात्र होईल.

[२] त्यांच्या जागा प्रसंगोपात्त रिकाम्या झाल्या असतां कशा भराव्या—आपल्या जागेची मुदत संपण्यापूर्वीं कोणी अध्यक्ष अगर उपाध्यक्ष मेला असतां,

त्यानें राजीनामा दिला असतां किंवा त्यास जागेवरून दूर केलें असतां किंवा तो काम करण्यास असमर्थ झाला असतां किंवा तो लोकल बोर्डाचा मेंबर असण्याचें बंद झाला असतां त्या रिकाम्या जागेवर त्या बोर्डाच्या दुसऱ्या कोणत्या तरी मेंबराची निवड करून ती जागा सोईस पडेल तितकी लवकर भरली पाहिजे.

[ ३ ] सभा बोलावण्यासंबंधानें अध्यक्षाची किंवा उपाध्यक्षाची असमर्थता—जेव्हां अध्यक्ष अगर उपाध्यक्ष [२] ऱ्या पोटकलमान्वयें निवडणुकीच्या कारणाकरितां सभा बोलावण्यास असमर्थ असेल किंवा कोणत्याहि कारणामुळें बोलावण्यास चुकेल तर अशी सभा बोलावण्याच्या कारणाकरितां कलेक्टर अध्यक्षाचे अधिकार चालविण्यास मुखत्यार आहे.

२७ त्यांच्या मागून येणारे लोक चार्ज घेईपर्यंत अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनीं कित्येक कर्तव्यें करीत राहण्याचें चालू ठेवणें—एखाद्या लोकल बोर्डाच्या हुद्याची मुदत संपल्यानंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनीं नवीन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडले जाई तोंपर्यंत व त्यांजकडून आपापल्या कामाचा चार्ज घेतला जाई तोंपर्यंत आपापल्या हुद्यांचीं कारभाराचीं चालू कर्तव्यें करीत राहिलें पाहिजे; मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, या आक्टान्वयें स्थापलेल्या नवीन बोर्डाच्या बाबतींत नवीन अध्यक्षाच्या निवडणुकीकरितां सभा कामावरून दूर होणाऱ्या बोर्डाच्या अध्यक्षानें बोलाविली पाहिजे. कामावरून दूर होणाऱ्या बोर्डाच्या अध्यक्षानें अशा सभेच्या वेळीं अध्यक्षस्थान स्वीकारलें पाहिजे व नंतर नवीन बोर्डानें त्या सभेकरितां आपला स्वतःचा चेअरमन निवडला पाहिजे व नंतर सभेनें नवीन अध्यक्ष निवडण्याचे कामास लागलें पाहिजे.

२८ हुद्याची मुदत—या आक्टांत किंवा त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यांत इतर रीतीनें ठरविलें असेल तें खेरीजकरून लोकल बोर्डाचे मेंबर तीन वर्षें इतक्या मुदतीपर्यंत हुद्यावर असतील. सदर मुदत कमिशनरास जर कोणत्याहि वेळीं ती वाढविणें योग्य वाटेल तर त्याबाबतचीं कारणें व ती तशी वाढविण्याचा हुकूम हीं मुंबई सरकारी गॅझेटांत जाहीर करून एकूण चार वर्षांहून जास्त नाहीं इतक्या मुदतीपर्यंत त्याच्या [कमिशनरच्या] हुकुमानें वाढवितां येईल.

२९ बोर्डाचा मेंबर म्हणून असण्याच्या हुद्याचा राजीनामा—उपाध्यक्षास किंवा अध्यक्षाशिवायच्या लोकल बोर्डाच्या कोणत्याहि मेंबरास अध्यक्षास लेखी नोटीस देऊन बोर्डाचा मेंबर अशा आपल्या हुद्याचा राजीनामा देण्याचा अधिकार आहे. अध्यक्षास बोर्डाचा मेंबर अशा आपल्या हुद्याचा राजीनामा कमिशनरास लेखी नोटीस देऊन देण्याचा अधिकार आहे.

३० [१] निवडणुकीनंतर मेंबर नालायक होणें—लोकल बोर्डाचा कोणताहि मेंबर ज्या मुदतीकरितां त्यास निवडलें किंवा नेमिलें असेल त्या मुदती-मध्यें—

[अ] ९ व्या कलमाच्या [१] ल्या पोटकलमान्वयें नालायक होईल किंवा

(ब) ९ व्या कलमाच्या [२] ऱ्या पोट-कलमाच्या [अ] अगर [ब] रकमेंत वर्णन केलें आहे असा कोणताहि हिस्सा किंवा हितसंबंध असून लोकल बोर्ड व कंपनी अगर मंडळी अगर सदरहू रकमांत वर्णन केलेल्या वर्तमानपत्राचा म्यानेजर अगर प्रसिद्ध करणारा यांच्या दरम्यानच्या करारासंबंधाच्या अगर कबुलायतीसंबंधाच्या कोणत्याहि बाबतींत लोकल-बोर्डाचा मेंबर या नात्यानें कांहीं कृत्य करील, किंवा

[क] सहा महिन्यांतून जास्त नाहीं अशा मुदतीपर्यंत तशा रीतीनें गैर-हजर राहाण्यास बोर्डाकडून अगर उपाध्यक्षाच्या बाबतींत अध्यक्षाकडून परवानगी देण्यांत आलेली असल्याशिवाय, तो बोर्ड ज्या जिल्ह्यासाठीं अगर तालुक्यासाठीं स्थापण्यांत आला असेल, अशा जिल्ह्यांतून अगर तालुक्यांतून लागोपाठ चार महिन्यांतून जास्त गैरहजर असेल किंवा बोर्डाच्या परवानगीशिवाय बोर्डाच्या सभांस लागोपाठ सहा महिने गैरहजर असेल,

तर तो मेंबर असण्याचें बंद होईल व त्याची जागा रिकामी होईल.

[२] या कलमाअन्वयें एकादी जागा रिकामी झाली आहे किंवा कसें असा कोणताहि प्रश्न, वाद किंवा संशय उत्पन्न होईल, तर कमिशनरचा हुकूम अशा प्रश्नाच्या, वादाच्या किंवा संशयाच्या निर्णयाच्या कारणासाठीं अखेरचा समजावा.

३१. गैरवर्तणूक वगैरेमुळें मेंबर हुद्यावरून दूर होणें—जिल्हा लोकल बोर्डाचे बाबतींत सरकारास व तालुका लोकल बोर्डाचे बाबतींत कमिशनरास, जर त्यास योग्य वाटेल तर लोकल बोर्डाचे शिफारशीवरून या आक्टाअन्वयें निवडलेला किंवा नेमलेला अशा लोकल बोर्डाचा जो कोणताहि मेंबर आपल्या कामगिरीच्या बजावणींत गैरवर्तन केल्याचा किंवा कोणतेंहि लाजिरवाणें वर्तन केल्याचा दोषी असेल, किंवा लोकल बोर्डाचा मेंबर या नात्यानें आपली कामगिरी बजावण्यास असमर्थ होईल त्यास त्याचें म्हणणें ऐकून घेण्याची संधि दिल्यानंतर, व प्रसंगाप्रमाणें सरकारास किंवा कमिशनरास जरूर वाटेल अशी चौकशी केल्यानंतर हुद्यावरून दूर करण्याचा अधिकार आहे.

३२. [१] जागा रिकामी झाल्यावर कोणास कळविणें तें—लोकल बोर्डांत कोणतीहि जागा रिकामी पडल्यानंतर अध्यक्षानें तावडतोब ती तशी रिकामी झाल्याबद्दल कलेक्टरास कळविलें पाहिजे.

[२] अशा बोर्डाच्या ज्या मेंबराची जागा रिकामी झाली असेल, तो मेंबर नेमिलेला मेंबर असेल व अशा बोर्डाचे मेंबर नेमण्यास कलम ५ अन्वयें कलेक्टरास अधिकार दिलेला नसेल, तर कलेक्टरानें सदर माहिती मिळाल्यानंतर, ती सदरीं सांगितल्याप्रमाणें अधिकार दिलेला कोणताहि अमलदार असल्यास त्याजकडे, किंवा अशा रीतीनें अधिकार दिलेला कोणताहि अमलदार नसेल, तर कमिशनरच्या मार्फत सरकारकडे, ती कळविली पाहिजे.

३३. प्रसंगोपात्त रिकाम्या झालेल्या जागा कशा भरणें—लोकल बोर्डाचा मेंबर आपल्या हुद्याची मुदत संपण्यापूर्वी मरण पावल्यामुळें, त्यानें राजीनामा दिल्यामुळें किंवा तो नालायक झाल्यामुळें किंवा त्यास काढून टाकल्यामुळें किंवा तो काम करण्यास असमर्थ झाल्यामुळें एकादी जागा रिकामी होईल तर ती जागा जितक्या लवकर सोईनें भरतां येईल तितक्या लवकर एकादा मनुष्य निवडून किंवा नेमून, जसें असेल तसें, भरली पाहिजे, परंतु ज्या मेंबराच्या जागीं अशा मनुष्यास निवडलें असेल किंवा नेमलें असेल त्या मेंबरानें ती जागा रिकामी झाली नसती तर जितके दिवसपर्यंत धारण केली असती तितके दिवस मात्र ती जागा सदरील मनुष्य धारण करील.

३४. ह्या आक्टाअन्वयें बोर्डाची निवडणूक होईतोंपर्यंत तात्पुरते ठराव—या आक्टांत कांहींहि सांगितलें असलें तथापि, कलम ४, रकम [४] अन्वयें या आक्टाच्या ठरावांअन्वयें स्थापन झाले आहेत असें समजण्यांत आलेल्या व या आक्टाचे ठराव अमलांत येण्याच्या लगत पूर्वी रचना झालेल्या लोकल बोर्डांनीं, या आक्टाच्या ठरावांअन्वयें होईल तेथवर, अशा दरेक बोर्डाच्या संबंधानें या बाबतींत सरकार ठरवील त्या तारखेपर्यंत लोकल फंडांचा कारभार चालविला पाहिजे. हा आक्ट पास होण्याच्या लगत पूर्वी रचना झाल्याप्रमाणें अशा बोर्डाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व मेंबर या आक्टाच्या ठरावांअन्वयें नेमलेले किंवा निवडलेले आहेत असें समजावें आणि त्यांच्या हुद्याची मुदत सदरीं सांगितलेल्या ठरविलेल्या तारखेस संपेल.

## बाब ३ री.—लोकल बोर्डाचें कामकाज चालविणें.

३५. [१] लोकल बोर्डाच्या सभा—लोकल बोर्डानें दर ३ महिन्यांत निदान एकापेक्षां कमी नाहीं इतके वेळां सभा भरून जमावें आणि या आक्टास व १३३ व्या कलमाच्या [क] रकमेअन्वयें या बाबतींत सरकारनें केलेल्या कोण-

त्याहि कानूंस किंवा हुकुमांस अनुसरून अशा सभांची जागा, दिवस, वेळ, सूचना, व्यवस्था व तहकुबी यांबाबद, आणि साधारणतः काम चालविण्याबाबद त्यास योग्य वाटतील तसे खालीं लिहिलेल्या पोट-कलमांतील ठरावांस पात्र राहून वेळोवेळीं नियम करावे.

[२] [अ] अध्यक्षानें, यांत पूर्वी ठरविल्याप्रमाणें तिमाही सभांसाठीं तारखा नक्की केल्या पाहिजेत व त्यास योग्य वाटेल तेव्हां तेव्हां एक विशेष सभा बोलवावी, आणि मेंबरांतून एकचतुर्थांशाहून कमी नाहीं इतक्या मेंबरांनीं लेखी विनंति केली असतां व अशी विनंति मिळाल्यापासून एकवीस दिवसांच्या आंत एकाद्या तारखेस त्यानें एक विशेष सभा बोलाविली पाहिजे.

[ब] तिमाही सभेसंबंधाची निवळ एकवीस दिवसांची नोटीस व विशेष सभेसंबंधाची निवळ चवदा दिवसांची नोटीस, ज्या वेळीं व ज्या जागीं अशी सभा भरावयाची असेल ती वेळ व जागा आणि तींत करावयाचें काम निर्दिष्ट करून मेंबरांत फिरविण्यांत आली पाहिजे व लोकल बोर्डाच्या कचेरींत लावण्यांत आली पाहिजे. अशा नोटिशींत विशेष सभेच्या बाबतींत अशा सभेसाठीं केलेल्या कोणत्याहि लेखी विनंतींत सांगितलेली कोणतीहि सूचना किंवा ठराव दाखल केलेला असला पाहिजे.

[क] सभेच्या सुरवातीपासून अखेरपर्यंत कोणत्याहि वेळीं तींत मेंबरांच्या सगळ्या संख्येपैकीं एकतृतीयांशाहून कमी मेंबर हजर असतील तर प्रमुखस्थानीं बसणाऱ्या अधिकाऱ्यानें तो वाजवी रीतीनें ठरवील अशा दुसऱ्या दिवसाच्या वेळेपर्यंत किंवा कोणत्या तरी दुसऱ्या पुढील दिवसाच्या वेळेपर्यंत ती सभा तहकूब ठेविली पाहिजे. अशा तहकुबीची नोटीस लोकल बोर्डाच्या कचेरींत चिकटविली पाहिजे, आणि पूर्वीच्या सभेच्या वेळीं कोरम झालें असतें तर जें काम तिजपुढें आणण्यांत आलें असतें तें काम तहकूब केलेल्या सभेंत आणलें पाहिजे व अशा सभेंत किंवा ती सभा भरविणें पुढें ढकलण्यांत येईल तर तेव्हां त्याचा निकाल करावा, मग तेव्हां कोरम हजर असो अगर नसो.

[ड] बोर्डापुढें चालू असलेली कोणतीहि चौकशी किंवा विचार गुप्तपणें केला पाहिजे अशा प्रकारचा आहे असें प्रमुखस्थानीं बसणाऱ्या अधिकाऱ्यास वाटेल तेवढी बाबत खेरीज करून, प्रत्येक सभेला येण्याविषयीं लोकांस मोकळीक असली पाहिजे; मात्र असें ठरविलें आहे कीं, चाललेल्या कामास कोणताहि मनुष्य हरकत करील त्यास कोणत्याहि वेळीं घालवून देवविण्याचा सदर्हू अधिकाऱ्यास अख्त्यार आहे.

[इ] अध्यक्षानें प्रत्येक सभेंत प्रमुखस्थानीं बसलें पाहिजे, किंवा तो गैरहजीर असेल तर उपाध्यक्षानें बसलें पाहिजे आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष हे दोघेहि गैरहजीर असतील तर हजर असलेल्या मेंबरांपैकीं ती सभा चेरमन म्हणून त्या प्रसंगीं ज्या कोणत्याहि एका मेंबरास पसंत करील त्यानें प्रमुखस्थानीं बसलें पाहिजे.

[फ] सर्व बाबतींचा निकाल हजर असणाऱ्या मेंबरांच्या बहुमताप्रमाणें केला पाहिजे, आणि ज्या बाबतींत दोन पक्ष होऊन उभयपक्षीं सारखीं मतें पडतील त्या सर्व बाबतींत अध्यक्षानें, उपाध्यक्षानें किंवा चेरमनानें जसें असेल तसें दुसरें अगर निर्णायक मत दिलें पाहिजे.

[ग] प्रमुखस्थानीं बसणाऱ्या अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय, ही परवानगी कोणताहि ठराव पास झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आंत त्या ठरावांत फेरफारासाठींच्या अगर रद्द करण्यासाठींच्या सूचनेच्या किंवा ठरावाच्या बाबतींत देतां कामा नये, कोणतीही तिमाहि सभा बोलावण्यासाठींच्या नोटिशींत किंवा विशेष सभेच्या बाबतींत अशा सभेसाठींच्या लेखी विनंतींत कोणतेंहि काम अगर कोणताहि ठराव दाखल केलेला असल्याखेरीज कोणतेंहि काम करतां कामा नये अगर कोणत्याहि ठरावावर वादविवाद करतां कामा नये. ज्या क्रमानें कोणतेंहि काम किंवा ठराव अशा सभेंत आणला पाहिजे तो क्रम प्रमुखस्थानीं बसणाऱ्या अधिकाऱ्यानें ठरविला पाहिजे आणि अशा अधिकाऱ्यानें, अशा कामाच्या कोणत्याहि विवक्षित बाबीस अगर कोणत्याहि विवक्षित ठरावास अग्रत्व देण्याचें कोणत्याहि मेंबरानें सुचविलें असतां ती सूचना सभेपुढें मांडली पाहिजे व त्या सूचनेतर्फे अगर विरुद्ध दिलेल्या मताधिक्याप्रमाणें चाललें पाहिजे.

[ह] कोणतीहि तिमाहि सभा, हजर असलेल्या मेंबरांच्या बहुमत असलेल्या मेंबरांच्या संमतीनें वेळोवेळीं तहकूब करण्याचा अधिकार आहे; परंतु ज्या सभेच्या वेळोवेळीं सभा तहकूब करण्यांत आली त्या सभेंत जें काम निकाल न होतां राहिलें असेल त्याखेरीज कोणतेंहि काम अशा तहकूब केलेल्या कोणत्याहि सभेंत करतां कामा नये.

[आय्] लोकल बोर्डाच्या कोणत्याहि ठरावांत, तो पास झाल्यापासून तीन महिन्यांच्या आंत, रकम (ब) मधील जरूर त्या गोष्टी पुऱ्या करणारी व अशा सभेच्या वेळीं ज्या ठरावांत फेरफार करण्याचें अगर जो ठराव रद्द करण्याचें योजिलें असेल तो ठराव व अशा ठरावांत फेरफार करण्यासाठीं अगर तो रद्द करण्यासाठीं सूचना किंवा ठराव पूर्णपणें असलेली ज्या तिमाही सभेची नोटीस देण्यांत आली असेल अशा सभेंत मेंबरांच्या सर्व संख्येच्या निम्याहून

कमी नाहीं इतक्या मेंबरांनीं पुष्टि दिलेल्या व पास झालेल्या ठरावानें असेल तें खेरीजकरून, कोणताहि फेरफार करतां कामा नये किंवा तो रद्द करतां कामा नये.

[ जे ] ज्या कारणें प्रमुखस्थानीं बसणाऱ्या अधिकाऱ्यास निकडीचीं वाटतील त्या कारणासाठीं मात्र खेरीज करून, बांधलें जात आहे अशा एखाद्या कामासंबंधीं, किंवा जें काम बोर्डासाठीं कलम ४५ याअन्वयें जिल्ह्याच्या सरकारी एक्झिक्यूटिव्ह एंजिनियरास मात्र बांधतां येईल अशा कामासंबंधीं, किंवा विद्येच्या कोणत्याहि बाबतीसंबंधीं कोणतेंहि प्रकरण लोकलबोर्डाच्या कोणत्याहि सभेंत चालविणें तें, सरकारी पब्लिक वर्क्स खात्याचा व शाळाखात्याचा जो कोणताहि अंमलदार बोर्डाचा मेंबर नसेल परंतु ज्यास अशा सभेमध्यें हजर होण्याचा ४० व्या कलमाअन्वयें हक्क असेल अशा अंमलदारास अशा सभेंत असें प्रकरण चालविण्याचा इरादा आहे अशाविषयीं व अशा प्रकरणासंबंधीं ज्या दरखास्ती किंवा सूचना सादर करण्यांत येतील त्यांविषयीं लिहून अशा सभेच्या निदान पंधरा दिवस पूर्वी पत्र पाठविल्यावांचून चालवितां नये.

[ के ] हजर असलेल्या मेंबरांच्या आणि ४० व्या कलमांतील ठरावांअन्वयें कांहीं सरकारी अमलदार हजर असतील तर त्यांच्या नांवाचीं, आणि बोर्डाच्या प्रत्येक सभेमध्यें चालविलेल्या कामांचीं, तसेंच सभेच्या वेळीं हजर असणारा कोणताहि मेंबर इच्छील तर, कोणत्याहि ठरावाच्या तर्फे किंवा त्याच्या विरुद्ध मत देणाऱ्या मेंबरांच्या नांवांचीं टिपणें या कारणासाठीं एक बुक करून ठेवावयाचें त्यांत लिहून ठेविलीं पाहिजेत, आणि त्यांवर जमेल तितकें लवकर अशा सभेच्या अध्यक्षानें, उपाध्यक्षानें किंवा चेअरमनानें सही केली पाहिजे, आणि तीं पहाण्याची बोर्डाच्या कोणत्याहि मेंबरास किंवा त्या जिल्ह्यांतील कोणत्याहि रहिवाशास सर्व वाजवी वेळीं मोकळीक असली पाहिजे.

[ ल ] तालुका-लोकल बोर्डानें या कलमाअन्वयें केलेला प्रत्येक नियम, ज्या जिल्हा लोकलबोर्डाच्या ताब्यांत असा तालुका-लोकल-बोर्ड असेल त्या जिल्हा--लोकल बोर्डाच्या पसंतीवर अवलंबून असला पाहिजे.

[ ३ ] रिकामी जागा झाल्यानें बोर्डाच्या किंवा कमिटीच्या कामास व्यत्यय येत नाहीं—लोकल बोर्डांत कोणतीहि जागा रिकामी असेल त्या मुदतींत, चालू असलेले मेंबर ती जागा रिकामी झालीच नाहीं असें समजून काम करण्यास मुखत्यार आहेत.

[ ४ ] बोर्ड वगैरेचीं कृत्यें पद्धतीविरुद्ध झाल्यामुळें गैरकायदेशीर होत नाहींत—बोर्डाचें, किंवा मेंबर म्हणून अगर अध्यक्ष, उपाध्यक्ष, अगर चेरमन म्हणून काम करणाऱ्या कोणत्याहि मनुष्याचें कोणताहि कृत्य, असा बोर्ड, अध्यक्ष,

उपाध्यक्ष, चेरमन किंवा मेंबर यांच्या नेमणुकींत कांहीं व्यंग होतें इतक्याच कारणावरून, किंवा ते अगर त्यांपैकीं कोणताहि असामी मेंबराच्या हुद्यास नालायक होता, किंवा बोर्डाची सभा भरण्याचा इरादा होता त्याविषयीं रीतीप्रमाणें सूचना योग्यरीतीनें दिली नव्हती या कारणानें, किंवा असेंच कांहीं दुसरे केवळ पद्धतीप्रमाणें न झाल्याकारणानें, गैरकायदेशीर आहे असें समजूं नये.

३६. [ १ ] स्टांडिंग कमिटी—दरेक लोकल बोर्डानें तो ठरवील त्याप्रमाणें सातांहून अधिक नाहीं व पांचांहून कमी नाहीं इतकी मेंबरांची संख्या असणारी एक स्टांडिंग कमिटी नेमिली पाहिजे.

[ २ ] स्टांडिंग कमिटीनें तिच्याकडे या आक्टाअन्वयें वांटून दिलेलीं कामें केलीं पाहिजेत आणि कलम १३३, रकम [ क ] अन्वयें केलेल्या कानूंत अगर कलम ३५ पोट-कलम [ १ ] याअन्वयें केलेल्या नियमांत असलेल्या कोणत्याहि निर्बंधांस अगर इतर ठरावांस पात्र राहून लोकल बोर्डाचे जे अधिकार व कामें इतर कोणत्याहि कमिटीकडे सोंपवून देण्यात आलीं नसतील असे सर्व अधिकार चालविले पाहिजेत व अशीं सर्व कामें केलीं पाहिजेत.

[ ३ ] पोट-कलम [ १ ] अन्वयें नेमलेल्या मेंबरांखेरीज आणखी अध्यक्ष हुद्याच्या नात्यानें स्टांडिंग कमिटीचा एक मेंबर असेल व चेअरमन असेल.

३७. ( १ ) सार्वजनिक आरोग्य कमिटी—प्रत्येक जिल्हा लोकल बोर्डास, बोर्ड निवडील अशा बोर्डाच्या मेंबरांची झालेली एक सार्वजनिक आरोग्य कमिटी नेमण्याचा अधिकार आहे. सदरहू मेंबरांस आपल्या हुद्याच्या मुदतीहून जास्त नाहीं अशा मुदतीपर्यंत कमिटीचा मेंबर म्हणून जिल्ह्याच्या सिव्हिल सर्जनास किंवा सरकारच्या कोणत्याहि वैद्यकीय अगर आरोग्यखात्याच्या अमलदारास किंवा कायदेशीर रीतीनें लायक असलेल्या वैद्यकीचा धंदा करणारास नेमून घेण्याचा अधिकार आहे.

( २ ) अशा कमिटीनें, १३३ व्या कलमाच्या ( क ) रकमेअन्वयें केलेल्या कानूंत किंवा ३५ व्या कलमाच्या ( १ ) त्या पोटकलमाअन्वयें केलेल्या नियमांत असलेल्या कोणत्याहि मर्यादांस किंवा इतर ठरावांस पात्र राहून, सार्वजनिक आरोग्य व आरोग्यरक्षण या बाबतींसंबंधींचीं जिल्हा लोकल बोर्डाचीं कामें केलीं पाहिजेत व अधिकार चालविले पाहिजेत व अशा बाबतींसंबंधींचे या आक्टाचे ठराव व आक्टाअन्वयें केलेले कोणतेहि पोटकायदे अमलांत आणिले पाहिजेत, व सदर कमिटी आपल्या कामांपैकीं किंवा अधिकारांपैकीं कोणतींहि कामें किंवा अधिकार बोर्डाच्या कोणत्याहि मेंबराकडे अगर ऑनररी किंवा पगारी अमलदाराकडे सोंपून देण्यास मुखत्यार आहे. असा मेंबर किंवा अमलदार

यांनीं बोर्ड वेळोंवेळीं जे कोणतेहि हुकूम करील त्या हुकमांस अनुसरून चालले पाहिजे. कमिटीस, अशा रीतीनें सोंपवून दिलेलीं कामें किंवा अधिकार यांपैकीं कोणतींहि कामें किंवा अधिकार कोणत्याहि वेळीं काढून घेण्याचा अधिकार आहे.

३८ (१) इतर कार्यकारी कमिट्या—लोकल बोर्डास, कोणत्याहि कामासंबंधानें लोकल बोर्डाचे अधिकार चालविण्यास व कामें करण्यास लोकल बोर्ड ठरवील अशा मेंबरांच्या कमिट्या किंवा बोर्डाचा कोणताहि मेंबर किंवा आनररी अगर पगारी अमलदार लकम १३३ (क) याअन्वयें केलेल्या कानू किंवा कलम ३५ (१) याअन्वयें केलेले नियम यांत असलेल्या कोणत्याहि मर्यादांस व ठरावांस पात्र राहून नेमण्याचा अधिकार आहे. जेव्हां सार्वजनिक आरोग्य कमिटी नेमण्यांत आली असेल तेव्हां कलम ३७, पोट कलम [२] यांत उल्लेख केलेले अधिकार अगर कामें नव्हेत.

[२] जेव्हां दवाखान्याची व्यवस्था पहाण्यासाठीं कमिटी नेमण्यांत आली असेल तेव्हां लोकल बोर्डास, अशा कमिटीचे मेंबर होण्यासाठीं कोणत्याहि स्थानिक रहिवाशांस नेमण्याचा अधिकार आहे.

[३] अशा कोणत्याहि कमिटीनें, मेंबरानें किंवा अमलदारानें बोर्ड वेळोवेळीं जे हुकूम करील त्यांस अनुसरून वागलें पाहिजे.

[४] बोर्डास कोणत्याहि वेळीं, अशी कोणतीहि कमिटी पुढें न चालविण्याचा अगर तिच्या घटनेंत फेरफार करण्याचा किंवा जे अधिकार चालविण्यास किंवा कामें करण्यास अशी कोणतीहि कमिटी, इसम किंवा अमलदार नेमिला असेल अशा अधिकारांपैकीं कोणतेहि अधिकार किंवा कामें काढून घेण्याचा अधिकार आहे.

३९. [१] कमिट्या. हुद्याची मुदत. रिकाम्या झालेल्या जागा. चेअरमन. काम चालविण्याची रीत. सभा. सभा पुढें ढकलणें. कोरम—कमिटीच्या मेंबरांच्या हुद्याची मुदत, मेंबरांच्या नेमणुकीच्या तारखेपासून एक वर्ष संपल्यानंतर अगर लोकल बोर्ड ठरवील त्या पूर्वीच्या तारखेस संपेल.

[२] कोणत्याहि कमिटींत रिकामी झालेली जागा शक्य तितकें लवकर प्रसंगाप्रमाणें तींत मेंबर नेमून अगर नेमून घेऊन भरली पाहिजे. या पोट—कलमाअन्वयें नेमण्यांत आलेला मेंबर ती जागा रिकामी झाली नसती तर ज्याच्या जागीं अशा इसमास नेमण्यांत आलें असेल त्यानें जितक्या मुदतीपर्यंत ती जागा धारण केली असती तितक्याच फक्त मुदतीपर्यंत तो धारण करील.

[३] [अ] अध्यक्ष अगर उपाध्यक्ष, हा जर कोणत्याहि कमिटीचा मेंबर नेमण्यांत आलेला असेल तर तिचा तो हुद्याच्या नात्यानें चेअरमन असेल.

[ब] ज्या कमिटीस हुद्याच्या नात्याचा चेअरमन नसेल तिच्यासाठीं लोकल बोर्डास एक चेअरमन नेमण्याचा अधिकार आहे.

[क] ज्या कमिटीस हुद्याच्या नात्याचा चेअरमन असेल किंवा लोकल बोर्डानें नेमलेला चेअरमन असेल तिनें, ज्या सभेस असा चेअरमन हजर राहणार नाहीं त्या प्रत्येक सभेच्या वेळीं आपल्या मेंबरांतून एक चेअरमन अशा सभेसाठीं नेमला पाहिजे.

[ड] ज्या कमिटीस हुद्याच्या नात्याचा किंवा लोकल बोर्डानें नेमलेला चेअरमन नसेल त्या कमिटीनें वेळोवेळीं अशा कमिटीच्या मेंबरांतून चेअरमन नेमिला पाहिजे.

[४] कलम ३५, पोट-कलम [२], रकमा [फ], [जि] व [के] आणि पोट कलमें [३] व [४] यांतील ठराव, जणूं "कमिटी" हा शब्द "बोर्ड" अगर "लोकल बोर्ड" या शब्दांच्या बदला दाखल केला असल्याप्रमाणें कमिट्यांस लागू असतील.

[५] कमिटीला योग्य वाटेल त्याप्रमाणें सभा भरविण्याचा व तहकूब ठेवण्याचा अधिकार आहे; परंतु कमिटीच्या चेअरमनास, त्यास योग्य वाटेल तेव्हां तेव्हां अशा कमिटीची विशेष सभा बोलावण्याचा अधिकार आहे व लोकल बोर्डाच्या अध्यक्षाच्या अगर कमिटीच्या दोन मेंबरांहून कमी नाहींत इतक्या मेंबरांच्या लेखी विनंतीवरून व अशी विनंति केल्यानंतर दोन दिवसांपेक्षां अधिक नाहीं अशा तारखेस ती बोलाविली पाहिजे.

[६] कमिटीच्या कोणत्याहि सभेच्या वेळीं त्या सभेंत कमिटीचे एक-द्वितीयांशाहून अधिक मेंबर हजर असल्याखेरीज कोणतेंहि काम चालवितां कामा नये.

४०. [१] कित्येक सरकारी अमलदार जिल्हा-लोकल-बोर्डाच्या सभांमध्यें हजर असण्यास मुखत्यार आहेत—जिल्ह्याचा एक्झिक्यूटिव्ह एन्जिनियर, एज्युकेशनल इन्स्पेक्टर व डेप्युटी डायरेक्टर ऑफ् पब्लिक हेल्थ व जिल्ह्यांतील सिव्हिल सर्जनाकडे त्यांतील हेल्थ आफिसराच्या कामांपैकीं कोणतींहि कामें दिलेलीं असतील तेव्हां तो, व जिल्ह्यांतील त्याच्या हुद्याचीं कोणतींहि कामें त्याकडे सोंपविलीं असतील तेव्हां डेप्युटी डायरेक्टर आफ् ॲग्रि-

कलेक्टर, किंवा असिस्टंट रजिस्ट्रार आफ् कोआपरेटिव्ह सोसायटीज हे जिल्हा–लोकल–बोर्डाचे मेंबर नसतील, तर त्यांस सदरहू बोर्डाच्या किंवा त्याच्या कोणत्याहि कमिटीच्या कोणत्याहि सभेमध्यें हजर असण्याचा हक्क आहे, आणि अशा सभांमध्यें आपल्या हुद्द्याच्या कामांच्या नात्यानें ज्या कोणत्याहि बाबतीविषयीं आपलें मत किंवा आपण देऊं शकेल ती माहिती अशा बोर्डास किंवा कमिटीस उपयोगी पडेल असें त्यास वाटेल त्या बाबतीबद्दल वादविवाद किंवा विचार चालेल त्यांत बोर्डाच्या किंवा कमिटीच्या अनुमतानें आपले विचार प्रदर्शित करण्याचा त्यांपैकीं प्रत्येकास अधिकार आहे: मात्र असें ठरविलें आहे कीं, सदरहू अमलदार त्या बोर्डाचे मेंबर असल्यावांचून त्यांस अशा कोणत्याहि बाबतींत मत देण्याचा हक्क नाहीं.

[२] कित्येक सरकारी अमलदार तालुका–लोकल–बोर्डाच्या सभांमध्यें हजर असण्यास मुखत्यार आहेत—तालुक्यांत चाकरीस असलेल्या ओव्हरसीयराच्या दरजाहून कमी दरजाचा नसेल असा सरकारी पब्लिक वर्क्स खात्यांतील कोणताहि अमलदार, आणि तालुक्याचा असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर याच्या दरजाहून कमी दरजाचा नसेल असा सरकारी शाळाखात्यांतील कोणताहि अमलदार, यास, वरच्याप्रमाणेंच हकीकत असेल तेव्हां व त्याच विशेष ठरावास पात्र राहून अशा तालुक्याच्या तालुका–लोकल–बोर्डाच्या किंवा सदरहू बोर्डाच्या कोणत्याहि कमिटीच्या कोणत्याहि सभेमध्यें वर सांगितलेल्या प्रकारच्या कोणत्याहि बाबतींत वादविवाद किंवा विचार चालेल त्यांत आपले विचार प्रदर्शित करण्याचा अधिकार आहे.

[३] लोकल–बोर्ड आपल्या सभांमध्यें सदरहू अमलदारांस हजर असण्याविषयीं सांगण्याला मुखत्यार आहेत—जर एकाद्या जिल्हा–लोकल–बोर्डास किंवा तालुका लोकल बोर्डास असें दिसेल कीं, वर लिहिलेल्या अमलदारांतून कोणताहि अमलदार अशा बोर्डाच्या किंवा त्याच्या कोणत्याहि कमिटीच्या पुढील कोणत्याहि सभेमध्यें हजर असणें वर सांगितल्याप्रमाणें हकीकत असेल तेव्हां इष्ट आहे, तर योजलेल्या सभेच्या निदान पंधरा दिवस पूर्वीं अशा अमलदारास पत्र लिहून त्या सभेमध्यें त्यास हजर होण्याविषयीं सांगण्याचा अशा बोर्डास अधिकार आहे; आणि सदरहू अमलदारास दुखण्यामुळें किंवा दुसऱ्या वाजवी कारणामुळें हजर होतां येत नाहीं असें असल्याखेरीज त्यास अशा सभेमध्यें हजर होणें भाग आहे.

४१. [१] अध्यक्ष लेखी सूचना असतील त्या लिहून फिरविण्यास मुखत्यार आहे—सभा भरणें जरूर नाहीं असें लोकल बोर्डाच्या अध्यक्षास अगर कमिटीच्या चेरमनास वाटेल तेव्हां तेव्हां, तो अध्यक्ष अगर चेरमन सभा

भरण्याच्या बदला, स्वतःची, किंवा अशा बोर्डाच्या अगर कमिटीच्या दुसऱ्या कोणत्याहि मेंबराची, किवा बोर्डाच्या कोणत्याहि कारभार करणाऱ्या अमलदाराची जेसी सूचना असेल ती मेंबरांच्या अभिप्रायाकरितां व मतांकरितां त्यांकडे लिहून फिरविण्यास मुखत्यार आहे.

[२] अशी कोणतीहि सूचना मेंबरांच्या मतांकारितां लिहून फिरविण्याच्या पूर्वी अध्याक्षास किंवा चेरमनास योग्य वाटेल तर, बोर्डाचा मेंबर नाहीं अशा ज्या कोणत्याहि सरकारी अमलदारास, अशा सूचनेचा विचार ज्या सभेंत करण्यांत येईल अशा कोणत्याहि सभेमध्यें ४० व्या कलमांतील ठरावांअन्वयें हजर राहण्याचा हक्क असेल त्या अमलदाराची कांहीं अभिप्राय त्या सूचनेवर देण्याची इच्छा असल्यास ते अभिप्राय अध्यक्षाला किंवा चेरमनाला मिळविण्याचा अधिकार आहे आणि ज्या प्रकरणासंबंधीं ती सूचना असेल तें प्रकरण ३५ व्या कलमाच्या [२] ऱ्या पोट–कलमांतील रकम [ जे ] ईंत सांगितलेल्या प्रकारचें असेल तर, असे अभिप्राय त्यानें मिळविले पाहिजेत.

[३] याप्रमाणें लिहून फिरविलेल्या कोणत्याहि सूचनेचा निकाल, ३५ व्या कलमाच्या [२] ऱ्या पोटकलमाची रकम [ अ ] याअन्वयें किंवा ३९ व्या कलमाच्या [ ५ ] व्या पोट–कलमाअन्वयें सदर्हू सूचनेचा विचार करण्यासाठीं विशेष सभा भरण्यांत न येईल तर, तिच्या संबंधानें मत देणाऱ्या मेंबरांच्या बहुमताप्रमाणें केला पाहिजे.

[४] या कलमाअन्वयें बोर्डानें केलेला प्रत्येक निकाल, कलम ३५ चें पोटकलम [२] याची रकम [कें] किंवा कलम ३९, पोट–कलम [४] याअन्वयें ठेवलेल्या टिपणवहींत लिहून ठेविला पाहिजे.

४२. [१] करार करण्याची रीति—लोकल बोर्डाच्या अध्यक्षास कोणताहि करार किंवा कबुलायत बोर्डाच्यातर्फे करण्याचा अधिकार आहे व ती अशा रीतीनें व अशा नमुन्याप्रमाणें कीं, त्यानें असा करार किंवा कबुलायत आपल्या स्वतःच्या तर्फे केली असती तर तिजवरून तो त्या त्या काळीं चालू असणाऱ्या कायद्याप्रमाणें जसा बद्ध झाला असता तशा रीतीनें व तशा नमुन्याप्रमाणें : मात्र असें ठरविलें आहे कीं, अशा कराराची किंवा कबुलायतीची रकम किंवा किंमत जिल्हा–लोकल–बोर्डाच्या बाबतींत पांचशें रुपयांहून, किंवा तालुका–लोकल–बोर्डाच्या बाबतींत दोनशें रुपयांहून अधिक असतां नये.

[२] लोकल बोर्डाच्या तर्फेचा दुसरा प्रत्येक करार किंवा कबुलायत लेखी असली पाहिजे, आणि तिजवर बोर्डाच्या अध्यक्षानें व दुसऱ्या दोन मेंब-

रांनीं सह्या केल्या पाहिजेत, आणि बोर्डाच्या सामायिक शिक्क्यानें तिजवर मोहर केली पाहिजे.

[३] कोणताहि करार किंवा कबुलायत या कलमांत ठरविल्याप्रमाणें केली नसेल ती लोकल बोर्डास बद्ध करणार नाहीं.

४३ [अ] बोर्डांनीं केलेल्या सर्व प्रकारच्या खर्चवेचाबद्दल लोकल फंड साधारणतः जबाबदार आहे—यांत पुढें दुसऱ्या रीतीचा ठराव केला आहे तेवढें खेरीजकरून लोकल बोर्डाचा कोणताहि मेंबर अशा बोर्डानें किंवा बोर्डाच्या तर्फे केलेल्या कोणत्याहि कराराबद्दल किंवा कबुलायतीबद्दल किंवा खर्चाबद्दल जातीनें जबाबदार होणार नाहीं; प्रत्येक लोकल बोर्डाच्या हातीं लोकल फंड असेल तो अशा कोणत्याहि कराराबाबत किंवा कबुलायतीबाबत व अशा सर्व खर्चाबाबत पात्र राहील व ते त्याजवर लादले जातील:

(ब) परंतु गैरउपयोग केलेल्या किंवा उधळलेल्या फंडाबद्दल व मिळकतीबद्दल मेंबरांस जबाबदार धरणें—मात्र असें ठरविलें आहे कीं, लोकल बोर्डाचा प्रत्येक मेंबर लोकल बोर्डाच्या ज्या कोणत्याहि पैशाच्या किंवा इतर मिळकतीच्या गैरउपयोगांत त्याचें अंग असेल किंवा जो त्याच्या गैरवर्तनामुळें किंवा मेंबराच्या नात्यानें त्यानें आपल्या कामाची मोठी हयगय केल्यामुळें झाला असेल किंवा होण्यास सोपें झालें असेल त्याबद्दल तो जातीनें जबाबदार होईल आणि याप्रमाणें गैरउपयोग झालेला पैसा किंवा मिळकत हीं परत मिळण्याबद्दल किंवा त्याबाबत भरपाई मिळण्याबद्दल त्यावर सरकारच्या मंजुरीनें संबंध असलेल्या लोकल बोर्डास किंवा सरकारास दावा आणण्याचा अधिकार आहे; आणि सरकारनें अशा रीतीनें परत मिळविलेला कोणताहि पैसा किंवा मिळकत अशा रीतीनें परत मिळविण्यास जरूर तो खर्च त्यांतून भागविल्यानंतर लोकल बोर्डाचे हवालीं केली पाहिजे.

४४ [१] तोडजोड करण्याचा अधिकार—लोकल बोर्डास त्यानें किंवा त्याजवर केलेल्या कोणत्याहि दाव्यासंबंधानें किंवा त्यानें ह्या अॅक्टान्वयें केलेल्या कोणत्याहि करारापासून उत्पन्न होणाऱ्या कोणत्याहि हक्कासंबंधानें किंवा मागणीसंबंधानें त्याला पुरती वाटेल तशा पैशाच्या रकमेकरितां किंवा दुसऱ्या मोबदल्याकरितां तोडजोड करण्याचा अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, कोणत्याहि करार करण्याच्या कामीं ह्या अॅक्टान्वयें कोणतीहि मंजुरी घ्यावी लागत असेल तर त्या करारामधून उत्पन्न होणाऱ्या कोणत्याहि हक्काची किंवा मागणीची तोडजोड करण्याच्या कामींहि तशीच अगाऊ मंजुरी घेतली पाहिजे.

[२] ज्या कोणत्याहि मनुष्याचें ह्या आक्टान्वयें लोकल बोर्डास व त्याच्या अमलदारांस व नोकरांस प्राप्त झालेले कोणतेहि अधिकार चालविल्याकारणानें कोणतेंहि नुकसान झालेलें असेल त्याला लोकल फंडांतून त्याचा मोबदला देण्याचा लोकल बोर्डाला अधिकार आहे.

४५ [१] सरकारी एक्झिक्यूटिव्ह एंजिनीयरानें करावयाचीं कामें—जिल्ह्याच्या सरकारी एक्झिक्यूटिव्ह एंजिनीयरानें तयार केलेले किंवा पसंत केलेले ज्या कामांचे नकाशे व अंदाजे कलम ८९, पोटकलम [१] रकम [ब] याअन्वयें अवश्य आहेत, त्या कामांपैकीं सरकार सामान्य किंवा विशेष हुकूम करून वेळोवेळीं फर्मावितील तीं सदरहू एक्झियूटिव्ह एंजिनीयरानें केलीं पाहिजेत; तो सरकारासाठीं एखादें काम करीत असतांना चालविता असता तेंच अधिकार या कारणासाठीं त्यानें चालविले पाहिजेत आणि सदरहू कामांपैकीं कोणतींहि कामें करण्यांत लोकल बोर्डाचे कांहीं अमलदार व नोकर त्यास मदत करीत असल्यास त्या सर्वांवर त्याचा निर्बंध असेल.

[२] दुसऱ्या मनुष्यांस जीं कामें करण्याचा अधिकार आहे तीं कामें—दुसरीं कामें करणें तीं सर्व ज्या लोकल बोर्डाच्या खर्चानें असें कोणतेंहि काम करावयाचें त्या लोकल बोर्डास योग्य वाटेल त्या मनुष्यांनीं व तशा देखरेखीखालीं केलीं पाहिजेत. मात्र असें ठरविलें आहे कीं, असें कोणतेंहि काम सदरहू बोर्ड तशा अर्थाची आपली इच्छा असल्याचें कळवील तर जिल्ह्याच्या सरकारी एक्झिक्यूटिव्ह एंजिनीयरानें पहिल्या पोट—कलमांत सांगितलेल्या रीतीनें केलें पाहिजे.

(३) सरकारी एक्झिक्यूटिव्ह एंजिनीयरानें कामास लाविलेल्या सरकारी नोकरमंडळीचा पैका देणें—जेव्हां कोणतेंहि काम या कलमान्वयें सरकारी एक्झिक्यूटिव्ह एंजिनीयराकडून आपल्या स्वतःच्या सरकारी नोकरमंडळीच्या मदतीनें सगळें किंवा अंशतः केलें जाईल तेव्हां अशा नोकरमंडळीबद्दलचा खर्च ज्या लोकल बोर्डाच्या खर्चानें तें काम केलें जाईल त्या बोर्डाच्या व सदरहू एक्झिक्यूटिव्ह एंजिनीयराच्या दरमियान कबूल करण्यांत येईल त्याप्रमाणें त्या बोर्डास द्यावा लागेलः मात्र असें ठरविलें आहे कीं, एक्झिक्यूटिव्ह एंजिनीयराच्या चाकरीबद्दल कोणत्याच प्रसंगीं कांहीं मागतां नये.

४६. (१) दोन किंवा अधिक स्थानिक मंडळांच्या एकवट कमिट्या—एखादा जिल्हालोकलबोर्ड दुसऱ्या कोणत्याहि जिल्हालोकलबोर्डाशीं किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीशीं किंवा क्यान्टोनमेंट कमिटीशीं किंवा एकाहून अधिक अशा लोकल बोर्डांशीं, म्युनिसिपालिटींशीं किंवा कमिटींशीं खालीं लिहिलेल्या गोष्टी करण्याविषयीं वेळोवेळीं एकत्र होण्यास मुखत्यार आहेः—

( अ ) ज्या कोणत्याहि कामांत त्यांचा सामायिक हितसंबंध असेल त्या कामासाठीं आपापल्या मंडळ्यांतून एक एकवट कमिटी नेमण्याविषयीं आणि अशा कमिटीचा चेअरमन नेमण्याविषयीं; आणि

( ब ) कोणतेंहि सामायिक काम बांधण्याच्यासंबंधानें व पुढें तें चालू ठेवण्याच्या संबंधानें अशा प्रत्येक मंडळीस बद्धक होत अशा शर्ती ठरविण्याचा अधिकार आणि अशा मंडळ्यांपैकीं एका किंवा कोणत्याहि मंडळीस चालवितां येईल असा कोणताहि अधिकार, अशा कोणत्याहि कमिटीस देण्याविषयीं; आणि

( क ) अशा कोणत्याहि कमिटीनें चालविण्याच्या कामाची शिस्त लावण्याबाबत आणि ज्या कारणासाठीं सदरहू कमिटी नेमली असेल त्या कारणासंबंधीं पत्रव्यवहार चालविण्याची शिस्त लावण्याबाबत कानू करण्याविषयीं व त्यांत कंपेश करण्याविषयीं.

( २ ) जेव्हां कोणत्याहि स्थानिक अधिकाऱ्यानें कोणत्याहि बाबतीसंबंधानें पोटकलम ( १ ) यांतील ठरावांअन्वयें दुसऱ्या कोणत्याहि स्थानिक अधिकाऱ्याची संमति मिळण्यासाठीं विनंति केली असेल व असा दुसरा स्थानिक अधिकारी संमति देण्याचें नाकारील तेव्हां सदरीं सांगितलेल्या बाबतींत क्यांटोंमेंट कमिटी नसणाऱ्या अशा दुसऱ्या स्थानिक अधिकाऱ्यानें संमति देण्याचें फर्माविणारा आपणास योग्य वाटेल असा हुकूम करण्याचा कमिशनरास अधिकार आहे आणि अशा दुसऱ्या स्थानिक अधिकाऱ्यानें अशा हुकुमांप्रमाणें वागलें पाहिजे.

( ३ ) पोटकलम (१) किंवा (२) यांअन्वयें कोणत्याहि कृत्यासंबंधानें संमति दिल्यानंतर अशा कृत्यापासून उद्भवणाऱ्या कोणत्याहि बाबतीसंबंधानें स्थानिक मंडळ्यांत जर कोणताहि मतभेद उत्पन्न होईल तर त्यासंबंधानें जर सदरहू स्थानिक मंडळ्या एका भागांत असतील तर कमिसनरचा व निरनिराळ्या भागांत असतील तर सरकारचा ठराव अखेरचा असेल असें समजावें.

## बाब ४ थी.

### लोकल बोर्ड संस्थापित करणें. मिळकत, अधिकार व कर्तव्यें.

४७. लोकल बोर्डाचें संस्थापन—प्रत्येक लोकल बोर्ड हा " चा जिल्हा–लोकल–बोर्ड " किंवा " चा तालुका–लोकल–बोर्ड " जसें असेल तसें या नांवानें संस्थापित मंडळी असेल व त्याची परंपरा सतत चालू राहील व त्याचा एक सामायिक शिक्का असेल आणि त्यास व त्यावर त्याच्या संस्थापित नांवानें फिर्याद करण्यास मिळेल आणि जंगम व स्थावर दोन्ही प्रका-

रची मिळकत संपादन करून धारण करण्याचा, मग सदर मिळकत त्याचा अधिकार असलेल्या क्षेत्राच्या मर्यादांच्या आंत असो किंवा बाहेर असो, आणि जी कोणतीहि जंगम किंवा स्थावर मिळकत त्याच्या स्वाधीन झाली असेल किंवा त्यानें संपादन केली असेल ती पट्टयानें देण्याचा, विकण्याचा किंवा दुसऱ्या रीतीनें दुसऱ्यास देण्याचा आणि करार करण्याचा व या आक्टाच्या कारणासाठीं जरूर असतील त्या दुसऱ्या सर्व गोष्टी करण्याचा त्या लोकल बोर्डास अधिकार असेल:

मात्र असें ठरविलें आहे कीं, स्थावर मिळकतीचा सात वर्षांहून अधिक मुदतीचा कोणताहि पट्टा आणि अशा कोणत्याहि मिळकतीची विक्री किंवा इतर तबदिली हीं कमिशनराची पूर्वी मंजुरी घेऊन केलीं नसतील तर तो पट्टा, विक्री किंवा इतर तबदिली हीं व्यवहारोपयोगी होणार नाहींत.

४८. स्थानिक कामें पुढें करण्यांत येतील तीं स्वाधीन होणें—लोकल बोर्ड बांधील तो प्रत्येक रस्ता, इमारत, किंवा इतर काम अशा लोकल बोर्डाच्या स्वाधीन असेल.

४९. मिळकत तालुका किंवा जिल्हा लोकल बोर्डाच्या स्वाधीन आहे हें ठरविण्याचा अधिकार—कोणतीहि मिळकत कोणत्याहि तालुक्याकरितां स्थापलेल्या लोकल बोर्डाच्या किंवा अशा तालुक्यावर अधिकार असणाऱ्या जिल्हा लोकल बोर्डाच्या स्वाधीन व्हावयाची अशाबद्दल कोणताहि संशय उत्पन्न होईल तेव्हां अशी मिळकत दोहोंपैकीं कोणत्या बोर्डाच्या स्वाधीन होईल हें ठरविण्याचा सरकारास अधिकार आहे, व असा कोणताहि निकाल अखेरचा असेल.

५०. अवश्य करावयाचीं कामें—लोकल बोर्डांनीं आपापल्या ताब्यांतील क्षेत्रांसाठीं आपल्या हातीं असलेल्या लोकल फंडांतून खालीं लिहिलेल्या गोष्टींबाबद जेथवर योग्य तजवीज करतां येईल तेथवर करणें हें त्यांचें काम आहे असें समजावें, म्हणजे:—

[अ] रस्ते व दळणवळणाचीं दुसरीं साधनें हीं बांधणें, आणि त्यांच्या स्वाधीन झालेले सर्व रस्ते व दळणवळणाचीं दुसरीं साधनें यांची मरामत करणें व तीं चालू राखणें;

[ब] इस्पितळें, दवाखाने, बाजार, धर्मशाळा व दुसऱ्या सार्वजनिक इमारती बांधणें व त्यांची मरामत करणें, आणि हीं ठिकाणें जाऊन पाहणें, त्यांची व्यवस्था ठेवणें व तीं चालू राखणें;

[क] सार्वजनिक तळीं, विहिरी व पाण्याचीं कामें बांधणें व त्यांची मरामत करणें, त्यांतून व इतर ठिकाणांहून पाणी पुरविणें, आणि पिण्याच्या व

स्वयंपाकाच्या कामाचें पाणी न बिघडेल अशा प्रकारें त्याचें संरक्षण करण्यासाठीं कामें बांधणें व तीं चालू ठेवणें;

[ड] प्राथमिक शिक्षणाच्या शाळांसाठीं योग्य जागेची सोय करून देणें, त्या जाऊन पाहणें व चालू ठेवणें, आणि प्राथमिक शाळांतील शिक्षक म्हणून लायकीचें शिक्षण घेणाऱ्या इसमांस, अशा लायकीकरितांचें शिक्षण चालू असण्याच्या मुदतींत, जरूर तर, वतन देणें, आणि प्राथमिक शिक्षणाची साधारणतः वृद्धि व प्रसार करणें;

( ई ) लोकांस देवी काढविण्याचें काम, व लोकांचें आरोग्य राखण्याण्यासाठीं जरूर असणारीं आरोग्यसंरक्षक कामें व तजविजी करणें;

(फ) अशा बोर्डाच्या स्वाधीन झालेल्या रस्त्यांच्या बाजूस अगर त्यांच्या जवळपास झाडें लावणें व त्यांचें संरक्षण करणें;

( ग ) त्यांचें स्वाधीन झालेली कोणतीहि मालमिळकत राखणें; आणि

( ह ) अशा जिल्ह्यांत किंवा जिल्ह्याबाहेरील, अशा कारणाकरितां सरकार जाहीरनाम्याच्या द्वारें योग्य म्हणून जाहीर करील अशा कोणत्याहि संस्थेंत अशा संस्थांस लागू असलेल्या कानूंबरहुकूम, पिसाळलेल्या कुत्र्याच्या दंशावर औषधोपचार घेणाऱ्या व अशा संस्थांत जाणाऱ्या व परत येणाऱ्या गरीब लोकांस पोसण्याचा व औषधोपचार करण्याचा खर्च, व त्यांचा जरूर असलेला इतर खर्च, सरकार सामान्य किंवा विशेष हुकुमाच्या द्वारें वेळोवेळीं फर्मावील त्या दरांनीं व त्या शर्तींस पात्र राहून देणें;

मर्जीस येईल तर खर्च करण्याचा अधिकार—आणि लोकल बोर्डास सदई फंडांतून त्यांच्या नजरेस येईल त्याप्रमाणें खालीं लिहिलेल्या गोष्टींबाबद तजवीज करण्याचा अधिकार आहे, म्हणजे:—

(आय्) १३३ व्या कलमाच्या (ड) रकमेअन्वयें या बाबतींत केलेल्या कानूंस अनुसरून बोर्डाच्या कामकाजाच्या कारणांसाठीं प्रवास करितांना आलेला खर्च बोर्डाचे मेंबरांस देणें; मात्र असा कोणताहि पैका सरकारच्या पगारदार नोकरास देतां कामा नये;

( जे ) मासल्याचीं शेतें करणें व तीं चालू ठेवणें, विदेशी झाडें आणून आपल्या देशांत होत असें करणें, चांगल्या जातीचें बीं बाहेरून आणून वांटणें, गुरांची व घोड्यांची अवलाद सुधारणें, मासे आणणें व त्यांचें संरक्षण करणें आणि शेतकी व स्थानिक उद्योगधंदे यांची वाढ व सुधारणा करणें;

(के) दुष्काळच्या किंवा महागाईच्या वेळीं मदतीचीं व स्थानिक मदतीचीं कामें स्थापणें व तीं चालू ठेवणें;

(ल) या कलमाच्या (ड) रकमेंत लिहिलेल्या कामांखेरीज शिक्षणासंबंधीं इतर कामें करणें;

(म) लाइट रेलवे व ट्रामवेची रचना, व्यवस्था व त्या चालू ठेवणें;

(न) लोकांचें आरोग्य, सुरक्षितपणा, सुख किंवा सोय यांची वृद्धि करण्याजोगीं दुसरीं कोणतींहि स्थानिक कामें किंवा तजविजी करणें; आणि

(ओ) कलेक्टराच्या अगाऊ अनुमतानें कोणतेंहि सार्वजनिक स्वागत, समारंभ. करमणूक किंवा प्रदर्शन हीं करणें.

५१. (१) तालुका–लोकल–बोर्ड व जिल्हा–लोकल–बोर्ड यांचीं परस्पर कामें—जिल्हा–लोकल–बोर्डाच्या निर्बंधास, आणि विधेच्या बाबतींत, कलम ८० चा विशेष ठराव (ब) याच्या ठरावांस पात्र राहून, प्रत्येक तालुका–लोकल–बोर्डाकडे म्हटलें म्हणजे त्या बोर्डाच्या खर्चानें राखलेले निवळ स्थानिक रस्ते, कामें व इमारती या सर्वांचा, आणि जीं स्थानिक खातीं व कारखाने जिल्हा–लोकल–बोर्डास आपल्या स्वतःच्या साक्षात् निर्बंधाखालीं व वहिवाटीखालीं घेण्याचें योग्य वाटेल तीं खातीं व कारखाने खेरीज करून बाकीचीं सर्व खातीं व कारखाने यांचा त्याच्या ताब्यांतील क्षेत्रांत, निर्बंध व कारभार असेल.

(२) जिल्हा–लोकल–बोर्डाच्या निर्बंधाखालील व कारभाराखालील रस्ते, कामें, इमारती, खातीं व कारखाने यांच्या संबंधानें, प्रत्येक तालुका–लोकल–बोर्ड, हा, जिल्हा–लोकल–बोर्ड तसें सांगेल तर, जिल्हा–लोकल बोर्डाचा गुमास्ता असला पाहिजे, आणि अशा गुमास्त्याच्या नात्यानें तालुका–लोकल–बोर्डास जिल्हा–लोकल-बोर्ड जो अधिकार व जीं कामें वेळोवेळीं लेखी देईल तो अधिकार तालुका-लोकल-बोर्डानें चालविला पाहिजे व तीं कामें त्यानें केलीं पाहिजेत.

## बाब ५ वी.—आरोग्यासंबंधीं व इतर अधिकार.

५२. इमारतींत जाऊन पाहण्याचा वगैरे अधिकार—यांत पुढें सांगितली आहे तशा रीतीची नोटीस देऊन सर्व इमारतींमध्यें व जमिनींमध्यें सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत कोणतेहि वेळीं जाऊन पाहण्याचा आणि आरोग्यरक्षणाच्या कारणासाठीं तीं सर्व किंवा त्यांचा कोणताहि भाग, स्वच्छ केला पाहिजे, साफसूफ केला पाहिजे किंवा इतर रीतीनें योग्य स्थितींत ठेविला पाहिजे अशाविषयीं लेखी नोटीस देऊन फर्माविण्याचा जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षास किंवा याबाबत सदरहू बोर्डानें अधिकार दिलेल्या कोणतेंहि इसमास अधिकार आहे.

५३. घाणेरड्या इमारती वगैरे—जो कोणी मनुष्यवस्तीलायक असलेल्या किंवा इतर प्रकारच्या कोणत्याहि इमारतीचा किंवा जमिनीचा मालक किंवा भोगवटा करणारा असून, ती इमारत किंवा जमिन घाणेरडी किंवा आरोग्यास अपायकारक अशा स्थितींत राहूं देईल अथवा शेजारी राहणारे लोकांस ती जिल्हा लोकल बोर्डाचे मतें पीडाकारक होऊं देईल, अथवा तिजवर निवडुंग अथवा आरोग्यास अपकारक असें रान माजूं देईल, आणि ती स्वच्छ करण्याविषयीं, साफसूफ करण्याविषयीं किंवा इतर रीतीनें योग्य स्थितींत आणण्याविषयीं या बाबतींत जिल्हा लोकल बोर्डानें अधिकार दिलेल्या कोणाही इसमाकडून लेखी नोटीस आल्यानंतर वाजवी वेळाचे आंत त्या नोटिशींत फर्माविल्याप्रमाणें करणार नाहीं, त्यास माजिस्ट्रेटापुढें अपराधाची शाबिती झाल्यावर पराकाष्ठा पंचवीस रुपयेपर्यंत दंड होईल, आणि अपराध एकसारखा चालू राहणारा असेल तर, अपराधाच्या शाबितीनंतर सदर अपराध ज्या दिवशीं चालू ठेवण्यांत येईल त्या दरेक दिवसाबद्दल त्यास पराकाष्ठा आणखी पांच रुपयेपर्यंत दंड होईल.

५४. पाण्याच्या पुरवठ्याच्या साधनांसंबंधानें अधिकार व कर्तव्यें—जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षास अगर सदरहू बोर्डानें या बाबतींत अधिकार दिलेल्या कोणत्याहि मनुष्यास कोणत्याहि वेळीं लेखी नोटिशीच्या द्वारें, कोणत्याहि विहीरीच्या, ओहोळाच्या, पाटाच्या, तळ्याच्या किंवा पाण्याच्या पुरवठ्याच्या इतर साधनाच्या मालकास किंवा त्यावर निर्बंध असलेल्या कोणत्याहि इसमास असा हुकूम करण्याचा अख्त्यार आहे कीं, त्यानें, ती विहीर वगैरे खासगी मिळकत असली किंवा नसली तथापि,

[अ] जर तें पाणी पिण्यासाठीं वापरण्यांत येत असेल तर,

[१] ओहोळ शिवाय करून पाण्याच्या पुरवठ्याचें असें इतर कोणतेंहि साधन चांगल्या दुरुस्तींत ठेविलें व राखिलें पाहिजे; किंवा

[२] नोटिशींत लिहिण्यांत येईल त्या वाजवी वेळाच्या आंत, असें कोणतेंहि पाण्याच्या पुरवठ्याचें साधन, त्यांतील गाळ, कचरा आणि कुजत असलेलीं झाडें वगैरे काढून साफ केलें पाहिजे; किंवा

[३] असें कोणतेंहि पाण्याच्या पुरवठ्याचें साधन, जमिनीवरील पाण्यापासून दूषित न व्हावें म्हणून बोर्ड सांगेल त्या रीतीनें त्याचें संरक्षण केलें पाहिजे; किंवा

[४] पाण्याच्या पुरवठ्याचें असें जें कोणतेंहि साधन नैसर्गिक रीतीनें वाहणारा ओहोळ नसून ज्याचें पाणी पिण्याच्या कारणाकरितां नालायक आहे

असें बोर्डाचें मत असेल त्या साधनाचें पाणी पिण्याच्या कारणाकरितां वापरण्याचें आणि इतरास वापरूं देण्याचें बंद केलें पाहिजे; किंवा

(५) पोट-रकम (४) अन्वयें अशी कोणतीहि नोटीस दिली असतांही असा वापर सुरू राहिला आणि तो बोर्डाच्या मतें, एऱ्हवीं बंद करणें शक्य नसलें, तर तो वापर बंद करण्यास बोर्डास पुरती वाटेल त्या रीतीनें सदरीं सांगितल्या प्रकारचें पाण्याच्या पुरवठ्याचें साधन इंगामी किंवा कायमचें बंद केलें पाहिजे, किंवा तें भरून काढलें पाहिजे किंवा त्यास कुडण किंवा कुंपण घातलें पाहिजे; किंवा

(६) जें कोणतेंहि सांचलेलें पाणी, बोर्डाच्या मतें आरोग्यास अपायकारक किंवा जवळपासचे लोकांस त्रासदायक असेल तें अशा कोणत्याहि पाण्याच्या पुरवठ्याच्या साधनांतून किंवा त्यास जोडलेल्या किंवा त्यालगत असलेल्या कोणत्याहि जमिनींतून किंवा जागेंतून किंवा पाटांतून किंवा सांठवणाच्या तलावांतून पाटानें किंवा इतर रीतीनें काढून टाकिलें पाहिजे;

(ब) नैसर्गिक रीतीनें वाहणारा ओहोळ खेरीज करून पाण्याच्या पुरवठ्याचें असें इतर कोणतेंहि साधन, मग त्यांतील पाणी पिण्याच्या कारणाकरितां वापरण्यांत येत असो किंवा नसो, पुरती दुरुस्ती, संरक्षण किंवा कुडण नसल्यामुळें बोर्डाच्या मतें, लोकांच्या किंवा ज्यांस तें वापरण्याचें किंवा त्याच्या जवळून किंवा जवळ जाण्याचें कारण असेल त्या मनुष्यांच्या आरोग्यास किंवा सुरक्षितपणास भयकारक असल्यास तें त्या नोटिशीपासून चोवीस तासांचे आंत बोर्ड फर्मावील किंवा पसंत करील त्या रीतीनें दुरुस्त किंवा सुरक्षित केलें पाहिजे किंवा त्यास कुडण घातलें पाहिजे.

५५. केलेले हुकूम न पाळल्यास उपाय.—वर सांगितलेला मालक किंवा अधिकार असलेला मनुष्य ५४ व्या कलमाच्या ठरावांत किंवा ठरावांअन्वयें सांगितलेल्या मुदतींत सदरहू प्रकारचा कोणताहि हुकूम पाळण्यास चुकेल किंवा हयगय करील तर, अशा नोटिशीअन्वयें जरूर असलेलें काम एकदम सुरू करण्याचा जिल्हा लोकल बोर्डास अख्त्यार आहे आणि जर अध्यक्षाच्या मतें कोणत्याहि मनुष्याच्या आरोग्याच्या किंवा सुरक्षितपणाच्या बचावासाठीं तात्कालिक तजवीज करणें जरूर असेल, तर त्यानें अशा नोटिशींत जरूर असल्याप्रमाणें तें काम एकदम सुरू केलें पाहिजे आणि ह्या कामीं जो कोणताहि खर्च येईल, तो सगळा, अशा पाण्याच्या पुरवठ्याच्या मालकानें किंवा त्या पुरवठ्यावर अधिकार असणाऱ्या मनुष्यानें दिला पाहिजे, आणि तो, ८ व्या बाबीअन्वयें वसूल करा-

बयाच्या कोणत्याहि कराबद्दल यावयाच्या रकमेप्रमाणेंच वसूल करण्याचा अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, लोकांकडून किंवा लोकांच्या कोणत्याही भागाकडून पाणी हक्कानें वापरण्यांत येत असलेल्या कोणत्याहि विहिरीच्या किंवा खाजगी ओहोळाच्या किंवा कोणत्याहि खासगी पाटाच्या, तळ्याच्या किंवा पाण्याच्या पुरवठ्याच्या इतर कोणत्याहि साधनाच्या बाबतींत अशा मालकास किंवा असा अधिकार असलेल्या मनुष्यास आलेला खर्च, जिल्हा लोकल बोर्ड तसें फर्मावील तर, अशा बोर्डाच्या हातीं असलेल्या लोकल फंडाच्या भागांतून देण्याचा अखत्यार आहे.

५६. (१) कित्येक कामाकरितां सार्वजनिक झरे वगैरे निराळे ठेवण्याचा अधिकार—जिल्हा लोकल बोर्डास जाहीर नोटिशीच्या द्वारें, संबंध असलेला झरा, तळें, विहीर किंवा दुसऱ्या ठिकाणीं ती नोटीस लावून आणि या आक्टानें अवश्य असलेल्या इतर रीतीनें सार्वजनिक झरे, तळीं, विहिरी आणि इतर जागा व सार्वजनिक पाण्याच्या प्रवाहाचे भाग पिण्याच्या कामाकरितां किंवा स्नानाकरितां किंवा इतर कपडे अथवा जनावरें धुण्यासाठीं किंवा रहिवाशांचें आरोग्य, स्वच्छता, सुख किंवा सोई वाढविणाऱ्या दुसऱ्या कोणत्याहि कामाकरितां राखून ठेवण्याचा अधिकार आहे; आणि सदरीं सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्याहि कारणासाठीं कोणतेहि खाजगी झरे, तळीं, विहिरी किंवा इतर जागा देखील मालकांच्या संमतीनें निराळ्या ठेवण्याचा अधिकार आहे.

(२) कित्येक ठिकाणचें पाणी वापरण्याचा प्रतिबंध करण्याचा अधिकार—ज्या ठिकाणचें पाणी लोक नेतात अशा ठिकाणचें पाणी वापरण्याचा प्रतिबंध करणें सांथीच्या काळांत इष्ट आहे असें बोर्डाच्या किंवा सरकारच्या नोकरींत असलेल्या कोणत्याहि वैद्यकीय अमलदाराचें सर्टिफिकेट मिळाल्यावर अशा कोणत्याहि ठिकाणीं तावडतोब नोटिशीच्या द्वारें जिल्हा लोकल बोर्डास पाणी वापरण्याचा प्रतिबंध करतां येईल अशा प्रकारची नोटीस पाण्याच्या पुरवठ्याच्या साधनाजवळ तिची एक प्रत लावून किंवा दंवडी पिटून बजावतां येईल, व तींत अशी बंदी किती दिवस राहील तें नमूद केलें पाहिजे. आणखी सर्टिफिकेटाशिवाय वेळोवेळीं जिल्हा लोकल बोर्डास सदरहू नोटिशीची मुदत वाढवितां येईल किंवा तींत फेरफार करतां येईल.

५७. दुसऱ्या कामासाठीं निराळ्या ठेवलेल्या जागांचा उपयोग केल्यास शिक्षा- जो कोणी—

(अ) पिण्याकरितां बोर्डाकडून किंवा खासगी मिळकतीच्या बाबतींत तिच्या मालकाकडून निराळी ठेवण्यांत आलेल्या कोणत्याहि जागेंतील पाण्यांत स्नान करील किंवा तें खराब करील, किंवा

(ब) पिण्याच्या कामासाठीं सदरीं सांगितल्याप्रमाणें निराळ्या ठेवलेल्या कोणत्याहि जागेच्या कोरड्या भागांत कोणताहि घाणेरडा किंवा अपायकारक पदार्थ टाकील, किंवा

(क) पिण्यासाठीं किंवा स्नानासाठीं सदरीं सांगितल्याप्रमाणें निराळ्या ठेवलेल्या कोणत्याहि जागेंत कपडे धुवील, किंवा

(ड) सदरीं सांगितल्याप्रमाणें पिण्याकरितां किंवा स्नानासाठीं किंवा कपडे धुण्याकरितां निराळ्या ठेवलेल्या कोणत्याही जागेंत कोणतेंहि जनावर किंवा स्वैंपाकाचीं भांडीं किंवा लोंकर, कातडीं किंवा इतर घाणेरडा किंवा त्रासदायक पदार्थ धुवील, किंवा कोणताहि त्रासदायक अगर अपायकारक पदार्थ टाकील, किंवा

(ई) पिण्यासाठीं अथवा स्नानासाठीं अथवा कपडे धुण्यासाठीं सदरीं सांगितल्याप्रमाणें निराळ्या ठेवलेल्या कोणत्याही जागीं, त्याच्या मालकीची मोरी, नाला, गटार, इंजिन किंवा बॉयलर यांतून किंवा दुसरा कोणताहि घाणेरडा पदार्थ यांतून वाहणारें किंवा त्याच्या मालकीच्या किंवा त्याच्या भोगवट्यांत असलेल्या कोणत्याहि इमारतींतून किंवा जागेंतून वाहणारें पाणी जाऊं देईल,

तो त्यावर माजिस्ट्रेटासमोर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाला असतां पराकाष्ठा पन्नास रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल, आणि अपराध चालू असल्याचे बाबतींत अपराधाच्या शाबितीच्या ठरावानंतर सदरहू अपराध ज्या ज्या दिवशीं चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल पराकाष्ठा दहा रुपयांपर्यंत जादा दंडास पात्र होईल.

५८. घाणेरड्या पाण्यापासून होणारी पीडा कमी करणें—जेव्हां कोणत्याहि खासगी आवारांत असणारें किंवा इतर ठिकाणीं असणारें कोणतेंहि डबकें, चर, तळें, पुष्करणी, विहीर, खाडा किंवा कोणतेंहि निरुपयोगी किंवा सांचलेलें पाणी किंवा घाणेरडे पाण्याच्या किंवा त्रासदायक किंवा अपायकारक अशा इतर पदार्थांचा कोणताहि पाट किंवा कुंडी हीं रहिवाशांच्या आरोग्यास अपकारक अथवा शेजाऱ्यांस उपद्रवकारक होण्यासारखीं आहेत असें जिल्हा लोकल बोर्डास दिसेल तेव्हां तीं साफ करण्याविषयीं, भरून टाकण्याविषयीं, त्यांतील पाणी वाहून जाई असें करण्याविषयीं किंवा तीं काढून टाकण्याविषयीं, अथवा पीडा कमी

करण्यासाठीं किंवा नाहीशी करण्यासाठीं आपल्या मतें ज्या तजविजी जरूर असतील त्या करण्याविषयीं त्यांचे मालकास लेखी नोटीस देऊन फर्माविण्याचा जिल्हा लोकल बोर्डास अधिकार आहे.

५९. (१) मनुष्यांच्या प्रेतांची व्यवस्था लावण्याच्या जागा बंद करणें—मनुष्यांच्या प्रेतांची व्यवस्था लावण्याकरितां वापरण्यांत येत असलेली जिल्ह्यांतील कोणतीहि जागा, आरोग्यास अपायकारक होईल किंवा होण्याचा संभव आहे अशा स्थितींत आहे असें जिल्हा लोकल बोर्डास वाटेल, तर त्याला आपलें मत त्याबद्दलच्या कारणांसहित, कमिशनर यांस सादर करण्याचा अधिकार आहे. मग कमिशनर यांस आणखी कांहीं चौकशी करविणें योग्य वाटल्यास ती करविल्यानंतर, जाहिरनाम्याच्या द्वारें त्या जाहिरनाम्यांत त्यासंबंधानें सांगितलेल्या तारखेपासून ती जागा सदरहूप्रमाणें वापरली जाण्याची बंद होईल, असें फर्माविण्याचा त्यांस अधिकार आहे.

(२) सदरहू जाहिरनाम्याची एक प्रत, जिल्ह्याच्या देशभाषेंत केलेल्या त्याच्या तर्जुम्यासहित, स्थानिक वर्तमानपत्रें असल्यास त्यांमध्यें प्रसिद्ध केली पाहिजे आणि ती जिल्हा लोकल बोर्डाचे कचेरींत व तो जाहिरनामा ज्या जागे संबंधानें असेल त्या जागेंत किंवा तिच्या जवळ, सहज दिसण्यासारख्या एका किंवा अधिक ठिकाणीं, लावून ठेविली पाहिजे.

(३) अशी कोणतीहि जागा बंद करण्याबद्दलच्या सदरहू जाहिरनाम्यांत सांगितलेल्या तारखेनंतर तींत जो कोणी मनुष्य कोणतेंहि मनुष्याचें प्रेत गाडील किंवा त्याची इतर प्रकारें व्यवस्था लावील, किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याच्या ठरावांअन्वयें किंवा पूर्वापार चालीवरून प्रेतें पुरण्याकरितां निराळी राखून न ठेवलेल्या कोणत्याहि सरकारी पड जमिनींत कोणतेंहि प्रेत पुरील, त्यास माजिस्ट्रेटापुढें अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यानंतर पराकाष्ठा शंभर रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

६०. (१) जेथें सांक्रामिक रोग आहे अशा इमारती वगैरेंत तपासणीसाठीं शिरण्याचा अध्यक्ष वगैरेस अधिकार असणें—कोणत्याहि जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षास किंवा या बाबतींत बोर्डानें अधिकार दिलेल्या कोणत्याहि इसमास जेथें कोणताहि भयंकर सांक्रामिक रोग आहे असें सांगण्यांत येत असेल किंवा असल्याचा वहीम असेल अशा कोणत्याहि इमारतींत किंवा जागेंत, अशी इमारत किंवा जागा तपासण्यासाठीं वाजवी नोटीस दिल्यानंतर, कोणत्याहि वेळीं शिरण्याचा अधिकार आहे.

(२) सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान तपासणी करणें— सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान असेल तें खेरीज करून इतर वेळीं अशी तपासणी करतां कामा नये.

(३) इमारती वगैरेंतील रोगबीजांचा नाश—इमारत किंवा जागा अगर तिचा कोणताहि भाग किंवा रोगबीजाचा संसर्ग राहील अशी त्यांतील कोणतीहि वस्तु साफ केल्यानें किंवा त्यांतील रोगबीजांचा नाश केल्यानें कोणत्याहि भयकारक सांक्रामिक रोगाच्या प्रसारास प्रतिबंध होईल किंवा आळा बसेल असें जिल्हा लोकल बोर्डाचें मत असेल तर, त्यानें मालकास किंवा भोगवटा करणारास नोटीस देऊन अशा नोटिशींत निर्दिष्ट करावयाच्या वेळाच्या आंत ती साफ करण्यास किंवा त्यांतील रोगबीजाचा नाश करण्यास भाग पाडलें पाहिजे: मात्र इतकेंच कीं, तावडतोब उपाय करणें जरूर आहे असें बोर्डास वाटेल किंवा मालक अगर भोगवटा करणारा गरिबीमुळें किंवा इतर कारणामुळें बोर्डाचा हुकूम पूर्णपणें अमलांत अणण्यास असमर्थ आहे असें असेल तर बोर्डास स्वतः अशी इमारत किंवा जागा अगर वस्तु साफ करविण्याचा किंवा त्यांतील रोगबीजांचा नाश करविण्याचा अधिकार आहे, आणि या कारणासाठीं अशा इमारतींतून किंवा जागेंतून अशा वस्तु बाहेर काढविण्याचा अधिकार आहे; आणि या पोट-कलमाअन्वयें बोर्डास आलेला खर्च सदरहू मालकाकडून किंवा भोगवटा करणाराकडून असा इसम गरिबीमुळें बोर्डाचा हुकूम पूर्णपणें पाळण्यास असमर्थ नसेल तर, बोर्डास वसूल करून घेतां येईल.

६१. (१) जिल्हा लोकल बोर्डानें रोगबीजयुक्त वस्तु धुण्याच्या व रोगबीजरहित करण्याच्या जागा जाहीर करणें—कोणत्याहि भयंकर सांक्रामिक रोगापासून रोगबीजयुक्त झालेले कपडे किंवा आंथरूणपांघरूण किंवा इतर कोणत्याहि वस्तु ज्या जागीं धुतां येतील किंवा रोगबीजरहित करतां येतील अशा जागा वेळोंवेळीं जिल्हा लोकल बोर्डानें जाहीर केल्या पाहिजेत.

(२) रोगबीजयुक्त वस्तूंचा नाश करणें—ज्यांत रोगबीजाचा संसर्ग राहण्याचा संभव असेल असे कपडे, आंथरूणपांघरूण किंवा इतर वस्तू यांचा नाश करावा असें फर्माविण्याचा जिल्हा लोकल बोर्डास अधिकार आहे, आणि नाश केलेल्या वस्तूंबद्दल मोबदला मागितला असतां दिला पाहिजे.

(३) शिक्षा—पोट-कलम (१) याअन्वयें अशा कामाकरितां निराळ्या ठेवलेल्या जागा खेरीज करून इतर कोणत्याहि जागीं जो कोणी असे कपडे किंवा आंथरूणपांघरूण किंवा दुसऱ्या वस्तू धुवील त्याच्यावर माजिस्ट्रेटपुढें अप-

राधाच्या शाबितीचा ठराव झाल्यास तो फारतर पन्नास रुपयांपर्यंतच्या दंडास पात्र होईल.

६२. (१) जिल्हा लोकल बोर्डास पोट कायदे करण्याचा अधिकार आहे—जिल्हा लोकल बोर्डास वेळोवेळीं कमिशनरच्या मंजुरीनें खालील बाबतीं-साठीं पोट-कायदे करण्याचा आणि ते रद्द करण्याचा किंवा त्यांत बदल करण्याचा अधिकार आहे, म्हणजे :—

(अ) मार्केटें, डेऱ्या, दुभत्याचीं दुकानें, धान्याच्या वखारी, धान्याचीं दुकानें, कसाईखाने, गाड्यांचे अड्डे, कबरस्थानें व स्मशानें, अपायकारक धंदे व जतनासंबंधींच्या सर्व बाबती यांच्या उपयोगाचें सामान्य किंवा विशेष नियमन, निर्बंध किंवा मनाई यांसाठीं ;

(ब) सार्वजनिक रस्त्यांचा उपयोग व त्यावरील रहदारी यांचें नियमन करण्यासाठीं व त्याबाबतची स्वच्छता, सुरक्षितता व व्यवस्था हीं ठेवण्यासाठीं; आणि

(क) या आक्टाचे सर्व हेतु अमलांत आणण्यासाठीं;
व अशा पोटकायद्यांच्या भंगाबद्दल दंड व गुन्हेगाऱ्या लादण्याचा त्यास अधिकार आहे.

(२) पोटकायद्यांचा भंग—कोणत्याहि पोटकायद्यामुळें अमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याला बाध येतां कामा नये व कोणत्याहि एका भंगाबद्दलचा दंड पन्नास रुपयांहून जास्त असतां कामा नये. मात्र इतकेंच कीं, भंग एकसारखा चालू असल्याचे बाबतींत अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यानंतर असा भंग ज्या ज्या दिवशीं करण्याचें चालू ठेवण्यांत आलें असेल अशा प्रत्येक दिवसाबद्दल गुन्हेगारास दहा रुपयांहून जास्त नाहीं इतक्या जास्त दंडास कोणत्याहि पोटकायद्यान्वयें पात्र करण्याचा अधिकार आहे.

(३) पोटकायदे कायम करणें—कोणताहि पोटकायदा किंवा एखादा पोटकायदा रद्द करणें किंवा त्यांत बदल करणें हें सरकारकडून पसंत करण्यांत आल्याशिवाय व कायम करण्यांत आल्याशिवाय अमलांत येणार नाहीं.

(४) पोटकायद्यांना कायद्यांचा अमल असणें—सर्व पोटकायद्यांस ते योग्य रीतीनें कायम करण्यांत आल्यानंतर कायद्याचा अंमल असेल.

६३ व्यक्तींच्या नांवानें केलेल्या नोटिशी वगैरेंची बजावणी:—या आक्टाअन्वये कोणा मनुष्याच्या नांवानें केलेली दरेक नोटीस त्यावर बजाविण्याचें व

त्याप्रमाणें केलेलें दरेक बिल त्याला दाखविण्याचें काम या आक्टांत त्यांबद्दल विशेष रीतीनें ठरविलेलें नसेल अशा सर्व बाबतींमध्यें जिल्हा लोकल बोर्डाच्या अमलदारानें किंवा नोकरानें किंवा यासंबंधानें जिल्हा लोकल बोर्डानें अधिकार दिलेल्या इतर मनुष्यानें किंवा सरकारच्या कोणत्याहि अमलदारानें किंवा नोकरानें ज्या शर्ती कबूल करण्यांत येतील त्या शर्तींवर:—

(अ) ज्या मनुष्याच्या नांवानें ती नोटीस किंवा बिल केलेलें असेल त्याला ती किंवा तें देऊन किंवा देण्यास काढून; किंवा

(ब) जर तो मनुष्य सांपडला नाहीं, तर त्याची अखेरची राहाण्याची माहीत असलेली जागा त्या जिल्ह्यांत असल्यास तेथें ती नोटीस किंवा बिल ठेवून; किंवा त्याच्या कुटुंबाच्या कोणत्या तरी जाणत्या पुरुषआसामीकडे किंवा नोकराकडे ती नोटीस किंवा बिल देऊन किंवा देण्यास काढून; किंवा

(क) जर तो मनुष्य त्या जिल्ह्यांत रहात नसेल आणि इतर ठिकाणचा त्याचा पत्ता अध्यक्षास किंवा ती नोटीस किंवा बिल देण्याविषयीं फर्माविणाऱ्या इतर मनुष्यास माहीत असेल, तर ती नोटीस किंवा बिल एका लखोट्यांत घालून व त्यावर तो पत्ता लिहून त्यांतून रजिस्टर टपालमार्फत त्या मनुष्याकडे पाठवून; किंवा

(ड) जर सदरीं सांगितलेल्या मार्गांपैकीं कोणताच साधण्यासारखा नसेल, तर तें बिल किंवा नोटीस ज्या इमारतीसंबंधीं किंवा जमिनीसंबंधीं असेल [असल्यास] तिच्या कोणत्यातरी सहज दिसण्यासारख्या भागावर तें किंवा ती लावून,

केलें पाहिजे.

६४. इमारतींच्या व जमिनींच्या मालकांवर किंवा भोगवटा करणारांवर नोटिशींची बजावणी —जेव्हां या आक्टाअन्वयेंची कोणतीहि नोटीस या आक्टावरून किंवा त्याअन्वयें कोणत्याहि इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकावर किंवा भोगवटा करणारावर बजावणें जरूर असेल किंवा बजावण्याची परवानगी असेल तेव्हां तींत त्या मालकाचें किंवा भोगवटा करणाराचें नांव लिहिणें जरूर नाहीं, आणि या आक्टांत ज्यांबद्दल विशेष रीतीनें इतर प्रकारें ठरविलें नसेल त्या बाबतींमध्यें तिची बजावणी,

(अ) ती नोटीस, त्या मालकास किंवा भोगवटा करणारास किंवा मालक किंवा भोगवटा करणार एकाहून अधिक असल्यास त्यांपैकीं कोणत्याहि एकास, देऊन किंवा देण्यास काढून, किंवा

[ ब ] जर असा कोणताहि मालक किंवा भोगवटा करणारा सांपडला नाहीं तर सदरीं सांगितल्याप्रमाणें अशा कोणत्याहि मालकाच्या किंवा भोगवटा करणाराच्या कुटुंबाच्या कोणत्या तरी जाणत्या पुरुषआसामीकडे किंवा नोकराकडे ती नोटीस देऊन किंवा देण्यास काढून, किंवा

[क] जर सदरीं सांगितलेल्या मार्गांपैकीं कोणताच साधण्यासारखा नसेल तर ती नोटीस ज्या इमारतीसंबंधीं किंवा जमिनीसंबंधीं असेल तिच्या कोणत्या तरी सहज दिसण्यासारख्या भागावर लावून,

केली पाहिजे.

६५. सार्वजनिक व सामान्य नोटिशी कशा प्रसिद्ध करणें—या आक्टावरून जी नोटीस, सार्वजनिक नोटिशीदाखल, किंवा सामान्यतः किंवा तींत नमूद केलेल्या व्यक्तींस नोटीस देणें जरूर आहे असें ज्या ठरावांमध्यें स्पष्टपणें सांगितलेलें नाहीं अशा ठरावांच्या योगें, देणें किंवा बजावणें जिल्हा लोकल बोर्डास जरूर असेल किंवा तसें करण्याविषयीं त्याला अधिकार दिला असेल त्या दरेक नोटिशीची एक नकल, तो जिल्हा लोकल बोर्ड यासंबंधानें पोटकायद्यांमध्यें ठरवील तशा त्या जिल्हा लोकल बोर्डाच्या कचेरीच्या सहज दिसण्यासारख्या भागीं तशा मुदतींत व तशा इतर सार्वजनिक इमारतींमध्यें व जागांमध्यें लावून ठेविली असतां किंवा तशा स्थानिक वर्तमानपत्रामध्यें किंवा तशा इतर रीतीनें प्रसिद्ध केली असतां, ती पुरतेपणीं दिली किंवा बजावली आहे असें समजलें पाहिजे.

६६. [ १ ] नमुन्यांत व्यंग असल्यानें नोटीस गैरकायदेशीर होणार नाहीं—कोणतीहि नोटीस किंवा बिल नमुन्याच्या व्यंगामुळें गैरकायदेशीर होणार नाहीं.

( २ ) कोणत्याहि नोटिशीवरून करणें जरूर असलेलीं कृत्यें करणें—जेव्हां या बाबीअन्वयेंच्या कोणत्याहि नोटिशीवरून ज्याबद्दल या आक्टांत मुदत नेमलेली नाहीं असें कोणतेंहि कृत्य करणें जरूर असेल, तेव्हां तें करण्याबद्दल त्या नोटिशींत वाजवी मुदत नेमली पाहिजे.

[ ३ ] त्या नोटिशीच्या अटींबरहुकूम वागणूक झाली नाहीं, तर तिजवरून करणें जरूर असलेलें कोणतेंहि कृत्य करण्याकरितां अवश्य असेल तें काम किंवा तजवीज करण्याचा त्या जिल्हा लोकल बोर्डास अधिकार आहे, आणि त्यामुळें त्या जिल्हा लोकल बोर्डास झालेला सर्व खर्च ज्यावर किंवा ज्यांवर ती नोटीस बजाविली असेल त्या मनुष्यानें किंवा मनुष्यांनीं दिला पाहिजे, आणि तो ६९ व्या कलमांत सांगितलेल्या रीतीनें वसूल करण्याचा अधिकार आहे.

६७. हुकुमांचें व नोटिशींचें उल्लंघन केल्याबद्दल दुसऱ्या कोणत्याहि कलमाअन्वयें शिक्षा करतां येत नसेल त्या प्रसंगीं शिक्षा—जो कोणी, या बाबींत दिलेल्या कोणत्याहि अधिकाराअन्वयें जिल्हा लोकल बोर्डानें किंवा त्याच्या वतीनें काढलेल्या कोणत्याहि लेखी नोटिशीच्या द्वारें दिलेल्या कोणत्याहि कायदेशीर हुकुमाचें उल्लंघन करील किंवा त्याबरहुकूम वागण्यास चुकेल, किंवा याप्रमाणें दिलेल्या कोणत्याहि अधिकाराअन्वयें त्या जिल्हा लोकल बोर्डानें त्याला ज्या शर्तीस पात्र करून कोणतीहि परवानगी दिली असेल त्यांबरहुकूम वागण्यास चुकेल त्याला, तें उल्लंघन किंवा ती चूक दुसऱ्या कोणत्याहि कलमाअन्वयें शिक्षा करण्याजोगा अपराध होत नसल्यास, माजिस्ट्रेटापुढें अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यानंतर पराकाष्ठा पन्नास रुपयांपर्यंत, आणि अपराधाच्या शाबितीच्या ठरावानंतर ज्या दिवशीं तें उल्लंघन किंवा ती चूक चालू राहील त्या दरेक दिवसाबद्दल आणखी पराकाष्ठा पांच रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, सदरहू नोटिशींत कोणतेंहि कृत्य करण्याबद्दल मुदत नेमलेली असून या आक्टांत त्याबद्दल मुदत नेमलेली नसेल, तेव्हां याप्रमाणें नेमलेली मुदत या आक्टाच्या अर्थाप्रमाणें वाजवी आहे किंवा कसें हें ठरविणें माजिस्ट्रेटाकडे राहील.

६८. [ १ ] मालकानें किंवा भोगवटा करणारानें कसूर केली असतां जिल्हा लोकल बोर्डास बांधकामें करण्याचा व खर्च वसूल करण्याचा अधिकार आहे—जेव्हां जेव्हां, या आक्टाच्या ठरावांअन्वयें कोणतेंहि बांधकाम कोणत्याहि इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकानें किंवा भोगवटा करणारानें करणें जरूर असून, तें काम करण्यांत आलें नसेल, तेव्हां तेव्हां जिल्हा लोकल बोर्डास, तें न केल्याबद्दल कोणतीहि शिक्षा देण्याविषयीं ठराव असो किंवा नसो, तें काम करवून घेण्याचा अधिकार आहे; आणि त्यामुळें झालेला खर्च, या आक्टांत इतर रीतीनें स्पष्टपणें ठरविलेलें नसल्यास, ज्या मनुष्यानें तें काम करावयास पाहिजे होतें त्यानें त्याला दिला पाहिजे, आणि तो, ८ व्या बाबीअन्वयें वसूल करावयाच्या कोणत्याहि कराबद्दल यावयाच्या रकमेप्रमाणेंच, त्या जिल्हा लोकल बोर्डास योग्य वाटेल त्याप्रमाणें एका रकमेनें किंवा हप्त्याहप्त्यांनीं वसूल करण्याचा अधिकार आहे.

[ २ ] भोगवटा करणाराकडून खर्च घेण्याचा अधिकार, व तो आपल्या भाड्यांतून वजा करण्याचा त्याचा अधिकार—याप्रमाणें कसूर करणारा सदरहू इमारतीचा किंवा जमिनीचा मालक असेल, तर त्या जिल्हा लोकल बोर्डास, त्या वेळीं किंवा त्यानंतर कोणत्याहि वेळीं त्या मालकाच्या विद्यमानें जो मनुष्य त्या

इमारतीचा किंवा जमिनीचा भोगवटा करील त्यापासून त्या मालकाकडून त्या त्या वेळीं येणें असलेला सर्व खर्च किंवा त्याचा कोणताहि भाग, त्या मालकावर दावा केलेला किंवा काम चालविलेलें असलें किंवा नसेल तथापि, पोट कलम (३) यांतील ठरावांस पात्र राहून, जादा इलाजादाखल, मागण्याचा अधिकार आहे; आणि मागितल्यावर तो त्या भोगवटा करणारानें दिला नाहीं तर तो त्या भोगवटा करणाराकडून घेण्याचा अधिकार आहे, आणि याप्रमाणें घ्यावयाची दरेक रकम ८ व्या बाबीअन्वयें वसूल करावयाच्या कोणत्याहि कराबद्दल यावयाच्या रकमेप्रमाणेंच वसूल करतां येईल; अशा कोणत्याहि खर्चाच्या संबंधानें त्या भोगवटा करणारानें याप्रमाणें दिलेली किंवा त्यापासून वसूल केलेली रकम त्यानें, आपली जागा ज्यापासून त्यानें घेतलेली असेल त्यास द्यावयाच्या भाड्यांतून वजा करण्याचा त्याला हक्क आहे.

(३) भोगवटा करणारे, देणें झालेल्या भाड्याहून जास्त रकम देण्यास पात्र नसणें—कोणत्याहि इमारतीचा किंवा जमिनीचा भोगवटा करणारा, त्याच्या किंवा तिच्या मालकावर या आक्टावरून लादलेल्या कोणत्याहि खर्चाच्या संबंधानें, ज्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या संबंधानें तो खर्च देणें असेल तिजबद्दल त्या भोगवटा करणाराकडून जी भाड्याची रकम, तो खर्च त्याकडे मागितल्या वेळीं देणें असेल किंवा ती मागणी केल्यानंतर व ती रकम ज्यापासून त्यानें आपली जागा घेतली असेल त्यास न देण्याविषयीं नोटीस दिल्यानंतर कोणत्याहि वेळीं जमेल व त्या भोगवटा करणाराकडून देणें होईल तिच्याहून जास्त पैसा, त्याच्या भाड्याची रकम व ज्या मनुष्यास तें भाडें देणें असेल त्यांचें नांव व पत्ता खऱ्या भावानें सांगण्याविषयीं त्या जिल्हा लोकल बोर्डानें त्याला विनंति केल्यावर तसें करण्यास त्यानें हयगई किंवा इनकार न केल्यास, देण्यास पात्र होणार नाहीं; परंतु अशा कोणत्याहि भोगवटा करणाराकडे मागितलेली रकम त्या मागणीच्या वेळीं त्यानें देणें असलेल्या, किंवा त्यानंतर जमलेल्या, भाड्याहून जास्त असल्याबद्दलच्या पुराव्याचा बोजा त्या भोगवटा करणारावर राहील:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, यांतील कोणत्याहि मजकुरावरून, सदरीं सांगितल्या प्रकारचें कोणतेंहि कामें करण्याचा खर्च देण्यासंबंधीं अशा कोणत्याहि भोगवटा करणाराच्या व मालकाच्या दर्म्यान झालेल्या कोणत्याही विशेष करारास बाध येतो असें समजूं नये.

६९. खर्चवेंच कोणत्या रीतीनें नक्की करावा व वसूल करावा—या आक्टांत देण्याविषयीं फर्माविलेल्या कोणत्याही खर्चवेंचासंबंधानें तक्रार

उत्पन्न होईल, तर त्याची रकम आणि जरूर असल्यास तिची वांटणी, ह्या आक्टांत स्पष्टपणें इतर रीतीनें ठरविलें असेल तें खेरीज करून जिल्हा लोकल बोर्डानें चौकशी करून ठरविली पाहिजे आणि ८ व्या बाबीअन्वयें वसूल करावयाच्या कोणत्याही करासाठीं मागणी केलेली रकम वसूल करण्यांत येते त्याच रीतीनें ती वसूल करतां येईल.

७०. (१) जिल्हा लोकल बोर्डास खटला करण्याचा अधिकार—जिल्हा लोकल बोर्डास हरेक सार्वजनिक पीडेबद्दल कोणताहि खटला करण्याविषयीं आणि कोणताहि दंड वसूल करण्याकरितां आणि या आक्टांतील किंवा त्या अन्वयेंच्या कोणत्याहि पोटकायद्यांतील ठरावांविरुद्ध अपराध करणाऱ्या कोणत्याहि मनुष्यांस शिक्षा होण्याकरितां काम चालविण्याविषयीं आणि अशा खटल्यांचा किंवा चालविलेल्या इतर कामाचा खर्च लोकल फंडांतून देण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, या आक्टां खालील अगर त्या अन्वयेंच्या कोणत्याहि पोट–कायद्याखालील कोणत्याहि अपराधाबद्दल करावयाचा कोणताहि खटला, तो अपराध केल्यापासून लगतच्या सहा महिन्यांनंतर करतां कामा नये.

(२) माजिस्ट्रेटाची हुकुमत—या आक्टाखालील किंवा त्याअन्वयें केलेल्या कोणत्याहि पोटकायद्याखालील दरेक खटला, त्या आक्टांत किंवा पोट-कायद्यांत इतर रीतीनें ठरविलें असेल तें खेरीज करून, कोणत्याहि माजिस्ट्रेटापुढें रुजू करण्याचा अधिकार आहे; आणि या आक्टाअन्वयें किंवा त्यावरून किंवा या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याहि पोटकायद्याअन्वयें किंवा त्यावरून ठरविलेला दरेक दंड किंवा गुन्हेगारी, व तसेंच जो नुकसानीचा मोबदला किंवा जो इतर खर्च वसूल करण्याकरितां या आक्टांत इतर प्रकारें ठराव केलेला नसेल तो सर्व मोबदला किंवा खर्च, त्या माजिस्ट्रेटास अर्जी करून व तो पैसा ज्याकडून मिळण्याबद्दल मागणी असेल त्या मनुष्याची या माजिस्ट्रेटाच्या हुकुमतीच्या हद्दींच्या आंत असलेली कोणतीहि जंगम मिळकत जप्त करून व विकून, वसूल करण्याचा अधिकार आहे.

७१. लोकल बोर्डाच्या कोणत्याहि मिळकतीस झालेलें नुकसान कसें भरून घेणें—ज्या कोणत्याहि कृत्याबद्दल, हयगईबद्दल किंवा करावयाची गोष्ट न केल्याबद्दल कोणताहि मनुष्य या आक्टांत किंवा या आक्टाअन्वयें ठरविलेल्या कोणत्याहि शिक्षेस पात्र झाला असेल त्याच्यायोगें किंवा तिच्यायोगें त्या मनुष्यानें कोणत्याहि लोकल बोर्डाच्या मिळकतीस कोणतेंहि नुकसान केलेलें असलें तर तो तें नुकसान भरून देण्यास पात्र होईल व त्याचप्रमाणें त्या शिक्षेस पात्र होईल,

आणि तक्रारीच्या प्रसंगीं त्या नुकसानीची रकम, त्या शिक्षेस पात्र होणाऱ्या मनुष्यावर ज्या माजिस्ट्रेटानें अपराधाच्या शाबितीचा ठराव केला असेल त्यानें ठरविली पाहिजे, आणि ती नुकसानीची रकम मागितल्यावर दिली नाहीं तर ती जप्तीच्या द्वारें वसूल केली पाहिजे, आणि त्यासाठीं त्या माजिस्ट्रेटानें आपलें वारंट काढलें पाहिजे.

७२. दावा करण्याचा वैकल्पिक इलाज—जिल्हा लोकल बोर्डास जप्ती करून विक्री करण्याच्या ऐवजीं, किंवा ८ व्या बाबीच्या ठरावांअन्वयें वसूल होण्यास पात्र असलेली कोणतीहि रकम किंवा या आक्टाअन्वयें देवविलेला कोणताहि नुकसानीचा मोबदला, खर्च, चार्ज किंवा नुकसानी सदरहूप्रमाणें काम चालवून सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं वसूल न होईल त्या प्रसंगीं ती, देण्यास पात्र असणाऱ्या मनुष्यावर, व तसेंच ज्या कोणत्याहि इतर मनुष्यानें कोणत्याहि प्रकारे जिल्हा लोकल बोर्डाच्या कोणत्याहि मिळकतीचें, हक्कांचें किंवा सवलतीचें नुकसान केलें असेल त्या मनुष्यावर, योग्य हुकुमतीच्या कोणत्याहि कोर्टांत, दावा करण्याचा अधिकार आहे.

७३. (१) पोलीस अमलदारांचे अधिकार—कोणत्याहि पोलीस अमलदाराला, जो कोणताहि मनुष्य या आक्टाच्या किंवा त्याखालीं केलेल्या कोणत्याहि पोटकायद्याच्या कोणत्याहि ठरावांविरुद्ध कोणताहि अपराध आपणासमक्ष करील त्याला, त्याचें नांव व पत्ता त्यास माहीत नसल्यास, व तो आपलें नांव व पत्ता देण्यास इन्कार करीत असल्यास, किंवा नांव व पत्ता दिला तर तो बरोबर नसल्याविषयीं संशय घेण्यास सदरहू पोलीस अमलदारास कारण असल्यास धरण्याचा अधिकार आहे; आणि त्या मनुष्याचें नांव व पत्ता बरोबर रीतीनें कळे तोंपर्यंत त्याला ठाण्यांत अटकावून ठेवण्याचा अधिकार आहे.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, धरलेल्या कोणत्याहि मनुष्यास, माजिस्ट्रेटच्या हुकुमावांचून, माजिस्ट्रेटापुढें त्याला आणण्यास जरूर असेल त्याहून किंवा पराकाष्ठा चोवीस तासांहून जास्त वेळपर्यंत अटकावून ठेवतां कामा नये.

(२) तसेंच, या आक्टाच्या किंवा त्याखालील कोणत्याहि पोटकायद्याच्या ठरावांविरुद्ध केलेल्या कोणत्याहि अपराधाची खबर जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षास किंवा एखाद्या अमलदारास तावडतोब देणें आणि जिल्हा लोकल बोर्डाच्या सर्व अमलदारांस व नोकरांस त्यांचा कायदेशीर अधिकार चालविण्यामध्यें मदत करणें, हेंहि सर्व पोलीस अमलदारांचें काम आहे.

## बाब ६ वी.—उत्पन्न व खर्च.

७४. (१) लोकल फंड, त्याचा ताबा, व तो कोठें ठेवणें तें—प्रत्येक जिल्ह्यांत ज्यास लोकल फंड म्हणण्यांत येईल, असा एक फंड असेल.

(२) लोकल फंड सरकारी खजिन्यांत किंवा ज्या ब्यांकेकडे सरकारी खजिन्याचें कामकाज सोंपवून देण्यांत आलें असेल अशा ब्यांकेंत किंवा सरकार-कडून पसंत करण्यांत येईल अशा इतर ब्यांकेंत किंवा सन १९१२ च्या सहकारी मंडळ्यांबाबत आक्टाअन्वयें नोंदलेल्या अगर नोंदली गेली आहे असें समजल्या जाणाऱ्या सहकारी संस्थेंत ठेवण्यांत आला पाहिजेः

मात्र इतकेंच कीं, जिल्हा लोकल बोर्डास, वेळोवेळीं, सरकारच्या आगाऊ मंजुरीनें, व गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या कोणत्याहि सामान्य किंवा विशेष हुकुमांस पात्र राहून, अशा फंडाचा कोणताहि भाग, हिंदुस्थान सरकारच्या सिक्युरिटींत, किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे याबाबत पसंत करितील अशा इतर सिक्युरिटींत घालण्याचा आणि अशा रीतीनें घालण्यांत आलेला पैसा तशाच स्वरूपाच्या इतर प्रकारांत बदलून घालण्याचा अधिकार आहे; आणि सिक्युरिटी-पासून व त्यांच्या विक्रीच्या ऐवजापासून आलेलें उत्पन्न, लोकल फंडाच्या खातीं जमा केलें पाहिजे.

७५. लोकल फंडाचें उत्पन्न—खालील ऐवज, लोकल फंडाचा भाग असेल किंवा त्याचा त्यांत भरणा करण्यांत आला पाहिजे, तो येणेंप्रमाणेंः—

(अ) या आक्टाचे सुरवातीस जिल्ह्याच्या लोकल फंडाची असलेली शिल्लक;

(ब) सन १८६५ चा सिंधचा लोकल फंड आक्ट व सन १८६९ चा मुंबईचा लोकल फंड आक्ट यांअन्वयें जिल्ह्यांत भरावयाच्या पट्ट्यांच्या कोण-त्याहि भागांचें ( आकारणीचा व वसुलीचा खर्च वजा करून ) निव्वळ उत्पन्न;

(क) कलमें ९३ व ९५ यांअन्वयें अधिकार दिलेल्या जिल्ह्यांतील पट्ट्यांचें ( आकारणीचा व वसुलीचा खर्च वजा करून ) निव्वळ उत्पन्न;

[ड] सन १८६८ चा मुंबईचा सार्वजनिक तरींबाबत आक्ट यान्वयें जिल्ह्यांत स्थापिलेल्या व सदरहू आक्टाअन्वयें जिल्हा लोकल बोर्डाच्या हवालीं झालेल्या तरी नसलेल्या, सर्व सार्वजनिक तरींपासूनचें ( वसूल करण्याचा व तरी चालविण्याचा खर्च वजा करून ) निव्वळ उत्पन्न आणि सदरहू आक्टाअन्वयें जिल्ह्यांत बसवलेले व वसूल केलेले सर्व दंड ;

[इ] सरकारनें लोकल बोर्डाच्या व्यवस्थेखालीं ठेविलेल्या किंवा लोकल बोर्डाच्या स्वाधीन झालेल्या (तरी धरून) मिळकतीपासून येणारीं सर्व भाडीं व नफे;

[फ] सन १८७३ चा रस्ते व पूल यांवरील टोलाबाबद आक्ट याअन्वयें जिल्ह्यांत घेण्यांत यावयाचें, लोकल बोर्डाच्या स्वाधीन झालेले रस्ते व पूल यांवरील सर्व टोलांचा व टोलांच्या मक्त्यांचा (वसुलीचा खर्च वजा करून) निव्वळ उत्पन्न;

[ग] सन १९१९ चा विषांबाबद आक्ट याअन्वयें जिल्ह्यांत घ्यावयाचा, फी, दंड व गुन्हेगाऱ्या यांच्या निव्वळ उत्पन्नाचा सरकार वेळोवेळीं फर्मावील तेवढा भाग;

[ह] सन १८७१ चा गुरांच्या अतिक्रमणाबाबद आक्टयाच्या ३१ व्या कलमाअन्वयें किंवा इतर प्रकारें फंडाच्या नांवें जमा धरण्याचा सरकारनें हुकूम केला असेल अशा सर्व रकमा;

[आय्] रेती काढून नेण्याच्या किंवा खाणी खोदण्याच्या परवानगीसाठीं सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा याअन्वयें जिल्ह्यांत घ्यावयाच्या सर्व फी;

[जे] हा आक्ट अमलांत आणतांना किंवा या आक्टाअन्वयेंच्या करांपासून लोकल बोर्डास मिळालेल्या सर्व रकमा आणि अशा बोर्डानें धारण केलेल्या कोणत्याहि सिक्युरिटींवरील व्याज व त्यांच्या विक्रीपासूनचा ऐवज;

[के] खासगी इसमांनीं दिलेल्या सर्व रकमा;

[ल] लोकल बोर्डाला प्राप्त झालेल्या कोणत्याहि मच्छीखान्यांचें उत्पन्न;

[म] लोकल बोर्डाच्या व्यवस्थेखालीं ठेवलेल्या धर्मादायाच्या व ट्रस्टांच्यासंबंधानें मिळालेल्या रकमा;

[न] सरकारनें दिलेल्या सर्व ग्रांटी व उत्पन्नाच्या लावून दिलेल्या रकमा:

मात्र इतकेंच कीं, जेव्हां एखादी सार्वजनिक तर, रस्ता किंवा पूल हीं अंशतः एका जिल्ह्यांत व अंशतः दुसऱ्या जिल्ह्यांत असतील, तेव्हां जर सदरहू जिल्हे एकाच भागांत असतील तर कमिशनरास, व ते निरनिराळ्या भागांत असतील तर सरकारास, अशा तरीच्या, किंवा असा रस्ता किंवा पूल यांवर घ्यावयाच्या टोलाच्या किंवा टोलांच्या मक्त्यांच्या निव्वळ उत्पन्नाचा, त्यास किंवा त्यांस योग्य वाटेल तितका भाग, प्रत्येक जिल्ह्याच्या लोकल फंडास लावून देण्याचा अधिकार आहे.

आणखी असें ठरविण्यांत येत आहे कीं, एखाद्या जिल्ह्यांतील एकादा रस्ता अंशतः लोकल बोर्डाकडे व अंशतः सरकारकडे गेलेला असेल तर कलेक्टरास

अशा रस्त्यावरील टोलाचा अगर टोलांच्या मक्त्याच्या निव्वळ उत्पन्नाचा त्याला योग्य वाटेल तेवढा भाग त्या जिल्ह्याच्या लोकल फंडाला देण्याचा अधिकार आहे.

७६. [१] लोकल फंड कोणत्या बोर्डांनीं खर्च करावयाचा–जिल्ह्याचा लोकल फंड, या आक्टाचे कारणांसाठीं प्रत्येक तालुका लोकल बोर्डाच्या हुकुमावरून किंवा हुकुमाअन्वयें खर्चाकरितां मिळूं शकेल, तो येणेंप्रमाणेंः—

[अ] या आक्टाचे सुरुवातीस अशा बोर्डाच्या हुकुमावरून किंवा हुकुमाअन्वयें खर्चाकरितां शिल्लक असलेली रकम; आणि

[ब] अशा तालुका लोकल बोर्डाच्या हुकमतीस पात्र असलेल्या क्षेत्रांत होणाऱ्या कलम ७२ च्या रकमा (ब), (क), (इ), (ग), (ह), (आय्), (जे) व (के) यांत वर्णन केलेल्या उत्पन्नांतून जिल्हा लोकल बोर्डानें, कलम ८० अन्वयें शिक्षणाच्या कारणासाठीं लावण्याचा भाग व सदर बोर्डास रास्त वाटेल असा कलमें ७८ व ८१ यांअन्वयें जिल्हा लोकल बोर्डानें द्यावयाच्या खर्चाचा भाग हे देण्याची तजवीज करून राहिलेली शिल्लक;

[२] फंडाचा बाकी राहिलेला भाग, या आक्टाचे कारणासाठीं, जिल्हा लोकल बोर्डाच्या हुकुमावरून किंवा हुकुमाअन्वयें खर्चाकरितां मिळूं शकेल.

७७. लोकल फंड कोठें खर्च करावयाचा—लोकल फंडांतून लोकल बोर्डांनीं करावयाचा खर्च या आक्टांत इतर रीतीनें ठराव केला असेल तें खेरीजकरून त्यांच्या त्यांच्या अधिकाराखालील मात्र क्षेत्रांच्या आंत केला पाहिजे, परंतु कमिशनरच्या मंजुरीनें या आक्टाच्या कारणांपैकीं कोणत्याहि कारणाकरितां त्या क्षेत्राच्या बाहेर करण्याचा अधिकार आहे.

७८. जिल्हा–लोकल–बोर्डांनीं भागवावयाचा सामान्य खर्च— प्रत्येक जिल्हा–लोकल–बोर्डाच्या हातीं लोकल फंडाचा भाग असेल त्यांतून त्यानें खालीं लिहिलेला खर्च भागविला पाहिजेः—

[अ] ११९ च्या कलमाअन्वयें ठेविलेल्या सर्व अमलदारांचे व नोकरांचे पगार व दुसरीं वेतनें, आणि अशा अमलदारांस व नोकरांस कांहीं पेनशनें अगर ते चाकरी सोडून घरीं बसतील तेव्हां त्यांस दुसऱ्या नेमणुका हीं द्यावयाचीं असल्यास तीं; आणि अशा अमलदारांच्या व नोकरांच्या मागून राहणाऱ्या नातेवाईकांस द्यावयाच्या ग्राच्युइटी किंवा कांपाशनेट नेमणुका; आणि सरकारच्या कोणत्याहि अमलदारानें किंवा नोकरानें बोर्डाकरितां केलेल्या कोणत्याहि नोकरीसाठीं कबूल करण्यांत येईल असा खर्च.

(ब) बोर्डानें कामावर लावलेल्या सरकारच्या कोणत्याहि अमलदारांचे किंवा नोकरांचे सरकारनें वेळोवेळीं ठरविलेल्या कानूप्रमाणें पगार, नेमणुका व

पेनशनांसाठीं वर्गण्या हीं देण्याकरितां सरकारनें वेळोवेळीं ठरविलेली जी रकम असेल ती.

७९. (१) उत्पन्नाचा कांहीं भाग म्युनिसिपालिटीस किंवा क्याद्र्टोन्मेंट कमिट्यांस सोंपवून देणें:—प्रत्येक जिल्हा-लोकल-बोर्डानें, ज्या जिल्ह्यासाठीं असा बोर्ड स्थापिला असेल त्या जिल्ह्यांतील प्रत्येक म्युनिसिपालिटीस व क्याद्र्टोन्मेंट कमिटीस, ७५ व्या कलमाच्या (ब) व (क) रकमेंत सांगिलेला, व अशा म्युनिसिपालिटीच्या किंवा कमिटीच्या ताब्यांतल्या म्युनिसिपल डिस्ट्रिक्टांतील किंवा क्याद्र्टोन्मेंटांतील जमिनीवर घेतलेला जो महसूल, त्याच्या दोनतृतीयांश इतकी रकम जिल्हा-लोकल-फंडांतून एकीकडे काढून देवविली पाहिजे, आणि जिल्हा-लोकल बोर्डास असा अधिकार आहे कीं त्यानें, आपल्या नजरेस येईल तर, अशा प्रत्येक म्युनिसिपालिटीस किंवा कमिटीस सदरहू महसुलाची सगळी रकम काढून द्यावी; ही जी महसुलाची रकम तिजविषयीं जिल्हा लोकल बोर्डाच्या विनंतीवरून कलेक्टरानें ठराव करून दाखला दिला पाहिजे.

[२] अशी एकीकडे काढून दिलेली रकम सदरहू म्युनिसिपालिटीनें किंवा क्याद्र्टोन्मेंट कमिटीनें ५० व्या कलमांत जीं कारणें सांगितलीं आहेत त्याच मात्र कारणांसाठीं, किंवा जे अमलदार व नोकर ती सदरहू कारणांपैकीं कोणत्याहि कारणाकरितां ठेवील त्यांस मेहनताना देण्यासाठीं, ती खर्च केली पाहिजे; आणि (१) ल्या पोट कलमांत सांगितलेला जो महसूल, त्याच्या निदान एकतृतीयांशाइतका त्या रकमेचा भाग तिणें ५० व्या कलमाच्या (ड) रकमेंत सांगितलेल्या प्रकारच्या शिक्षणाच्या कारणासाठीं मात्र खर्च केला पाहिजे.

८०. शिक्षणाच्या कारणासाठीं खर्च जिल्हा-लोकल-बोर्डांनीं मात्र करणें-प्रत्येक जिल्ह्यांत ५० व्या कलमाच्या (ड) व (ल) रकमांत सांगितलेल्या प्रकारच्या शिक्षणाच्या कारणासाठीं लोकल फंडांतून खर्च करणें तो फक्त जिल्हा-लोकल-बोर्डानेंच केला पाहिजे, अगर त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यांत सांगितलेला असेल त्या अधिकाऱ्यानें केला पाहिजे, आणि या कारणासाठीं ७५ व्या कलमाच्या (ब) व (क) रकमेंत सांगितलेल्या महसुलाच्या निदान एकतृतीयांशाइतकी रकम (७९ व्या कलमाच्या (१) ल्या पोट कलमांत सांगितलेली रकम किंवा सांगितलेल्या रकमा वाद करून) सदरहू कारणाला सदरहू बोर्डानें स्वतः खर्च करण्यासाठीं वेगळी काढून ठेविली पाहिजे :

मात्र असें ठरविलें आहे कीं,

(अ) याप्रमाणें वेगळा काढून ठेवलेला महसूल कोणत्याहि तालुका-लोकल-बोर्डाच्या अधिकाराखालील क्षेत्रांत घेतलेला असेल त्याचा कोणताच भाग अशा बोर्डाच्या संमतीवांचून सदरहू क्षेत्राबाहेर खर्च करतां नये; आणि

(ब) प्रत्येक जिल्हा लोकल बोर्डानें अगर सदरीं सांगितलेल्या अशा अधिकाऱ्यानें प्राथमिक शिक्षणाबद्दल अवश्य करण्याचा जो खर्च तो शिक्षणाबाबत जिल्हा लोकल बोर्डाचा व तालुका लोकल बोर्डाचा स्वतंत्र अधिकार कितपत आहे हें आणि शिक्षणाच्या बाबतींत त्यांचे सरकारी शाळाखात्याशीं व परस्परांशीं एकंदरीनें संबंध हीं १३३ व्या कलमाच्या (इ) रकमेअन्वयें या बाबतींत सरकारनें केलेल्या कानूंत वेळोवेळीं ठरविलीं पाहिजेत.

या कलमाच्या (ब) विशेष ठरावाचे ठराव, म्युनिसिपालिटींनीं व क्यान्टोन्मेंट कमिट्यांनीं ७९ व्या कलमान्वयें शिक्षणाच्या कारणासाठीं ज्या रकमा खर्च करण्याच्या त्या रकमांच्या संबंधानें म्युनिसिपालिटीस व क्यान्टोनमेंट कमिट्यांसहि लागू होतील.

८१. (१) दुसऱ्या कारणासाठीं कोणत्या बोर्डांनीं खर्च करावा याचा निश्चय करण्याविषयीं ठरावः—शिक्षणाखेरीज दुसऱ्या बाबतींसंबंधीं खर्चाबद्दलची जिल्हा लोकल बोर्ड व तालुका लोकल बोर्ड यांतून प्रत्येकाची जबाबदारी खालीं लिहिलेल्या ठरावांप्रमाणें ठरविली पाहिजे. म्हणजेः—

(अ) प्रत्येक लोकल बोर्डाच्या स्वाधीन जी कोणतीहि इमारत किंवा दुसरी मालमिळकत असेल ती व त्या बोर्डाच्या खर्चानें केलेलें कोणतेंहि काम हीं यथास्थित राखण्याविषयीं तो बोर्ड जबाबदार असेल;

[ब] जिल्हा लोकल बोर्डाच्या स्वाधीन झालेले जिल्ह्यांतील मुख्य रस्ते व जिल्ह्यांतून पार जाणारीं दुसरीं दळणवळणाचीं साधनें हीं बांधण्याबद्दल, यथास्थित राखण्याबद्दल व त्यांची मरामत करण्याबद्दल लोकांस देवी काढण्याचें काम व लोकांसाठीं दवाखाने व जिल्ह्यास एकंदरीनें फायदा करणारीं दुसरीं अशींच स्थानिक खातीं व कारखाने चालू ठेवण्याबद्दल आणि ज्या बाबतींत दोन किंवा अधिक तालुक्यांचा हितसंबंध असेल अगर असूं शकेल त्या सर्व बाबतींबद्दल जिल्हा लोकल बोर्ड जबाबदार असतील;

[क] जे दुसरे रस्ते व कामें केवळ स्थानिक असतील तीं सर्व बांधण्याबद्दल व यथास्थित राखण्याबद्दल आणि जिल्हा लोकल बोर्डानें चालू ठेवलेलीं नाहींत अशीं सर्व स्थानिक खातीं व कारखाने यांबद्दल तालुका लोकल बोर्ड जबाबदार असतील; आणि

[ड] ह्या कलमाच्या [क] रकमेंत सांगितलेल्या प्रकारचीं जीं मोठीं कामें तालुका लोकल बोर्डाच्या हातीं असलेल्या ऐवजानें करतां येण्याजोगीं नसतील तीं आपल्या खर्चानें करण्यासाठीं घेण्याचा जिल्हा लोकल बोर्डास अधिकार आहे, किंवा खर्चाचा कांहीं भाग तालुका लोकल बोर्डानें किंवा खानगी मनुष्यांनीं किंवा या दोन्हींनीं द्यावा या शर्तीनें मदतीस पैका देऊन तालुका लोकल बोर्डास तीं कामें हातीं घेण्यांत मदत करण्याचा जिल्हा लोकल बोर्डास अधिकार आहे.

[२] कोणताहि खर्च काम, कारखाना किंवा खातें याबद्दल कोणता बोर्ड जबाबदार आहे याविषयीं जिल्हा लोकल बोर्ड व तालुका लोकल बोर्ड यांच्या दरम्यान मतभेद उत्पन्न होईल तर त्या गोष्टीचा निवाडा होण्यासाठीं ती कमिशनराकडे पाठवावी आणि तो निवाडा अखेरचा होईल.

८२. [१] लोकल फंडांतून पैका कसा काढावा:—ज्या लोकल बोर्डास पैका पाहिजे असेल त्या लोकल बोर्डाच्या अध्यक्षानें सह्या केलेल्या चेकाखेरीज किंवा भलामणपत्राखेरीज लोकल फंडांतला पैका सरकारी तिजोरींतून किंवा बँकेनें किंवा सहकारी मंडळीनें देतां नये. परंतु ही गोष्ट कलमें १२६ ते १३१ [दोन्ही धरून] यांतील ठरावांस पात्र आहे.

[२] शंभर रुपयांहून अधिक कोणतीहि रक्कम लोकल बोर्डानें द्यावयाची ती सदरहूप्रमाणें सह्या केलेल्या चेकाच्या किंवा भलामणपत्राच्या द्वारानें दिली पाहिजे. दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें देतां नये.

८३. सरकारनें ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें हिशोब ठेवणें—प्रत्येक लोकल बोर्डाच्या जमाखर्चाचे हिशोब सरकार १३३ व्या कलमाच्या [फ] रकमेअन्वयें ह्या बाबतींत केलेल्या कानूंत वेळोवेळीं ठरवील त्या नमुन्याप्रमाणें ठेवले पाहिजेत; आणि जमाखर्चाची बाकी सरकार ठरवील त्याप्रमाणें दरसाल प्रत्येक नगदी किंवा महसुली सालाच्या शेवटच्या दिवशीं काढली पाहिजे.

८४. हिशोबांचें तेरीज दर साल प्रसिद्ध करणें—लोकल फंडांतून घेतलेल्या रकमा, नोकर मंडळीबद्दलचा व दुसऱ्या सर्व प्रकारचा खर्च, हातीं घेतलेलीं कामें व प्रत्येक कामावर खर्च केलेल्या रकमा व कांहीं शिल्लक हातीं असल्यास ती, हीं दर्शविणारें प्रत्येक लोकल बोर्डाच्या हिशोबांचें एक तेरीज बोर्डाच्या अध्यक्षानें दरसाल, वर्ष संपल्यानंतर होईल तितक्या लवकर कलेक्टराकडे किंवा कलेक्टर याबाबत ज्या अमलदारास नेमील त्या अमलदाराकडे सरकार १३३ व्या कलमाच्या [फ] रकमेअन्वयें या बाबतींत केलेल्या कानूंत वेळोवेळीं ठरवील त्या नमुन्याप्रमाणें पाठविलें पाहिजे आणि तें मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केलें पाहिजे.

८५. (१) लोकल फंडाच्या वास्तविक उत्पन्नाचें व अंदाज केलेल्या उत्पन्नाचें पत्रक लोकल बोर्डास पाठविणें—यांत पुढें ठरविल्याप्रमाणें लोकल बोर्डास वार्षिक बजेट एस्टिमेट तयार करतां येण्यासाठीं सरकार वेळोवेळीं फर्मावील त्या तारखेस किंवा त्या तारखेपूर्वी व त्या नमुन्याप्रमाणें कलेक्टरानें आपल्या जिल्ह्यांतील प्रत्येक तालुका लोकल बोर्डास एक वार्षिक पत्रक पाठविलें पाहिजे; त्या पत्रकांत ज्या तालुक्यासाठीं असा बोर्ड स्थापिला असेल त्या तालुक्याबाबत खालीं लिहिलेला मजकूर असावा:—

| | |
|---|---|
| (अ) गेल्या संपूर्ण सरकारी सालांत प्रत्यक्ष आलेला पैका;<br>(ब) चालू सरकारी सालांत पैका यावयाचा त्याचा तपासलेला अंदाज; आणि<br>(क) लगत पुढच्या सरकारी सालांत पैका येण्याचा संभव असेल त्याचा पहिला अंदाज; | ज्या मार्गांनीं लोकल फंड उत्पन्न होतो त्यांपैकीं प्रत्येक मार्गानें; |

आणि तसेंच एक पत्रक सगळ्या जिल्ह्याबद्दल जिल्हा लोकल बोर्डास पाठविलें पाहिजे.

(२) जिल्हा लोकल बोर्डानें सरकार वेळोवेळीं फर्मावील अशा तारखेस किंवा त्या तारखेपूर्वी ७५ व्या कलमाच्या (ब) रकमेंत व (क) रकमेंत सांगितलेल्या महसुलाची सरासरी किती रकम सदरहू जिल्ह्यांतील प्रत्येक तालुका लोकल बोर्डाच्या लगत पुढच्या सरकारी सालांत स्वाधीन होईल तें अशा तालुका लोकल बोर्डास कळवून कलम ७६, पोटकलम (१) रकम [ब] यांच्यासंबंधानें सदरहू रकम कोणत्या रीतीनें ठरविली आहे तें दाखविलें पाहिजे.

८६. [१] उत्पन्नाचें व खर्चाचें वार्षिक बजेट एस्टिमेट तयार करणें—सरकार १३३ व्या कलमाच्या [फ] रकमेअन्वयें ह्या बाबतींत केलेल्या कानूंत वेळोवेळीं फर्मावील त्या तारखेस किंवा त्यापूर्वी व त्या नमुन्याप्रमाणें प्रत्येक लोकल बोर्डानें दरसाल पुढल्या सरकारी सालाबद्दल आपल्या उत्पन्नाचें व खर्चाचें बजेट एस्टिमेट तयार केलेलें असलें पाहिजे.

[२] बजेट एस्टिमेटांचा बोर्डानें विचार करणें व तीं पसंत करणें—याप्रमाणें तयार केलेल्या बजेट एस्टिमेटाचा विचार बोर्डानें सदरहू तारखेस किंवा त्या तारखेनंतर होईल तितक्या लौकर केला पाहिजे आणि त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणें त्यांत फेरफार करून किंवा केल्यावांचून तो पसंत केला पाहिजे.

८७. तालुका लोकल बोर्डाचीं बजेट एस्टिमेट मंजुरीसाठीं जिल्हा लोकल बोर्डाकडे गुजरणें—तालुका लोकल बोर्डानें पसंत केलेलें प्रत्येक बजेट एस्टिमेट

ज्या जिल्हा लोकल बोर्डाच्या ताब्यांत असा तालुका लोकल बोर्ड असेल त्या जिल्हा लोकल बोर्डाकडे लागलेंच पाठविलें पाहिजे; आणि जिल्हा लोकल बोर्डास असा अधिकार आहे कीं, त्यानें

( ब ) त्याला योग्य वाटेल तितक्या वेळां असें बजेट एस्टिमेट तपासणीसाठीं त्या तालुका लोकल बोर्डाकडे परत पाठवावें, किंवा

(ब) त्याजकडे पाठविलेलें कोणतेंहि बजेट एस्टिमेट किंवा तपासलेलें बजेट एस्टिमेट, जसें असेल तसेंच, किंवा त्यास योग्य वाटतील ते फेरफार करून मंजूर करावें.

८८. ( १ ) तपासलेलीं किंवा पुरवणी बजेट एस्टिमेट अवश्य असेल तेव्हां करण्याचा अधिकार आहे—ज्या वर्षाबद्दल असें कोणतेंहि बजेट एस्टिमेट पसंत किंवा मंजूर केलें असेल त्या वर्षांत कोणत्याहि वेळीं प्रत्येक लोकल बोर्डास, तपासलेलें किंवा पुरवणी बजेट एस्टिमेट तयार करविण्याचा अधिकार आहे. अशा प्रत्येक तपासलेल्या अगर पुरवणी एस्टिमेटाचा त्या लोकल बोर्डानें विचार केला पाहिजे व तें पसंत केलें पाहिजे आणि तालुका लोकल बोर्डाच्या बाबतींत तें एस्टिमेट असल वार्षिक बजेट एस्टिमेट पाठविण्याच्या रीतीप्रमाणें जिल्हा लोकल बोर्डाकडे मंजुरीसाठीं पाठाविलें पाहिजे.

( २ ) फंडाच्या पुनर्योजना करणें त्या बजेट एस्टिमेटाप्रमाणें पसंतीस व मंजुरीस पात्र असतील—बजेट एस्टिमेटांतील फंडांची पुनर्योजना वेळोवेळीं करण्याचा अधिकार आहे, पण ती बजेट एस्टिमेटास जी पसंती किंवा मंजुरी जरूर आहे तशाच पसंतीनें किंवा मंजुरीनें केली पाहिजे.

८९. ( १ ) बजेट एस्टिमेट व पुनर्योजना केव्हां पसंत किंवा मंजूर करणें—लोकल बोर्डाचें कोणतेंहि बजेट एस्टिमेट व बजेटांतील एकाद्या रकमेची कोणतीहि पुनर्योजना, वर सांगितल्याप्रमाणें पसंत किंवा मंजूर करणें ती खालीं लिहिलेला प्रकार असल्यावांचून करतां नये:—

(अ) अशा बोर्डाच्या जमेच्या बाजूस, जिल्हा लोकल बोर्डाच्या बाबतींत निदान पांच हजार रुपये, आणि तालुका लोकल बोर्डाच्या बाबतींत निदान दोनशें रुपये बाकी, सरकारी सालाच्या अखेरीस राहण्याविषयीं त्यांत तजवीज केलेली असल्यावांचून;

( ब ) ज्या बजेट एस्टिमेटांत कोणत्याहि कामाविषयीं, मग तें नवीन बांधण्याचें असो किंवा मरामतीचें असो, तजवीज केलेली असेल त्या बजेट एस्टिमेटांत अशा प्रत्येक कामाबाबद, त्या बोर्डानें पसंत केलेला असेल असा त्या कामाच्या खर्चाचा तपशीलवार अंदाज जोडलेला असल्यावांचून, व दर मैलास

सरासरी तीनशें रुपयांहून अधिक खर्च ज्या रस्त्याला होणार असेल अशा रस्त्याच्या बाबतींत किंवा एकंदर खर्च ज्या कामाला तीन हजार रुपायांहून अधिक होणार असेल अशा दुसऱ्या कोणत्याहि कामाच्या बाबतींत, जिल्ह्याच्या सरकारी एक्झिक्यूटिव्ह इंजिनियरानें किंवा बोर्डानें कामावर लावलेल्या व सरकारनें पसंत केलेल्या इंजिनीयरानें नकाशा व अंदाज तयार केलेला अगर पसंत केलेला असल्यावांचून.

(२) बजेट एस्टिमेटच्या नकला व पुनर्योजना करावयाच्या त्यांचीं पत्रकें कलेक्टराकडे पाठविणें—गेल्या ठरावांअन्वयें अखेर पसंत किंवा मंजूर केलेल्या प्रत्येक बजेट एस्टिमेटची एक नकल आणि पुनर्योजना करावयाची ती त्याप्रमाणेंच पसंत किंवा मंजूर केल्यावर त्या प्रत्येकीचें पत्रक हीं, प्रत्येक लोकल बोर्डाच्या अध्यक्षानें विलंब न लावतां कलेक्टराकडे किंवा याबाबद ज्या अमलदारास तो नेमील त्या अमलदाराकडे पाठविलीं पाहिजेत. वार्षिक बजेट एस्टिमेट फेब्रुवारी महिन्याच्या निदान १८ व्या तारखेस याप्रमाणें पाठविलीं पाहिजेत.

९०. (१) बजेट एस्टिमेटांत तजवीज केलेली नसेल अशी कोणतीच रक्कम भारी निकडीचा प्रसंग असल्यावांचून खर्च करतां नये—भारी निकड असेल तेव्हां मात्र खेरीज करून, मात्र त्या त्या वेळीं अमलांत असलेलें जें कोणतें तरी बजेट एस्टिमेट सदरहूप्रमाणें पसंत किंवा मंजूर केलेलें असेल त्यांत दाखल असल्यावांचून कोणतीहि रक्कम कोणत्याहि लोकल बोर्डानें किंवा त्याच्या तर्फेनें खर्च करतां नये.

[२] कोणतीहि रक्कम भारी निकडीच्या प्रसंगीं याप्रमाणें खर्च केली असेल तर त्यासंबंधीं हकीकत, असा ज्यास्ती खर्च कोणत्या रीतीनें भरून काढण्याचें त्या लोकल बोर्डानें योजिलें आहे त्याच्या खुलाशासहित, अध्यक्षानें [ जर ती रक्कम तालुका लोकल बोर्डानें खर्च केली असेल तर जिल्हा लोकल बोर्डाच्या मार्फत ] कलेक्टरास लगेच लेखी कळविली पाहिजे.

९१. हा आक्ट अमलांत येईल तेव्हां चालू असलेल्या बजेट एस्टिमेटांबाबद ठराव—हा आक्ट सुरू होण्याच्या पूर्वीं सन १८७४ चा मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट याअन्वयें कोणत्याहि लोकल बोर्डानें तयार केलेलें, पसंत केलेलें किंवा मंजूर केलेलें प्रत्येक बजेट एस्टिमेट ह्या आक्टाअन्वयें योग्य रीतीनें तयार केलेलें आहे, पसंत किंवा मंजूर केलेलें आहे असें समजलें पाहिजे.

९२. (१) सरकारच्या हुकुमाअन्वयें मुदतीमुदतीनें हिशोबाची तपासणी करणें—प्रत्येक लोकल बोर्डाच्या हिशोबांची तपासणी व रुजुवात सरकार वेळो·

वेळीं फर्मावील त्या मुदतींनीं, त्या रीतीनें व त्या आडिटरानें किंवा त्याच्या देखरेखीखालीं केली पाहिजे.

(२) सर्व हिशोब वगैरे पाहण्याचा ऑडिटरास अधिकार असणें—या कलमाअन्वयें नेमलेल्या प्रत्येक ऑडिटरास लोकल बोर्डाच्या कबजांतील किंवा ताब्यांतील हिशोब आणि सर्व बुकें, खतें, करार, व्हौचर व दुसरे सर्व दस्तऐवज व कागदपत्र पाहण्यास मिळाले पाहिजेत.

(३) प्रत्येक लोकल बोर्डासंबंधीं ऑडिटराचा रिपोर्ट मुंबई सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध केला पाहिजे आणि त्याची नकल संबंध असलेल्या प्रत्येक बोर्डास व कलेक्टरास पाठविली पाहिजे. प्रत्येक तालुका-लोकल बोर्डासंबंधीं रिपोर्टाची नकल जिल्ह्याच्या जिल्हा-लोकल-बोर्डासहि पाठविली पाहिजे.

## बाब ७ वी.—कर बसविणें.

९३. (१) जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर एक आणा सेस घेणें—यांत नंतर सांगितलेल्या शर्तीवर व रीतीनें सरकारनें खालील रकमांच्या प्रत्येक रुपयावर, म्हणजे—

(अ) परिशिष्ट अ यांत सांगितलेले चार्जांपैकीं कोणत्याहि चार्जांमुळें व ह्या बाबतींत सरकार जो कोणताहि चार्ज जाहीर करील त्या चार्जांमुळें घ्यावयाच्या रकमा खेरीजकरून, सामान्य जमीन महसूल म्हणून सरकारास द्यावयाच्या प्रत्येक रकमेच्या, आणि

(ब) सारा घेण्याची मालकी दुसऱ्याकडे गेली नसती तर जमीन महसूल म्हणून कोणत्याहि जमिनीवर जी रकम आकारतां आली असती अशा प्रत्येक रकमेच्या,

प्रत्येक रुपयावर एक आण्याचा किंवा ज्या जिल्हा लोकल बोर्डास तो सेस द्यावयाचा असेल अशा लोकल बोर्डानें त्या कारणासाठीं बोलाविलेल्या विशेष सभेंत पास झालेल्या ठरावास अनुलक्षून अर्ज केला असतां दोन आण्यांहून अधिक नाहीं इतका वाढविलेला सेस घेतला पाहिजे.

मात्र इतकेंच कीं, सदरीं सांगितल्याप्रमाणें बसवावयाचा कोणताहि वाढविलेला सेस हा, ३ पै यांची एखादी पट असली पाहिजे.

[२] सरकारास, ज्या लोकल बोर्डाकडे तो सेस भरावयाचा असेल अशा लोकल बोर्डाचा अर्ज आल्यानंतर, ज्या क्षेत्रांत दुष्काळ पडला आहे असें

सरकारनें जाहीर केलें असेल अशा कोणत्याहि क्षेत्रांत, कोणत्याहि वर्षी तो सेस किंवा त्याचा कोणताहि भाग वसूल करण्याचें तहकूब करण्याचा अधिकार आहे.

९४. आकारणींसाठीं कानू--सन १८७९चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा यांत व्याख्या केल्याप्रमाणें दुमाला गांवांवरील सदरहू सेसच्या आकारणींत,

[अ] सदरहू कायद्यांत व त्याअन्वयें केलेल्या कानूंत सांगितल्या रीतीप्रमाणें त्या गांवाची जर मोजणी झालेली असेल व आकारणी करण्यांत आली असेल तर सदरहू कायदा किंवा त्याअन्वयें केलेल्या कानू याअन्वयें ठरविल्याप्रमाणें त्या गांवाच्या आकारणीच्या एकूण रकमेवर सेस ठरविला पाहिजे.

[ब] सन १८६३ च्या जमीन महसुलाच्या माफीविषयीं [ नंबर १ ] च्या आक्टाअन्वयें अगर सन १८६३ च्या जमीन महसुलाच्या माफीविषयीं [नबर २] च्या आक्टाअन्वयें जर त्या गांवास समरी सेटलमेंट लागू झालें असेल आणि या कलमाची [अ] रकम लागू होत नसेल तर समरी सेटलमेंटच्या कारणाकरितां ठरविल्याप्रमाणेंच्या एकूण वार्षिक आकारणीवर सेस ठरविला पाहिजे; आणि

(क) या कलमाच्या रकमा (अ) किंवा (ब) ह्यांपैकीं कोणतीहि ज्या गांवास लागू होत नसेल त्या गांवांत कलेक्टरच्या दप्तरांत दाखल केलेल्या जुन्या अगर कमाल दरानें सेस ठरवावा आणि असा कोणताहि दर दाखल केलेला नसेल अगर अशा रीतीनें दाखल केलेल्या दराविरुद्ध त्या दुमाला गांवाच्या धारण करणारानें अगर मालकानें हरकत घेतली असेल तर सेस, कलेक्टर व असा धारण करणारा किंवा मालक यांच्यामध्यें समजूत होऊन ठरलें असेल त्याप्रमाणें ठरवावा किंवा, समजूत होत नसेल तर सरकारकडून सरासरी मोजणी करवून व साऱ्याचा आकार ठरवून त्याप्रमाणें सेस ठरवावा. अशा सरासरी मोजणीच्या खर्चाचा अर्धा भाग लोकल बोर्डानें व अर्धा अशा गांवाच्या धारण करणारानें अगर मालकानें सोसला पाहिजे.

९५. पाणीपट्टीवर सेस बसविणें—सन १८७९ च्या मुंबईच्या इरिगेशन आक्टाच्या ठरावांअन्वयें घ्यावयाच्या पाणीपट्टीच्या दरेक रुपयावर दोन आण्यांहून जास्त नाहीं इतका सेस बसविण्याचा सरकारास अधिकार आहे.

९६. कलम ९३ यांत वर्णन केलेला सेस वसूल करण्याची रीत—कलम ९३ यांत वर्णन केलेला सेस, जेवढें होईल तेवढें करून, जमीन महसूल ज्या रीतीनें व कायद्याच्या ज्या ठरावांप्रमाणें वसूल करतात त्याच रीतीनें व कायद्याच्या त्याच ठरावांअन्वयें वसूल केला पाहिजे.

९७. कलम ९५ यांत वर्णन केलेला सेस वसूल करण्याची रीत—कलम ९५ यांत वर्णन केलेला सेस, जेवढें होईल तेवढें करून, सन १८७९ चा मुंबईचा इरिगेशन आक्ट याअन्वयें सरकारास द्यावयाच्या पाणीपट्टीप्रमाणें त्याच रीतीनें व कायद्याच्या त्याच ठरावांअन्वयें वसूल केला पाहिजे.

९८. वरिष्ठ धारण करणारांस मदत—वरिष्ठ धारण करणारे व पाण्याच्या पाटांचे मालक यांची त्यांच्या कुळांकडून व खातेदारांकडून किंवा त्यांचे पाण्याचे पाटांचा उपयोग करण्यास अधिकार मिळालेल्या इसमांकडून येणें असलेल्या रकमा वसूल करण्यास त्यांस द्यावयाच्या मदतीसंबंधाचे कायद्याचे ठराव, दुमाला जमिनींच्या अगर दुमाला नसलेल्या जमिनींच्या सर्व वरिष्ठ धारण करणारांस आणि पाण्याच्या पाटांच्या मालकांस त्यांच्या कुळांपासून, खातेदारांपासून अगर त्यांच्या पाण्याच्या पाटांचा उपयोग करण्यास अधिकार असलेल्या इसमांपासून सदरहू सेसांची वसुली करण्यासंबंधानें लागू असतील आणि सन १८७९ च्या मुंबईच्या जमीन महसुलाच्या कायद्याअन्वयें जमिनीच्या खातेदारांस देखील त्यांच्या कुळांपासून अगर समाईक खातेदारांपासून सदरहू सेस वसूल करण्यासंबंधानें लागू असतील.

९९. जिल्हा लोकल बोर्डाला जे कर लादतां येतील असे कर—जे कोणतेहि सामान्य किंवा विशेष हुकूम ह्या बाबतींत सरकार करील अशा हुकुमांस पात्र राहून प्रत्येक जिल्हा लोकल बोर्डास—

(अ) १०० व्या कलमावरून जरूर असलेल्या प्रथम करावयाच्या गोष्टी केल्यानंतर, आणि

(ब) कमिशनरची मंजुरी घेऊन व जे फेरफार किंवा शर्ती कलम १०१ अन्वयें अशी मंजुरी देतांना कमिशनरास योग्य वाटतील अशा फेरफारांस किंवा शर्तींस पात्र राहून,

ह्या आक्टाच्या कारणांसाठीं, जो कोणताहि कर हिंदुस्थान सरकारसंबंधीं आक्टाचें कलम ८० अ, पोट-कलम (३), रकम (अ) अन्वयें केलेल्या कानू-अन्वयें स्थानिक अधिकारी गव्हर्नर जनरल यांच्या आगाऊ मंजुरीवांचून स्थानिक कायदेमंडळानें केलेल्या कोणत्याहि कायद्यानें लादण्यास मुखत्यार असेल असा कोणताहि कर लादण्याचा अधिकार आहे:

मात्र इतकेंच कीं, आरोग्यरक्षणाबाबतचा विशेष सेस किंवा पाणीपट्टी याशिवाय सदरीं सांगितल्याप्रमाणें बसविलेला कोणताहि कर, सरकारच्या स्पष्ट संमतीशिवाय सरकारची असलेली व सार्वजनिक कामाकरितांच केवळ उपयोगांत असलेली, व

फायद्याच्या कारणांकरितां न वापरलेली किंवा वापरण्याचा हेतू नसलेली कोणतीहि इमारत किंवा कोणत्याहि इमारतीचा भाग, किंवा कोणतेंहि वाहन, जनावर किंवा इतर मिळकत यांचे संबंधानें बसवितां कामा नये; आणि फौज जाण्याबद्दल, सरकारी स्टोर, किंवा सरकारची इतर कोणतीहि मिळकत हीं नेण्याबद्दल, ड्यूटीवर असलेल्या लष्करी किंवा पोलीस अंमलदार यांच्या जाण्याबद्दल किंवा अशा अंमलदारांच्या ताब्यांतील कोणतेहि इसम किंवा मिळकत नेण्याबद्दल कोणताहि टोल घेतला जातां कामा नये.

१००. कर बसविण्याच्या पूर्वी बोर्डानें चालवावयाचें काम—प्रत्येक जिल्हा लोकल बोर्डानें कोणताहि कर बसविण्यापूर्वी, प्रथमतः खालील गोष्टी केल्या पाहिजेतः—

(१) त्यानें, बोर्डाच्या सभेंत एक ठराव पसार करून,

(अ) ९९ व्या कलमाअन्वयें बसवितां येईल असा एखादा कर पसंत करावा; आणि

[ब] पसंत केलेला कर ठरविणाऱ्या कानू पसंत कराव्या;

आणि अशा ठरावांत व अशा कानूंमध्यें—

(क) ज्या वर्गाच्या किंवा वर्गांच्या मनुष्यांस किंवा मिळकतीस किंवा ज्या वर्गाच्या किंवा वर्गांच्या मनुष्यास आणि मिळकतीस तो कर देण्यास पात्र करण्याचा आणि जी कोणतीहि माफी देण्याचा त्या जिल्हा लोकल बोर्डाचा विचार असेल तो वर्ग किंवा ते वर्ग आणि ती माफी निर्दिष्ट केली पाहिजे;

(ड) असे वर्ग ज्या रकमेस किंवा ज्या दरास पात्र करण्याचा विचार असेल ती रकम किंवा तो दर निर्दिष्ट केला पाहिजे; आणि

(इ) सरकार ज्या इतर गोष्टी ह्याप्रमाणें निर्दिष्ट करण्यास सांगेल त्या सर्व निर्दिष्ट केल्या पाहिजेत.

(२) अशा प्रकारचा ठराव केला जाईल तेव्हां जिल्हा लोकल बोर्डानें, सदरहू कानू व परिशिष्ट ब ह्यांत दिलेल्या नमुन्याची एक नोटीस त्यांच्या प्रारंभीं दाखल करून, प्रसिद्ध केल्या पाहिजेत.

(३) त्या डिस्ट्रिक्टाच्या ज्या कोणत्याहि रहिवाशाची सदरहू कर बसविण्याबद्दल, किंवा सदरहू प्रकारें योजिलेल्या रकमेबद्दल किंवा दराबद्दल, किंवा त्या करास, रकमेस किंवा दरास ज्या वर्गाच्या मनुष्यांस किंवा मिळकतीस पात्र करावयाचें असेल त्या वर्गाबद्दल किंवा योजिलेल्या कोणत्याहि माफीबद्दल हर-

कत असेल, त्याला सदरहू नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आंत आपली हरकत लिहून जिल्हा लोकल बोर्डाकडे पाठविण्याचा अख्त्यार आहे, आणि त्या बोर्डानें अशा सर्व हरकतींचा विचार केला पाहिजे, किंवा आपल्या मेंबरांच्या एका कमिटीस त्यांचा विचार करून त्यांबाबत रिपोर्ट करण्याचा अधिकार दिला पाहिजे, आणि तो योजिलेला कर सदरहू हरकतींस अनुसरून बसविण्याचें सोडून देण्याबद्दल किंवा त्यांत फेरफार करण्याबद्दल जिल्हा लोकल बोर्डानें ठराव केला नसल्यास त्यानें, त्या हरकती, त्यांबाबतच्या आपल्या अभिप्रायानिशीं आणि सदरीं सांगितल्याप्रमाणेंच्या नोटिशीसहित व कानूंसहित कमिशनराकडे सादर केल्या पाहिजेत.

१०१. शर्ती मंजूर करण्याचा, फिरवण्याचा व घालण्याचा अधिकार— कमिशनरास, सादर केलेल्या कानू, नामंजूर करण्याचा, किंवा आणखी विचार करण्यासाठीं त्या जिल्हा लोकल बोर्डाकडे परत पाठविण्याचा, किंवा सदरहू नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आंत योजिलेल्या कराच्या संबंधानें कोणतीहि हरकत, किंवा त्याच्या मतें पुरेशी हरकत, घेण्यांत आलेली नसल्यास त्या कानू—

(अ) फेरफार न करितां, किंवा

(ब) त्यास योग्य वाटतील तशा

(१) बसवावयाची रकम ज्यांवरून जास्त होणार नाहीं अशा फेरफारांस पात्र करून, किंवा

(२) अशा करापासून उत्पन्न होणाऱ्या सगळ्या ऐवजाचा किंवा त्याच्या कोणत्याहि भागाचा डिस्ट्रिक्टांत ज्या शर्तीवरून अशा शर्तींमध्यें सांगितलेल्या या आक्टाच्या कोणत्याहि कारणाकडे किंवा कारणांकडे विनियोग करावयाचा त्या शर्तीस पात्र करून,

मंजूर करण्याचा अख्त्यार आहे.

१०२. मंजूर केलेल्या कानू नोटिशीसहित प्रसिद्ध करणें:—जिल्हा लोकल बोर्डानें कलम १०१ अन्वयें मंजूर करण्यांत आलेल्या सर्व कानू, त्या कानू ज्या फेरफारांस पात्र करून तशी मंजुरी दिलेली असेल त्या सर्व फेरफारांनिशीं त्या ज्या जिल्ह्याकरितां ठरविलेल्या असतील त्या जिल्ह्यामध्यें जींत अशा मंजुरीची व तिच्या तारखेचा व अनुक्रम नंबराचा उल्लेख केलेला आहे अशा एका नोटिशीसहित प्रसिद्ध केल्या पाहिजेत, आणि मग याप्रमाणें प्रसिद्ध केलेल्या कानूंत ठरविल्याप्रमाणें तो कर त्या नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या व ती नोटिस

प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून एका महिन्याहून आधींची नाहीं अशा तारखेपासून बसविला पाहिजे आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या ऐवजाचा विनियोग जिल्हा लोकल बोर्डानें सदरहू मंजुरी कलम १०१ अन्वयें कांहीं शर्तीस पात्र करून दिलेली असल्यास त्या सर्व शर्तीस अनुसरून केला पाहिजेः

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं,

(अ) सालोसाल घ्यावयाचा कोणताहि कर—

(१) कोणत्याहि सालांतील एप्रिलची पहिली तारीख—जुलैची पहिली तारीख—आक्टोबरची पहिली तारीख—जानेवारीची पहिली तारीख—ह्यांपैकीं कोणत्या तरी तारखेशिवाय दुसऱ्या कोणत्याहि तारखेस अमलांत येतां कामा नये, आणि

(२) तो एप्रिलची पहिली तारीख शिवाय करून दुसऱ्या कोणत्याहि तारखेस अमलांत आला तर तो लगत पुढें येणाऱ्या एप्रिलच्या पहिल्या तारखेपर्यंत दर तिमाहीनें वसूल करतां येईल.

(ब) ह्या कलमान्वयें नोटीस काढण्यांत येईल त्या दिवशीं किंवा त्याच्यापूर्वी जिल्हा लोकल बोर्डानें जरूर असतील अशा कमिशनरानें पसंत केलेल्या आणखी तपशीलवार कानू प्रसिद्ध केल्या पाहिजेत. ह्या कानूंमध्यें त्यांत सांगितलेला कर बसविण्याची व वसूल करण्याची रीत आणि ज्या तारखांस तो कर किंवा त्याचे कांहीं हप्ते असल्यास ते देणें होतील त्या तारखा ठरविल्या पाहिजेत; आणि

(क) जर कोणताहि कर किंवा कोणत्याहि कराचा विशेष भाग ठराविक मुदतीकरितां मात्र घेण्याबद्दल मंजुरी दिलेली असेल तर तो कर घेण्याचें त्या मुदतीमध्यें येणें झालेली जी बाकी देण्यांत आली नसेल ती शिवायकरून त्या मुदतीच्या अखेर बंद केलें पाहिजे.

१०३. हरकत घ्यावयाजोगे कर घेण्याचें महकूब करण्याचा सरकारचा अधिकार—जिल्हा लोकल बोर्डानें घ्यावयाचा कोणताहि कर गैरवाजवी रीतीनें बसत आहे असें किंवा तो कर अगर त्याचा कोणताहि भाग घेणें एकंदर लोकांच्या हितास बाधक आहे असें किंवा त्या घेण्यानें सरकारनें दिलेल्या कोणत्याहि वचनांचा किंवा घेतलेल्या जबाबदाऱ्यांचा भंग होत आहे असें सरकारास फिर्याद झाल्यावरून किंवा दुसऱ्या रीतीनें कोणत्याहि वेळीं दिसून येईल तर सदरहू करास जी कोणतीहि हरकत आहे असें त्यांस दिसेल ती हरकत या बाबतींत तें ठरवील तशा मुदतीच्या आंत दूर करण्यासाठीं तजवीज करण्यास सदरहू जिल्हा लोकल

बोर्डास सांगण्याचा सरकारास अधिकार आहे आणि याप्रमाणें ठरविलेल्या मुदतीच्या आंत सदरहू सांगण्याप्रमाणें सरकारच्या खात्रीलायक वहिवाट करण्यांत न आली तर त्यास असा कर किंवा त्याचा असा भाग घेण्याचें काम त्यास असलेली हरकत दूर केली जाई तितका वेळपर्यंत मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन महकूब करण्याचा अधिकार आहे.

बाब ८ वीः—कर वसूल करण्याबाबत.

१०४. (१) कराच्या रकमेबद्दल बिल देणें:—जी कोणती रकम—

(अ) ह्या आक्टाच्या कोणत्याहि ठरावामध्यें किंवा ठरावान्वयें ह्या बाबींत सांगितल्याप्रमाणें वसूल करतां येईल असें ठरविलेलें असेल, किंवा

(ब) टोलसंबंधानें मागितल्याबरोबर मिळण्याजोगी नसून जो दुसरा कोणताहि कर कोणत्याहि जिल्ह्यांत बसविलेला असेल त्याच्यासंबंधानें यावयाची रकम म्हणून किंवा हप्ता म्हणून मागितली जाण्यास पात्र असेल,

ती येणें होईल तेव्हां जिल्हा लोकल बोर्डानें शक्य असेल तितक्या लवकर ती रकम देण्यास पात्र असलेल्या मनुष्यास त्या येणें असलेल्या रकमेबद्दल एक बिल देवविलें पाहिजे.

(२) बिलांतला मजकूर—अशा प्रत्येक बिलांत—

(अ) ती रकम ज्या मुदतीबद्दल मागितलेली असेल ती मुदत, आणि

(ब) ती रकम ज्या मिळकतीबद्दल, पेशाबद्दल किंवा वस्तूबद्दल मागितलेली असेल ती मिळकत, तो पेशा किंवा ती वस्तु;

ही नमूद केलेली असून त्यांत—

(१) ती रकम न दिली असतां उत्पन्न होणाऱ्या पात्रतेबद्दल, आणि

(२) यांत पुढें सांगितल्याप्रमाणें त्या मागणीवर अपील ज्या मुदतीच्या आंत करतां येईल त्या मुदतीबद्दल,

नोटिसहि दिलेली असली पाहिजे.

(३) बिलाची रकम पंधरा दिवसांच्या आंत न दिल्यास मागणीची नोटिस काढणें—सदरीं मागितल्याप्रमाणें ज्या रकमेबद्दल कोणतेंहि बिल दिलें असेल ती रकम तें बिल दिल्यापासून पंधरा दिवसांच्या आंत लोकल बोर्डाच्या कचेरीमध्यें किंवा अशा रकमा घेण्यास त्यासंबंधाच्या कोणत्याहि कायद्यान्वये अधि

कार दिलेल्या मनुष्याकडे न भरल्यास त्या जिल्हा लोकल बोर्डास ती रक्कम देण्यास जबाबदार असलेल्या मनुष्यावर परिशिष्ट [ क ] ह्यांतील नमुन्याप्रमाणें किंवा त्यासारख्या नमुन्याप्रमाणें एक मागणीची नोटीस बजाविण्याचा अधिकार आहे.

१०५. कोणत्या बाबतींत वारंट काढण्याचा अधिकार आहे:—जर सदरील रक्कम देण्यास पात्र असलेला मनुष्य अशा मागणीच्या नोटिशीच्या बजावणीपासून पंधरा दिवसांच्या आंत—

( अ ) त्या नोटिशींत मागितलेली रक्कम देणार नाहीं किंवा

( ब ) ती रक्कम त्यानें कां देऊं नये याबद्दल जिल्हा लोकल बोर्डाच्या खात्रीलायक किंवा बोर्ड कानूच्या द्वारें ज्या अमलदारास ह्या बाबतींत नेमील त्या अमलदाराच्या खात्रीलायक कारण दाखविणार नाहीं, किंवा

( क ) कलम ११३ ह्याच्या ठरावान्वयें त्या मागणीवर अपील करणार नाहीं,
तर ती रक्कम ती वसूल करण्याच्या सर्व खर्चासहित परिशिष्ट ड ह्यांतील नमुन्याप्रमाणें किंवा त्यासारख्या नमुन्याप्रमाणें जिल्हा लोकल बोर्डानें काढविलेल्या वारंटाअन्वयें ती रक्कम न देणाऱ्या मनुष्याची जंगम मिळकत जप्त करून व विकून वसूल करण्याचा अख्त्यार आहे.

१०६. वारंटावर सही कोणी करावी:—१०५ अन्वयें काढलेल्या प्रत्येक वारंटावर तें काढविणाऱ्या जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षानें किंवा ह्या कारणासाठीं जिल्हा लोकल बोर्डानें अधिकार दिलेल्या अमलदारानें किंवा सरकारच्या मंजुरीनें सरकारच्या अमलदारानें सही केली पाहिजे.

१०७. वारंट कोणाच्या नांवानें द्यावें—जेव्हां मिळकत जिल्ह्यांत असेल तेव्हां वारंट त्या जिल्ह्यांत स्थापलेल्या लोकल बोर्डाच्या अमलदाराच्या किंवा सरकारच्या मंजुरीनें सरकारी अमलदाराच्या नांवानें दिलें पाहिजे. जेव्हां मिळकत दुसऱ्या जिल्ह्यांत असेल तेव्हां तें वारंट अशा दुसऱ्या जिल्ह्यांतील जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षाच्या नांवानें दिलें पाहिजे : मात्र इतकेंच कीं, अशा अध्यक्षाला या वारंटावर शेरा लिहून आपल्या हाताखालच्या अमलदाराच्या किंवा सरकारच्या मंजुरीनें सरकारी अमलदाराच्या नांवानें देण्याचा अधिकार आहे. जेव्हां मिळकत मुंबई शहरांत असेल तेव्हां तें वारंट मुंबईच्या स्मालकाज कोर्टाच्या रजिस्ट्राराच्या नांवानें दिलें पाहिजेः मात्र इतकेंच कीं, रजिस्ट्राराला अशा वारंटावर शेरा लिहून आपल्या हाताखालच्या अमलदाराच्या नांवानें देण्याचा अधिकार आहे.

१०८. विशेष हुकुमाअन्वयें घरांत जाण्याचा अधिकारः-शेरा लिहून किंवा इतर रीतीनें एखादें वारंट ज्या कोणत्याहि अमलदाराच्या नांवानें दिलेलें असेल त्यानें, त्या वारंटांत त्याला विशेष हुकूम करून ह्या बाबतींत अधिकार दिलेला असल्यास व इतर प्रसंगीं नव्हे, सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान कोणत्याहि वेळीं, त्या वारंटांत सांगितलेली जप्ती करण्यासाठीं व त्या वारंटाअन्वयें पकडली जाण्यास पात्र असलेली मिळकत एखाद्या इमारतींत आहे असें वाटण्यास त्यास वाजवी कारण असेल तर, व आपणास दिलेला अधिकार व आपला उद्देश जाहीर करून योग्य रीतीनें आंत येऊं देण्याची मागणी केल्यानंतर त्याचा त्या इमारतींत इतर रीतीनें प्रवेश होऊं शकत नसेल तर, अशा इमारतींचें बाहेरचें किंवा आंतलें दार किंवा खिडकी फोडून उघडणें कायदेशीर होईलः मात्र, स्त्रियांकरितां योजिलेल्या कोणत्याहि दालनांत अशा अमलदारास जावयाचें किंवा तीं जबरदस्तीनें उघडावयाची असल्यास, त्यानें आपल्या तशा इराद्याची सूचना तीन तास आधीं दिल्याशिवाय आणि अशा स्त्रियांस तें दालन सोडून जाण्यास संधी दिल्याशिवाय तसें करतां कामा नये.

१०९. वारंट कसें बजवावयाचें तें--अशा अमलदारानें, खालीं सांगितलेल्या शर्तीस, अपवादांस व माफीस पात्र राहून, ज्या मनुष्यानें पैसा भरला नाहीं म्हणून त्या वारंटांत सांगितलें असेल, त्याची कोणतीहि जंगम मिळकत सांपडेल तेथें जप्त करणें कायदेशीर होईलः

[अ] खालीं निर्दिष्ट केलेली मिळकत जप्त करतां कामा नये:—

[१] रकम न देणारा मनुष्य, त्याची स्त्री व त्याचीं मुलें यांचीं जरूरीचीं वापरावयाचीं चिरगुटें व आंथरूणपांघरूण,

[२] कारागिरांचीं हत्यारें,

[३] रकम न देणारा मनुष्य शेतकरी असल्यास त्याचीं शेतकीचीं आऊतें, बीं, आणि जीं जनावरें त्याच्या उपजीविकेच्या प्राप्तीला जरूर असतील तीं जनावरें;

[ब] जप्ती भारी असूं नये: म्हणजे, जप्त केलेल्या मिळकतीची किंमत साधेल तितकी वारंटाअन्वयें जी रकम वसूल करावयाची असेल तिच्याइतकीच सरासरी असावी आणि वारंटावर सही करण्यास ज्या मनुष्यास कलम १०६ यामध्यें किंवा त्याअन्वयें अधिकार दिलेला असेल त्याच्या मतें जप्त न करण्याजोगे जिन्नस जप्त करण्यांत आलेले असले तर ते तावडतोब परत दिले पाहिजेत; आणि

[क] त्या अमलदारानें ती मिळकत पकडल्याबरोबर तिची एक यादी केली पाहिजे, आणि ती मिळकत नेण्याच्या आधीं, ती पकडल्यावेळीं ज्या मनुष्याच्या कबजांत होती त्या मनुष्यास, परिशिष्ट ई ह्यांतील नमुन्याप्रमाणें, एक लेखी नोटीस, अशा नोटिशींत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा रीतीनें सदरहू मिळकत विकण्यांत येईल अशा अर्थाची दिली पाहिजे.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, मिळकत जप्त केल्यानंतर व ती घेऊन जाण्याच्या पूर्वी पैसा न दिलेल्या इसमानें देणें असलेली रकम व नोटीस, वारंट व मिळकतीची जप्ती यांस आनुषंगिक असा सर्व खर्च देण्यांत येईल तर त्या अमलदारानें जप्ती उठविली पाहिजे.

११०. (१) जप्त केलेल्या मालाची विक्रीः—पकडलेली मिळकत जेव्हां त्वरित व स्वाभाविक रीतीनें नासून जाण्यासारखी असेल किंवा ती रखवालींत ठेवण्याचा खर्च व घ्यावयाची रकम यांची बेरीज तिच्या किंमतीहून जास्त होण्यासारखी असेल तेव्हां त्या वारंटावर ज्यानें सही केली असेल त्या अध्यक्षानें किंवा अमलदारानें, एकदम, ती मिळकत पकडली तेव्हां ज्याच्या कबजांत होती त्या मनुष्यास ती एकदम विकण्यांत येईल अशाबद्दल नोटीस दिली पाहिजे, आणि त्याप्रमाणें त्यानें ती त्या वारंटांत निर्दिष्ट केलेली रकम ताबडतोब देण्यांत न आल्यास विकली पाहिजे.

(२) विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोगः—पकडलेली मिळकत पोट-कलम (१) अन्वयें एकदम विकण्यांत न आल्यास, ती किंवा तिचा पुरेसा भाग, त्या वारंटावर ज्या मनुष्यानें सही केली असेल त्यानें तें मद्कूब न केलें तर, किंवा पैसा न दिलेल्या मनुष्याकडून येणें असलेली रकम, त्या नोटिशीसंबंधाच्या, वारंटासंबंधाच्या व मिळकत जप्त करून अटकावून ठेवण्यासंबंधाच्या सगळ्या खर्चासुद्धां, भरण्यांत आली नाहीं तर वारंट बजावणाऱ्या अमलदारानें बजाविलेल्या नोटिशींत सांगितलेली मुदत संपली म्हणजे जिल्हा लोकल बोर्डाच्या हुकुमानें जाहीर लिलांवानें विकण्याचा अधिकार आहे, आणि त्यापासून होणारें उत्पन्न किंवा त्याचा जरूर असेल तेवढा भाग येणें असलेल्या रकमेच्या आणि सदरीं सांगितलेल्या सगळ्या अनुषंगिक खर्चाच्या उलगड्याकडे लाविला पाहिजे.

(३) कांहीं शिल्लक राहिल्यास त्याची कशी व्यवस्था करावीः—कांहीं शिल्लक राहिल्यास ती ताबडतोब लोकल फंडाच्या खातीं जमा केली पाहिजे, व त्याचवेळीं, तसें केल्याबद्दलची नोटीस, ती मिळकत ज्या मनुष्याच्या कबज्यांतून घेतली असेल त्याला दिली पाहिजे, परंतु ती शिल्लक त्या नोटिशीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आंत जिल्हा लोकल बोर्डाकडे लेखी अर्जी करून मागण्यांत

आल्यास, ती सदरहू मनुष्यास परत दिली पाहिजे. जी कोणतीहि रकम सदरहू प्रकारच्या नोटिशीच्या तारखेपासून एका वर्षाच्या आंत मागण्यांत येणार नाहीं ती जिल्हा लोकल बोर्डाची मिळकत होईल.

१११. जिल्ह्याच्या बाहेर जप्ती व विक्रीः—जेव्हां वारंट जिल्ह्याच्या बाहेर नांवानें दिलें असेल तेव्हां वारंट काढणाऱ्या अधिकाऱ्यास शेरा लिहून, वारंट ज्या अध्यक्षाच्या किंवा रजिस्ट्राराच्या नांवानें दिलें असेल त्या अध्यक्षाला किंवा रजिस्ट्राराला जप्त केलेली मिळकत विकण्यास फर्माविण्याचा अधिकार आहे, आणि अशा बाबतींत अशा अध्यक्षानें किंवा रजिस्ट्रारानें ती मिळकत विकणें व त्या विक्रीसंबंधीं सर्व गोष्टी करणें कायदेशीर होईल व मागील ठरावांत त्याप्रमाणें फेरफार केले पाहिजेत. अशा अध्यक्षानें किंवा रजिस्ट्रारानें, त्यास झालेला वसुलीचा सर्व खर्च वजा केल्यानंतर वारंटाअन्वयें वसूल केलेली रकम तें वारंट काढणाऱ्या अधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजे.

११२. (अ) घ्यावयाच्या फी व खर्चः—कलम १०४, पोट-कलम (३), याअन्वयें काढिलेल्या दरेक नोटिशीबद्दलची फी,

(ब) कलम १०९ अन्वयें केलेल्या प्रत्येक जप्तीबद्दची फी, आणि

(क) सदरहू कलमाअन्वयें पकडलेलीं कोणतींहि जनावरें पोसण्याबद्दलचा खर्च,

हीं जिल्हा लोकल बोर्डाच्या कानूंमध्यें ह्यासंबंधानें जे जे दर दाखल केलेले असतील त्या त्या दरांप्रमाणें घेतलीं जाण्यास पात्र होतील, आणि कलम १०५ अन्वयें घ्यावयाच्या वसुलातीच्या खर्चात त्यांचा समावेश केला पाहिजे.

११३. माजिस्ट्रेटाकडे अपिलें:—कलम १०४, पोट कलम (३) याअन्वयें काढलेल्या मागणीच्या कोणत्याहि नोटिशीवर अपिलें, ह्या प्रकारच्या प्रकरणांचा इन्साफ सरकारच्या किंवा जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हुकुमाअन्वयें ज्या कोणत्याहि माजिस्ट्रेटानें किंवा माजिस्ट्रेटाच्या बेंचानें करावयाचा, त्या माजिस्ट्रेटाकडे किंवा बेंचाकडे करण्याचा अख्त्यार आहे.

परंतु—

(अ) ज्या मागणीच्या नोटिशीबद्दल तक्रार असेल ती बजावल्यानंतर लगत पुढच्या पंधरा दिवसांच्या आंत तें अपील केलेलें असल्याशिवाय;

[ब] जिल्हा लोकल बोर्डाच्या मागणीस ज्या कारणावरून तक्रार असेल तें कारण जींत तमूद केलें आहे अशी एक लेखी अर्जी, खालीं लिहिल्याप्रमाणें; म्हणजे :

[१] इमारतींवरील व जमिनीवरील पट्टीच्या बाबतींत, त्या पट्टीच्या ज्या आकारणीप्रमाणें किंवा फिरविलेल्या आकारणीप्रमाणें बिल तयार केलें असेल त्या आकारणीबद्दल किंवा फिरविलेल्या आकारणीबद्दल दिलेल्या नोटिशींत ठरविलेल्या मुदतीच्या आंत; आणि

[२] ज्या दुसऱ्या कोणत्याहि मागणीच्या संबधानें कलम १०४, पोट—कलम (१) याअन्वयें बिल दिलें असेल त्या मागणीच्या बाबतींत, असें बिल दिल्यानंतर लगत पुढच्या पंधरा दिवसांच्या आंत,

जिल्हा लोकल बोर्डाकडे केलेली असल्याशिवाय, आणि

[क] अपेलंटाकडून मागितलेली रक्कम त्यानें जिल्हा लोकल बोर्डाच्या कचेरींत अनामत ठेवलेली असल्याशिवाय;

अशा कोणत्याहि अपिलाची सुनावणी होणार नाहीं व त्याचा निकाल करण्यांत येणार नाहीं.

११४. जमीन, इमारती, वगैरेची पट्टी बसविली जाण्याची पात्रता—जमिनीवर किंवा इमारतीवर किंवा या दोन्हींवर पट्टीच्या रूपानें बसविलेल्या कोणत्याहि कराबद्दल येणें असलेल्या सर्व रकमा, त्या इमारतींवरील किंवा जमिनींवरील कांहीं जमिनमहसूल देणें असल्यास त्याच्या अगाऊ भरण्यास पात्र राहून, ज्या इमारतींबद्दल किंवा जमिनीबद्दल तो कर घ्यावयाचा असेल त्यांवर आणि असा कर देण्यास पात्र असलेल्या मनुष्यांची जंगम मिळकत, कोणतीहि असल्यास, अशा इमारतींत किंवा जमिनीवर सांपडल्यास तिजवर पहिला बोजा होतो असें समजलें पाहिजे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा कोणत्याहि कराची कोणतीहि बाकी, ती जर एका वर्षाहून जास्त मुदतीची किंवा मालक नसलेला भोगवटा करणारा त्या जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा करीत नसेल त्या मुदतीची येणें राहिलेली असली, तर तशा भोगवटा करणाराकडून वसूल करतां कामा नये.

११५. जतीनें व विक्रीनें वसूल करण्याच्या अधिकाराची महकुबी—सरकारास कोणत्याहि वेळीं जाहिरनाम्याच्या द्वारें, कोणत्याहि जिल्ह्यांत, कलमें १०९ ते ११० (दोन्ही धरून) यांचा अमल महकूब करण्याचा अधिकार आहे; आणि त्या जाहिरनाम्यांत ह्यासंबंधानें जी तारीख नेमण्यांत येईल त्या तारखेपासून, सदरहू कलमांअन्वयें त्या तारखेपर्यंत वसूल करण्याजोग्या कोणत्याहि कराबद्दल येणें असलेली प्रत्येक रकम, कलम ७०, पोट–कलम (२), यांत

सांगितलेले दंड वसूल करण्यासाठीं ठरविलेल्या रीतीनें, माजिस्ट्रेटाकडे अर्ज करून वसूल करतां येईल, इतर रीतीनें वसूल करतां येणार नाहीं.

११६. (१) टोल न दिल्याबद्दल वाहन किंवा जनावर पकडण्याचा अधिकार—जिल्हा लोकल बोर्डानें घ्यावयाचा कोणताहि टोल मागितल्यावर तो देण्यांत न आल्यास तो घेण्यासाठीं नेमिलेल्या मनुष्यास, ज्या कोणत्याहि वाहनावर किंवा जनावरावर तो टोल घ्यावयाचा असेल तें वाहन किंवा जनावर, किंवा मागणीची भरपाई होण्यास पुरेशा किंमतीचा त्या वाहनांतल्या किंवा जनावराच्या ओझ्याचा कोणताहि भाग पकडून अटकावून ठेवण्याचा अख्त्यार आहे. नंतर त्यानें त्या धरलेल्या मिळकतीचा कबजा असणाऱ्या मनुष्यास त्या मिळकतीची एक यादी दिली पाहिजे, व तिजबरोबर परिशिष्ट ई यांत दिलेल्या नमुन्याप्रमाणें एक लेखी नोटीस दिली पाहिजे. ह्या नोटिशींत, तींत सांगितल्याप्रमाणें ती मिळकत विकण्यांत येईल असें लिहिलेलें असावें.

(२) पकडलेली मिळकत एकदम विकण्याचा अधिकार—जेव्हां कोणताहि पकडलेला जिन्नस त्वरित व स्वाभाविक रीतीनें नासून जाण्यासारखा असेल, किंवा तो ठेवण्याचा खर्च व त्यावर घ्यावयाच्या टोलाची रक्कम मिळून त्याच्या किंमतीहून जास्त होण्याचा संभव असेल तो जिन्नस पकडणाऱ्या मनुष्यास ज्या मनुष्याच्या कबज्यांत तो सांपडला असेल, त्याला तो एकदम विकला जाईल असें कळविण्याचा अधिकार आहे, आणि त्यानें तो, टोलाची मागितलेली रक्कम लगेच देण्यांत न आल्यास, त्याप्रमाणें विकला किंवा विकविला पाहिजे.

(३) रक्कम भरल्यावर मिळकतीची सुटका—अशा विक्रीची सुरुवात होण्यापूर्वी कोणत्याहि वेळीं, ज्या मनुष्याची मिळकत सदरहूप्रमाणें पकडलेली असेल तो मनुष्य, झालेल्या सर्व खर्चाची रक्कम आणि देणें असलेल्या टोलाची रक्कम लोकल बोर्डाच्या कचेरीमध्यें देईल तर ती पकडलेली मिळकत तावडतोब सोडून देण्यांत आली पाहिजे.

(४) विक्री—जर ह्याप्रमाणें रक्कम दिली नाहीं तर ती मिळकत विकण्याचा अख्त्यार आहे, आणि अशा विक्रीचें उत्पन्न, त्या टोलाची रक्कम आणि ती मिळकत पकडण्याचा, अटकावून ठेवण्याचा व विकण्याचा खर्च हीं देण्याच्या कामीं लावलें पाहिजे.

[५] शिल्लक राहिलेल्या रकमेची कशी व्यवस्था करावी—विक्रीच्या उत्पन्नांतून कांहीं रक्कम बाकी राहिल्यास ती लोकल फंडाच्या खातीं जमा केली

पाहिजे, आणि त्या विक्रीनंतरच्या लगत सहा महिन्यांच्या आंत जिल्हा लोकल बोर्डाकडे लेखी अर्जी करण्यांत आली असतां ती मिळकत पकडल्या वेळीं ज्या मनुष्याच्या कबज्यांत होती त्याला ती रक्कम अदा करण्याचा अख्त्यार आहे आणि ह्याप्रमाणें अर्जी करण्यांत न आल्यास ती रक्कम जिल्हा लोकल बोर्डाची मिळकत होईल.

११७ [१] टोल घेण्याचा इजारा देणें—या आक्टाअन्वयें लादतां येईल असा कोणताहि टोल घेण्याचा इजारा जाहीर लिलावानें किंवा खाजगी मक्तयानें जिल्हा लोकल बोर्डानें देणें कायदेशीर होईल:

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, इजारदारानें सदरहू इजाऱ्याच्या शर्ती योग्य रीतीनें पुऱ्या करण्याविषयीं तारण दिलें पाहिजे.

[२] टोलांच्या इजारदारानें लावलेल्या मनुष्यास पकडण्याचा अधिकार असणें—या कलमाअन्वयें कोणत्याहि टोलाचा इजारा देण्यांत आला असेल तेव्हां असा टोल वसूल करण्यासाठीं इजारदारानें लावलेल्या कोणत्याहि मनुष्यास, इजाऱ्याच्या शर्तीस पात्र राहून, ११६ व्या कलमाचीं पोट–कलमें [१] व [२] यांत सांगितलेले अधिकार असतील:

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणताहि जप्त केलेला माल जिल्हा लोकल बोर्डाच्या हुकुमावांचून विकण्याचा अधिकार नाहीं.

[३] या कलमाअन्वयें दिलेल्या कोणत्याहि इजाऱ्यासंबंधानें लोकल बोर्डास इजारदाराकडून मिळावयाची कोणतीहि रक्कम जमीन महसुलाच्या बाकीप्रमाणें वसूल करण्याचा अधिकार आहे.

११८. भरलेल्या सर्व रकमांबद्दल पावत्या देणें—ह्या आक्टाखालील कोणत्याहि कराच्यासंबंधानें दिलेल्या सर्व रकमांबद्दल, त्या घेणाऱ्या मनुष्यानें, त्या रकमा नमूद करून व त्या कोणत्या कराच्यासंबंधानें दिलेल्या आहेत तें लिहून एक पावती देण्यास काढली पाहिजे.

## बाब ९ वी—लोकल बोर्डांचे अमलदार व नोकर.

११९. [१] जिल्हा लोकल बोर्डांनीं नोकरमंडळीची यादी तयार करणें व मंजूर करणें: चीफ ऑफिसर: हेल्थ ऑफिसर: इन्जिनिअर—प्रत्येक जिल्हा लोकल बोर्डास या आक्टाअन्वयें आपलीं व जिल्ह्यांतील तालुका लोकल बोर्डांचीं कामें बरोबर रीतीनें बजाविण्यास येण्यासाठीं जे अमलदार व नोकर ठेवणें अवश्य व योग्य वाटेल ते अमलदार व नोकर चाकरीस ठेवण्यास व त्यास पगार

देण्यास तो बोर्ड मुखत्यार आहे, आणि याप्रमाणें ठेवावयाची जी नोकरमंडळी तिची एक यादी त्या बोर्डानें वेळोवेळीं तयार केली पाहिजे व मंजूर केली पाहिजे; त्या यादींत निरनिराळ्या अमलदारांचे व नोकरांचे हुद्दे व दर्जे, ज्या बोर्डाच्या ताब्यांत त्यांस चाकरीस ठेवावयाचे ते ते बोर्ड, त्यांचीं त्यांचीं कामें व प्रत्येकास द्यावयाच्या पगारांची, फींची व नेमणुकींची रक्कम व प्रकार हीं लिहावीं, आणि सदरहू अमलदार व नोकर यांपैकीं कोणते कायमचे ठेवावयाचे व कोणते हंगामी मात्र ठेवावयाचे याविषयींहि नियम तींत केलेला असावा.

[२] जेव्हां कोणत्याहि जिल्हा लोकल बोर्डानें चीफ आफिसर किंवा इंजिनिअर नेमला असेल व अशी नेमणूक सरकारानें पसंत केली तर अशा चीफ् आफिसराच्या किंवा इंजिनियरच्या पगाराचा दोनतृतीयांश भाग सरकार देईल, आणि जेव्हां कोणताहि जिल्हा लोकल बोर्ड हेल्थ ऑफिसर नेमील आणि सरकार अशी नेमणूक पसंत करील तेव्हां सरकार अशा ऑफिसराच्या पगाराचा दोनतृतीयांश भाग देईल.

१२०. अमलदार व नोकर ठेवण्याचा अधिकार सोंपवून देणें—जिल्हा लोकल बोर्ड, १३३ व्या कलमाच्या [ग] रकमेअन्वयें ह्या बाबतींत सरकारनें केलेल्या कोणत्याहि कानूस किंवा हुकुमास पात्र राहून, त्याच्या अध्यक्षास किंवा त्याच्या ताब्यांतील कोणत्याहि तालुका लोकल बोर्डाच्या अध्यक्षास, ह्या बाबतींत कानूच्याद्वारा सरकार ठरवील अशा मर्यादेहून जास्त नाहीं अशा पगारावर कोणत्याहि अमलदारास किंवा नोकरास नेमण्याचा अधिकार सोंपवून देण्यास मुख्त्यार आहे.

१२१. नोकरमंडळी ठेवण्याच्या कामीं उधळेपणा न होऊं देण्याचा कमिशनरचा अधिकार—जिल्हा लोकल बोर्डानें आपले अमलदार किंवा नोकर म्हणून ज्या मनुष्यांस ठेविलें असेल किंवा ज्यास ठेवण्याचा जिल्हा-लोकल-बोर्डाचा विचार असेल त्या मनुष्यांची संख्या, किंवा त्या मनुष्यांस किंवा कोणत्याहि अमुक मनुष्यास त्या बोर्डानें लावून दिलेला मेहनताना भारी आहे असें कमिशनराचें मत असेल तर, कमिशनरानें फर्माविलें असतां, सदहू मनुष्यांची संख्या किंवा त्यांचा किंवा त्याचा मेहनताना सदहू बोर्डानें कमी केला पाहिजे:

मात्र असें ठरविलें आहे कीं, अशा कोणत्याहि फर्माविण्याविरुद्ध तो जिल्हा-लोकल बोर्ड सरकारास अपील करण्यास मुख्त्यार आहे, आणि सरकारचा ठराव अखेरचा होईल.

१२२. अमलदार व नोकर यांस शिक्षा व त्यांची बर्तर्फी—जिल्हा-लोकल-बोर्डानें ठेविलेल्या कोणत्याहि अमलदारास किंवा नोकरास शिक्षा करण्याचा

किंवा बर्तर्फ करण्याचा अधिकार सदर्हू बोर्डाकडे राहील, मात्र तो १३३ व्या कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याहि नियमास व याबाबत सरकारनें १३३ व्या कलमाच्या (ग) रकमेअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूस किंवा हुकुमास पात्र असेल:

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, सदरीं सांगितल्याप्रमाणें पात्र राहून कलम १३३ रकम [ग] अन्वयें ह्या बाबतींत केलेल्या कानूंत सरकार ठरवील अशा मर्यादेहून जास्त पगार न मिळणाऱ्या कोणत्याहि अशा अमलदारास किंवा नोकरास शिक्षा करण्याचा किंवा बर्तर्फ करण्याचा अधिकार जिल्हा लोकल बोर्ड, त्याच्या अध्यक्षास किंवा त्याच्या ताब्यांतलि कोणत्याहि तालुका लोकल बोर्डाच्या अध्यक्षास सोंपवून देण्यास मुखत्यार आहे.

१२३. जिल्हा लोकल बोर्डांनीं नियम करणें—प्रत्येक जिल्हा लोकल बोर्डास वेळोवेळीं खालीं लिहिलेल्या गोष्टींबाबद नियम करण्याचा अधिकार आहे.

[अ] तारण द्यावयाचें त्याची रकम ठरविण्याबाबद बोर्डानें ठेविलेल्या ज्या कोणत्याहि अमलदाराकडून किंवा नोकराकडून तारण घेणें योग्य आहे असें वाटेल त्यानें द्यावयाच्या तारणाची रकम व प्रकार ठरविण्याबाबद;

[ब] रजेची शिस्त बांधण्याबाबद—बोर्डानें ठेविलेले कायमचे अमलदार व नोकर यांस रजा देण्याची शिस्त बांधण्याबाबद;

[क] गैरहजिरीच्या वेळचे रोजमुरे ठरविण्याबाबद—सदर्हू अमलदार व नोकर किंवा त्यांपैकीं कितीएक असामी यांस रजेवर असतांना अलावन्स देण्याचा अधिकार देण्याबाबद;

[ड] बदली मनुष्यांचे रोजमुरे ठरविण्याबाबद—असे कोणतेहि अमलदार किंवा नोकर रजेवर असतील त्या मुदतींत त्यांचें काम करण्यासाठीं नेमलेल्या मनुष्यांस मेहनताना द्यावयाचा तो ठरविण्याबाबद;

[ई] चाकरीच्या मुदतीची शिस्त बांधण्याबाबद—अशा सर्व अमलदारांच्या व नोकरांच्या चाकरीच्या मुदतीची शिस्त बांधण्याबाबद;

[फ] पेनशन वगैरे ठरविण्याबाबद—असे अमलदार व नोकर, किंवा त्यांतून कोणीहि, चाकरी सोडतील तेव्हां त्यांस कोणत्या शर्तींनीं पेनशनें, ग्राचुइटी, किंवा कंप्याशनेट अलावन्सेस मिळावीं त्या शर्ती, असे अमलदार व नोकर यांच्या हयात नातलगांस ग्राचुइटी किंवा कंप्याशनेट अलावन्सेस ज्या शर्तींवर देण्यांत येतील त्या शर्ती आणि अशीं पेनशनें, ग्राचुइटी किंवा कंप्याशनेट अलावन्सेस यांची रकम हीं ठरविण्याबाबद; आणि

[ग] प्राव्हिडेंट फंडाला वर्गणी देण्याबाबद—जो कोणताहि पेनशन फंड किंवा प्राव्हिडेंट फंड सदहू अमलदार व नोकर सदहू बोर्डाचे पसंतीनें स्थापितील त्या फंडास नियमित ठरविलेल्या दरांनीं व नियमित ठरविलेल्या शर्तीस अनुसरून वर्गणी भरण्याचा अधिकार देण्याबाबद:

मात्र असें ठरविलें आहे कीं,

(१) सरकारानें तात्पुरत्या दिलेल्या अमलदारांबाबद विशेष ठराव—जर एकादा अमलदार कोणत्याहि लोकल बोर्डाला सरकारानें काम करण्यास तात्पुरता दिला असेल किंवा जर एकादा अमलदार कांहीं अंशीं सरकारच्या चाकरींत असेल व कांहीं अंशीं एकाद्या लोकल बोर्डाच्या चाकरींत असेल, तर सरकारनें याबाबत १३३ व्या कलमाच्या [ग] रकमेअन्वयें केलेल्या कानूंवरून जरूर असेल तितकी, त्याच्या पेनशनसाठीं व लीव्ह अलवन्सासाठीं वर्गणी अशा बोर्डानें दिली पाहिजे, आणि सरकारास सहा महिन्यांची पूर्वीं नोटीस दिल्यावांचून पुढें त्याच्या चाकरीची जरूर नाहीं म्हणून सरकारच्या संमतीशिवाय अशा अमलदारास कोणत्याहि वेळीं निरोप देऊं नये; आणि

(२) आणि सरकारानें नियम पसंत करण्याबाबद—कोणत्याहि जिल्हा लोकल बोर्डानें या कलमाअन्वयें केलेला कोणताहि नियम सरकारानें पसंत केल्यावांचून व पसंत करीत तोंपर्यंत अमलांत येणार नाहीं.

## बाब १० वी.—निर्बंध.

१२४. (१) तपासणी, देखरेख यांचे अधिकार—कमिशनरास, कलेक्टरास किंवा सरकारच्या सामान्य किंवा विशेष हुकुमावरून अधिकार दिलेल्या सरकारच्या कोणत्याहि अंमलदारास, खालील गोष्टी करण्याचा अधिकार आहे, म्हणजे:—

[अ] कोणत्याहि लोकल बोर्डाच्या किंवा त्याच्या निर्बंधाखालीं व व्यवस्थेखालीं असलेल्या कोणत्याहि संस्थेच्या भोगवट्यांत असलेल्या कोणत्याहि स्थावर मिळकतींत किंवा त्याच्या हाताखालीं किंवा त्याच्या हुकुमाअन्वयें चाललेल्या कोणत्याहि बांधकामांत प्रवेश करण्याचा व तीं तपासण्याचा, किंवा त्यानें लेखी अधिकार दिलेल्या कोणत्याहि इतर इसमाकडून अशी स्थावर मिळकत, संस्था किंवा बांधकाम यांत प्रवेश करविण्याचा व तपासविण्याचा; आणि

(ब) कोणत्याहि लोकल बोर्डाच्या किंवा अशा बोर्डानें नेमिलेल्या कोणत्याहि कमिटीच्या चाललेल्या कामकाजांतील कोणताहि उतारा मागविण्याचा

व लोकल बोर्डाच्या ताब्यांतील किंवा त्याच्या निर्बंधाखालील कोणतेंहि बूक किंवा दस्तऐवज मागविण्याचा किंवा तीं तपासण्याचा,
अधिकार आहे.

(२) कलेक्टरास—

(अ) लोकल बोर्डास पुरवण्यास भाग पाडणें योग्य आहे असें त्यास वाटेल असें कोणतेंहि पत्रक, तक्ता, हिशेब किंवा रिपोर्ट मागविण्याचा; आणि

(ब) लोकल बोर्डाकडून लवकरच करण्यांत यावयाची कोणतीहि गोष्ट करण्यास जी कोणतीहि हरकत त्याच्या मतें असेल, ती हरकत किंवा अशा बोर्डाकडून कोणतीहि गोष्ट ज्या माहितीच्या योगें केली जाणें जरूर होईल अशी कोणतीहि आपण पुरविलेली माहिती, अशा लोकल बोर्डानें विचारांत घेण्याचें, आणि वाजवी वेळाच्या आंत, अशी गोष्ट करण्यापासून परावृत्त न होण्याचीं किंवा अशी गोष्ट न करण्याचीं आपलीं कारणें नमूद करून एक लेखी उत्तर पाठविण्याचें त्यास भाग पाडण्याचा,
अधिकार आहे.

१२५. (१) लोकल बोर्डाचे हुकूम वगैरे बजाविणें महकूब करण्याचा कलेक्टराचा अधिकार:— जर लोकल बोर्डाचा कोणताहि हुकूम किंवा ठराव बजाविल्यानें, किंवा लोकल बोर्डानें किंवा त्याच्या तर्फे कोणतीहि गोष्ट करावयाची असेल किंवा करण्यांत येत असेल ती केल्यानें, लोकांस इजा किंवा त्रास होत आहे अगर होण्याचा संभव आहे अगर स्वस्थतेचा भंग होण्याचा संभव आहे किंवा गैरकायदा आहे असें कलेक्टरास वाटेल तर आपल्या सहीच्या लेखी हुकुमानें तो बजाविणें महकूब करण्यास किंवा ती करणें मना करण्यास कलेक्टर मुखत्यार आहे.

(२) कलेक्टराच्या हुकुमाविषयीं कमिशनरास रिपोर्ट करणें, आणि कमिशनरास तो बहाल करण्याचा किंवा त्यांत कंपेश करण्याचा अधिकार आहे:— कलेक्टर (१) ह्या पोट कलमाअन्वयें कोणताहि हुकूम करील तेव्हां, त्यानें त्या हुकुमाची नकल, तो करण्याच्या कारणासहित, कमिशनराकडे व तो हुकूम लागू असलेल्या लोकल बोर्डाकडे, लागलीच पाठविली पाहिजे; आणि तो हुकूम रद्द करणें किंवा तो फेरफारानिशीं किंवा फेरफारावांचून नेहमीं किंवा त्यांस योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत, चालू राहील असें फर्माविणें कमिशनरच्या नजरेवर राहील.

(३) या कलमाअन्वयें असलेल्या प्रत्येक प्रकरणाबाबद सरकारचा अखेरचा हुकूम होण्यासाठीं सरकारास रिपोर्ट करणें:—या कलमांत सांगितल्या-

प्रमाणें घडून येणाऱ्या प्रत्येक प्रकरणाचा कमिशनरानें सरकारास लागलाच रिपोर्ट केला पाहिजे, आणि त्या प्रकरणांत केलेला कोणताहि हुकूम तपासण्यास किंवा त्यांत फेरफार करण्यास, आणि त्याबाबद कमिशनर करूं शकतो तसा दुसरा कोणताहि हुकूम करण्यास सरकार मुखत्यार आहे.

१२६. (१) निकडीच्या बाबतींत कलेक्टराचे असाधारण अधिकार— कलेक्टरास असा अधिकार आहे कीं, जें कोणतेंहि काम पुरें करण्याचा किंवा कृत्य करण्याचा लोकल बोर्डास अधिकार दिलेला असेल व जें एकदम करणें कलेक्टराच्या मतें लोकांचे आरोग्यास किंवा सलामतीस अवश्य असेल तें काम किंवा कृत्य निकडीच्या प्रसंगीं करण्याची त्यानें तजवीज करावी, आणि तें काम पुरें करण्याचा किंवा तें कृत्य करण्याचा खर्च, तें करण्यासाठीं नेमलेल्या मनुष्यास देण्याच्या वाजवी मेहनतान्यासुद्धां त्या लोकल बोर्डानें लागलाच दिला पाहिजे असें फर्मावावें.

(२) सदरहू खर्च व मेहनताना याप्रमाणें देण्यांत न आले तर, ज्या तिजोरींत किंवा ब्यांकेंत किंवा मंडळींत लोकल फंड ठेवलेला असेल किंवा तो संबंध किंवा त्याचा भाग डिपाझिट म्हणून ठेवलेला असेल किंवा व्याजानें उसनवार दिला असेल ती तिजोरी किंवा ब्यांक अगर मंडळी स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें तो खर्च व मेहनताना किंवा अशा अमलदाराच्या हातीं अशा लोकल फंडाची बाकी असेल तींतून देतां येईल तेवढी रकम द्यावी, असें त्या अमलदारास फर्माविण्याचा कलेक्टरास अधिकार आहे.

(३) या कलमावरून आपणांस दिलेल्या अधिकारांचा कलेक्टर उपयोग करील त्या प्रत्येक बाबतीविषयीं त्यानें कमिशनरास लागलाच रिपोर्ट केला पाहिजे.

१२७. (१) लोकल बोर्ड कामें करण्यास चुकला असतां तीं करण्याविषयीं तजवीज करण्याचा सरकारचा अधिकारः—कोणत्याहि लोकल बोर्डाकडे या आक्टावरून किंवा या आक्टाअन्वयें सोंपलेलें कोणतेंहि काम करण्यास तो बोर्ड चुकला आहे असें सरकारास फिर्याद झाल्यावरून किंवा एऱ्हवीं कळेल तेव्हां, जी चूक घडली म्हणून म्हणणें असेल तिजविषयीं तो लोकल बोर्ड दोषी आहे अशी योग्य चौकशीअंतीं सरकारची खात्री होईल तर तें काम अमुक मुदतींत झालें पाहिजे असें ठरविण्यास सरकार मुखत्यार आहे.

मात्र इतकेंच कीं, असा हुकूम कां करतां कामा नये याचें कारण दाखविण्यास लोकल बोर्डास संधि देण्यांत आल्याशिवाय अशी कोणतीहि मुदत ठरवितां कामा नये.

(२) तें काम अशा ठरविलेल्या मुदतींत करण्यांत आलें नाहीं तर, सरकारास असा अधिकार आहे कीं, तें करण्यासाठीं कोणा तरी मनुष्यास त्यानें नेमावें, आणि तें करण्याचा खर्च, तें करण्यासाठीं नेमलेल्या मनुष्यास देण्याच्या वाजवी मेहनतान्यासुद्धां, त्या लोकल बोर्डानें लागलाच दिला पाहिजे असें फर्मावावें.

(३) सदर्हू खर्च व मेहताना याप्रमाणें देण्यांत न आले, तर ज्या तिजोरींत किंवा ब्यांकेंत अगर मंडळींत लोकल फंड ठेविलेला असेल किंवा तो सबंध किंवा त्याचा भाग डिपाझिट म्हणून ठेवलेला असेल किंवा व्याजानें उसनवार दिलेला असेल ती तिजोरी किंवा ब्यांक अगर मंडळी स्वाधीन असणाऱ्या अंमलदारानें तो खर्च व मेहताना, किंवा अशा अमलदाराच्या हातीं अशा लोकल फंडाची बाकी असेल तींतून देतां येईल तेवढी रकम द्यावी, असें त्या अमलदारास फर्माविण्याचा सरकारास अधिकार आहे.

१२८. (१) लोकल बोर्डाच्या कामकाजासंबंधीं चौकशी—सरकारास, वेळोवेळीं आपल्या कोणत्याहि अमलदारांकडून कोणत्याहि लोकल बोर्डासंबंधानें किंवा त्यासंबंधींच्या बाबतींसंबंधानें, किंवा ज्या बाबतींसंबंधानें या आक्टाअन्वयें सरकारची मंजुरी, पसंती, संमति किंवा हुकूम यांची जरूरी असेल अशा कोणत्याहि बाबतींसंबंधानें चौकशी कराविण्याचा अधिकार आहे.

(२) अशी चौकशी करणाऱ्या अमलदारास, सन १९०८ चा दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा आक्ट याअन्वयेंचे, चौकशीच्या कारणासाठीं साक्षीपुरावा घेण्याचे व साक्षीदारांस हजर राहण्यास भाग पाडण्याचे व दस्तऐवज हजर करण्यास लावण्याचे कोर्टाचे अधिकार असतील.

(३) सरकारास, पोटकलम (१) याअन्वयें केलेल्या चौकशीच्या खर्चासंबंधानें व ज्या पक्षकारांनीं व ज्या फंडांतून तो दिला गेला पाहिजे ते पक्षकार व तो फंड यासंबंधानें हुकूम करण्याचा अधिकार आहे, व असा हुकूम, सरकारकडून किंवा त्यांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि इसमाकडून अर्ज आल्यानंतर, जणुं तो दिवाणी कोर्टाचा हुकुमनामा असल्याप्रमाणें अमलांत आणण्याचा अधिकार आहे.

१२९. (१) लोकल बोर्ड नालायक असले, ते कांहीं करण्यास चुकले त्यांनीं अधिकारांचा गैरउपयोग केला तर ते मोडण्याचा किंवा त्यांस दूर करण्याचा सरकारचा अधिकारः—या आक्टावरून किंवा या आक्टाअन्वयें किंवा एऱ्हवीं कायद्यानें कोणत्याहि लोकल बोर्डाकडे सोंपलेलीं कामें करण्याच तो लायक नाहीं, किंवा दुराग्रहानें तो तीं करीत नाहीं, किंवा तो आपल्या अधिकारां-

बाहेर चालतो किंवा आपल्या अधिकारांचा उपयोग करतो, असें सरकारास वाटेल, तर सरकारनें तो लोकल बोर्ड नालायक आहे, किंवा कामें करण्यास चुकला, किंवा आपल्या अधिकारांबाहेर चालला किंवा त्यानें आपल्या अधिकारांचा गैरउपयोग केला, असें, जसें असेल तसें, मुंबई सरकारी ग्याझेटांत एक हुकूम तो करण्याच्या कारणांसह प्रसिद्ध करून ठरवावें. आणि

[अ] सदरहू बोर्ड मोडावा, किंवा

[ब] सदरहू हुकुमांत मुदत सांगून त्या मुदतीपर्यंत तो लोकल बोर्ड दूर करावा, असा सरकारास अधिकार आहे.

[२] जेव्हां लोकल बोर्ड मोडण्यांत किंवा दूर करण्यांत आला असेल तेव्हां बोर्डाच्या सर्व मेंबरांनीं, सदरहू हुकुमाच्या तारखेपासून, असे मेंबर म्हणून आपले हुद्दे सोडले पाहिजेत.

१३०. मोडल्यानंतर लोकल बोर्डाची पुनर्घटनाः—जेव्हां एखादा लोकल बोर्ड मोडण्यांत आला असेल, तेव्हां जणुं त्याच्या मेंबरांच्या हुद्याची मुदत संपली असल्याप्रमाणें, जरूर असतील अशा नेमणुकी व निवडणुकी करून, त्याची पुनर्घटना केली पाहिजे; आणि या आक्टांत ठरविलेल्या रीतीप्रमाणें सदरहू बोर्डाचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड केली पाहिजे.

१३१. लोकल बोर्ड दूर केल्याचा परिणामः—जेव्हां एकादा लोकल बोर्ड दूर केला जाईल तेव्हां खालीं लिहिलेले परिणाम होतीलः—

[अ] बोर्डाचे सर्व अधिकार व कामें, बोर्ड दूर केला असेल त्या मुदतींत, त्याबाबद ज्या मनुष्यास किंवा मनुष्यांस सरकार वेळोवेळीं नेमतील त्या मनुष्यास किंवा मनुष्यांस चालविण्याचा व करण्याचा अधिकार आहे; अशा मनुष्यास किंवा अशा मनुष्यांस यांस, एखादा मनुष्य किंवा कमिटी किंवा कमिट्या नेमण्याचा, व त्यांकडे, या आक्टाअन्वयें लोकल बोर्डास एखाद्या मनुष्याकडे किंवा कमिटीकडे जे अधिकार सोंपून देतां आले असते असे सर्व अधिकार सोंपून देण्याचा अधिकार आहे, तसेंच अशा मनुष्यांस किंवा कमिटीस किंवा कमिट्यांस, बोर्डास जीं कामें सोंपवून देतां आलीं असतीं अशीं कामें करण्याचा अधिकार देण्याचा आख्त्यार आहे; आणि

(ब) बोर्डाच्या स्वाधीन असलेली सर्व मालमिळकत, बोर्ड जितक्या मुदतीसाठीं दूर केला असेल त्या मुदतीपर्यंत, सरकारच्या स्वाधीन होईल.

(क) जेव्हां बोर्डाचे अधिकार चालविण्यास व त्याचीं कामें करण्यास एकाहून अधिक इसम नेमण्यांत येतील तेव्हां, अशा इसमांस, आपल्यापैकीं

एकास किंवा अधिकांस, आपल्यातर्फे फिर्याद करण्याचा किंवा त्यांवर फिर्याद केली जाण्याचा अधिकार देण्याचा अख्त्यार आहे.

१३२. कलेक्टर वगैरे यांवर सरकारचे व कमिशनरांचे अधिकार— सामान्य व महसुलाच्या कारभारांत, कमिशनांवर सरकार, कलेक्टरांवर कामिशनर, व कलेक्टरांच्या ताब्यांतील अमलदारांवर कलेक्टर जो अधिकार व नियंतृत्व धारण करितात व चालवितात तोच अधिकार व नियंतृत्व सरकार कमिशनरांवर, कमिशनर कलेक्टरांवर व कलेक्टर आपल्या ताब्यांतील अमलदारांवर या आक्टासंबंधीं सर्व गोष्टींत धारण करितील व चालवितील.

## बाब ११ वी.—कानू.

१३३. ज्या कारणांसाठीं कानू व हुकूम करण्याचा अधिकार आहे तीं कारणें—सरकारास, मुंबई सरकारी गझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, या आक्टास अनुसरून होत अशा, खालीं लिहिलेल्या कारणांसाठीं कानू किंवा हुकूम वेळोवेळीं करण्याचा अधिकार आहे:—

(अ) प्रत्येक लोकल बोर्डाच्या मेंबरांच्या संख्या आणि प्रत्येक लोकल बोर्डासाठीं निवडलेले मेंबर किती व नेमलेले मेंबर किती ह्याचें प्रमाण आणि प्रत्येक मतदारसंघासंबंधानें निवडावयाच्या मेंबरांची संख्या ठरविण्यासाठीं;

(ब) लोकल बोर्डाच्या मेंबरांच्या निवडी, त्या कोणत्या रीतीनें कराव्या तें, आणि अशा निवडी कोणत्या जागीं कराव्या तें, व एकाद्या अधिकाऱ्याच्यां देखरेखीखालीं कराव्या असें असल्यास, त्या कोणत्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं कराव्या तें, आणि निवडी करतेवेळीं मतें देण्यांत येतील तीं कोणत्या रीतीनें लिहून घ्यावीं तें व अशा निवडींचे निकाल कसे व कोणी जाहीर करावे तें ठरविण्यासाठीं;

(क) लोकल बोर्डाचें काम कोणत्या रीतीनें चालविलें पाहिजे त्याबाबद ज्या सामान्य शर्ती योग्य वाटतील त्या ठरवून देण्यासाठीं;

(ड) ५० व्या कलमाच्या (आय्) रकमेच्या कारणासाठीं ज्या शर्तींअन्वयें व ज्या दरांनीं प्रवासाचा खर्च दिला पाहिजे त्या शर्ती व ते दर हे ठरविण्यासाठीं;

(ई) कलम ८० चा विशेष ठराव (ब) याच्या कारणांसाठीं प्राथामिक शिक्षणाबाबत प्रत्येक जिल्हा लोकल बोर्डानें भागविला पाहिजे असा खर्च शिक्षणाच्या बाबतींत जिल्हा व तालुका लोकल बोर्डाच्यां स्वतंत्र अधिकाराची मर्यादा

व शिक्षणाच्या बाबतींत सामान्यतः त्यांचा सरकारच्या एज्युकेशनल डिपार्टमेंटशीं व परस्परांशीं संबंध हीं ठरविण्यासाठीं;

[फ] कलमें ८३, ८४ यांच्या व कलम ८६ चें पोट कलम ( १:) याच्या कारणासाठीं, लोकल बोर्डांचे हिशेब ज्या नमुन्याप्रमाणें ठेवले पाहिजेत तो नमुना, व त्यांचे हिशेबांचें तेरीज व बजेट एस्टिमेंटें ज्या नमुन्याप्रमाणें तयार केलीं पाहिजेत ते नमुने हीं ठरविण्यासाठीं व लोकल बोर्डाच्या हिशेब तपासणीचें नियमन करण्यासाठीं;

(ग) कलमें १२०, १२२ व कलम १२३ चा विशेष ठराव (आय्) याच्या कारणाकरितां, लोकल बोर्डांचे अंमलदार व नोकर यांच्या नेमणुकी, त्यांवर निर्बंध, त्यांस शिक्षा व त्यांस काढून टाकणें यांचें व लोकल बोर्डांनीं नेमिलेल्या सरकारी अंमलदारांचीं पेन्शनें व लीव्ह अलावन्सेस यांबाबत वर्गण्यांची मर्यादा यांचें नियमन करण्यासाठीं;

(ह) सामान्यतः या आक्टाच्या कारभाराशीं संबंध असलेल्या सदरहू आक्टांत ज्यांबाबत मुद्दाम ठराव केलेला नसेल अशा सर्व बाबतींत लोकल बोर्डस व सरकारी अमलदार यांच्या मार्गदर्शकत्वासाठीं;

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, या कलमाअन्वयें करावयाच्या कानू, आगाऊ प्रसिद्ध केल्यानंतर केल्या पाहिजेत.

## बाब १२ वी.—किरकोळ.

१३४. लोकल बोर्डाचा मेंबर, अमलदार किंवा नोकर याचा त्या बोर्डाशीं केलेला कोणताहि करार वगैरे यांत हितसंबंध असेल तर त्यास शिक्षा - लोकल बोर्डाच्या कोणत्याहि मेंबराचा, किंवा लोकल बोर्डानें ठेविलेल्या किंवा त्याच्या ताब्यांत चाकरीस असलेल्या कोणत्याहि अमलदाराचा किंवा नोकराचा, तो ज्या बोर्डाचा मेंबर असेल किंवा ज्यानें त्यास ठेविलें असेल किंवा ज्याच्या ताब्यांत तो चाकरीस असेल त्या बोर्डाच्या हुकुमावरून केलेल्या कोणत्याहि कामांत, किंवा अशा बोर्डाशीं किंवा अशा बोर्डाच्या हुकुमाअन्वयें केलेल्या कोणत्याहि करारांत, साक्षात् किंवा पर्यायानें, कोणताहि भाग किंवा हितसंबंध असेल तर, त्यावर माजिस्ट्रेटापुढें अपराधाच्या शाबितीचा ठराव झाला असतां तो पांचशें रुपयांहून जास्त नाहीं इतक्या दंडास पात्र होईल:

मात्र असें ठरविलें आहे कीं, ह्या कलमाअन्वयें अपराधाच्या शाबितीचा ठराव कोणत्याहि मनुष्यास केवळ खालीं लिहिलेल्या सबबीनें लागू होणार नाहीं, म्हणजे:—

(अ) जी कोणती संयुक्तधनविशिष्ट मंडळी त्या लोकल बोर्डाशीं करार करील, किंवा जीस त्या लोकल बोर्डानें किंवा त्याच्या तर्फे कामास लावलें असेल त्या संयुक्तधनविशिष्ट मंडळींत त्याचा शेर असल्यानें किंवा सन १९१२ च्या सहकारी मंडळ्यांबाबत आक्टाअन्वयें नोंदलेल्या किंवा नोंदल्या आहेत असें समजल्या जाणाऱ्या कोणत्याहि मंडळींत त्याचा शेर किंवा हितसंबंध असल्यानें, किंवा

(ब) ज्या कोणत्याहि वर्तमानपत्रांत त्या लोकल बोर्डाच्या कामकाजासंबंधीं कोणतीहि जाहिरात दाखल करण्यांत येईल त्या वर्तमानपत्रांत त्याचा भाग किंवा हितसंबंध असल्यानें, किंवा

(क) त्या लोकल बोर्डानें किंवा त्याच्या तर्फे कर्जाऊ काढलेल्या कोणत्याहि पैक्यांत डिबेंचर धारण केल्यानें किंवा इतर रीतीनें त्याचा संबंध असल्यानें, किंवा

(ड) त्या लोकल बोर्डाच्या तर्फे लीगल प्राक्टिशनर म्हणून पेशाच्या रीतीनें कामावर लागल्यानें.

१३५. बोर्डाचे मेंबर वगैरे सरकारी नोकर आहेत असें समजणें—लोकल बोर्डाचा प्रत्येक मेंबर, आणि जिल्हा लोकल बोर्डानें ठेविलेला अगर त्याच्या हाताखालीं कामावर लावलेला प्रत्येक अमलदार व नोकर हा हिंदुस्थानच्या पिनल कोडाच्या २१व्या कलमाच्या अर्थाप्रमाणें सरकारी नोकर आहे असें समजलें पाहिजे.

१३६. (१) दाव्यांची मर्यादा—कोणताहि लोकल बोर्ड, किंवा लोकल बोर्डाचा कोणताहि अमलदार अगर नोकर, अगर लोकल बोर्डाच्या हुकुमांअन्वयें काम करणारा कोणताहि असामी, याच्या विरुद्ध, या आक्टाअन्वयें कोणतेंहि कृत्य केल्याबद्दल अगर या आक्टाअन्वयें म्हणावयाचें कोणतेंहि कृत्य केल्याबद्दल कोणताहि दावा आणणें ती अशा लोकल बोर्डाला, अमलदाराला, नोकराला, अगर असामीला योजिलेल्या फिर्यादीची व तिच्या कारणांची अगाऊ एक महिन्याची लेखी नोटीस दिल्यावांचून, किंवा ज्या कृत्याविषयीं कागाळी असेल त्या कृत्याला तीन महिने होऊन गेल्यावर, आणितां नये.

(२) असा कोणताहि दावा नुकसान भरून मिळण्याबद्दल असेल तेव्हां, दावा आणण्यापूर्वी पुरता मोबदला द्यावयास काढिला असला तर, वादीला याप्रमाणें द्यावयास काढिलेल्या रकमेहून जास्त कांहीं मिळावयाचें नाहीं,

व याप्रमाणें रक्कम देऊं काढिल्यावर प्रतिवादीला जो खर्च येईल तो सर्व वादीनें दिला पाहिजे.

१३७. जमीन घेणें—जेव्हां या आक्टाच्या कारणासाठीं कोणतीहि जमीन पाहिजे असेल तेव्हां सरकार, ज्या लोकल बोर्डास ती पाहिजे असेल त्यानें अर्ज केला असतां सन १८९४ च्या जमीन घेण्याविषयीं आक्टाच्या ठरावान्वयें ती घेण्यास लागण्यास मुख्त्यार आहे. आणि त्या आक्टाअन्वयें द्यावयाचा नुकसानीचा मोबदला लोकल बोर्डानें दिला असतां ती जमीन लोकल बोर्डाकडे जाईल.

---

## परिशिष्ट अ.

(कलम ९३ची रकम (अ) पहा.)

१. कसूर केल्याच्या बाबतींत गुन्हेगारी किंवा व्याज म्हणून सन १८७९ चा मुंबईचा जमीन महसुलाचा कायदा याच्या १४८ व्या कलमान्वयें लादलेला कोणताहि खर्च धरून परंतु त्याच कायद्याच्या ६५ व्या कलमान्वयें, शेतकीशीं संबंध नसलेल्या कारणासाठीं जमिनीचा उपयोग करण्याकरितां परवानगी देण्यांत लादलेला कोणताहि दंड वगळून गुन्हेगाऱ्या व दंड.

२. इनामांच्या वारसासंबंधानें किंवा तबदिलीसंबंधानें, प्रत्येक वारशाच्या किंवा तबदिलीच्या वेळीं सरकारच्या सर्व हक्कांच्या बदला प्रसंगविशेषीं द्यावयाच्या, ठरविलेल्या रकमा.

३. नोकरींतून बिगर अधिकारानें गैरहजेरीच्या मुदतींसाठीं कनिष्ठ गांवनोकरांकडून वसूल केलेला सर्व्हिस इनाम जमिनीवरील जमीनमहसूल: आणि इनामें व वतनें यांवरील तुटक्या मुदतीसाठीं व मागील वर्षांसाठीं आकारणीचे असे दुसरे सर्व खर्च.

४. चराईची फी, प्रत्येक गुरामागें घेतली असेल तेव्हां.

---

## परिशिष्ट ब.

(कलम १००चें पोटकलम (२) पहा.)

योजिलेल्या कराच्या नोटिशीचा नमुना.

ज्या डिस्ट्रिक्टाच्या रहिवाशांस यावरून नोटीस देण्यांत येते कीं, [मंजूर केलेल्या कानूंच्या पृष्ठावर प्रसिद्ध केलेल्या, व म्हणून

माहीत असलेल्या कराच्या बदला* ] यास जोडिलेल्या कानूंमध्यें सांगितलेला, (प्रसंगाप्रमाणें,) कर, पट्टी, टोल, ऑक्ट्राय किंवा सेस बनविण्याचा जिल्हा लोकल बोर्डाचा इरादा आहे.

योजिलेल्या करास सदरहू डिस्ट्रिक्टापैकीं ज्या कोणत्याहि रहिवाशास हरकत वाटत असेल त्याला ह्या नोटिशीच्या तारखेपासून एका महिन्याच्या आंत आपली हरकत जिल्हा लोकल बोर्डाकडे लेखी पाठविण्याचा अख्त्यार आहे.

कानू.

(कलम १०० चें पोटकलम [१] अन्वयें जिल्हा लोकल बोर्डानें केलेल्या कानू येथें जोडाव्या.)

---

## परिशिष्ट क.

(कलम १०४ चें पोटकलम [३] पहा.)

### मागणीच्या नोटिशीचा नमुना.

अ. ब. , राहणार यांस.

मालूम व्हावें कीं, चा जिल्हा लोकल बोर्ड, कडे, तारीख सन १९ पासून सुरू होऊन तारीख सन १९ रोजीं संपणाऱ्या मुदतीकरितां (येथें कर ज्या मिळकतीबद्दल किंवा इतर बाबतीबद्दल घ्यावयाचा असेल त्याचें वर्णन लिहावें ) बद्दल कानू अन्वयें घ्यावयाची व कडून यावयाची रकम मागत आहे आणि ह्या नोटिशीच्या बजावणीपासून पंधरा दिवसांच्या आंत सदरहू रकम येथील लोकल बोर्ड ऑफिसांत भरली नाहीं आणि त्या जिल्हा लोकल बोर्डाच्या खात्रीलायक असें ती रकम न भरण्याचें पुरतें कारण दाखविलें नाहीं तर ती रकम खर्चासुद्धां वसूल करण्याकरितां जतीचें वारंट काढण्यांत येईल.

आज तारीख माहे सन १९ .

(सही)

च्या जिल्हा लोकल बोर्डाच्या हुकुमावरून.

---

* तो कर जर कोणत्याहि चालू कराच्या बदला बसवावयाचा असला तर हा मजकूर दाखल करावा.

परिशिष्ट ड.

(कलम १०५ पहा.)

वारंटाचा नमुना.

(वारंटाच्या बजावणीचें काम ज्या अमलदाराकडे सोंपविलें असेल त्याचें नांव येथें दाखल करावें. )

ज्याअर्थी अ. ब., राहणार यानें तारीख सन १९ पासून सुरू होऊन तारीख सन १९ रोजीं संपणाऱ्या मुदतीबद्दल रकान्यांत सांगितलेल्या * करासंबंधानें येणें असलेली आणि कानू नंबर अन्वयें घ्यावयाची रकम भरली नाहीं आणि ती भरण्याचें खात्रीलायक कारण दाखविलें नाहीं;

आणि ज्याअर्थी त्या रकमेच्या मागणीची नोटीस त्यावर बजाविल्यापासून पंधरा दिवस होऊन गेले आहेत;

त्याअर्थी यावरून तुम्हांस हुकूम करण्यांत येत आहे कीं, तुम्ही सन १९२ चा मुंबईचा लोकल बोर्ड ॲक्ट, कलमें १०८ व १०९ यांच्या ठरावास पात्र राहून, सदरहू अ. ब. यांकडून खालीं लिहिल्याप्रमाणें म्हणजे—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | रु. आ. पै. |
| सदरहू कराबद्दल | ... | ... | ... | ... | |
| नोटीस बजावण्याबद्दल | ... | ... | ... | ... | |

अशी रकम रु. येणें आहे त्या रकमेच्या किंमतीची त्याची मालमत्ता जप्त करावी आणि ह्या वारंटाअन्वयें तुम्हीं पकडलेल्या मालाचा सर्व तपशील दाखलेसूद करून ह्या वारंटासह ताबडतोब मजकडे पाठवावा.

आज तारीख माहे सन १९ .

(सही)

अध्यक्ष [किंवा प्रसंगाप्रमाणें इतर कोणी कलम १०६ पहा.]

---

* येथें कराचें वर्णन द्यावें.

## परिशिष्ट ई.

(कलम १०९, रकम [क] व कलम ११६, पोटकलम [१] पहा.)

[यादीचा व नोटिशीचा नमुना.]

अ. ब. राहणार यांस
मालूम व्हावें कीं, मी आज रोजीं तारीख सन १९ पासून
सुरू होऊन तारीख सन १९ रोजीं संपणाऱ्या मुदती-
करितां रकान्यांत सांगितलेल्या कराबद्दल* येणें असलेला ऐवज
आणि मागणीच्या नोटिशीच्या बजावणीबद्दल येणें रु.
याबद्दल याखालील यादींत सांगितलेली मालमत्ता आज रोजीं पकडली आहे, आणि
जर ह्या नोटिशीच्या तारखेपासून पांच दिवसांच्या आंत तुम्ही
येथील लोकल बोर्ड ऑफिसांत सदरहू रकम वसुलाच्या खर्चासहित भरली नाहीं तर
सदरहू मालमत्ता विकण्यांत येईल.

आज तारीख माहे सन १९ .

(वारंट बजावणाऱ्या अमलदाराची सही.)

### यादी.

(पकडलेल्या मालमत्तेचा तपशील येथें लिहावा.)

---

* येथें कराचें वर्णन द्यावें.

## मुंबईचा लोकलबोर्ड आक्ट.

# कलम १३३ अन्वयें सरकारनें केलेले कानू.

( १३३ कलमाच्या निरनिराळ्या रकमांखालीं केलेले कानू चुकून मागेंपुढें छापले गेले आहेत. सबब पुढें दिलेल्या क्रमानें ते वाचावें. )


| | | | पृष्ठें. |
|---|---|---|---|
| कलम १३३ (अ) | .... | .... | १०८ |
| कलम १३३ (ब) | .... | .... | ८५ |
| कलम १३३ (क) | .... | .... | १०३ |
| कलम १३३ (ड) | .... | .... | १०५ |
| कलम १३३ (इ) | .... | .... | ११३ |
| कलम १३३ (फ) | .... | .... | ११३ |
| कलम १३३ (ग) | .... | .... | ११३ |
| कलम १३३ (ह) | .... | .... | ११५ |

# लोकल बोर्डांच्या निवडणुकींबावत कानू

## मुंबई सरकार

## जनरल डिपार्टमध्यें

मुक्काम जंजिरे मुंबई तारीख १० माहे जुलै सन १९२४

नंबर ४४५५—सन १९२३ चा मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट (सन १९२३ चा मुंबईचा ६ वा) याचें कलम १३३ रकम (ब) यावरून दिलेले अधिकार चालवून, आणि सरकारचा रेव्हेन्यू डिपार्टमेंटांतील तारीख २३ माहे सप्टेंबर सन १८८४ चा जाहीरनामा नंबर ७५७५ हा रद्द करून, मुंबई सरकार, लोकल बोर्डांच्या मेंबरांच्यां निवडणुकीचें नियमन करण्याबावत खालीलप्रमाणें कानू करीत आहे—

१. लहान सरनामा.—या कानूस सन १९२४ च्या मुंबईच्या लोकलबोर्डांच्या निवडणुकींबावत कानू असें म्हणावें.

२. व्याख्या.—या कानूंत विषयास किंवा संदर्भाला बाध येत नसेल तर--

"रिटर्निंग आफिसर (निवडणूक कामगार)" या शब्दांचा अर्थ, कोणत्याही मतदारसंघांतील कोणत्याही निवडणुकीच्या अथवा निवडणुकीच्या भागाच्या संबंधानें कलेक्टरानें रिटर्निंग आफिसर म्हणून नेमिलेला कोणताही इसम असा समजावा, व त्यांत कलेक्टराच्या आगाऊ मंजुरीनें रिटर्निंग आफिसरानें आपल्या कामापैकीं कोणतेंहि काम करण्यासाठीं त्या त्या वेळीं नेमिलेल्या कोणत्याही इसमाचा समावेश होतो.

३. कलेक्टरानें निवडणुकीकरितां जागा व तारखा ठरविणें:—सदरहू आक्टाच्या ६ व्या कलमाअन्वयेंची, जिल्हा अथवा तालुका लोकल बोर्डांच्या मेंबरांची प्रत्येक निवडणूक, ती ज्या मतदारसंघाबद्दल व्हावयाची असेल त्या मतदारसंघांतील पसंत केलेल्या एक अथवा अधिक गांवीं करण्यांत आली पाहिजे. सदरहू निवडणूक ज्या गांवीं करण्यांत आली पाहिजे तीं गांवें कलेक्टरानें ठरविलीं पाहिजेत, व निवडणुकीच्या पुढील पर्यायांसाठीं म्हणजे, नेमणुकीचे कागद घेणें, नेमणुकीचे कागद तपासणें, मतें देणें व मतें मोजणें यांसाठीं तारीख, वेळ व जागा हीं ठरविलीं पाहिजेत. सदरहु आक्टाच्या १७ व्या कलमाअन्वयें, निवडणुकींबावत ठरविलेल्या तारखेपूर्वीं नेमणुकीचे कागद घेण्याची तारीख सहा आठवड्यांहून कमी असतां कामा नये.

४. निवडणुकीची तारीख, जागा इत्यादि प्रसिद्ध करणें:—(१) सदरहू आक्टाच्या १७ व्या कलमाअन्वयें निवडणुकीबाबत ठरविलेल्या तारखेपूर्वी निदान आठ आठवडे, अशा तारीखेसंबंधाची व ३ ऱ्या कानूअन्वयें निवडणुकीच्या निरनिराळ्या पर्यायांकरितां ठरविलेल्या जागा, तारखा व वेळा यांसंबंधींची एक लेखी नोटीस कलेक्टरानें—

(अ) जिल्हा व तालुका लोकल बोर्डांच्या अध्यक्षांच्या कचेरीच्या, तसेंच ज्या तालुक्यांत अथवा महालांत सदरहू निवडणूक व्हावयाची असेल त्या मामलतदार अथवा महालकरी यांच्या कचेरीच्या एखाद्या ठळक जागीं आणि ज्या मतदारसंघासंबंधानें सदरहू निवडणूक व्हावयाची असेल अशा मतदारसंघाच्या प्रत्येक गांवांतील चावडींत अथवा कलेक्टर नेमील अशा दुसऱ्या सार्वजनिक इमारतींत लावविली पाहिजे; आणि

(ब) ज्यांत सदरहू निवडणूक व्हावयाची असेल त्या, प्रसंगाप्रमाणें, जिल्ह्यांतील अथवा तालुक्यांतील देशी भाषेंतील निदान एका तरी दैनिक किंवा साप्ताहिक वर्तमानपत्रांत, कोणतेंही असल्यास, प्रसिद्ध करविली पाहिजे.

[२] तसेंच कलेक्टरास, सदरहू निवडणुकीच्या निरनिराळ्या पर्यायां संबंधाची नोटीस त्याला योग्य वाटेल अशा इतर कोणत्याहि रीतीनें प्रसिद्ध करविण्याचा अधिकार आहे.

५. उमेदवारांची नेमणुक:—[१] नेमणुकीचे कागद घेण्याकरितां ३ ऱ्या कानूअन्वयें नेमिलेल्या तारखेस किंवा तारखेपूर्वी व नेमिलेल्या वेळीं, दरएक उमेदवारानें, ३ ऱ्या परिशिष्टांत ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें पूर्णपणें भरलेला व सदरहू नेमणुकीस आपली संमति आहे अशा अर्थाची उमेदवारानें स्वतः सही केलेला व सदरहू आक्टाच्या १४ व्या कलमान्वयेंच्या निवडणुकीच्या तारखेपूर्वी शेवटीं प्रसिद्ध केलेल्या अशा मतदारसंघाच्या सुधारलेल्या यादींत ज्यांचीं नांवें नोंदलेलीं असतील अशा नांव सुचविणारा व अनुमोदन देणारा म्हणून दोन इसमांनीं सह्या केलेला नेमणुकीचा कागद रिटर्निंग आफिसराच्या स्वाधीन केला पाहिजे. ठरविलेल्या नमुन्याप्रमाणेंचे नेमणुकीचे कागद त्याबद्दलची मागणी करणाऱ्या कोणत्याहि मतदारास कलेक्टरानें पुरविले पाहिजेत.

[२] मतदारसंघाचे मतदारांचे यादींत ज्याचें नांव नोंदलेलें आहे, व सदरहू आक्टाअन्वयें जो कोणत्याहि नालायकीस पात्र नाहीं अशा कोणत्याहि इसमास, जितक्या जागा भरावयाच्या असतील तितक्या नेमणुकींच्या कागदांवर—जास्त कागदांवर नव्हे—नांव सुचविणारा व अनुमोदन देणारा म्हणून सह्या करण्याचा अधिकार आहे.

[ ३ ] नांव सुचविणारा व अनुमोदन देणारा यांनीं नेमणुकीचा कागद रिटार्निंग ऑफिसराकडे सादर करण्याचे वेळीं हजर राहिलें पाहिजे, व सदरहू आफिसारानें तेथल्या तेथेंच नांव सुचविणारा व अनुमोदन देणारा यांनीं नेमणुकीच्या कागदांवर खुषीनें सह्या केल्या असल्याबद्दल खात्री करून घेतली पाहिजे. नांव सुचविणारा अथवा अनुमोदन देणारा यांपैकीं कोणीहि जर नेमणुकीच्या कागदांवर आपण सही केल्याचें कबूल करण्याची नाखुशी दर्शवील तर उमेदवाराला नवीन नेमणुकीचा कागद सादर करण्याचा अधिकार आहे.

६. नेमणुकीच्या कागदांची तपासणीः—नेमणुकीच्या पत्रकांची तपासणी करण्याकरितां नेमलेल्या तारखेस उमेदवारांस, प्रत्येक उमेदवाराचा एकेक नांव सुचविणारा व अनुमोदन देणारा यांत, व प्रत्येक उमेदवारानें योग्य रीतीनें लेखी अधिकार दिलेला इतर एक इसम—यास—परंतु इतर कोणत्याहि इसमास नव्हे—नेमिलेल्या वेळीं व जागीं हजर राहण्याचा अधिकार आहे, व ५ व्या कानूंत ठरविलेल्या वेळेच्या आंत व ठरविलेल्या रीतीनें जे स्वाधीन करण्यांत आले असतील असे सर्व उमेदवारांचे नेमणुकीचे कागद तपासण्याबाबत त्यांस, सर्व वाजवी सवलती रिटार्निंग आफिसरानें दिल्या पाहिजेत.

७. हरकतींचा निकाल करणें; नेमणूक नामंजूर करणें.—( १ ) रिटार्निंग ऑफिसरानें नेमणुकीचे कागद तपासले पाहिजेत व कोणत्याहि नेमणुकीबद्दल ज्या हरकती घेण्यांत येईल अशा सर्व हरकतींचा निकाल केला पाहिजे, व अशी हरकत आल्यावरून किंवा आपण होऊन, त्यांस जरूर वाटेल अशी संक्षिप्त चौकशी, कोणतीहि असल्यास, ती केल्यानंतर, खालील मुद्यांपैकीं कोणत्याहि मुद्यावर कोणतीहि नेमणूक नामंजूर करण्याचा अख्त्यार आहे ते मुद्देः—

(१) उमेदवार निवडणुकीकरितां नालायक आहे;

(२) नांव सुचविणारा अथवा अनुमोदन देणारा हे नेमणुकीच्या कागदावर सही करण्यास नालायक आहेत;

(३) ठरविलेल्या ठरावांपैकीं कोणत्याहि ठरावाप्रमाणें वागण्यांत कोणतीहि कसूर झालेली आहे.

(४) उमेदवार किंवा कोणताहि नांव सुचविणारा किंवा अनुमोदन देणारा, हे, प्रसंगाप्रमाणें, असा उमेदवार, नांव सुचविणारा किंवा अनुमोदन देणारा यांचे नंबर म्हणून ज्या इसमांचे निवडणूक करणारांच्या यादींतील नंबर नेमणुकीच्या कागदांत, दिलेले असतील, ते इसम नाहींत.

( ५ ) उमेदवार किंवा कोणताहि नांव सुचविणारा अथवा अनुमोदन देणारा यांची सही खरी नाहीं किंवा ती कपटानें मिळविलेली आहे.

(२) पोट-कानू (१) चे कारणासाठीं—

(१) कोणत्याहि मतदारसंघाच्या मतदारांच्या यादींतील नोंदीची कोणतीहि दाखलेसूद नक्कल हजर करणें, हा, सदरहू नोंदींत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि मतदाराच्या प्रसंगाप्रमाणें, निवडणुकीस उभे राहण्याच्या किंवा नेमणुकीच्या कागदावर सही करणाराच्या हक्काचा, सदरहू उमेदवार, नांव सुचवणारा किंवा अनुमोदन देणारा हा नालायक आहे असें सिद्ध होईल तें खेरीजकरून, निर्णायक पुरावा समजला पाहिजे; आणि

(२) ज्या वेळीं एकाद्या इसमानें, नांव सुचविणारा किंवा अनुमोदन देणारा म्हणून जितक्या रिकाम्या जागा भरावयाच्या असतील त्यापेक्षां अधिक नेमणुकीच्या कागदांवर सह्या केल्या असतील, त्या वेळीं अशा रीतीनें सही केलेल्या कागदांपैकीं, भरावयाच्या, रिकाम्या जागांच्या संख्येपर्यंत, जे पहिल्यानें मिळालेले असतील ते कागद कायदेशीर आहेत असें समजलें पाहिजे.

(३) पोट-कानू (२) यांत सांगितलेल्या कोणत्याहि मजकुरावरून नेमणुकीच्या, कागदामध्यें कोणतीहि नियमबाह्यता असल्याच्या मुद्यावरून, कोणत्याहि उमेदवाराची नेमणूक नामंजूर करण्याचा, जर, ज्यांत कोणत्याहि रीतीची नियमबाह्यता झालेली नाहीं अशा दुसऱ्या नेमणुकीच्या कागदाअन्वयें योग्य रीतीनें सदरहू उमेदवाराची नेमणूक करण्यांत आली असेल, तर, अधिकार मिळतो असें समजतां कामा नये.

८. तपासणी पुरी होणें.—(१) रिटर्निंग ऑफिसरानें प्रत्येक नेमणुकीच्या कागदावर तो स्वीकारल्याबद्दल किंवा नामंजूर केल्याबद्दल आपला निर्णय नमूद केला पाहिजे आणि नेमणुकीचा कागद जर नामंजूर करण्यांत आला असेल तर अशा नामंजुरीबद्दलच्या आपल्या कारणांचा थोडक्यांत तपशील लेखी नमूद केला पाहिजे. रिटर्निंग ऑफिसराच्या निर्णयाविरुद्ध एका आठवड्याचे आंत कलेक्टराकडे अपील करण्याचा अधिकार आहे.

(२) या बाबतींत ठरविलेल्या दिवशीं सदरहू तपासणी पुरी झाली पाहिजे, व चाललेल्या कामाच्या कोणत्याहि तहकुबीस परवानगी दिली जातां कामा नये.

९. कायदेशीर नेमणुकांची यादी तयार करणें.—(१) नेमणुकांची तपासणी पुरी झाल्यानंतर रिटर्निंग ऑफिसरानें तावडतोब कायदेशीर नेमणुकांची एक यादी स्वतःच्या सहीनें तयार करविली पाहिजे, व ती आपल्या कचेरींतील एखाद्या ठळक जागीं, व सदरहू निवडणूक जेथें जेथें व्हावयाची असेल अशा प्रत्येक जागीं लावविली पाहिजे. तसेंच, त्यानें सदरहू यादीची एक नक्कल कलेक्टराकडे तावडतोब पाठविली पाहिजे.

(२) रिटर्निंग ऑफिसरानें ज्या उमेदवाराची नेमणूक कायदेशीर झाली असेल अशा प्रत्येक उमेदवारास एक एक चिन्ह नेमून दिलें पाहिजे व पोटकानू (१) यांत सांगितलेल्या यादीबरोबर तें प्रसिद्ध केलें पाहिजे.

१०. प्रतिस्पर्धी नसलेल्या निवडणुकीचें काम चालविण्याची रीति.—नेमणुकीच्या पत्रकांच्या तपासणीनंतर, कोणत्याहि मतदारसंघांतील नेमणुकींची संख्या, सदरहू मतदारसंघांतील रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षां ज्यास्त नसेल तर, नेमणूक केलेला एक इसम किंवा अनेक इसम निवडून आले आहेत असें समजलें पाहिजे, आणि अशा बाबतींत, रिटर्निंग ऑफिसरानें त्या निवडणुकीचा निकाल ताबडतोब जाहीर केला पाहिजे, व त्या जिल्ह्याचे कलेक्टरास तो कळविला पाहिजे. कलेक्टरानें तो निवडणुकीचा निकाल मुंबई सरकारी गॅझेटांत जाहीर केला जाण्याची व्यवस्था केली पाहिजे.

११. दोन अथवा अधिक मतदारसंघांत नेमणूक केली जाण्याचा हक्क.—जेव्हां दोन अथवा अधिक मतदारसंघांबद्दल एकाच वेळीं किंवा वेळेचे सुमारास निवडणुकी व्हावयाच्या असतील, तेव्हां, एकाच इसमाची अशा प्रत्येक मतदारसंघाबद्दल उमेदवार म्हणून नेमणूक केली जाण्याचा अधिकार आहे; मात्र तो इतर प्रकारें योग्य रीतीनें लायक असला पाहिजे.

१२. उमेदवारी परत घेणें.—ज्या उमेदवाराची नेमणूक ९ व्या कानूअन्वयें कायदेशीर म्हणून जाहीर केली गेली आहे, अशा उमेदवारास, १७ व्या कलमाअन्वयें निवडणुकीबाबत ठरविलेल्या तारखेस किंवा तारखेपूर्वी कोणत्याहि वेळीं, आपण सही केलेल्या व रिटर्निंग ऑफिसराकडे पाठवून दिलेल्या लेखी नोटिशीनें, आपली उमेदवारी परत घेण्याचा अधिकार आहे. अशा रीतीनें उमेदवारी परत घेतल्यानें त्याची नेमणूक रद्द होईल. जेव्हां सदरहू नोटीस मतें घेण्याला सुरवात झाल्यानंतर दिली गेली असेल, आणि अशा उमेदवारी परत घेण्यानें निवडणुकीस कोणीहि प्रतिस्पर्धी उरत नसेल तेव्हां, मतें घेणाऱ्या अंमलदारानें, मतें घेण्याचें बंद केलें पाहिजे, व रिटर्निंग ऑफिसरानें असा प्रतिस्पर्धी नसलेला किंवा नसलेले उमेदवार योग्य रीतीनें निवडून आल्याबद्दल जाहीर केलें पाहिजे.

१३. मतें देण्याच्या जागा (पोलिंग स्टेशनें) आणि मतें घेणारे अंमलदार (पोलिंग ऑफिसर):—(१) निवडणूक करणारांची यादी प्रसिद्ध करते वेळीं कलेक्टरानें, प्रत्येक मतदारसंघाकरितां जरूर असतील तितक्या मतें देण्याच्या जागा, त्यांचीं ठिकाणें व प्रत्येकीस नेमून द्यावयाचा प्रदेश हीं पसंत केलीं पाहिजेत.

(२) कलेक्टरानें प्रत्येक मतें देण्याच्या जागीं प्रमुखस्थानीं असण्यासाठीं व तेथें मतें घेण्यासाठी मतें घेणाऱ्या अंमलदाराची नेमणूक केली पाहिजे व त्याला निवडणुकीचे वेळीं दिलेलीं मतें स्वीकारण्याकरितां एक पेटी पुरविली पाहिजे.

(३) ज्या मतदारसंघाकरितां निवडणूक व्हावयाची असेल त्यांतील प्रत्येक गांवांतील गांवकामगारांनीं, आजारीपणा किंवा इतर योग्य कारण यांमुळें त्यांस प्रतिबंध होईल तें खेरीज करून, निवडणुकीला आरंभापासून अखेरपर्यंत हजर राहिलें पाहिजे,व मतें घेणाऱ्या अंमलदारास निवडणुकीचे कामीं जी लागेल ती मदत केली पाहिजे.

(४) कलेक्टरानें जरूर तर मतें देण्याचे जागीं सर्वसाधारण देख-रेख करण्याकरितां प्रमुखस्थानीं असणारा अंमलदारहि [ प्रिसाइडिंग ऑफिसर ] नेमिला पाहिजे.

१४. मतपत्रकें टाकण्याच्या [ बॅलट बॉक्स ] पेटीवर मोहोर करणें.—मतें घेण्यास सुरवात करण्यापूर्वीं, मतें घेणाऱ्या अंमलदारानें, मतें देण्याचे जागीं हजर असतील अशा उमेदवारांस अथवा त्यांच्या एजंटांस आणि सरकारी अंमल-दारांस मतपत्रकें टाकण्याची पेटी रिकामी असलेली दाखविली पाहिजे; व नंतर तिला कुलूप लावलें पाहिजे,व तीवर अशा रीतीनें मोहोर केली पाहिजे कीं, मोहोर फोडल्या-शिवाय ती उघडतां येऊं नये.यानंतर मतपत्रकें टाकण्याची पेटी एक पडदा लावून बंद भागांत ठेविली पाहिजे.

१५. मतदारांनीं मतें देण्याच्या जागीं हजर राहणें.—आपलें मत देण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक मतदारानें, तसें करण्याकरितां, त्याचें नांव,ज्या प्रदेशाकरितांच्या मतदारांचे यादींत दाखल केलेलें असेल त्या प्रदेशासाठीं अस-लेल्या मतें देण्याच्या जागीं सदरहू आक्टाच्या १७ व्या कलमाअन्वयें निवडणुकी-साठीं नेमलेल्या दिवशीं व ह्या बाबतींत ३ ऱ्या कानूअन्वयें कलेक्टर नेमील अशा तासांच्या दरम्यान हजर राहिलें पाहिजे.

१६. [१] मतदार तेच आहेत अशाबद्दल.—मतदार मतें देण्याचे जागीं हजर झाला म्हणजे, मतें घेणाऱ्या अंमलदारानें प्रथम त्याजपासून त्याचें नांव, ज्या मतदारसंघांत मत देण्याचा आपणांस हक्क आहे असें तो म्हणत असेल तो मतदारसंघ यांविषयीं व सदरहू यादींत ज्याचें नांव आहे तोच तो इसम आहे किंवा कसें आणि त्यानें पूर्वींच मत दिलेलें आहे किंवा कसें यांविषयीं खात्री करून घेतली पाहिजे.

(२) पोट-कानू (१)यांत नमूद केलेल्या मुद्यांसंबंधीं मतें घेणाऱ्या अंमलदाराची खात्री झाली म्हणजे, त्यानें मतदारांचे यादींतून त्या मतदाराचें नांव खोडून टाकलें पाहिजे व त्या मतदाराचा मतदारांच्या यादींतील नंबर व ज्या प्रदेशाकरितांच्या यादींत त्याचें नांव दाखल केलेलें असेल तो प्रदेश मतपत्रकाच्या स्थळप्रतीवर दाखल केला पाहिजे. नंतर मतदारानें सदरहू स्थळप्रतीवर सही केली पाहिजे, किंवा तो अशिक्षित असेल तर त्यानें आपल्या आंगठ्याचा ठसा उमटविला पाहिजे. नंतर मतें घेणाऱ्या अंमलदारानें मतदाराला त्याचें मतपत्रक दिलें पाहिजे.

१७. मत देणें:—मतपत्रक मिळाल्यानंतर मतदारानें मतें देण्याच्या भागाकडे गेलें पाहिजे, आणि त्या मतदारसंघांत जितके मेंबर निवडून यावयाचे असतील तितकीं मतें त्याला असतील, व आपलीं सर्व मतें त्याला एकाच उमेदवाराला देण्याचा किंवा त्या उमेदवारांमध्यें वांटून देण्याचा अधिकार आहे; मात्र इतकेंच कीं, त्याच्या मतांची ( फुल्यांची ) एकूण संख्या सदरहू मतदारसंघांत निवडून यावयाच्या मेंबरांच्या एकूण संख्येपेक्षां जास्त असतां कामा नये. त्यानें त्या उमेदवाराला जितकीं मतें देण्याची त्याची इच्छा असेल अशा दरेक मताबद्दल उमेदवाराच्या नांवापुढें पेन्सलीनें एक फुली केली पाहिजे. जर मतदाराची आपलीं सर्व मतें देण्याची इच्छा नसेल, तर, त्यानें आपल्या मतपत्रकाचा भाग कोरा ठेवला पाहिजे.

फक्त एकाच मतदारास एकाच वेळीं मतें देण्याच्या भागांत जाऊं दिलें पाहिजे.

१८. मतपत्रकाचा नमुना:—मतपत्रक, ह्या कानूंस जोडलेल्या १ ल्या परिशिष्टांतील नमुन्याप्रमाणें असलें पाहिजे. मतपत्रकांवर अनुक्रमानें नंबर असले पाहिजेत, व अनुक्रम नंबर मुख्य प्रतीच्या व स्थळ प्रतीच्या मागील बाजूस छापिला पाहिजे.

१९. मतपत्रक देणें.—३ ऱ्या कानूअन्वयें निवडणुकीसाठीं नेमिलेल्या बंद करण्याच्या तासानंतर कोणतेंहि मतपत्रक देतां कामा नये; परंतु ज्या मतदाराला सदरहू बंद करण्याच्या तासापूर्वीं मतपत्रक देण्यांत आलें असेल, अशा, कोणत्याहि मतदाराला, आपलें मत देण्याची परवानगी दिली पाहिजे.

२०. मतें देण्याच्या जागीं कामावर असलेल्या अमलदारांनीं मत देणें.—मतें घेणारा अंमलदार किंवा दुसरा कोणीहि इसम मतें देण्याच्या जागीं कामावर असेल व तेथें त्याला मत देण्याचा अधिकार नसेल तर, जीसंबंधानें तो कामावर असेल त्या निवडणुकींत मत देण्याचा, अशा अंमलदारास किंवा इसमास हक्क असेल, तर, त्या मतें देण्याचे जागीं आपलें मत देण्याचा त्यास अधि-

कार आहे. मतदारांच्या यादींतील त्याचे नंबराऐवजीं, जेथें त्याला एरव्हीं मत देण्याचा हक्क असतां त्या मतें देण्याच्या जागेचें नांव मतपत्रकाच्या स्थळप्रतींत दाखल केलें पाहिजे.

२१. मुखत्यारामार्फत मत देणें.—मुखत्यारामार्फत मत देतां येणार नाहीं.

२२. एकादा मतदार तोच आहे अशाविषयीं तक्रार असेल तेव्हां.—मतें घेणाऱ्या अंमलदारानें आणि प्रमुखस्थानीं असणारा अंमलदार, जर एकादा असेल तर, त्यानें, मतदार असल्याबद्दल हक्क सांगणारा कोणताहि मनुष्य तोच तो आहे अशाविषयीं कोणत्याहि तक्रारीचा निकाल केला पाहिजे.

२३. मतदारांस मदत.—मतें घेणाऱ्या अंमलदारानें आणि प्रमुखस्थानीं असणारा अंमलदार, जर एकादा असेल तर त्यानें, ज्या नालायकीमुळें कोणताहि मतदार ठरविलेल्या रीतीनें मत देण्यास असमर्थ होत असेल अशी कोणतीहि नालायकी असलेल्या कोणत्याहि मतदारास जी मदत लागेल ती दिली पाहिजे.

२४. देऊं केलेलीं मतपत्रकें.—जर एकादा मनुष्य, मतदारांच्या यादींत नांव नोंदलेला अमुक मतदार म्हणून आपणास म्हणवीत असून, असा मतदार म्हणून दुसऱ्या मनुष्यानें मत दिल्यावर मतपत्रकाकरितां अर्जी करील तर, अर्जी करणाराला, मतें घेणारा अंमलदार जे प्रश्न विचारील त्यांचीं योग्य रीतीनें उत्तरें दिल्यावर, मत देण्याचा हक्क असेल. तथापि मतदारानें मतपत्रकाच्या पाठीवर ज्या उमेदवारांना तो मतें देऊं इच्छित असेल त्यांचीं नांवें, व प्रत्येकास किती मतें देण्याची त्याची इच्छा आहे तें, लिहिलें पाहिजे, किंवा तो अशिक्षित असेल तर, मतें घेणाऱ्या अंमलदारानें त्याच्याकरितां लिहिलें पाहिजे, आणि सदरहू मतदारानें तें मतपत्रक मतें घेणाऱ्या अंमलदारास दिलें पाहिजे, व त्या अंमलदारानें त्या मतपत्रकावर मतदाराचें नांव आणि त्याचा मतदारांच्या यादींतील नंबर हीं लिहिलीं पाहिजेत, आणि तें मतपत्रक एका निराळ्या पुडक्यांत ठेविलें पाहिजे. अशा मतपत्रकांस "देऊं केलेलीं मतपत्रकें" असें म्हणावें. अशा रीतीनें देऊं केलेल्या मतपत्रकांची यादी ह्या कानूंस जोडलेल्या २ ऱ्या परिशिष्टांतील नमुन्याप्रमाणें ठेविली पाहिजे.

२५. मतें देण्याच्या मांडवामध्यें (पोलिंग बूथमध्यें) येऊं देणें.—निवडणुकीच्या दिवशीं मतें घेणाऱ्या अंमलदारानें, मतें देण्याच्या मांडवाच्या बाहेरच्या खोलींत उमेदवारांना, मतदारांना ओळखण्याच्या कामीं मदत करण्याकरितां येऊं दिलें पाहिजे; मात्र इतकेंच कीं, उमेदवारांशिवाय, आणखी प्रत्येक उमेदवाराच्या एकाहून जास्त नाहीं अशा एजंटांस एका वेळीं हजर राहतां येईल.

उमेदवार व त्यांचे एजंट ह्यांशिवाय, फक्त मतदार व त्यांचे जरूर तितकेच बरोबर असणारे, ह्यांस मतें देण्याच्या मांडवामध्यें येऊं दिलें पाहिजे.

२६. (१) उमेदवार व एजंट यांनीं मतदाराशीं बोलतां कामा नये.—उमेदवार व त्यांचे एजंट यांनीं मत देण्याकरितां बाहेरच्या खोलींत आलेल्या कोणत्याहि मतदाराशीं बोलतां किंवा त्यास कांहींहि सांगतां कामा नये; परंतु त्यांस एकाद्या मतदारासंबंधीं खालील तीन मुद्यांवर तक्रार असेल तर, फक्त मतें घेणाऱ्या अंमलदाराला किंवा प्रमुखस्थानीं असणारा अंमलदार, जर एकादा असेल तर, त्याला, सांगण्याचा अधिकार आहेः—

(१) ज्या मतदारसंघाबाबत निवडणूक चालू आहे त्या मतदारसंघाच्या मतदारांच्या यादींत त्याचें नांव नाहीं,

(२) मतदारांच्या यादींत दाखविलेला अमुक एक मतदार म्हणून असण्याचा त्याचा हक्क खोटा आहे,

(३) त्यानें मत पूर्वीच दिलेलें आहे.

(२) ही कानू मोडणाऱ्या कोणत्याहि इसमास, मतें घेणाऱ्या अंमलदारास अथवा प्रमुखस्थानीं असणारा अंमलदार, जर एकादा असेल तर, त्यास बाहेरच्या खोलींतून घालवून देण्याचा अधिकार आहे, आणि ती निवडणूक चालू असे तोंपर्यंत त्यास परत येऊं देतां कामा नये.

२७. मतें घेण्याचें बंद करणें: मतपत्रकें पाठविणें.–(१) मतें घेणाऱ्या अंमलदारानें मतें घेण्याचें बंद झाल्यानतर शक्य तितक्या लवकर, गांवकामगारांच्या समक्ष आणि कोणताहि उमेदवार अथवा त्याचा प्रतिनिधि हजर असेल तर, त्यांच्या समक्ष खालील कागदपत्र वगैरेचीं निरनिराळीं पुडकीं केलीं पाहिजेत, व त्यांतील प्रत्येक पुडक्यावर त्यांत काय काय आहे त्याचें वर्णन लिहून त्यांवर आपल्या स्वतःचा शिक्का केला पाहिजे व ज्या उमेदवाराची किंवा प्रतिनिधीची आपला शिक्का करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याहि उमेदवाराचा किंवा प्रतिनिधीचा शिक्का केला पाहिजेः—

(१) सदरहू मतें देण्याच्या जागीं उपयोगांत असलेलीं मतपत्रकें टाकण्याची दरएक पेटी, उघडी नसलेली परंतु बरोबर किल्ली असलेली,

(२) उपयोग न केलेलीं मतपत्रकें,

(३) देऊं केलेलीं मतपत्रकें,

(४) मतदारांच्या यादीच्या खुणा केलेल्या प्रती,

(५) उपयोग केलेल्या मतपत्रकांच्या स्थळप्रती, आणि

(६) देऊं केलेल्या मतांची यादी.

(२) मतें घेणाऱ्या अंमलदारानें सदरहू पुडकीं संबंध असलेल्या रिटर्निंग ऑफिसराकडे पाठविलीं पाहिजेत, व त्यासोबत आपल्याजवळ दिलेल्या मतपत्रकांची संख्या दर्शविणारें व उपयोग केलेलीं मतपत्रकें, देऊं केलेलीं मतपत्रकें, आणि उपयोग न केलेलीं मतपत्रकें, या सदराखालीं त्यांचा हिशोब देणारें एक पत्रक असलें पाहिजे.

२८. मतें मोजणें—[१] [३] ऱ्या कानूअन्वयें नेमिलेल्या तारखेस व वेळीं संबंध असलेल्या रिटर्निंग ऑफिसरानें हजर असतील अशा उमेदवारांच्या किंवा योग्य रीतीनें लेखी अधिकार दिलेल्या त्यांच्या प्रतिनिधींच्या समक्ष मतपत्रकें टाकण्याची प्रत्येक पेटी उघडली पाहिजे व जीं मतपत्रकें त्यास कायदेशीर वाटतील अशीं मतपत्रकें तो नामंजूर करील अशा मतपत्रकांपासून निराळीं काढलीं पाहिजेत. नामंजूर केलेल्या मतपत्रकांवर "नामंजूर केलेलीं" हे शब्द व नाकारण्याचीं कारणें लिहिलीं पाहिजेत.

[२] रिटर्निंग ऑफिसरास ज्या मतपत्रकावर किंवा ज्या मतपत्रकाच्या योगानें मतदारानें त्यास जितकीं मतें देण्याचा हक्क असेल त्यांहून जास्त मतें दिलीं असतील किंवा ज्यावर ज्या कोणत्याहि लेखाच्या अथवा खुणेच्या योगानें रिटर्निंग ऑफिसराच्या मतें तें ओळखलें जावें असा इरादा असेल असा लेख किंवा खूण असेल किंवा ज्यावर खूण केलेली नसल अथवा जें अनिश्चितपणामुळें निरर्थक असेल असें मतपत्रक नामंजूर करण्याचा अधिकार आहे.

[३] त्यानें प्रत्येक उमेदवारास दिलेलीं मतें मोजलीं पाहिजेत.

[४] त्यानें मोजण्याचें काम पुरें झाल्यावर निरनिराळ्या पुडक्यामध्यें प्रत्येक पुडक्यावर त्यांत काय काय आहे तें लिहून मोजलेलीं मतपत्रकें आणि नामंजूर केलेलीं मतपत्रकें हीं मोहरबंद करून ठेवलीं पाहिजेत. देऊं केलेल्या मतपत्रकांचीं मोहरबंद केलेलीं पुडकीं, मतदारांच्या यादीच्या खुणा केलेल्या प्रती आणि उपयोग केलेल्या मतपत्रकांच्या स्थळप्रती त्यानें उघडतां कामा नयेत; परंतु उपयोग न केलेल्या मतपत्रकांचीं पुडकीं आणि देऊं केलेल्या मतांची यादी असलेलें पुडकें हीं त्यानें उघडलीं पाहिजेत, आणि त्यानें मतें घेणाऱ्या प्रत्येक अमलदारानें दिलेला मतपत्रकांचा हिशोब, सदरीं सांगितल्याप्रमाणें मोजलेलीं किंवा नामंजूर केलेलीं मतपत्रकें, उपयोग न केलेलीं मतपत्रकें आणि देऊं केलेल्या मतांच्या यादींत दाखविल्याप्रमाणें देऊं केलेल्या मतांचीं पत्रकें ह्यांच्या संख्येशीं ताडून पाहून त्याचा खरेपणा पाहिला पाहिजे. तपासणीनंतर त्यानें प्रत्येक मोहरबंद केलेल्या पुडक्यावर पुनः मोहोर केली पाहिजे आणि प्रत्येक पुडक्यावर त्यांत काय काय आहे तें आणि ज्या निवडणुकीशीं त्याचा संबंध असेल त्या निवडणुकीची तारीख हीं लिहिलीं पाहिजेत.

[५] नंतर त्यानें खालील गोष्टी दाखविणारें एक पत्रक तयार केलें पाहिजे आणि त्यावर खरेपणाचा दाखला दिला पाहिजे—

[१] पोटकलम [४] यांत उल्लेख केल्याप्रमाणें खरेपणा पाहिल्याचा निकाल;

[२] ज्या इसमांस कायदेशीर मतें देण्यांत आलीं असतील त्यांचीं नांव;

[३] प्रत्येक इसमास दिलेल्या कायदेशीर मतांची संख्या;

[४] गैरकायदेशीर म्हणून जाहीर केलेल्या मतांची संख्या;

[५] दिलेल्या देऊं केलेल्या मतांची संख्या;

आणि कोणत्याहि उमेदवारास किंवा त्याच्या एजंटास सदरहू पत्रकाची नक्कल किंवा उतारा घेण्यासाठीं परवानगी दिली पाहिजे.

[६] रिटर्निंग ऑफिसर ह्या कानूअन्वयेचें काम ज्या तारखेस व ज्या वेळीं तें पुनः सुरू करण्यांत येईल त्याबद्दल हजर असलेल्या उमेदवारांस किंवा त्यांच्या प्रतिनिधींस नोटिस दिल्यानंतर कोणत्याहि पर्यायास तहकूब ठेवण्यास मुखत्यार आहे.

२९. निकाल जाहीर करणें—मतें मोजण्याचें काम पुरें झाल्यावर, रिटर्निंग ऑफिसरानें ज्या उमेदवारास अथवा उमेदवारांस सर्वांत जास्त मतें मिळालीं असतील तो किंवा ते निवडला गेला आहे किंवा निवडले गेले आहेत असें ताबडतोब जाहीर केलें पाहिजे.

३०. निवडणुकींचे निकाल प्रसिद्ध करणें—निवडून आलेल्या उमेदवाराचें नांव अथवा उमेदवारांचीं नांवें कलेक्टरानें लगत पुढच्या मुंबई सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध करविलीं पाहिजेत.

३१. अनेक मतदारसंघांकडून निवडणुकी—[१] जर कोणत्याहि मनुष्यास एकाच लोकल बोर्डाच्या एकापेक्षां अधिक मतदारसंघांनीं निवडलें असेल, तर त्यानें या आक्टाच्या २१ व्या कलमाअन्वयें अशा निवडणुकीचा निकाल प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आंत स्वतः सही केलेल्या व संबंध असलेल्या रिटर्निंग ऑफिसराच्या स्वाधीन केलेल्या लेखी नोटिशीनें ह्या मतदारसंघांपैकीं कोणत्या मतदारसंघाबद्दल तो काम करूं इच्छित आहे तें त्यानें पसंत केलें पाहिजे, आणि अशी पसंती करण्यांत आली म्हणजे ज्या दुसऱ्या मतदारसंघाकडून असा इसम निवडला गेला असेल अशा इतर प्रत्येक मतदारसंघांत सदरहू निवडणुकीचा निकाल, जणूं त्याच्याकरितां कोणतींहि मतें देण्यांत आलीं नव्हतीं अशा रीतीनें ठरविला पाहिजे.

[ २ ] जर सदरहू इसम [१] ल्या पोटकानूंत उल्लेख केलेली पसंती करणार नाहीं, तर अशा इसमाच्या निवडणुकी निरर्थक होतील आणि सदरहू निवडणुकींचे निकाल जणूं सदरहू इसमाकरितां कोणतींहि मतें देण्यांत आलीं नव्हतीं अशा रीतीनें ठरविले पाहिजेत.

३२. निवडणुकीसंबंधीं कागदपत्रांची रखवाली—कलेक्टरानें २८ व्या कानूंत उल्लेख केलेलें पत्रक व पुडकीं आणि निवडणुकीसंबंधाचे दुसरे सर्व कागदपत्र आपल्या रखवालींत ठेवले पाहिजेत.

३३. [ १ ] निवडणुकीसंबंधीं कागदपत्र हजर करणें व पाहणें—कलेक्टराच्या रखवालींत असतांना मोजलेल्या, नामंजूर केलेल्या किंवा देऊं केलेल्या मतपत्रकांचीं आणि त्यांच्या स्थळप्रतींचीं पुडकीं एखाद्या लायक कोर्टाच्या हुकुमाअन्वयें असेल तें खेरीजकरून उघडतां कामा नयेत आणि त्यांतील कागदपत्र पाहतां कामा नयेत; किंवा हजर करतां कामा नयेत; मात्र इतकेंच कीं, मतपत्रकांच्या स्थळप्रतींचीं पुडकीं ह्या आक्टाच्या १९ (१) कलमान्वयें अर्जी सादर करण्यासाठीं दिलेली मुदत संपल्यानंतर आणि कोणतीहि अर्जी सादर करण्यांत येईल तर अशा अर्जीची विल्हेवाट लागल्यानंतर उघडण्याचा आणि त्यांतील कागदपत्र पाहण्याचा किंवा हजर करण्याचा अधिकार आहे.

( २ ) कलेक्टराच्या रखवालींत असलेले निवडणुकीसंबंधीं इतर सर्व कागदपत्र सर्व लोकांस पाहण्यासाठीं खुले असले पाहिजेत.

३४. निवडणुकीसंबंधीं कागदपत्रांचा नाश करणें—एखाद्या लायक कोर्टानें इतर रीतीनें फर्माविलें नसेल, तर संबंध असलेल्या कलेक्टरानें निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून एक वर्ष संपल्यानंतर निवडणुकीसंबंधीं सर्व कागदपत्रांचा नाश करविला पाहिजे.

## परिशिष्ट १ लें.

मतपत्रकाचा नमुना.

(कानू १८ पहा.)

चा $\frac{\text{जिल्हा}}{\text{तालुका}}$ लोकल बोर्ड.

**मतपत्रक.**

स्थळप्रत | बाहेरची प्रत

अनुक्रम नं. | (पुढील बाजू)

| | उमेदवाराचें नांव. | फुली X | चिन्ह |
|---|---|---|---|
| १. मतदारसंघ. | १ | | |
| २. मतें देण्याच्या जागेचा नं. | २ | | |
| ३. यादींतील मतदाराचा नं. | ३ | | |
| ४. सही अथवा आंगठ्याचा ठसा. | ४ | | |
| | ५ | | |

(बाहेरच्या प्रतीची मागील बाजू)

१. तुम्हांस मतें आहेत.

२. ज्या उमेदवारास [उमेदवारांस] मत देण्याची तुमची इच्छा असेल त्या उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) नांवापुढें (नांवांपुढें) $\frac{\text{फुल्या}}{\text{एक फुली}}$ करा.

३. मतपत्रकावर तुम्ही, $\frac{\text{एकूण फुल्यांपेक्षां}}{\text{एका फुलीपेक्षां}}$ जास्त फुल्या करतां कामा नये.

टीपः—एकापेक्षां जास्त सभासद असलेल्या मतदारसंघाच्या बाबतींत मतपत्रकांत रेषेवरचा मजकूर दाखल करावा.

| अनुक्रम नंबर. |
|---|

## परिशिष्ट २ रें.

देऊं केलेल्या मतांची यादी.

(कानू २४ पहा.)

चा $\frac{\text{जिल्हा}}{\text{तालुका}}$ लोकल बोर्ड.

**मतें देण्याची जागा.**

| मतदारसंघाचें नांव. | मतदाराचें नांव. | मतदारांच्या यादींतील नंबर. | दिलेल्या मतांची संख्या. |
|---|---|---|---|
| | | | |

## परिशिष्ट ३ रें.

### नेमणुकीच्या कागदाचा नमुना.

[ कानू ५ पहा. ]

चा जिल्हा/तालुका लोकल बोर्ड.

ज्या मतदारसंघाकरितां उमेदवाराची नेमणूक करण्यांत आलेली असेल त्या मतदारसंघाचें नांव.

उमेदवाराचें नांव.

बापाचें नांव.

वय.

पत्ता.

जात [ बिनमुसलमान, मुसलमान, इंडियन ख्रिश्चन, युरोपिअन, अथवा ॲंग्लो-इंडियन तें लिहा ].

ज्या मतदारसंघाच्या मतदारांच्या यादींत उमेदवार म्हणून नोंदलेला असेल तो मतदारसंघ.

ज्या मतदारसंघाच्या मतदारांच्या यादींत उमेदवार मतदार म्हणून नोंदलेला असेल त्या मतदाराच्या यादींतील उमेदवाराचा नंबर.

नांव सुचविणाराचें नांव.

नांव सुचविणाराचा मतदारसंघाच्या मतदारांच्या यादींतील नंबर.

नांव सुचविणाराची सही.

अनुमोदन देणाराचें नांव.

मतदारसंघाच्या मतदारांच्या यादींतील अनुमोदन देणाराचा नंबर.

अनुमोदन देणाराची सही.

### उमेदवाराचा इकरार.

जर मी निवडून आलों तर काम करण्याची माझी खुशी मी यावरून जाहीर करतों.

तारीख.

उमेदवाराची सही.

# मुंबईच्या लोकल बोर्ड आक्टाखालीं केलेले कानू.

मुंबई सरकार.

जनरल डिपार्टमेंट.

ठराव नंबर ४४५३.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख १९ माहे आगष्ट सन १९२४

ठरावः—सन १९२३ चा मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट (सन १९२३ चा मुंबईचा ६ वा) यास यांत यापुढें सदरहू आक्ट असें म्हटलें आहे. याच्या ४५ व्या कलमाचें पोटकलम (१), ५० व्या कलमाची (इ) रकम, ७४ व्या कलमाचें पोटकलम (२), ७५ व्या कलमाच्या (ग) व (इ) या रकमा, ७८ व्या कलमाची (ब) रकम, ९३ व्या कलमाच्या [१] ल्या पोटकलमाची [अ] रकम, ९५ वें कलम व १२४ व्या कलमाचें पोटकलम [१] यांवरून मिळालेले अधिकार चालवून मुंबई सरकार पुढीलप्रमाणें हुकूम करीत आहेत, ते येणेंप्रमाणें—

१. खालील कामें सरकारी एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअरानें केलीं पाहिजेत, तीं येणेंप्रमाणें—

[अ] ज्या कामाकरितां सदरहू आक्टाच्या ८९ व्या कलमाच्या [१] ल्या पोटकलमाच्या [ब] रकमेअन्वयें जिल्ह्याच्या सरकारी एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअरानें तयार केलेल्या अगर पसंत केलेल्या प्लॅनची व अंदाजी खर्चाची जरूरी आहे व ज्याचा अंदाज केलेला एकूण खर्च ३०,००० रुपयांपेक्षां जास्त आहे असें प्रत्येक काम आणि

[ब] ज्या कामाचा एकूण अंदाज केलेला खर्च ३०,००० रुपयांपेक्षां जास्त नसेल, परंतु जें काम त्या जिल्ह्याच्या सरकारी एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअरास लेखी नमूद केलेल्या कारणांवरून सदरहू काम आपणा स्वतःकडून केलें जाणें इष्ट वाटेल व जर अशी शिफारस तें जिल्हा लोकल बोर्ड ज्या भागांत असेल त्या भागाच्या कमिशनरानें मंजूर केली असेल तर—सदरीं सांगितल्याप्रमाणेंचें प्रत्येक काम: मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, सदरहू आक्टाच्या ११९ व्या कलमाच्या [२] ऱ्या पोटकलमाअन्वयें सरकारानें पसंत केलेल्या इंजिनिअरास कामावर लावणाऱ्या जिल्हा लोकल बोर्डास या पारिग्राफांतील कोणताहि मजकूर लागू असणार नाहीं.

२. लोकल बोर्डाच्या क्षेत्रांतून पिसाळलेल्या कुत्र्याच्या दंशावरील औषधोपचाराकरितां सरकारनें उघडलेल्या व तशा कारणाकरितां योग्य म्हणून जाहीर केलेल्या अगदीं नजीकच्या संस्थांत येणाऱ्या गरीब इसमांचा प्रवासाचा प्रत्यक्ष खर्च व त्यांच्या जेवणाखाणाचा व औषधोपचाराचा खर्च तारीख १२ माहे सप्टेंबर सन १९२२ चा जनरल डिपार्टमेंटांतील सरकारचा ठराव नंबर ५५२ यांत मंजूर केलेल्या कानूंपैकीं कानू १२ मध्यें सरकारनें ठरविलेल्या दरांनीं व ठरविलेल्या शर्तींवर किंवा वेळोवेळीं ठरविण्यांत येतील अशा इतर दरांनीं लोकल बोर्डानें दिला पाहिजे.

३. लोकलफंड ज्यांत ठेवण्याचा अधिकार आहे अशा पसंत केलेल्या बँका पुढीलप्रमाणें आहेत, त्या येणेंप्रमाणें:—

[१] नॅशनल बँक ऑफ् इंडिया, लिमिटेड.
[२] हाँगकाँग अँड शँघाय बँकिंग कार्पोरेशन.
[३] चार्टर्ड बँक ऑफ् इंडिया, आस्ट्रेलिया अँड चायना.
[४] बँक ऑफ् इंडिया, लिमिटेड.
[५] सेंट्रल बँक ऑफ् इंडिया.
[६] मर्कंटाइल बँक ऑफ् इंडिया, लिमिटेड.
[७] बँक ऑफ् बरोडा, लिमिटेड.

४. सन १९१९ चा विषांबाबत आक्ट [ सन १९१९ चा १२ वा ] याअन्वयें जिल्ह्यांत वसूल केलेल्या फी, दंड व शिक्षा यांपासूनचें खर्च कोणताहि असल्यास तो वजा करून राहिलेलें निवळ उत्पन्न जिल्हा लोकल बोर्डाच्या खातीं जमा टाकलें पाहिजे : मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, म्युनिसिपल व कँटोनमेंट क्षेत्रांत जमा होणाऱ्या उत्पन्नाचे बाबतींत अशा उत्पन्नाचा फक्त दोनतृतीयांशच जिल्हा लोकल बोर्डाच्या खातीं जमा टाकला पाहिजे.

५. सन १८७१ चा गुरांचा अतिक्रमणाबाबत आक्ट [ सन १८७१ चा १ ला ] याअन्वयें म्युनिसिपल किंवा कँटोनमेंट हद्दींच्या बाहेरील क्षेत्रांत जमा होणारे खर्च वजा जातां राहणारें निवळ उत्पन्न लोकल बोर्डाच्या खातीं जमा टाकलें पाहिजे.

६. लोकल बोर्डास उसनवार नोकरी दिलेल्या सरकारी नोकरांचे पगार, भत्ते व पेन्शनाबाबतच्या वर्गण्या यांबाबत पैसा फंडामेंटल रूल्सनां धरून अकाउंटंट जनरल, मुंबई यांजकडून सांगण्यांत येईल त्याप्रमाणें लोकल बोर्डानीं दिला पाहिजे.

७. पुढील बाबींस लोकल फंड सेस देण्याची माफी असेल त्या बाबी येणेंप्रमाणें—

[१] नोटिसांबाबत फी.

[२] सन १८७९ चा मुंबईचा जमीनमहसुलाचा कायदा याच्या १८३व्या कलमाअन्वयेंच्या विक्रीचा खर्च व खोती गांव जप्त करण्यासंबंधींचा खर्च.

[३] जें फॉरेस्टचें उत्पन्न म्हणून समजण्यांत येतें असें, रेव्हिन्यू डिपार्टमेंटाच्या ताब्यांमधील संरक्षित किंवा इतर जाहीर केलेलें फॉरेस्ट यांतून लिलावानें विकलेल्या गवताचें किंवा गुरचरणाचें उत्पन्न.

[४] झाडापासूनचें म्हणजे फळें, वाळलेलें लांकूड, कांटे, पाचोळा, यांपासूनचें किंवा ताडीचीं झाडें धरूनच्या झाडांवरील सरकारच्या हक्काच्या विक्रीपासूनचें आणि तसेंच कायदेशीर रीतीनें बनविलेल्या फॉरेस्टांतून रेव्हिन्यू डिपार्टमेंटानें जेव्हां वसूल केलें असेल तेव्हां तशा प्रकारचें झाडांच्या विक्रीपासूनचें उत्पन्न.

८. सन १८७९ चा मुंबईच्या इरिगेशन आक्ट याच्या ठरावांअन्वयें घ्यावयाच्या पाणीपट्टीच्या दर रुपयामागें एक आणा याप्रमाणें आणखी हुकूम देण्यांत येत तोंपर्यंत घेण्यांत आला पाहिजे.

९. सदरहू आक्टाच्या १२४ व्या कलमाच्या [१] ल्या पोटकलमाच्या कारणांकरितां सरकारच्या खालील अंमलदारांस अधिकार देण्यांत येत आहेत : ते अंमलदार येणेंप्रमाणें—

[१] सगळे सुपरिंटेंडिंग इंजिनिअर.

[२] सॅनिटरी इंजिनिअर टु गव्हर्मेंट.

[३] मुंबई सरकारचे डायरेक्टर ऑफ् पब्लिक हेल्थ, आणि

[४] सर्व एज्युकेशनल इन्स्पेक्टर.

१०. ९३ व्या कलमाच्या १ ल्या पोटकलमाच्या (अ) रकमेअन्वयें लोकल फंडाचा सेस देण्याची माफी असलेल्या बाबी व ९५ व्या कलमाअन्वयें पाणी-पट्टी घेणें हींहि मुंबई सरकारी गॅझेटांत जाहीर केलीं पाहिजेत.

# १३३ कलमाच्या (क) रकमेवरून दिलेल्या अधिकारासंबंधीं कानू.

## मुंबई सरकार.

## जनरल रिपार्टमेंट.

मुक... जंजिरे मुंबई, तारीख २४ माहे जानेवारी सन १९२४.

नंबर ४४५६.—सन १९२३ चा मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट [ सन १९२३ चा मुंबईचा ६ वा] याच्या १३३ व्या कलमाच्या [क] रकमेवरून दिलेले अधिकार चालवून, आणि मागाहून सुधारल्याप्रमाणेंचा तारीख २१ माहे नोव्हेंबर सन १८८४ चा रेव्हिन्यू डिपार्टमेंटांतील सरकारचा जाहिरनामा नंबर ९२४८ व तारीख ७ माहे जानेवारी सन १८८५ चा रेव्हिन्यू डिपार्टमेंटांतील सरकारचा जाहिरनामा नं. ७८, यांच्या, लोकल बोर्डाचा कारभार ज्या रीतीनें चालविला पाहिजे त्या रीतीशीं जेवढ्या भागाचा संबंध येत असेल तेवढा रद्द करून, मुंबई सरकार, लोकल बोर्डाचा कारभार ज्या रीतीनें चालविला पाहिजे त्या रीतीसंबंधानें शर्ती ठरविणाऱ्या पुढील कानू करीत आहे, त्या येणेंप्रमाणें:—

१. लोकल बोर्डांनीं कित्येक अधिकार व कर्तव्यें कमिट्यांकडे सोंपून न देणें.—आक्टाच्या पुढील कलमांत ठरविलेले लोकल बोर्डाचे अधिकार व कर्तव्यें हीं फक्त लोकल बोर्डांनींच चालविलीं व केलीं पाहिजेत व तीं, त्यांनीं सदरहू आक्टाअन्वयें त्यांनीं नेमिलेल्या कोणत्याहि कमिटीकडे सोंपून देतां कामा नयेतः—

कलमें ३७, ३८, ४४, ४६, ४७, ५९, ६२, ७६, ८६, ८८ [१], ९३, ९४, ९९, १००, १०२, १०३, ११९, १२० व १२३.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, जिल्हा लोकल बोर्डाच्या स्टांडिंग कमिट्यांस, बजेट एस्टिमेंटांतील फंडाच्या पुनर्योजना पसंत करण्याचा व मंजूर करण्याचा, सदरहू आक्टाच्या ३५ व्या कलमाअन्वयें या बाबतींत जिल्हा लोकल बोर्डानें केलेल्या कोणत्याहि नियमास पात्र राहून, अधिकार आहे.

२. लोकल बोर्डांनीं किंवा त्यांशीं चालवावयाचा पत्रव्यवहार.—लोकल बोर्डांनीं अथवा लोकल बोर्डाशीं पत्रव्यवहार करणें तो त्यांच्या त्यांच्या अध्यक्षांच्या मार्फत, अथवा जर कोणत्याहि लोकल बोर्डानें चीफ ऑफिसर किंवा सेक्रेटरी नेमलेला असेल तर अशा चीफ ऑफिसराच्या किंवा सेक्रेटरीच्या मार्फत केला पाहिजेः मात्र इतकेंच कीं, लोकल बोर्ड व कमिशनर किंवा सरकार यांच्या

दरम्यानचा पत्रव्यवहार, जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष व जिल्ह्याचा कलेक्टर यांच्या मार्फत झाला पाहिजे व असा पत्रव्यवहार हमेष इंग्रजींत असला पाहिजे.

३. लोकल बोर्डानीं किंवा त्यांच्या विरुद्ध करावयाचे दावे.—कोणत्याहि तालुका लोकल बोर्डानें, तो ज्या जिल्हा लोकल बोर्डाच्या ताब्यांत असेल त्या जिल्हा लोकल बोर्डाच्या आगाऊ मंजुरीशिवाय कोणत्याहि दिवाणी कोर्टांत दावा किंवा इतर चालवावयाचें काम दाखल करतां कामा नये किंवा त्यांत उत्तरपक्ष करतां कामा नये.

जिल्हा लोकल बोर्डाच्या साधारण सभेंत पास झालेल्या त्याच्या ठरावाच्या अधिकाराअन्वयें असेल तें खेरीज करून, जिल्हा लोकल बोर्डानें अशी कोणतीहि मंजुरी देतां कामा नये व ज्यांत जिल्हा लोकल बोर्डाचाच खुद्द संबंध येत असेल असा दिवाणी कोर्टांतील कोणताहि दावा किंवा चालवावयाचें काम दाखल करतां कामा नये किंवा त्यांत उत्तरपक्ष करतां कामा नये: मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, जिल्हा लोकल बोर्डाच्या स्टांडिंग कमिटीस, सदरहू आक्टाच्या ३५ [ १ ] कलमाअन्वयें जिल्हा लोकल बोर्डानें केलेल्या कोणत्याहि नियमास पात्र राहून, सदरीं सांगितल्या प्रकारचे कोणतेहि दावे किंवा इतर चालवावयाचीं कामें, हीं दाखल करण्यास किंवा त्यांत उत्तरपक्ष करण्यास मंजुरी देण्याचा अधिकार चालविण्याचा अख्त्यार आहे.

४. करार करण्यापूर्वी जाहीर रीतीनें टेंडरें मागविणें.—[ १ ] ज्यास खर्च रु. २५०० हून अधिक येईल असा अंदाज असेल असें सामान पुरविण्याविषयीं अथवा एखादें काम बांधण्याविषयीं लोकल बोर्डानें कोणताहि करार करण्यापूर्वी, स्थानिक वर्तमानपत्रें, कोणतींहि असल्यास, अशा एका अगर अधिक वर्तमानपत्रामध्यें आणि बोर्डास योग्य वाटेल त्या इतर रीतीनें जाहिरात देऊन असा करार करण्याला तयार असलेल्या लोकांकडून जाहिर रीतीनें टेंडरें मागविलीं पाहिजेत.

[ २ ] सर्वांत कमी किंवा कोणतेंहि टेंडर स्वीकारण्याविषयीं लोकल बोर्डानें स्वतःला बांधून घेऊं नये आणि तो बांधलेला नाहीं, परंतु बहुशः असें आहे कीं, भरंवशाच्या मनुष्याकडून आलेलें जें सर्वांत कमीचें टेंडर तें स्वीकारलें पाहिजे.

# १३३ कलमाच्या ( ड ) रकमेअन्वयें दिलेल्या अधिकारासंबंधीं कानू.

## मुंबई सरकार.

### जनरल डिपार्टमेंट

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख १६ माहे जानेवारी सन १९२४

नंबर ४४५७.—सन १९२३ चा मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट [ सन १९२३ चा मुंबईचा ६ वा ] याचें कलम १३३, याच्या [ ड ] रकमेअन्वयें दिलेले अधिकार चालवून मुंबई सरकार, तारीख ७ माहे जानेवारी सन १८८५ चा रेव्हिन्यू डिपार्टमेंटांतील सरकारचा जाहिरनामा नंबर ७८ यांत कायम केलेल्या कानू खालीलप्रमाणें आणखी सुधारीत आहे, म्हणजे:—

सदरहू कानूंपैकीं कानू ६० अ हिच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

६० अ [ १ ] [ अ ] प्रवासाचा भत्ता.—लोकल बोर्डाच्या अमलदारांनीं व मेंबरांनीं लोकल बोर्डाच्या सभांस किंवा स्टांडिंग कमिटी, पब्लिक हेल्थ कमिटी किंवा सदरहू आक्टाच्या ३८ व्या कलमाअन्वयें नेमलेली डिस्पेन्सरी कमिटी धरून, इतर कोणतीहि कमिटी यांच्या सभांस हजर राहण्यासाठीं, किंवा तपासणीसाठीं त्यांजकडे दिलेलीं कामें अगर शाळा तपासण्यासाठीं केलेल्या प्रवासाकरितां, आणि सामान्यतः अशा अमलदारांनीं किंवा मेंबरांनीं अध्यक्षाच्या हुकुमाअन्वयें, खरोखर बोर्डाच्या हितासाठीं किंवा सन १९२० चा गांवपंचायतींबाबत आक्ट याअन्वयें करावयाचीं कामें करण्यासाठीं केलेल्या इतर प्रवासाकरितां भत्ता खालील ठरावांस पात्र राहून, सिव्हिल सर्व्हिस रेग्युलेशन्स किंवा त्याअन्वयें केलेल्या पुरवणी कानू यांबरहुकूम, देतां येण्यासारखा आहे.

[ ब ] अध्यक्षांस, आपआपल्या जिल्ह्यांत किंवा तालुक्यांत, कोणत्याहि कामाची पाहाणी करण्यासाठीं, तें त्यांजकडे विशेष रीतीनें लावून दिलेलें नसलें तरी, प्रवास करण्याकरितां प्रवासाचा भत्ता मिळण्याची परवानगी असेल.

(२) अमलदार व मेंबर यांचें खालीलप्रमाणें वर्गीकरण केलें पाहिजे:—

जिल्हा लोकल बोर्डाचा अध्यक्ष; जिल्हा लोकल बोर्डाचा उपाध्यक्ष, जेव्हां तो अध्यक्षाच्या बद्दल काम करीत असेल तेव्हां ... ... ... १ ला वर्ग.

जिल्हा लोकल बोर्डाचा मेंबर; तालुका लोकल बोर्डाचा अध्यक्ष व उपाध्यक्ष; तालुका लोकल बोर्डाच्या कोणत्याहि कमिटीचा चेअरमन ... ... २ रा वर्ग.

तालुका लोकल बोर्डाचा मेंबर ... ... ३ रा वर्ग दरमहा रु. ८५ च्या हेड कारकुनाच्या दर्जाचा.

( ३ ) एकाद्या अमलदाराचें किंवा मेंबराचें नेहमींचें राहण्याचें ठिकाण हें त्याची हेड क्वार्टरची जागा आहे असें समजावें.

(४) (अ) कोणत्याहि विवक्षित बोर्डासंबंधानें सरकारच्या विशेष हुकुमांस पात्र राहून खालीं लिहिलेल्या अमलदारांस कोणत्याहि नगदी सालांत द्यावयाच्या प्रवासाच्या भत्त्याची कमाल रकम खालीलप्रमाणें असली पाहिजेः—

| | |
|---|---|
| तालुका लोकल बोर्डाचा अध्यक्ष ... ... | ३०० रुपये |
| जिल्हा लोकल बोर्डाच्या किंवा तालुका लोकल बोर्डाच्या कोणत्याहि कमिटीचा चेअरमन ... ... | ३०० |
| अध्यक्ष नसलेला किंवा वरीलपैकीं कोणताहि हुद्दा धारण करीत नसलेला जिल्हा लोकल बोर्डाचा मेंबर ... ... | २०० |
| वरीलपैकीं कोणताहि हुद्दा धारण करीत नसलेला तालुका लोकल बोर्डाचा मेंबर ... ... ... | १५० |

[ब] दरेक जिल्हा लोकल बोर्डानें दर वर्षी विशेष ठराव करून त्या सालांत अध्यक्षास द्यावयाच्या प्रवासाच्या भत्त्याची कमाल रकम कायम केली पाहिजे.

[क] जर एकादा मेंबर तालुका लोकल बोर्डात एक व जिल्हा लोकल बोर्डात दुसरी अशा हुद्यांच्या दोन जागा धारण करीत असेल तर त्याला वर्षांत द्यावयाच्या प्रवासाच्या भत्त्याची रकम ज्या हुद्याला जास्त भत्ता देतां येण्यासारखा असेल त्या हुद्याच्या रकमेइतकी असावी.

[ड] प्रवासाच्या भत्त्यासंबंधानें सामान्यतः सरकारी नोकरांवर घातलेले सर्व निर्बंध व त्यांस दिलेल्या सवलती लोकल बोर्डांच्या अमलदारांच्या व मेंबरांच्या बाबतींत लागू असतील.

[५] जिल्हा लोकल बोर्डाचा अध्यक्ष हा नियामक अमलदार असला पाहिजे व त्यानें, सरकारनें वेळोवेळीं काढलेल्या हुकुमांसंबंधानें अशा अमलदाराचे अधिकार चालविले पाहिजेत.

[६] सिव्हिल सर्व्हिस रेग्युलेशनच्या १०६३ [ २ ] पारिग्राफाच्या कारणांसाठीं दुसऱ्या वर्गातील अमलदारास किंवा मेंबरास दर दिवशीं रु. ३ भत्ता मिळण्याचा हक्क आहे असें समजावें.

[७] ह्या कानूच्या कारणांसाठीं लोकल बोर्डांच्या अमलदारांस व मेंबरांस नॉन-मिनिस्टेरियल अमलदार असें समजावें.

# १३३ कलमाच्या (ग) रकमेअन्वयें दिलेल्या अधिकारासंबंधीं कानू.

मुंबई सरकार.

जनरल डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २३ माहे जानेवारी सन १९२४.

नंबर ४४६०.—सन १९२३ चा मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट [सन १९२३ चा मुंबईचा ६ वा] याच्या १३३ व्या कलमाच्या [ग] रकमेअन्वयें दिलेले अधिकार चालवून, आणि रेव्हिन्यू डिपार्टमेंटांतील सरकारचे जाहिरनामे नंबर ९२४८, तारीख २१ माहे नोव्हेंबर सन १८८४ व नंबर ७८, तारीख ७ माहे जून सन १८८५ यांच्या, लोकल बोर्डांच्या अमलदारांच्या व नोकरांच्या नेमणुकी, त्यांवर निर्बंध, त्यांस शिक्षा व त्यांची बरतर्फी यांच्याशीं जेवढ्या भागाचा संबंध येत असेल तेवढा भाग रद्द करून, मुंबई सरकार, लोकल बोर्डांच्या अमलदारांच्या व नोकरांच्या नेमणुकी, त्यांवर निर्बंध, त्यांस शिक्षा व त्यांची बडतर्फी, आणि लोकल बोर्डांनीं कामावर लावलेल्या सरकारी अमलदारांचीं पेनशनें व लीव्ह अलावन्सेस यांसाठीं द्यावयाच्या वर्गण्यांची मर्यादा, यांचें नियमन करणाऱ्या खालील कानू करीत आहे, त्या येणेंप्रमाणें:—

१. ज्या पगाराच्या मर्यादेपर्यंतच्या अमलदारांची व नोकरांची नेमणूक करणें, त्यांस शिक्षा करणें वगैरेचा अधिकार सोंपवून देण्याचा अधिकार आहे त्या पगाराची मर्यादा.—ज्या पगाराच्या मर्यादांपर्यंत अमलदारास व नोकरांस नेमण्याचा, शिक्षा करण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा अधिकार जिल्हा लोकल बोर्डास सदरहू आक्टाच्या १२० व्या कलमांतील ठरावाअन्वयें व १२२ व्या कलमाच्या विशेष ठरावाअन्वयें, त्याच्या अध्यक्षाकडे व त्याच्या हाताखालील तालुका लोकल बोर्डाच्या अध्यक्षाकडे सोंपवून देण्याचा अखत्यार आहे, त्या पगाराच्या मर्यादा अनुक्रमें रुपये शंभर व रुपये वीस असल्या पाहिजेत.

२. अपील.—सदरहू आक्टाच्या १२२ व्या कलमाच्या विशेष ठरावाअन्वयें सोंपवून दिलेल्या अधिकारांवरून जिल्हा अगर तालुका लोकल बोर्डाच्या अध्यक्षानें केलेले हुकूम, दरेक बाबतींत जिल्हा लोकल बोर्डाकडे अपील करण्याच्या हक्कास पात्र असतील.

३. बडतर्फीपूर्वी अमलदारांचें किंवा नोकरांचें म्हणणें ऐकून घेणें.—लोकल बोर्डाच्या कोणत्याहि अमलदारास अगर नोकरास, त्यास आपला जाब देण्यासाठीं आपलें म्हणणें ऐकून घेतलें जाण्याची वाजवी संधि दिल्याखेरीज

बडतर्फ करतां कामा नये. अशा अमलदारानें अगर नोकरानें दिलेला लेखी जाब दप्तरीं दाखल केला पाहिजे व त्यासंबंधानें लेखी हुकूम काढला पाहिजे.

४. बडतर्फीचा हुकूम.—बडतर्फीचा अगर बडतर्फी कायम करणारा दरेक हुकूम लेखी असला पाहिजे, व त्यांत, आणलेला किंवा आणलेले आरोप, जाब, आणि हुकुमाबद्दलचीं कारणें निर्दिष्ट केलीं पाहिजेत.

५. लोकल बोर्डांनीं कामावर लावलेल्या सरकारी नोकरांचें पेनशन व लीव्ह अलावन्स.—लोकल बोर्डांनीं कामावर लावलेल्या सरकारी नोकरांचें पेनशन व लीव्ह अलावन्स, फॉरिन सर्व्हिसकडे केलेल्या बदल्यांच्या बाबतींत, सरकार वेळोवेळीं जें स्केल ठरवील त्यास अनुसरून असेल आणि अशा अलावन्सांची नक्की रकम सरकारानें, दरेक बाबतींत, लोकल बोर्डाकडे एकाद्या अमलदाराच्या बदलीस मंजुरी देण्याचा हुकूम करतेवेळीं संबंध असलेल्या जिल्हा लोकल बोर्डास कळविली पाहिजे.

---

सरकारी ठ. नं. ४४५४, १८ आगष्ट, ३० सप्टेंबर १९२४, ३ जानेवारी, १० फेब्रुवारी, २० मार्च १९२५ ला उत्तरभाग, दक्षिणभाग, मध्यभाग, मुंबईच्या आसपासचीं खेडीं व सिंध ह्या भागांतील लोकल बोर्डांच्या मतदारसंघाची संख्या व व्याप्ति आणि त्यांची रचना हीं ठरविण्याकरतां मुंबई लोकल बोर्डांच्या १३३ (अ) कलमाखालीं केलेल्या

## कानूचा सारांश.

जिल्हा लोकल बोर्डांच्या निवडणुकीः—जिल्हा लोकल बोर्डांच्या निवडणुकीच्या कारणासाठीं, जिल्ह्यांतील प्रत्येक तालुका हा एक स्वतंत्र सामान्य मतदार संघ असेल, आणि सबंध जिल्हा हा एक मुसलमान मतदार संघ असेल.

अपवाद १ ला—उत्तर भागांत भडोच जिल्हा लोकल बोर्डाच्या बाबतींत दोन मुसलमान मतदार संघ असतील. सुरत जिल्हा लोकल बोर्डांच्या बाबतींत दोन मुसलमान मतदार संघ असतील.

अपवाद २ राः—दक्षिण भागांत बेळगांव, विजापूर आणि रत्नागिरी या जिल्ह्यांत प्रत्येक तालुक्याला एक मुसलमान मतदार संघ असेल; व धारवाड जिल्ह्यांत असे चार मुसलमान मतदार संघ असतील.

अपवाद ३ रा—सिंधमध्यें या कानूंना जोडलेल्या नं. १ च्या परिशिष्टांत दाखविल्याप्रमाणें, सबंध तालुक्याचा किंवा तालुक्याच्या भागाचा किंवा तालुक्यांचे गटाचा मुसलमान मतदार संघ बनविण्यांत येईल.

२—तालुका लोकल बोर्डांच्या निवडणुकी.—तालुका लोकल बोर्डांच्या निवडणुकींच्या कारणांसाठीं ह्या कानूंस जोडलेल्या १ ल्या परिशिष्टांत दर्शविल्याप्रमाणें व सिंध प्रांताचे बाबतींत २ च्या परिशिष्टांत दर्शविल्याप्रमाणें प्रत्येक तालुका अथवा महाल यांचे गांवांच्या गटांत विभाग केलेले असतील, आणि अशा गटांनीं बनविलेल्या प्रत्येक तालुका लोकल बोर्डाच्या सामान्य मतदारसंघाची संख्या व व्याप्ति, ह्या कानूंस जोडलेल्या २ च्या परिशिष्टांत सांगितल्याप्रमाणें असेल (सिंध प्रांताचे बाबतींत ३ च्या परिशिष्टांत सांगितल्याप्रमाणें) आणि प्रत्येक तालुका अथवा महाल हा एक मुसलमान मतदारसंघ होईल.

अपवाद १ ला.—मध्यभागांत एकमेकांशेजारीं असलेल्या तालुक्यांतील खेड्यांचा एक मुसलमान मतदारसंघ बनविला असेल.

अपवाद २ रा.—सिंध प्रांताचे बाबतींत प्रत्येक तालुका लोकल बोर्डाच्या सामान्य व मुसलमान मतदारसंघाची संख्या व व्याप्ति २ च्या परिशिष्टांत दर्शविली आहे.

३—लोकल बोर्डांची रचना.—प्रत्येक जिल्ह्यांतील जिल्हा व तालुका लोकल बोर्डांची रचना, प्रत्येक लोकल बोर्डाच्या मेंबरांची संख्या, प्रत्येक लोकल बोर्डासाठीं निवडलेले मेंबर किती व नेमलेले मेंबर किती याचें प्रमाण, आणि प्रत्येक मतदारसंघानें निवडावयाच्या मेंबरांची संख्या, हीं प्रत्येक भागाच्या कमिशनरानें प्रत्येक लोकल बोर्डाचे बाबतींत जाहीर करावयाच्या तारखेपासून, ह्या कानूंस जोडलेल्या ३ च्या परिशिष्टांत सांगितल्याप्रमाणें असतील.

ह्या नियमांना अनुसरून सर्व बोर्डांची रचना खालीं दर्शविल्याप्रमाणें असेल.

## जिल्हा लोकल बोर्ड.

| मुलकी विभाग | बोर्डांची संख्या | मतदार संघ | | | उमेदवार निवडलेले | | | लोकनियुक्त | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण | मुसलमान | एकूण | सर्वसाधारण | मुसलमान | एकूण | | |
| सिंध .... | ७ | ३५ | १५३ | १८८ | ३४ | १२. | १६२ | ५४ | २१६ |
| उत्तरभाग .... | ६ | ४७ | ८ | ५.५ | १२४ | १२ | १३६ | ४३ | १७९ |
| मध्यभाग ... | ७ | ६६ | ७ | ७३ | १५६ | १८ | १७४ | ५४ | २२८ |
| दक्षिणभाग .... | ६ | ५२ | १२ | ६४ | १०७ | १२ | ११९ | ३१ | १५० |
| मुंबई सबर्बन भाग .... | १ | २ | १ | ३ | ८ | १ | ९ | ३ | १२ |
| एकूण .... | २७ | २०२ | १८१ | ३८३ | ४२९ | १७१ | ६०० | १८९ | ७८५ |

## तालुका लोकल बोर्ड.

| मुलकी विभाग | | बोर्डांची संख्या | मतदारसंघ | | | उमेदवार निवडलेले | | | लोकनियुक्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्वसाधारण | मुसलमान | एकूण | सर्वसाधारण | मुसलमान | एकूण | | |
| सिंध | .... | ५९ | १४५ | ५८० | ७२५ | १६२ | ५४६ | ७०८ | २३६ | ९४४ |
| उत्तरभाग | .... | ४२ | १४८ | ४१ | १८९ | ४६९ | ४८ | ५१७ | १६७ | ६८४ |
| मध्यभाग | .... | ६६ | ४११ | ६६ | ४७७ | ७३६ | ७९ | ८१५ | २४७ | १०६२ |
| दक्षिणभाग | .... | ५२ | ३०७ | ५२ | ३५९ | ६२४ | ७२ | ६९६ | १५८ | ८५४ |
| मुंबई सबर्बन भाग | .... | २ | ७ | २ | ९ | १० | २ | १२ | ४ | १६ |
| एकूण | .... | २२१ | १०१८ | ७४१ | १७५९ | २००१ | ७४७ | २७४८ | ८१२ | ३५६० |
| एकूण बेरीज | .... | २४८ | १२२० | ९२२ | २१४२ | २४३० | ९१८ | ३३४८ | ९९७ | ४३४५ |

## कानू १३३ (इ)

( सदरहू कानू शेवटीं प्राथमिक शिक्षणाबाबत आक्ट जोडला आहे त्याच्या खालीं प्राथमिक शिक्षणाचे नियम केलेले छापले आहेत ते पाहावे. )

---

## कानू १३३ (फ)

हे कानू फारसे उपयोगाचे नाहींत; सबब ते छापले नाहींत. )

---

## कानू १३३ (ग)

### जनरल डिपार्टमेंट.

### मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २३ माहे जानेवारी सन १९२४.

नंबर ४४६०—सन १९२३ चा मुंबईचा लोकलबोर्ड आक्ट(सन १९२३ चा मुंबईचा ६ वा ) याच्या १३३ व्या कलमाच्या ( ग ) रकमेअन्वयें दिलेले अधिकार चालवून, आणि रेव्हिन्यू डिपार्टमेंटांतील सरकारचे जाहिरनामे नंबर ९२४८, तारीख २१ माहे नोव्हेंबर सन १८८४ व नंबर ७८, तारीख ७ माहे जून सन १८८५ यांच्या, लोकलबोर्डांच्या अम्मलदारांच्या व नोकरांच्या नेमणुकी, त्यांवर निर्बंध, त्यांस शिक्षा व त्यांची बडतर्फी यांच्याशीं जेवढ्या भागाचा संबंध येत असेल तेवढा भाग रद्द करून, मुंबई सरकार, लोकलबोर्डांच्या अम्मलदारांच्या व नोकरांच्या नेमणुकी, त्यांवर निर्बंध, त्यांस शिक्षा व त्यांची बडतर्फी, आणि लोकलबोर्डांनीं कामावर लावलेल्या सरकारी अम्मलदारांचीं पेनशनें व लीव्ह अलावन्सेस यांसाठीं द्यावयाच्या वर्गण्यांची मर्यादा, यांचें नियमन करणाऱ्या खालील कानू करीत आहे, त्या येणेंप्रमाणें:—

१. ज्या पगाराच्या मर्यादेपर्यंतच्या अम्मलदारांची व नोकरांची नेमणूक करणें,त्यांस शिक्षा करणें वगैरेचा अधिकार सोंपून देण्याचा अधिकार आहे त्या पगाराची मर्यादाः—ज्या पगाराच्या मर्यादेपर्यंत अम्मलदारांस व नोकरांस नेमण्याचा, शिक्षा करण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा अधिकार जिल्हा लोकलबोर्डास सदरहू आक्टाच्या १२० व्या कलमांतील ठरावांअन्वयें व १२२ व्या कलमाच्या विशेष ठरावांअन्वयें, त्याच्या अध्यक्षाकडे व त्याच्या हाताखालील तालुका लोकलबोर्डांच्या

अध्यक्षाकडे सोंपून देण्याचा अखत्यार आहे, त्या पगाराच्या मर्यादा अनुक्रमें रुपये शंभर व रुपये वीस असल्या पाहिजेत.

२. अपील.—सदहू आक्टाच्या १२२ व्या कलमाच्या विशेष ठरावा-अन्वयें सोंपून दिलेल्या अधिकारांवरून जिल्हा अगर तालुका लोकलबोर्डाच्या अध्यक्षानें केलेले हुकूम, दरएक बाबतींत जिल्हा लोकलबोर्डाकडे अपील करण्याच्या हक्कास पात्र असतील.

३. बडतर्फीपूर्वी अम्मलदारांचें किंवा नोकरांचें म्हणणें ऐकून घेणें.—लोकलबोर्डाच्या कोणत्याही अम्मलदारास अगर नोकरास, त्यास आपला जाब देण्यासाठीं आपलें म्हणणें ऐकून घेतलें जाण्याची वाजवी संधि दिल्याखेरीज बड-तर्फ करतां कामा नये. अशा अम्मलदारानें अगर नोकरानें दिलेला लेखी जाब दप्तरीं दाखल केला पाहिजे व त्यासंबधानें लेखी हुकूम काढला पाहिजे.

४. बडतर्फीचा हुकूम.—बडतर्फीचा अगर बडतर्फी कायम करणारा दरएक हुकूम लेखी असला पाहिजे, व त्यांत आणलेला किंवा आणलेले आरोप, जाब आणि हुकुमाबद्दलचीं कारणें निर्दिष्ट केलीं पाहिजेत.

" ४ अ—सदहू आक्टाच्या ११९ ( २ ) कलमाअन्वयें नेमलेला कोण-ताही चीफ ऑफिसर, इंजिनिअर किंवा हेल्थ ऑफिसर यांस, लोकलबोर्डाच्या मेंबरांच्या सबंध संख्येच्या तीन चतुर्थांश मतांनीं व कमिशनराच्या आगाऊ मंजुरीनें असेल तें खेरीज करून, सस्पेंड करतां कामा नये, बडतर्फ करतां कामा नये, किंवा शिक्षा करतां कामा नये. " ( ज. डि. स. ठ. नं. ४४६० ता. १८–८–१९२४. )

५. लोकलबोर्डानीं कामावर लावलेल्या सरकारी नोकरांचें पेनशन व लीव्ह अलॉवन्स.—लोकलबोर्डानीं कामावर लावलेल्या सरकारी नोकरांचें पेन्शन व लीव्ह अलावन्स, फॉरिन सर्व्हिसकडे केलेल्या बदल्यांच्या बाबतींत, सरकार वेळोवेळीं जें स्केल ठरवील त्यास अनुसरून असेल आणि अशा अलावन्सांचा नक्की रकम सरकारनें, दरएक बाबतींत, लोकलबोर्डाकडे एकाद्या अम्मलदाराच्या बदलीस मंजुरी देण्याचा हुकूम करतेवेळीं संबंध असलेल्या जिल्हा लोकलबोर्डास कळविली पाहिजे.

# कानू १३३ (ह)

## जनरल डिपार्टमेंट.

### मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख ६ माहे मे सन १९२५.

नंबर ५००१.—सन १९२३ च्या मुंबईच्या लोकलबोर्ड आक्टाच्या १३३ व्या कलमाच्या रकम (ह) अन्वयें दिलेले अधिकार चालवून व रेव्हिन्यू डिपार्टमेंटांतील सरकारी जाहिरनामे नंबर ९२४८, तारीख २१ माहे नोव्हेंबर सन १८८४, आणि नंबर ७८, तारीख ७ माहे जानेवारी सन १८८५, यांच्या यानंतर सुधारलेल्या स्वरूपांतील जेवढ्या भागांत लोकलबोर्डांच्या सामान्य कारभाराविषयीं किरकोळ गोष्टींचा संबंध येईल तेवढा भाग रद्द करून मुंबई सरकार, सदरहू आक्टाच्या कारभाराबाबतच्या, आणि सदरहू आक्टांत विशेषतः ठराव न केलेल्या अशा सर्व गोष्टींत लोकलबोर्डास व सरकारी अमलदारांस सामान्यतः मार्गदर्शक होण्याकरितां पुढील कानू करीत आहे; त्या अशाः—

१. चालू असलेल्या कामांची तपासणी.—सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरकडून लोकलबोर्डाकरितां जें काम केलें जात असेल अशा कामाच्या बाबतींत लोकलबोर्डाच्या एकाद्या सभासदाच्या रिपोर्टवरून स्टँडिंग कमिटीला जी एकादी तक्रार करावयाची, अभिप्राय द्यावयाचा किंवा जी एकादी सूचना करण्याची इच्छा असेल, ती कमिटीच्या चेअरमननें सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरला, विलंब न लावितां कळविली पाहिजे व सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरनें कमिटीची शिफारस अमलांत न आणण्यास सबळ कारण नसल्यास शक्त्यनुसार ती अमलांत आणिली पाहिजे, व असें कारण असल्यास तें सदरहू स्टँडिंग कमिटीच्या चेअरमनास कळविलें पाहिजे.

२. जिल्हा लोकल-बोर्डांमध्यें परस्पर पत्रव्यवहार वारंवार चालविणें.—प्रत्येक जिल्हा लोकलबोर्डानें आजूबाजूच्या जिल्ह्यांच्या जिल्हा-लोकल-बोर्डांशीं, सदरहू बोर्डांच्या अमलाखालीं निरनिराळ्या क्षेत्रांच्या सामान्य फायद्याचीं कामें, लोकोपयोगी खातीं व संस्था हीं एकवटपणानें व एकोप्यानें चालवितां यावीं या उद्देशानें, वारंवार पत्रव्यवहार ठेविला पाहिजे.

३. सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरनें करावयाच्या कामांचे मंजूर झालेले नकाशे व अंदाज हे त्यास पुरविणें.—सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरनें करावयाच्या कामांचे मंजूर झालेले नकाशे व अंदाज हे, ज्या लोकलबोर्डाकरितां अशीं कामें करावयाचीं आहेत, त्या लोकलबोर्डाच्या अध्यक्षानें सदरहू अमल-

दारास त्याच्या माहितीकरितां व त्याच्या कचेरींत नोंद ठेवण्याकरितां पाठविले पाहिजेत.

४. खर्च करण्यापूर्वी बजेटांत त्याबद्दल तजवीज करण्याची आवश्यकता:- एकाद्या कामाच्या अगर लोकोपयोगी खात्याच्या खर्चाचा अंदाज पसंत करणें व तें काम अगर लोकोपयोगी खातें उभारण्यासाठीं अगर चालूं ठेवण्यासाठीं रकमेची तजवीज करणें या दोन्ही गोष्टी एकमेकांपासून अगदीं भिन्न आहेत. नुसता अंदाज पसंत केल्यानें एकाद्या कामासाठीं अगर लोकोपयोगी खात्यासाठीं रकम खर्च करण्याचा अधिकार प्राप्त होत नाहीं. खर्चाच्या अंदाजाची पसंती व बजेटच्या अंदाजांत त्याबद्दल रकमेची तजवीज या दोन्ही गोष्टी एकादें काम अगर लोकोपयोगी खातें सुरू करण्यापूर्वी जरूर आहेत. या कानूस फक्त एकच ग्राह्य अपवाद म्हटला म्हणजे आक्टाच्या ९० व्या कलमांत सांगितलेली जरूरीच्या प्रसंगाची बाबत ही होय.

५. कांहीं नकाशे व अंदाज सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरनें आपण पसंत करण्यापूर्वी अगर ते पुरविण्यापूर्वी सुपरिंटेंडिंग इंजिनियराकडे पसंतीकरितां सादर करणें.—सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरनें, आक्टाच्या ४५ (१) कलमाअन्वयें त्या वेळीं अमलांत असलेल्या सरकारी हुकुमांअन्वयें आपणांस जें काम करावें लागेल त्या कामाचा नकाशा व अंदाज आक्टाच्या ८९ (१) (ब) कलमाअन्वयें पसंत करण्यापूर्वी आणि अशा कोणत्याहि कामाचा तयार केलेला नकाशा व अंदाज लोकलबोर्डास देण्यापूर्वी इंपीरियल आणि प्रॉव्हिन्शिअल कामांच्या बाबतींतील सरकारच्या हुकुमांअन्वयें सदरहू अमलदारानें चालवीत असलेल्या मंजुरीच्या अधिकाराच्या बाहेर त्यांत अंदाज केलेल्या कामाचा एकूण खर्च जात असल्यास, ज्या सुपरिंटेंडिंग इंजिनियराच्या हाताखालीं तो असेल त्याची पसंती त्यास मिळवावी.

६. सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियर सरकारी पब्लिक वर्क्स खात्याच्या अधिकाऱ्यांच्या हाताखालीं असावा व त्यानें लोकलबोर्डाचीं कामें करण्यामध्यें त्या खात्याचे नियम पाळावे:—सरकारी एक्झिक्युटिव इंजिनीयर, आक्टाखालीं अगर या कानूखालीं जीं त्याचीं कामें तीं करण्याबाबतच्या सर्व गोष्टींमध्यें, सरकारी पब्लिक वर्क्स खात्याचा अमलदार या नात्यानें तो ज्या अधिकाऱ्यांच्या हाताखालीं असेल त्याच अधिकाऱ्यांच्या हाताखालीं आहे असें समजावें आणि कोणत्याही लोकलबोर्डासाठीं त्यानें जीं कामें करावयाचीं त्याबद्दल मक्ते ( कॉंट्रॅक्ट ) देण्याच्या कामीं व इतर सर्व तपशिलाच्या गोष्टींमध्यें, सरकारसाठीं करावयाच्या कामांला

जे नियम व ज्या रीती लागू असतील तेच नियम व त्या रीती, आक्टाच्या अगर या कानूंच्या उलट नसतील तेवढ्यापुरतें, यांबरहुकूम त्यानें चाललें पाहिजे.

७. सरकारी एक्झिक्युटिव इंजिनीयरनें कोणतीं कामें त्यानें करावयाचीं त्याबद्दल त्याला कळवावयाचें; वः—कोणत्याही लोकलबोर्डाचें बजेट अखेर पसंत अगर मंजूर झाल्याबरोबर बोर्डाच्या अध्यक्षानें ( अगर उपाध्यक्षानें ) बजेटचा अंदाज ज्या वर्षाबद्दल असेल त्या वर्षांत कोणतीं कामें सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरनें करावयाचीं हें त्याला कळविलें पाहिजे, आणि कानू ३ प्रमाणें पाठवावे लागणारे सदरहू कामांचे मंजूर केलेले नकाशे व अंदाज सदरहू अमलदाराकडे पाठविले पाहिजेत.

त्यानें लोकलबोर्डांना विचारून तीं करण्याची वेळ वगैरेबद्दल व्यवस्था करावी.—सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरनें लोकलबोर्डाला लिहून असें प्रत्येक काम केव्हां सुरू करावयाचें व तें किती झपाट्यानें चालवावयाचें तें ठरविलें पाहिजे.

८. सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरला लोकलबोर्डाच्या संमतीवांचून नकाशांत व अंदाजांत फेरफार करण्याचा अख्त्यार नाहींः—सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियरनें एकाद्या लोकलबोर्डाकरितां जें कोणतेंहि काम करीत असेल त्या कामाच्या नकाशांत अगर अंदाजांत जास्त खर्च लावण्यासारखा कोणताच फेरफार बोर्डाची पूर्वी संमति असल्यावांचून करतां कामा नये; मात्र इतकेंच कीं, खर्च शेंकडा पांच टक्क्यांपेक्षां जास्त होत नसेल तर बोर्डाची आगाऊ संमति घेण्याची जरूरी नाहीं:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, बाजारभाव वाढल्याच्या योगानें अंदाजांत असलेले दर सुधारणें जरूर होईल तर, सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियर सदरील अंदाजाप्रमाणें वागण्याविषयीं बांधलेला नाहीं; पण त्याला योग्य वाटल्यास, त्याला लोकलबोर्डाच्या पसंतीसाठीं सुधारलेला अंदाज पाठवून लागणारी जास्त रकम देण्याबद्दल बोर्डास विचारण्याचा अख्त्यार आहे.

९. सरकारी एक्झिक्युटिव इंजिनीयरनें प्रत्येक लोकलबोर्डाला वार्षिक रिपोर्ट पाठवावा.—सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियर ज्या लोकलबोर्डासाठीं कोणतेंही काम करीत असेल अशा प्रत्येक लोकलबोर्डाला त्यानें झालेल्या खर्चाबद्दल चेकची मागणी करीत असतांना तिजबरोबर काम किती झालें याबद्दलचा जो माहेवारी रिपोर्ट पाठवावयाचा त्याशिवाय आणखी त्यानें दरसाल प्रत्येक हिशोबी सालाच्या शेवटीं अशा प्रत्येक बोर्डाला एक साधारण रिपोर्ट पाठविला पाहिजे.

सरकारी एक्झिक्युटिव इंजिनियर ज्या बोर्डासाठीं कोणतेंहि काम करीत असेल अशा प्रत्येक बोर्डाला तो बोर्ड अगर त्याचा अध्यक्ष (अगर उपाध्यक्ष) सदरहू रिपोर्टात असलेल्या प्रकारची कांहीं जादा माहिती मागेल ती त्यानें सर्व वेळीं पुरविली पाहिजे.

१०. सुपरिंटेंडिंग इंजिनीयरच्या आड्मिनिस्ट्रेशन रिपोर्टात सरकारी एक्झिक्युटिव इंजिनीयरांनीं लोकलबोर्डासाठीं केलेल्या कामांचा समावेश व्हावा.— सरकारी एक्झिक्युटिव इंजिनीयरानें आपल्या वार्षिक रिपोर्टाची नक्कल प्रत्येक लोकलबोर्डास व आपल्या विभागाच्या सुपरिंटेंडिंग इंजिनीयरास पाठविली पाहिजे, आणि सुपरिंटेंडिंग इंजिनीयरांनीं सरकाराला पाठवावयाच्या वार्षिक आड्मिनिस्ट्रेशन रिपोर्टात पब्लिक वर्क्स खात्याकडून लोकलबोर्डासाठीं केलेल्या मुख्य मुख्य कामांचें वर्णन दिलें पाहिजे.

११. सरकारी अमलदारांनीं सरकारची प्रथम मंजुरी घेतल्यावांचून लोकलफंडांतून मुशाहिरा घेऊं नये.—आक्टाचें कलम ४५ त्याचें पोटकलम ३ यांत इतर रीतीनें सांगितलें आहे तेवढें खेरीज करून कोणत्याही सरकारी ऑफिसांत लावलेल्या मनुष्यानें पत्रव्यवहार करण्याच्या नेहमींच्या मार्गानें कमिशनरची मंजुरी प्रथम मिळविल्यावांचून आपण केलेल्या अगर करावयाच्या कामाबद्दल मुशाहिरा म्हणून कोणत्याच लोकलबोर्डाकडून अगर कोणत्याच लोकलफंडांतून कोणतीच रकम घेऊं नये अथवा कमिशनरची मंजुरी प्रथम मिळाल्यावांचून केलेल्या अगर करावयाच्या कामाबद्दल कोणत्याच लोकलफंडांतून कोणतीच रकम देऊं नये.

१२. आक्टाचें कलम ७८ (अ) याअन्वयें जिल्हा-लोकल-बोर्डांनीं जे खर्च द्यावयाचे ते खर्च सरकारची आगाऊ मंजुरी घेतल्यावांचून करूं नये.— ज्या अमलदाराचा अगर नोकराचा पगार अगर भत्ता (अलावन्स) जिल्हा लोकलबोर्डानें आक्टाचें कलम ७८ यांतील रकम (अ) अन्वयें लोकलफंडांतून दिला पाहिजे असें असेल अशा कोणत्याच अमलदाराला अगर नोकराला कोणत्याच सरकारी ऑफिसांत कामाला लावतां कामा नये, आणि सदरहूप्रमाणें जो खर्च दिला पाहिजे असा कोणताहि खर्च, पत्रव्यवहार करण्याच्या नेहमींच्या मार्गानें सरकारची आगाऊ मंजुरी मिळविल्यावांचून, कोणत्याच सरकारी अमलदारानें करूं नये.

१३. कलम ३५ (२) (ज) या अन्वयें पत्र कोणास पाठवावयाचें.— पब्लिक वर्क्स व एज्युकेशनल खात्यांतील सरकारी अमलदारास पुढें होणाऱ्या सभेची तारीख कळविण्याकरतां सदरहू आक्टाचें कलम ३५ याचें पोट कलम (२)

यांतील रकम (ज) याअन्वयें पाठवावयाचें पत्र, पब्लिक वर्क्स खात्याच्या बाब-तींत त्या जिल्ह्याच्या एक्झिक्युटिव इंजिनियरास, व एज्युकेशनल खात्याच्या बाबतींत जिल्हा लोकलबोर्डाच्या सभेच्या संबंधीं एज्युकेशनल इन्स्पेक्टरास, व तालुका लोकलबोर्डाच्या सभेच्या संबंधीं डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरास, अगर, एक्झिक्युटिव इंजिनीयर अथवा एज्युकेशनल अगर डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पे-क्टर कोणत्याही बाबतींत या कारणाकरितां सामान्य अगर विशिष्ट सूचना देऊन ठरवील, अशा सब्-डिव्हिजनल ऑफिसरच्या अगर असिस्टंट डेप्युटी एज्यु-केशनल इन्स्पेक्टरच्या हुद्याहून कमी हुद्दा नाहीं अशा हाताखालच्या अमल-दारास, पाठविलें पाहिजे.

१४. सभेंतील कामकाजाची नक्कल कलेक्टराकडे व प्रांत ऑफिसरकडे सहीशिक्यानिशीं पाठविणें.—आक्टाचें कलम ३५ याच्या पोटकलम (२) मधील रकम [के] अन्वयें ठेविलेली जिल्हा-लोकलबोर्डाच्या प्रत्येक सभेच्या कामकाजाची नक्कल सभेचें काम संपतांच शक्य तितक्या लवकर अध्यक्षानें जिल्ह्याच्या कले-क्टरकडे सहीशिक्यानिशीं पाठविली पाहिजे; व तसेंच तालुका लोकलबोर्डाच्या सभेच्या कामकाजाची नक्कल प्रांत ऑफिसरकडे व संबंध असलेल्या जिल्हा-लोकल-बोर्डाकडे सुद्धां सहीशिक्यानिशीं पाठविली पाहिजे.

१५. सरकारी नोकरांमार्फत नोटिसा वगैरे देण्याबाबत कलेक्टरबरोबर करावयाचा करारनामा.—जेव्हां एकादें लोकलबोर्ड आक्टाचें कलम ६३ अन्वयें त्याच्या सर्व क्षेत्रांत अगर क्षेत्राच्या विभागांत नोटिसा वगैरे सरकारी नोकरांमार्फत देण्याची इच्छा करील, तेव्हां जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षानें कलेक्टरास लिहून अशा कामगिरीसाठीं वसूल करावयाच्या खर्चाच्या बाबतींत यासोबतच्या पांचव्या परिशिष्टांतील नमुन्याप्रमाणें त्याजबरोबर करारनामा केला पाहिजे.

१६. जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षांस पिकांची आणेवारी कळविणें.- "ज्या क्षेत्रांत दुष्काळ पडला आहे असें सरकारनें जाहीर केलें असेल" अशा एकाद्या क्षेत्रांतील पिकांची 'आणेवारी ठरविल्याबरोबर कलेक्टरनें जिल्हा लोकल-बोर्डाच्या अध्यक्षास ती कळविली पाहिजे; म्हणजे कर अगर त्याचा कोणताहि भाग याची वसुली तहकूब करण्याकरितां आक्टाच्या ९३ व्या कलमाच्या [२] च्या पोटकलमाअन्वयें बोर्डाची अर्ज करण्याची इच्छा असेल तर तसा अर्ज त्यास करतां येईल. आक्टाचें कलम ९३ याचें पोटकलम [२] याच्या कारणांकरितां दुष्काळ या शब्दांत जमीनमहसुलाच्या तहकुबीची जरूरी आहे अशी "दुर्भिक्षता" किंवा अवर्षण अगर पावसाची कमतरता यांचा समावेश होतो.

१७. सरकारी अमलदारांनीं वारंटांवर सही करणें.—जेव्हां एकादें जिल्हा-लोकलबोर्ड त्याप्रमाणें लेखी अर्ज करून तशी इच्छा दर्शवील, तेव्हां कोणत्याही क्षेत्रांत, संबंध असलेल्या सब्-डिव्हिजनल ऑफिसरास अगर मामलेदारास जिल्हा लोकलबोर्डातर्फे वारंटांवर सह्या करण्याचा अधिकार देण्याचा कलेक्टरास सामान्यतः अख्त्यार आहे, आणि अशा प्रकारच्या अर्जावरून सर्कल इन्स्पेक्टराच्या हुद्याहून कमी नाहीं अशा हुद्याच्या रेव्हिन्यू ऑफिसरकडे असें वारंट पाठविण्यास अधिकार देण्याचा त्यास अख्त्यार आहे.

१८. चीफ् ऑफिसर, इंजिनीयर, व हेल्थ ऑफिसर या जागांसाठीं जाहिरात देणें.—आक्टाच्या ११९ व्या कलमाच्या [२] र्‍या पोटकलमाअन्वयें चीफ् ऑफिसर, इंजिनीयर, अगर हेल्थ ऑफिसर या जागांवर, [ सरकारी नोकरींतील एकाद्या लायक अमलदाराला मागणी करून घेतलें असेल अशा बाबी खेरीज करून ] जाहिराती देण्याच्या कारणांकरितां अध्यक्ष जीं वर्तमानपत्रें निवडील अशा वर्तमानपत्रांतून जाहिराती देऊन अर्ज मागवून अशा जाहिरातींपैकीं पहिल्या जाहिरातीच्या तारखेपासून निदान दोन महिने जाईपावेतों कायम नेमणूक करतां कामा नये.

१९. सदरहू जागांकरितां लायकी.—सरकारी नोकरींतील एकाद्या लायक अमलदाराला मागणी करून घेतलें असेल अशा बाबी खेरीज करून [१] कोणीहि इसम—

[ अ ] चीफ् ऑफिसराच्या जागेकरितां, तो मुंबई युनिव्हर्सिटीच्या डिग्रीच्या परीक्षांपैकीं कोणतीहि एक परीक्षा अगर इतर मंजूर झालेल्या युनिव्हर्सिटीच्या तत्समान परीक्षा पास झालेला असल्याशिवाय लायक समजला जाणार नाहीं.

[ ब ] इंजिनीयरच्या जागेकरितां, तो बी. ई. अथवा एल. सी. ई. अगर कोणतीहि तत्समान परीक्षा पास होऊन रस्ते व इमारती बांधण्याच्या कामाचा निदान एक वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव त्यास असल्याशिवाय लायक समजला जाणार नाहीं.

[ क ] हेल्थ ऑफिसरच्या जागेकरितां, त्यास सार्वजनिक आरोग्यामध्यें ब्रिटिश डिप्लोमा अगर एम्. बी. बी. एस्. ची डिग्री असून आरोग्यशास्त्राचें व सांक्रामिक रोगशास्त्राचें काम चालविण्याइतकें ज्ञान असल्याबद्दलचें सर्टिफिकीट असल्याशिवाय लायक समजला जाणार नाहीं.

[ २ ] चीफ् ऑफिसर, इंजिनीयर व हेल्थ ऑफिसर यांच्या नेमणुका प्रथमतः एक वर्षाच्या पसंतवारीच्या मुदतीवर केल्या जातील.

२०. सरकारची पसंती कशी मिळवावी.—आक्टाच्या ११९ व्या कलमाच्या(२)ऱ्या पोटकलमाअन्वयें चीफ ऑफिसर, हेल्थ ऑफिसर व इंजिनियर यांच्या नेमणुकीकरितां लागणाऱ्या सरकारी पसंतीकरितां जिल्ह्याचा कलेक्टर व कमिशनर यांच्या मार्फत अर्ज करावा.

२१. इतर जागांकरितां लायकी.—लोकलबोर्डातील कारकुनांच्या व इतर नेमणुकांकरितां कमीत कमी लायकी सरकारी नोकरींतील तत्समान नेमणुकांकरितां लागणाऱ्या योग्यतेइतकी सामान्यत: असली पाहिजे, व नेमणुका करितांना जिल्ह्यांतील निरनिराळ्या जातींचें योग्य मिश्रण होण्याच्या आवश्यकतेकडे योग्य लक्ष्य पुरविलें पाहिजे.

---

# परिशिष्ट.

## ( कानू १५ पहा. )

## करारनामा.

हा करारनामा सन १९२ ज्या ज्या तारखेस एका पक्षीं सन १९२३ चा मुंबईच्या लोकलबोर्डाचा आक्ट ( सन १९२३ चा मुंबईचा ६ वा ) याअन्वयें स्थापन झालेलें चें जिल्हा—लोकलबोर्ड ( यास यांत पुढें " सदरहू लोकलबोर्ड " असें म्हटलें आहे ) व दुसऱ्या पक्षीं हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ् स्टेट इन् कौन्सिल ( यास यांत पुढें " सेक्रेटरी ऑफ् स्टेट " असें म्हटलें आहे; या शब्दांत संदर्भास सोडून नसेल तर अगर त्यास बाध येत नसेल तर, त्याच्या जागेवर नंतर येणारे व असाइन्स यांचा समावेश होतो ) यांच्यामध्यें करण्यांत आला.

ज्याअर्थी चें जिल्हा—लोकलबोर्ड सन १९२३ चा मुंबईचा लोकलबोर्डाचा आक्ट सन १९२३ चा मुंबईचा ६ वा ) याच्या ६३ व्या कलमाअन्वयें त्याच्या सर्व क्षेत्रांत अगर क्षेत्राच्या विभागांत नोटिसा वगैरे सरकारी नोकरांमार्फत देण्याची इच्छा करतें आणि ज्याअर्थी सदरहू आक्टाच्या १३३ (ह) कलमाअन्वयें सरकारनें केलेल्या कानूंपैकीं १५ व्या कानूअन्वयें सदरहू लोकलबोर्डाचा अध्यक्ष यानें अशा कामगिरीसाठीं वसूल करावयाच्या खर्चाबाबतचा करारनामा सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांच्या वतीनें व याजकरितां करण्यासाठीं ज्या कलेक्टरास अर्ज केला आहे;

त्याअर्थी हें खत असें दर्शवितें कीं, सेक्रेटरी ऑफ् स्टेट याच्या वतीनें व याजकरितां चा कलेक्टर सन १९२३ चा मुंबईचा लोकलबोर्डाचा आक्ट (सन १९२३ चा मुंबईचा ६ वा) याच्या ६३ व्या कलमाअन्वयें नोटिसा वगैरे देण्याचें काम पुढील अटीवर हातीं घेण्याचें कबूल करतोः—

जिल्हा-लोकलबोर्डानें अशा कामगिरीबद्दलचा खर्च सन १८७० चा कोर्टफीचा आक्ट (सन १८७० चा ७ वा) याच्या २० व्या कलमाखालीं केलेल्या कानूअन्वयें रेव्हिन्यू कोर्टांनीं नोटिसा व समन्स देण्याच्या कामाकरितां ठरविलेल्या फीच्या दराप्रमाणें दिला पाहिजे.

या खताचा पुरावा म्हणून, प्रथम वर लिहिलेल्या तारखेस व वर्षी यावर च्या सदरहू लोकलबोर्डाचा अध्यक्ष व सदरहू लोकलबोर्डाचे दोन इतर सभासद यांनीं यावर आपली सही केली आहे व सदरहू लोकलबोर्डाचा सामान्य शिक्का यावर वठविला आहे, आणि , चा कलेक्टर, यानें मुंबई सरकारच्या हुकुमावरून, हिंदुस्थानचा सेक्रेटरी ऑफ् स्टेट इन् कौन्सिल याच्या वतीनें व याजकरितां यावर आपली सही करून आपल्या हुद्याचा शिक्का वठविला आहे.

, अध्यक्ष, आणि } अध्यक्ष.

, व ,
च्या लोकलबोर्डाचे दोन सभासद यांनीं
च्या समक्ष सही करून चा लोकलबोर्डाचा
सामान्य शिक्का वठविला असे. } सभासद.

, चा कलेक्टर यानें (१)
(२) यांच्या
समक्ष सही करून शिक्का वठवून स्वाधीन केलें असे. } चा कलेक्टर.

टीपः—सदरहू सन १९२३ चा मुंबईचा लोकलबोर्डाचा आक्ट याचें कलम ४२ याअन्वयें सदरहू लोकलबोर्डाच्या अध्यक्षानें व दोन सभासदांनीं व सरकारच्या वतीनें कलेक्टरानें हा करारनामा करून दिला पाहिजे. तारीख १ माहे एप्रिल सन १९२६ पावेतों (रु. १) एक रुपाया किंमतीच्या स्टांप कागदावर हा लिहून दिला पाहिजे, परंतु तो नोंदून घेण्याची जरूरी नाहीं.

# प्रस्तावना

## मुंबईचा प्राथमिक शिक्षणाबाबत ॲक्ट

सक्तीच्या शिक्षणाचा विचार करण्याकरितां नेमिलेल्या कमिटीच्या शिफारशी अमलांत आणणें हा ह्या आक्टाच्या मसुद्याचा हेतु आहे. स्थानिक अधिकाऱ्याकडून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अमलांत आणण्यासाठीं आवश्यक असलेल्या साधनांची या मसुद्यांत तरतूद केली आहे आणि प्राथमिक शिक्षण देण्यासाठीं सुधारलेली व्यवस्था करण्याची संधी घेण्यांत आलेली आहे.

जेव्हां हा आक्टाचा मसुदा अमलांत येईल तेव्हां प्राथमिक शिक्षणाच्या संबंधानें जिल्हा लोकल बोर्ड व म्युनिसिपालिट्या यांचीं फंडाच्या तरतूदींशिवाय इतर कर्तव्यें स्कुल बोर्डाकडे जातील. प्रत्येक जिल्हा लोकल बोर्डास व ज्या म्युनिसिपालिटीची आपल्या शाळा चालविण्याची इच्छा असेल व जी आपल्या शाळा चालविण्यालायक समजण्यांत येईल अशा प्रत्येक म्युनिसिपालिटीस एक एक स्कूल बोर्ड असेल. ज्याअर्थी कित्येक लहान सहान म्युनिसिपालिट्यांची शिक्षक मंडळी थोडी असते त्याअर्थी त्यांच्या प्राथमिक शाळांची व्यवस्था अशा म्युनिसिपालिट्या ज्या जिल्ह्यांत येत असतील त्या जिल्ह्यांच्या जिल्हा लोकल बोर्डाकडून चालविली जाणें कारभाराच्या दृष्टीनें सोयीचें आहे असें आढळून आलें आहे. तथापि अशा म्युनिसिपालिट्यांचे स्कूल बोर्डावर प्रतिनिधी असतील तसेंच स्कूल बोर्डात स्थानिक अधिकाऱ्यांकडून निवडण्यांत आलेले सभासद, अल्प संख्याकाचे प्रतिनिधी, शिक्षणांतील अनुभवी इसम, स्त्रिया आणि सरकारनियुक्त इसम यांचा समावेश होईल. स्थानिक अधिकाऱ्यांचीं म्हणजे ज्याकरितां स्कूल बोर्डाची रचना करण्यांत आली असेल असे जिल्हा लोकल बोर्ड किंवा म्युनिसिपालिटी यांचीं प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींतील कर्तव्यें करून त्याशिवाय सक्तीच्या शिक्षणाच्यासंबंधानें या आक्टाचे ठराव अमलांत आणणें हेंहि स्कूल बोर्डाचें कर्तव्य असेल. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत जिल्हा लोकल बोर्ड आणि म्युनिसिपालिट्या यांजकडून हल्लीं चालविले जातात त्यांहून अधिक विस्तृत अधिकार स्कुल बोर्डास असावे असा हेतु आहे.

आपल्या हुकमतीस पात्र असलेल्या क्षेत्राच्या कोणत्याहि भागांत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तजवीज करण्याचा आपला इरादा असल्याचे ठराव करून जाहीर करण्यास स्थानिक अधिकाऱ्यास मुभा असेल. जर स्थानिक अधिकारी जिल्हा लोकल बोर्ड असेल तर जिल्ह्यांतील ज्या म्युनिसिपालिटीस वर नमुद

केलेल्या कारणांमुळें आपल्या स्वतःच्या शाळा चालविण्याचा अधिकार देण्यांत आलेला नसेल अशा म्युनिसिपालिटीच्या हुकमतींतील क्षेत्राचा सदर क्षेत्रांत समावेश करण्याचा अधिकार आहे. सक्तीच्या शिक्षणाची तजवीज करण्याची स्थानिक अधिकाऱ्याची सूचना एका योजनेच्या स्वरूपांत सरकारकडे सादर केली जाईल आणि सरकारकडून सदर योजना मंजूर करण्यांत येईल, तर सरकार स्थानिक अधिकारी म्युनिसिपालिटी असेल तर दर साल येणाऱ्या खर्चांपैकीं अर्धा खर्च आणि स्थानिक अधिकारी जिल्हा लोकल बोर्ड असेल तर अशा खर्चांपैकीं दोनतृतीयांश खर्च सोसण्यास कबूल होईल. स्थानिक अधिकारी तसें करण्यास त्यास सांगण्यांत आल्यावर अशी योजना तयार करणार नाहीं किंवा योजना अमलांत आणण्यास किंवा अमलांत असण्याचें चालू ठेवण्यास चुकेल तेव्हां सरकारास प्रसंगाप्रमाणें एखादी योजना तयार करविण्याची किंवा ती अमलांत आणविण्याची किंवा अमलांत असण्याचें चालू ठेवविण्याची मोकळीक असेल.

सरकारकडून एखादी योजना मंजूर करण्यांत आल्यावर ती स्कुल बोर्डाकडून सन १९१८चा मुंबईचा प्राथमिक शिक्षणाबाबत ( डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिट्यांसंबंधीं ) आक्ट याच्या धर्तीवर अमलांत आणण्यांत येईल. मुख्य फरक असा आहे कीं, त्या आक्टाअन्वयें मोफत प्राथमिक शिक्षण फक्त म्युनिसिपल डिस्ट्रिक्टांतच सक्तीचें करतां येत होतें; पण या आक्टाअन्वयें मोफत प्राथमिक शिक्षण म्हणजे शिशुवर्गांत व व्हर्न्याक्युलर इयत्ता १।४ यांत देण्यांत येत असल्या प्रकारचें शिक्षण मुंबई शहर खेरीज करून सबंध इलाख्यांत पैसा जसा हातीं असेल त्याप्रमाणें हळूहळू सक्तीचें करतां येईल. [ हेतु व कारणें. ]

# मुंबईचा प्राथमिक शिक्षणाबाबत आक्ट.

## सन १९२३ चा मुंबईचा आक्ट ४ था.

**मुंबई इलाख्यांत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तजवीज करण्याबाबत व प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था व त्यावरील निर्बंध यांबाबत अधिक चांगली तजवीज करण्याबाबत आक्ट.**

( गव्हर्नर जनरल यांची मंजुरी मिळाल्यानंतर मुंबई सरकारी गझेटांत तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १९२३ रोजीं पहिल्यानें प्रसिद्ध केलेला. )

ज्या अर्थी सरकारचें जाहीर केलेलें धोरण असें आहे कीं, क्रमाक्रमानें वाढ होणाऱ्या विशिष्ट योजनेस अनुसरून मुलांमुलींच्या मोफत व सक्तीच्या सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा फैलाव व्हावा, आणि ज्या अर्थी सरकारनें नेमिलेल्या सन १९२१ च्या सक्तीच्या शिक्षणाबाबत कमिटीनें शिफारस केलेल्या मार्गांनीं हें उद्दिष्ट गांठतां येईल अशा रीतीनें प्राथमिक शिक्षणाचा क्रमाक्रमानें विकास व वाढ होण्यासाठीं तजवीज करणें जरूर आहे आणि ज्या अर्थी, ह्या कारणाकरितां मुंबई इलाख्यांत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तजवीज करणें व प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था व त्यावरलि निर्बंध यांबाबत अधिक चांगली तजवीज करणें योग्य आहे, आणि ज्या अर्थी हा आक्ट पास होण्यासाठीं हिंदुस्तान सरकारसंबंधीं आक्टाच्या ८० अ कलमाच्या [ ३ ] च्या पोट-कलमाच्या ( इ ) रकमेअन्वयें जरूर असलेली गव्हर्नर जनरल यांची आगाऊ मंजुरी मिळविलेली आहे; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहेः—

१. (१) लहान सरनामा व व्याप्ति—या आक्टास सन १९२३ चा मुंबईचा प्राथमिक शिक्षणाबाबत आक्ट असें म्हणावें.

(२) व्याप्ति—तो मुंबई शहर खेरीजकरून सगळ्या मुंबई इलाख्यास लागू आहे.

२. या आक्टांत विषयास अगर संदर्भास बाध येत नसेल तर—

"कबूल केलेली शाळा" या शब्दांचा अर्थ, ज्या शाळेंत किंवा शाळेच्या भागांत प्राथमिक शिक्षणाचे धडे दिले जात असतील व जी किंवा जो स्कूल बोर्डानें त्या त्या वेळीं कबूल केलेला असेल किंवा कबूल करण्याचें नाकारणाऱ्या स्कूलबोर्डाचे निकालावरील अपिलांत सरकारनें कबूल केलेला असेल अशी शाळा किंवा शाळेचा भाग असा समजावा;

" सक्तीचें क्षेत्र " या शब्दांचा अर्थ, ज्या क्षेत्रांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें असेल असें क्षेत्र असा समजावा ;

कबूल केलेल्या शाळेंत " जाणें " याचा अर्थ, सरकारच्या पसंतीनें स्कूल बोर्ड ठरवील अशा दिवशीं व प्रत्येक दिवशीं तो बोर्ड ठरवील अशा वेळीं व तितके तासपर्यंत अशा शाळेंत शिक्षणासाठीं हजर राहणें असा समजावा;

"मूल" या शब्दाचा अर्थ, शाळेचें वर्ष सुरू होण्याच्या वेळेस ज्याचें वय सहा वर्षांहून कमी नसेल व अकरा वर्षांहून अधिक नसेल असें मूल असा समजावा;

"प्राथमिक शिक्षण " या शब्दाचा अर्थ, शिशुवर्गात व व्हर्नाक्युलर इयत्ता १ ते ४ या धरून, त्यांत, १७ व्या कलमान्वयें ठरविलेलें किंवा मंजूर केलेलें असेल त्याप्रमाणें वेळोवेळीं दिलें जाणारें शिक्षण असा समजावा;

" स्थानिक अधिकारी " या शब्दांचा अर्थ, आपल्या शाळा चालविण्याचा सरकारकडून अधिकार देण्यांत आला असेल अशी म्युनिसिपालिटी किंमा जिल्हा लोकल बोर्ड असा समजावा व त्यांत एडनचे बाबतींत एडनच्या एक्झिक्टीव्ह कमिटीचा समावेश होतो;

" आईबाप " या शब्दांत पालकाचा व मूल ज्या मनुष्याच्या प्रत्यक्ष ताब्यांत असेल अशा कोणत्याही मनुष्याचा समावेश होतो;

" ठरविलेलें " या शब्दाचा अर्थ या आक्टाचे कारणासाठीं सरकारनें केलेल्या कानूंत ठरविलेले असा समजावा.

३. [१] स्कूल बोर्डाची रचना—प्रत्येक स्थानिक अधिकाऱ्यास एक बोर्ड असला पाहिजे. सदर स्कूल बोर्डाची रचना ठरविल्याप्रमाणें असली पाहिजे, व तो स्थानिक अधिकारी म्युनिसिपालिटी असेल तर सातांहून कमी नाहींत व नवांहून ज्यास्त नाहींत इतके निवडलेले सभासद मिळून झालेला असला पाहिजे, आणि स्थानिक अधिकारी जिल्हा लोकल बोर्ड असेल तर तो नवांहून कमी नाहींत इतके व सोळांहून ज्यास्त नाहींत इतके निवडलेले सभासद मिळून झालेला असला पाहिजे. हे सभासद स्थानिक अधिकाऱ्याकडून निवडले गेले पाहिजेत, व होईल तितकेंकरून त्यांत शिक्षणांतील अनुभवी इसम, स्त्रिया, अल्पसंख्याकांचे, मागासलेले वर्गाचे व अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधि आणि स्थानिक अधिकारी जिल्हा लोकल बोर्ड असेल, तर जिल्ह्यांतील स्थानिक अधिकारी नसलेल्या म्युनिसिपालिट्यांचे प्रतिनिधि यांचा समावेश झाला पाहिजे. असे सभासद स्थानिक अधिकाऱ्याचे सभासद असलेच पाहिजेत असें नाहीं.

खुलासा—मागासलेले व अस्पृश्य वर्ग यांचा अर्थ, सरकारनें असे जाहीर केलेले वर्ग असा आहे.

(२) स्थानिक अधिकारी म्युनिसिपालिटी असेल तर, तिहींहून जास्त नाहींत इतके जादा सभासद व स्थानिक अधिकारी जिल्हा लोकल बोर्ड असेल तर चारांहून जास्त नाहींत इतके जादा सभासद नेमण्याचा सरकारास अधिकार आहे.

(३) स्कूल बोर्डाची मुदत स्थानिक अधिकाऱ्याच्या मुदतीइतकीच असेल; व अशा मुदतीच्या अखेरीस स्कूल बोर्डाच्या सभासदांनीं हुद्दा सोडला पाहिजे; मात्र इतकेंच कीं, नवीन बोर्ड नेमण्यांत येईपर्यंत त्यांनीं हुद्यावर राहिलें पाहिजे.

(४) स्कूल बोर्डाच्या मुदतींत प्रसंगोपात्त रिकाम्या होणाऱ्या जागा, बाकी राहिलेल्या मुदतीसाठीं, प्रसंगाप्रमाणें, निवडणूक किंवा नेमणूक करून भरल्या पाहिजेत.

४. (१) स्कूल बोर्डाचे अधिकार व कर्तव्यें. सुरुवात—प्रत्येक स्कूल बोर्डाचे संबंधानें, या बाबतींत सरकार फर्मावील अशा तारखेपासून व स्थानिक अधिकाऱ्याच्या सामान्य निर्बंधास पात्र राहून, स्कूल बोर्डानें या आक्टांत ठरविण्यांत येतील किंवा या आक्टाअन्वयें ठरविले जातील असे अधिकार चालविले पाहिजेत व अशीं कर्तव्यें केलीं पाहिजेत.

(२) स्कूल बोर्डानें ज्या स्थानिक अधिकाऱ्याकरितां त्याची रचना झालेली असेल त्या स्थानिक अधिकाऱ्याचे प्राथमिक शिक्षणासंबंधाचे अधिकार चालविले पाहिजेत व कर्तव्यें केलीं पाहिजेत, आणि जर स्थानिक अधिकारी जिल्हा लोकल बोर्ड असेल, तर त्यानें, जिल्ह्यांतील स्थानिक अधिकारी नसलेल्या म्युनिसिपालिट्यांचे तसलेच अधिकारहि चालविले पाहिजेत व कर्तव्येंही केलीं पाहिजेत. तसेंच सदर स्कूल बोर्डानें या आक्टाचे ठराव अमलांत आणले पाहिजेत.

(३) स्कूल बोर्डानें आपलें वार्षिक बजेट व त्यांतील सर्व फेरफार स्थानिक अधिकाऱ्याच्या मंजुरीकरितां सादर केले पाहिजेत.

(४) स्कूल बोर्डानें, आणखी स्थानिक अधिकारी किंवा सदरीं सांगितल्या प्रकारची अशी कोणतीही म्युनिसिपालिटी यांजकडून शिक्षणासंबंधींच्या कोणत्याही कारणाबाबतचे जे अधिकारी व जीं कर्तव्यें त्याकडे सोंपून देण्यांत येतील तसे अधिकार चालविले पाहिजेत व तशीं कर्तव्यें केलीं पाहिजेत.

(५) स्कूल बोर्डानें बोर्डाचे सभासदांमधून आपला चेअरमन निवडला पाहिजे.

५. कर्तव्यें सोंपून देणें—स्कूल बोर्डास, वेळोवेळीं आपले अधिकार व कर्तव्यें यांपैकीं कोणतेही अधिकार व कर्तव्यें, बोर्डाच्या कोणत्याही पोटकमिटीकडे किंवा बोर्डाच्या कोणत्याही सभासदाकडे किंवा ऑनररी किंवा पगार-

दार अमलदाराकडे सोंपून देण्याचा अधिकार आहे. अशी कमिटी, सभासद किंवा अमलदार यांनीं, स्कूल बोर्डाकडून वेळोवेळीं देण्यांत येतील अशा कोणत्याही समजुतींस अनुसरून वागलें पाहिजे; बोर्डास कोणत्याही वेळीं, अशा रीतीनें बनविलेली कोणतीही पोट-कमिटी बंद करण्याचा किंवा तिच्या रचनेंत फेरफार करण्याचा किंवा अशा रीतीनें सोंपून दिलेले कोणतेही अधिकार किंवा कर्तव्यें परत घेण्याचा अधिकार आहे.

६. (१) म्युनिसिपालिटीनें शाळा जिल्हा लोकल बोर्डाकडे देणें: परत देणें:—स्थानिक अधिकारी नसलेल्या प्रत्येक म्युनिसिपालिटीनें, या बाबतींत सरकारनें जाहीर करावयाच्या तारखेस, ती ज्या जिल्ह्यांत असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा लोकल बोर्डाकडे, आपल्या स्वाधीन असलेल्या सर्व प्राथमिक शाळा, त्यांच्या जमिनी, इमले, दप्तर व सामानसुमान यांसह दिल्या पाहिजेत व जिल्हा लोकल बोर्डाकडून प्राथमिक शिक्षण मिळणाऱ्या म्युनिसिपल डिस्ट्रिक्टांतील मुलांची संख्या हिच्या आधारानें सरकारकडून वेळोवेळीं ठरविण्यांत येईल अशी रकम व शिक्षणाचे कारणांकरितां तिनें धारण केलेले कोणतेही फंड (यांत ट्रस्ट फंड येतात) यांपासून होणारें उत्पन्न व मिळविलेला सर्व पैसा हीं सदरहू जिल्हा लोकल बोर्डास शिक्षणाच्या कारणासाठीं दरसाल दिलीं पाहिजेत.

(२) जर अशा कोणत्याही म्युनिसिपालिटीस कोणत्याही वेळीं आपल्या शाळा चालविण्याचा अधिकार सरकारकडून देण्यांत येईल, तर जिल्ह्याच्या जिल्हा लोकल बोर्डानें, या बाबतींत सरकारनें जाहीर करावयाच्या तारखेस, अशा म्युनिसिपालिटीच्या स्थलसीमेंत असलेल्या सर्व प्राथमिक शाळा, त्यांच्या जमिनी, इमले, दप्तर व सामानसुमान यांसह अशा म्युनिसिपालिटीकडे दिल्या पाहिजेत, आणि अशी म्युनिसिपालिटी सदरीं सांगितलेल्या तारखेपासून (१) ल्या पोट-कलमांत सांगितलेल्या रकमा देण्यास त्यानंतर पात्र असणार नाहीं.

७. प्राथमिक शिक्षणावरील स्कूल कमिटीचा निर्बंध बंद होणें—जेव्हां कोणत्याही म्युनिसिपालिटींत, सन १९०१ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट याच्या २८ व्या कलमाअन्वयें स्कूल कमिटी नेमण्यांत आलेली असेल, तेव्हां त्या कमिटीचा प्राथमिक शिक्षणावरील निर्बंध सरकारनें याबाबत जाहीर करावयाच्या तारखेपासून बंद होईल.

८. शिक्षणासंबंधींची विद्यमान नोकरमंडळी स्थानिक अधिकाऱ्यांनीं आपापल्याकडे घेणें, स्थानिक अधिकाऱ्यांनीं घेतलेल्या अशा अमलदारांच्या नोकऱ्या—स्थानिक अधिकाऱ्यानें सरकार फर्मावील असे सरकारच्या शिक्षणखात्यांत नोकरीस असलेले प्राथमिक शाळांतील शिक्षक, असे इसम सदरहु खात्यांत ज्या अटींवर

व शर्तींवर नोकरीस असतील त्याच अटींवर व शर्तींवर आपणाकडे घेऊन नोकरीस ठेवले पाहिजेत.

( २ ) अशा शिक्षकाच्या संबंधानें सरकारचे विद्यमान व भावी हक्क, जबाबदारी, कर्तव्यें व अधिकार स्थानिक अधिकाऱ्याकडे जातील व तीं त्याजकडून चालविलीं गेलीं पाहिजेत किंवा केलीं गेलीं पाहिजेतः

मात्र इतकेंच कीं, ( अ ) अशा कोणत्याही शिक्षकास, नोकरीवरून काढून टाकणाऱ्या कोणत्याही हुकुमाविरुद्ध सरकारकडे अपील करण्याचा अधिकार असेल;

( ब ) ज्या वेळीं अशा शिक्षकांस आपणांकडे घेऊन स्थानिक अधिकाऱ्याकडून नेमण्यांत येईल त्यावेळीं त्या शिक्षकांस लागू असलेल्या पगार व भत्ता यांच्या स्केलांत सरकारच्या आगाऊ मंजुरीशिवाय बदल करतां कामा नये.

( ३ ) स्थानिक अधिकाऱ्यानें, ( १ ) त्या पोट-कलमाच्या ठरावाअन्वयें दुसऱ्या स्थानिक अधिकाऱ्यानें आपणांकडे घेतलेल्या कोणत्याही शिक्षकानें अशा अधिकाऱ्याच्या बजावलेल्या नोकरीच्या संबंधानें, सरकार फर्मावील अशा दुसऱ्या स्थानिक अधिकाऱ्याकडे व फर्मावील अशा रकमा भरल्या पाहिजेत.

( ४ ) या कलमाचे ठराव, सरकारच्या शिक्षणखात्यांत तारीख १ माहे जुलै सन १९२३ रोजीं किंवा त्यापूर्वीं किंवा कलम ( ४ ) पोट-कलम ( १ ) या-अन्वयें ठरविलेल्या तारखेस किंवा त्यापूर्वीं यांपैकीं जी अधिक उशिरां असेल त्या तारखेस किंवा त्यापूर्वीं, नेमिलेल्या प्राथमिक शाळांतील सर्व शिक्षकांस लागू होतील.

९. ( १ ) स्कूल बोर्ड आडमिनिस्ट्रेटिव्ह अमलदार—स्थानिक अधिकाऱ्यानें स्कूल बोर्डाच्या शिफारशीवरून व सरकारच्या पसंतीनें ज्यास स्कूल बोर्ड आडमिनिस्ट्रेटिव्ह अमलदार असें म्हणण्यांत येईल असा एक अमलदार नेमिला पाहिजे. तो स्कूल बोर्डाचा मुख्य कार्यकारी अमलदार असेल, व त्याचा पगार, अधिकार व कामें हीं या बाबतींत स्थानिक अधिकाऱ्यानें केलेल्या व सरकारनें मंजूर केलेल्या कायद्यांनीं ठरविलीं पाहिजेत.

( २ ) अशा कोणत्याही अमलदारास, सरकारच्या आगाऊ मंजुरीनें असेल तें खेरीजकरून, कौन्सिलरांच्या सबंध संख्येचा निदान दोनतृतीयांश मतें नसतील तर हुद्यावरून दूर करतां येणार नाहीं, त्याचें वेतन कमी करतां कामा नये, त्यास सस्पेंड करतां कामा नये.

१०. ( १ ) सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तजवीज करण्याचा इरादा स्थानिक अधिकाऱ्यानें जाहिर करणें—स्थानिक अधिकाऱ्यास, मुलांच्या किंवा मुलींच्या बाबतींत किंवा दोघांच्याही बाबतींत आपल्या हुकमतीस पात्र असलेल्या सबंध क्षेत्रांत किंवा त्याच्या कोणत्याही भागांत, आणि स्थानिक अधिकारी जर

जिल्हा लोकल बोर्ड असेल, तर स्थानिक अधिकारी नसलेल्या जिल्ह्यांतील म्युनिसिपालिटीच्या हुकमतीस पात्र असलेल्या कोणत्याही क्षेत्रांत, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तजवीज करण्याचा आपला इरादा ठराव करून जाहिर करण्याचा अधिकार आहे, व त्यानें आपल्या सूचना योजनेच्या रूपांत सरकारकडे सादर केल्या पाहिजेत.

(२) स्थानिक अधिकाऱ्यानें, सरकारनें तसें करण्यास सांगितलें असतां सरकारनें निर्दिष्ट करावयाच्या वेळेच्या आंत, सरकार फर्मावील त्याप्रमाणें वर सांगितल्या प्रकारच्या अशा क्षेत्रांत व सरकार निर्दिष्ट करील त्याप्रमाणें मुलांच्या किंवा मुलींच्या बाबतींत किंवा दोघांच्याहि बाबतींत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तजवीज करावयाची एक योजना सादर केली पाहिजे.

(३) प्रत्येक स्थानिक अधिकाऱ्यानें, ठरविलेल्या मुदतीच्या आंत, आपल्या हुकमतीस पात्र असलेल्या क्षेत्रांत एका ठराविक मुदतीच्या आंत सक्तीच्या शिक्षणाच्या सार्वत्रिक सुरवातीसाठीं शक्य तितका संपूर्ण कार्यक्रम तयार केला पाहिजे.

११. योजनेंत असावयाचा तपशील—सदरहू योजनेंत खालील तपशील असला पाहिजे, तो येणेंप्रमाणें:—

[अ] सक्तीचें क्षेत्र;

[ब] अशा क्षेत्रांत राहणारे व जातवार व भाषावार वर्गीकरण केलेले मुलगे किंवा मुली किंवा दोघेहि, यांची खानेसुमारी;

[क] ज्या कबूल केलेल्या शाळा होतील अशा खाजगी शाळांचा निर्देश असलेली विद्यमान व योजिलेल्या शाळांची यादी;

[ड] विद्यमान व योजिलेल्या शिकविणाऱ्या, तपासणी करणाऱ्या व देखरेख करणाऱ्या नोकरमंडळीची यादी;

[इ] सक्तीच्या क्षेत्रांतील सर्व जातींच्या मुलांची त्यांच्या त्यांच्या देशी भाषांत, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तजवीज ज्या रीतीनें केली जाईल ती रीत;

[फ] सदरहू योजनेचा सालोसाल येणारा व एकदाच येणारा खर्च व स्थानिक अधिकाऱ्यानें त्यांतील आपल्या हिश्शाचा खर्च भागविण्याचें कसें योजिलें आहे तें; आणि

[ग] जर सक्तीच्या क्षेत्रांत स्थानिक अधिकारी नसलेली अशी एखादी म्युनिसिपालिटी असेल तर स्थानिक अधिकाऱ्याच्या मतें अशा म्युनिसिपालिटीनें दरसाल किती रकम द्यावी तें.

१२. योजनेस सरकारची मंजुरी—सरकारास, जरूर दिसेल ती चौकशी केल्यानंतर, अशी योजना फेरफारानिशीं किंवा फेरफाराशिवाय मंजूर करण्याचा अधिकार आहे.

१३. (१) योजनेकरितां सरकारनें पैशाची तजवीज करणें—योजना मंजूर करण्यांत येईल, तर सरकार सदरहू योजनेस पुनः पुनः येणाऱ्या व एकदाच येणाऱ्या वार्षिक जादा खर्चापैकीं, स्थानिक अधिकारी म्युनिसिपालिटी असेल तर अर्धा खर्च, व स्थानिक अधिकारी जिल्हा लोकल बोर्ड असेल तर, सदरहु खर्चांपैकीं दोनतृतीयांश खर्च सोशील; परन्तु सरकारची जबाबदारी स्थानिक अधिकाऱ्यानें अंदाजल्याप्रमाणेंच्या, खर्चाच्या, प्रसंगाप्रमाणें, निम्याहून किंवा दोनतृतीयांशाहून अधिक असणार नाहीं.

(२) या कलमांतील कोणत्याहि मजकुरावरून, हा आक्ट अमलांत येईल त्यावेळीं प्राथमिक शिक्षणाच्या कारणाकरितां कोणत्याहि स्थानिक अधिकाऱ्याच्या त्यास सरकारकडून देण्यांत येत असलेल्या कोणत्याहि वार्षिक ग्रांटीबाबतच्या हक्कास बाध येणार नाहीं: मात्र इतकेंच कीं, जर सरकारास असें वाटेल कीं, कोणत्याहि स्थानिक अधिकाऱ्याच्या शिक्षणविषयक फंडाचा गैरउपयोग किंवा दुरुपयोग करण्यांत आलेला आहे किंवा येण्याच्या बेतांत आहे, तर त्यास अशा स्थानिक अधिकाऱ्याकडे अशा गैरउपयोगाबद्दल किंवा दुरुपयोगाबद्दल खुलासा मागण्याचा अधिकार आहे, आणि जर दिलेल्या खुलाशानें सरकारची खात्री होणार नाहीं तर त्यास अशा स्थानिक अधिकाऱ्यास द्यावयाच्या ग्रांटमधून त्यास योग्य वाटेल तेवढी रक्कम कमी करण्याचा अधिकार आहे.

१४. स्थानिक अधिकाऱ्याचें कर्तव्य—जेव्हां एखादी योजना मंजूर करण्यांत आलेली असेल, तेव्हां स्थानिक अधिकाऱ्यानें सक्तीच्या क्षेत्रांत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबत पुरेशी तजवीज केली पाहिजे, व स्कूल बोर्डानें चालविलेल्या अशा क्षेत्रांतील कोणत्याहि शाळेंत कोणत्याहि मुलाच्या प्राथमिक शिक्षणाबाबत कोणतीहि फी घेतां कामा नये.

१५. मंजुरीनंतर योजनेंत फेरफार करणें—मंजुरी केलेली योजना, स्थानिक अधिकाऱ्यास सरकारच्या मंजुरीनें मागें घेण्याचा किंवा तींत वेळोवेळीं फेरफार करण्याचा अधिकार आहे, किंवा मुंबई सरकारी गॅझेटांत तो करण्याच्या कारणांसह प्रसिद्ध केलेल्या हुकुमानें सरकारास सदरहु योजनेंत फेरफार करण्याचा, ती रद्द करण्याचा किंवा तात्पुरती तहकूब करण्याचा अधिकार आहे.

१६. (१) शाळांची तपासणी—पत्रकें—कबूल केलेली प्रत्येक शाळा व स्थानिक अधिकाऱ्यानें चालविलेली किंवा मदत दिलेली प्रत्येक प्राथमिक शाळा, शाळा भरण्याच्या वेळांत, सरकारच्या व स्थानिक अधिकाऱ्याच्या तपासणी अमलदारांस विशेषतः खालील गोष्टी नक्की करून घेण्यासाठीं तपासणीकरितां खुली असली पाहिजे, म्हणजे—

(अ) १७ व्या कलमाअन्वयें ठरविल्याप्रमाणें किंवा मंजूर केल्याप्रमाणें शिक्षण दिलें जात आहे किंवा नाहीं;

(ब) अनिष्ट प्रकारचें कोणतेंहि शिक्षण दिलें जात आहे किंवा कसें;

(क) मुलांच्या सक्तीच्या हजिरीबाबत आक्टाचे ठराव पार पाडण्यांत येत आहेत किंवा नाहीं; आणि

(ड) ठरविलेलीं रजिस्टरें व दप्तरें हीं ठेवण्यांत येत आहेत किंवा कसें.

(२) स्थानिक अधिकाऱ्यानें चालविलेल्या अशा कोणत्याहि शाळेच्या संबंधानें स्कूल बोर्डानें, व अशा इतर कोणत्याहि शाळेच्या मॅनेजरानें सरकारास किंवा स्थानिक अधिकाऱ्यास वेळोवेळीं लागतील अशीं पत्रकें पुरविलीं पाहिजेत व अशी माहिती दिली पाहिजे.

१७. कबूल केलेल्या शाळांतील विषय, अभ्यासक्रम इत्यादि–कबूल केलेल्या शाळांतील व स्थानिक अधिकाऱ्यानें चालविलेल्या किंवा मदत दिलेल्या इतर प्राथमिक शाळांतील विषय, अभ्यासक्रम, बुकें व शिक्षणाच्या इयत्ता हीं, ठरविलेलें असेल त्याप्रमाणें असलीं पाहिजेत; परन्तु त्यांत स्थानिक परिस्थितीस जुळण्याकरितां, स्कूल बोर्डास सरकारच्या मंजुरीनें बदल करण्याचा अधिकार आहे.

१८. मुलांना शाळेंत जाण्यास लावण्याचें आईबापांचें कर्तव्य–सक्तीच्या प्रत्येक क्षेत्रांतील ज्या मुलाला योजना लागू असेल त्या प्रत्येक मुलाच्या आईबापांनीं, यांत पुढें ठरविलें आहे त्याप्रमाणें वाजवी सबब नसेल तर आणि सदरहू आईबाप व मूल हीं अशा क्षेत्रांत साधारणतः राहत असतील तर, त्या मुलाला अशा क्षेत्रांतील कबूल केलेल्या शाळेंत जाण्यास लावलें पाहिजे.

१९. वाजवी सबबीचा अर्थ–कबूल केलेल्या शाळेंत मुलाला जाण्यास लावण्याला कसूर केल्याबद्दल आईबापांला खालील बाबतींपैकीं कोणत्याहि बाबतींत वाजवी सबब आहे असें समजावें:—

(अ) जेव्हां आजारीपणामुळें, नबळेपणामुळें अथवा दुसऱ्या अपरिहार्य कारणामुळें मुलांस शाळेंत जातां येत नसेल,

(ब) जेव्हां स्कूल बोर्डाच्या मतें जें शिक्षण योग्य असेल असें शिक्षण मुलाला कबूल केलेल्या शाळेंत मिळण्याच्या ऐवजीं इतर रीतीनें मिळत असेल, अथवा त्याला आपलें प्राथमिक शिक्षण अगोदरच पुरें केलें असल्याबद्दल स्कूल बोर्डाकडून दाखला मिळालेला असेल;

[क] जेव्हां स्कूल बोर्डाच्या सल्ल्यानें सरकारनें ठरवावयाच्या व मुलाच्या राहण्याच्या ठिकाणापासून अगदीं जवळच्या रस्त्यानें मोजावयाच्या अंतराच्या आंत कोणतीही कबूल केलेली शाळा नसेल;

[ड] जेव्हां योग्य रीतीनें अर्ज केल्यानंतर, कबूल केलेल्या शाळेंत मुलास दाखल करण्याचें नाकारण्यांत आलें असेल आणि जींत त्यास घेतां येईल अशी [क] रकमेअन्वयें ठरविलेल्या अंतराच्या आंत दुसरी कोणतीही कबूल केलेली शाळा नसेल, तेव्हां मुलास दाखल करतां येईल असें आईबापांस कळविलें जाई त्या बेळपर्यंत,

(इ) जेव्हां देशी भाषेंत जात शिक्षण दिलें जातें अशी कोणतीही कबूल केलेली शाळा सदरहू जागेंत नसेल;

(फ) जेव्हां आईबापांस ज्या धार्मिक शिक्षणास त्यांची हरकत असेल असें धार्मिक शिक्षण जींत गेलें असतां घ्यावें लागणार नाहीं अशा शाळेंत मुलास पाठवितां येईल अशी कोणतीहि कबूल केलेली शाळा सदरहू जागेंत नसेल.

२०. (१) शाळेंत जाण्याविषयीं हुकूम काढणें—जेव्हां स्कूल बोर्डाची अशी खात्री होईल कीं, कोणत्याही मुलाला मुलाचे जे आईबाप कबूल केलेल्या शाळेंत जाण्यास लावण्यासाठीं १८ व्या कलमाच्या ठरावांअन्वयें बांधलेले असतील ते आईबाप तसें करण्यास चुकले आहेत तेव्हां तो स्कूल बोर्ड, त्या आईबापांस त्यांचें म्हणणें ऐकून घेतलें जाण्याची संधि दिल्यानंतर व त्याला जरूर वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्या आईबापांस हुकूम करण्यास मुखत्यार आहे आणि त्या हुकुमांत निर्दिष्ट करण्यांत येईल त्या तारखेस व त्या तारखेपासून त्या आईबापांनीं अशा मुलास एखाद्या कबूल केलेल्या शाळेंत जाण्यास लावण्याविषयीं फर्माविलें पाहिजे.

(२) हा अधिकार आपण नेमिलेल्या एखाद्या इसमाकडे किंवा कमिटीकडे सोंपवून देण्यास स्कूल बोर्ड मुखत्यार आहे.

२१. (१) मुलास शाळेंत जाण्यास लावण्यास चुकल्याबद्दल शिक्षा—ज्या कोणत्याहि आईबापांविरुद्ध २० व्या कलमाअन्वयें एखाद्या मुलासंबंधानें हुकूम करण्यांत आला असेल आणि जे आईबाप अशा हुकुमांत निर्दिष्ट केलेल्या तारखेस व तनंतर अशा मुलासंबंधानें १८ व्या कलमाच्या ठरावांप्रमाणें वागण्यास कसूर करतील ते आईबाप जर ते, जेथें माजिस्ट्रेट असेल अशा कोणत्याही शहरांत किंवा गांवांत राहत असतील, तर अशा माजिस्ट्रेटापुढें अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यानंतर व जर ते इतर ठिकाणीं राहत असतील तर, या बाबतींत जिल्हा माजिस्ट्रेटानें अधिकार दिलेल्या एखाद्या मुलकी किंवा पोलीस पाटलापुढें किंवा इतर इसमापुढें अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यानंतर, दोन रुपयांहून जास्त नाहीं इतक्या दंडास पात्र होतील, आणि जर असा अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यानंतर अशी कसूर चालू राहील तर, असा माजिस्ट्रेट, पाटील किंवा इसम यापुढें अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यानंतर, ज्या प्रत्येक

दिवशीं अशी कसूर चालू राहील किंवा पुन्हां करण्यांत येईल अशा प्रत्येक दिवसाबद्दल आठ आणे दंडासही पात्र होतील.

( २ ) कोणत्याही माजिस्ट्रेटानें, पाटलानें किंवा इसमानें ( १ ) ल्या पोटकलमाअन्वयेंच्या अपराधाचा इनसाफ हातीं घेणें तो, २० व्या कलमाअन्वयेंचा ज्यानें हुकूम केला असेल असा अधिकारी किंवा इसम यांची किंवा या बाबतींत सदरहू बोर्डानें अधिकार दिलेल्या कोणत्याही इसमाची फिर्याद आली असल्यावांचून घेतां कामा नये.

२२. ( १ ) सक्तीच्या शिक्षणास पात्र असलेल्या मुलास नोकरविर ठेवल्याबद्दल शिक्षा—जो कोणी मनुष्य ज्या कोणत्याही मुलाच्या संबंधानें १८ व्या कलमाचे ठराव लागू असतील त्या मुलाला अशा मुलाच्या योग्य शिक्षणास अडथळा होईल अशा रीतीनें, आपल्या स्वतःच्या वतीनें अथवा दुसऱ्या कोणत्याही मनुष्याच्या वतीनें जाणूनबुजून कामावर लावील तो मनुष्य त्याच्यावर माजिस्ट्रेटापुढें अपराधाच्या शाबितीचा ठराव झाला असतां पंचवीस रुपयांपेक्षां जास्त नाहीं इतक्या दंडास पात्र होईल.

( २ ) कोणत्याही कोर्टानें या कलमाअन्वयेंच्या कोणत्याही आपराधाचा इन्साफ हातीं घेणें तो स्कूल बोर्डाची अथवा स्कूल बोर्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह अंमलदाराची किंवा या बाबतींत सदरहू बोर्डानें किंवा अंमलदारानें अधिकार दिलेल्या कोणत्याही इसमाची फिर्याद आली असल्याशिवाय घेतां कामा नये, आणि कोणत्याही मनुष्याविरुद्ध या कलमाअन्वयें कोणतीही फिर्याद करण्यापूर्वी, स्कूल बोर्डानें अथवा स्कूल बोर्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह अमलदारानें किंवा अशा इसमानें सदरहू मनुष्यावर त्याच मुलासंबंधानें या कलमाअन्वयें पूर्वी अपराधाच्या शाबितीचा ठराव झालेला नसेल तर, अशा मनुष्याला ताकीद देवविली पाहिजे.

२३. ( १ ) दंडाची व्यवस्था कशी लावावयाची—जर मॅजिस्ट्रेट, पाटील किंवा इसम यांनीं २१ व्या किंवा २२ व्या कलमाअन्वयें लादलेला दंड भरण्यांत येईल, तर तो स्थानिक अधिकाऱ्याच्या नांवें जमा करण्यांत आला पाहिजे व सदरहू अधिकाऱ्यानें तो शिक्षणाच्या कारणांकडे लावला पाहिजे.

( २ ) जर असा दंड भरण्यांत न येईल, तर त्याची रकम स्थानिक अधिकाऱ्यानें, एखाद्या करासंबंधानें मागणी केलेल्या रकमेप्रमाणें त्याच रीतीनें वसूल केली पाहिजे.

२४. अपील—एखादा पाटील किंवा इसम यांपुढील २१ व्या कलमाअन्वयेंच्या अपराधाच्या शाबितीच्या ठरावावरील अपील, ज्यांत अपील करणारा राहत असेल असें शहर किंवा गांव यांत हुकमत असणाऱ्या अगदीं जवळच्या माजिस्ट्रेटाकडे चालेल.

२५. विशिष्ट वर्गास माफी देण्याचा अधिकार—सरकारास, मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून ह्या आक्टाच्या अंमलाची सक्तीच्या कोणत्याही क्षेत्रांतील किंवा त्याच्या भागांतील कोणत्याही विशिष्ट वर्गाच्या अथवा समाजाच्या मुलांस किंवा मुलींस माफी देण्याचा अधिकार आहे.

२६. (१) स्थानिक अधिकाऱ्याची कसूर—जर एखादा स्थानिकअधिकारी, तसें करण्यास त्यास सांगण्यांत आल्यावर, योजना तयार करण्यांत कसूर करील किंवा योजना मंजुर करण्यांत आल्यानंतर, मंजूर केल्याप्रमाणेंच्या योजनेस अनुसरून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबत पुरेशी तजवीज करण्याचें व अशी योजना अमलांत आणण्याचें किंवा अमलांत असण्याचें चालू ठेवण्याचें वर्जील, तर सरकारास योग्य चौकशी केल्यानंतर, प्रसंगाप्रमाणें सदर योजना तयार करण्याकरितां किंवा ती अंमलांत आणण्याकरितां किंवा अंमलांत असण्याचें चालू ठेवण्याकरितां एखादा इसम नेमण्याचा अधिकार आहे, व त्याबाबतचा खर्च सदरहू स्थानिक अधिकाऱ्यानें सरकारास दिला पाहिजे.

(२) जर सदरहू खर्च अशा रीतीनें देण्यांत येणार नाहीं, तर सरकारास सदर स्थानिक अधिकाऱ्याच्या वतीनें कोणताही पैसा त्या त्या वेळीं त्याचा बँकर म्हणून किंवा इतर कोणत्याही नात्यानें ज्याच्या कबज्यांत असेल अशा कोणत्याही इसमास, ज्याच्या हातीं असेल अशा किंवा वेळोवेळीं त्यास मिळेल अशा पैशांतून असा खर्च देण्याबद्दल हुकूम करून फर्माविण्याचा अधिकार आहे आणि असा इसम असा हुकूम पाळण्यास बांधलेला असेल.

२७. (१) कानू—सरकारास, मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून खालील गोष्टींबाबत नियमन करणाऱ्या कानू करण्याचा अधिकार आहे, म्हणजे—

(अ) स्थानिक अधिकारी, स्थानिक अधिकारी नसलेल्या म्युनिसिपालिट्या, स्कूल बोर्ड्स, आडमिनिस्ट्रेटिव्ह अमलदार यांनीं अधिकार चालविण्याबाबत व कर्तव्यें करण्याबाबत व शिक्षणाच्या बाबतींत सरकारच्या एज्युकेशनल डिपार्मेंटाशीं व परस्परांशीं असावयाचे त्यांचे संबंध याबाबत;

(ब) स्थानिक अधिकाऱ्यानें नोकरीस ठेवलेले शिकविणारे, तपासणी करणारे व देखरेख करणारे नोकरलोक यांचा यांस किंवा यांसाठीं कमाल व किमान पगार, पेनशन देणें किंवा प्राव्हिडंट फंडाची तजवीज, रजा देणें व नोकरीच्या इतर शर्ती यांबाबत;

(क) आक्टाअन्वयें ठरवावयाच्या गोष्टींबाबत.

(२) (१) ल्या पोट-कलमाअन्वयें केलेल्या कानू आगाऊ प्रसिद्ध केल्यानंतर केल्या पाहिजेत.

( ३ ) स्थानिक अधिकाऱ्यास वेळोवेळीं सरकारच्या मंजुरीनें ह्या आक्टाच्या व या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंच्या ठरावांस विसंगत नाहींत असे नियम, या आक्टाचे हेतु पार पाडण्यासाठीं करण्याचा अधिकार आहे. विशेषतः व सदरील ठरावांचे सामान्यतेस बाध न येतां, स्थानिक अधिकारी खालील गोष्टींबाबत नियम करण्यास मुखत्यार आहे, म्हणजेः—

[ अ ] प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमांत, स्थानिकगरजांस उपयुक्त अशा व्यावहारिक शिक्षणाचा अभ्यासाचा समावेश करणें;

( ब ) प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही वयाच्या मुलांस प्रयोगात्मक शास्त्रीय ज्ञान, मॉडेलिंग, सृष्टिज्ञान, हस्तकलाशिक्षण, गृहकृत्यांची माहिती धरून उद्योगधंदे शिकण्यापूर्वी लागणारें ज्ञान यांसंबंधीं शिक्षण देण्याबाबत;

( क ) प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही वयाच्या मुलांस शारीरिक व नैतिक शिक्षण देण्याबाबत;

( ड ) शिकविणारे, तपासणी करणारे व देखरेख करणारे नोकरलोक यांचा पगार व नोकरीच्या शर्ती ठरविण्याबाबत व प्राथमिक शाळांचा कारभार व व्यवस्था यांचें नियमन करण्याबाबत;

( इ ) प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही वयाच्या गरीब मुलांस बुकें, स्लेटी व शिकतांना लागणाऱ्या वस्तू हीं पुरविण्याबाबत;

( फ ) वरच्या प्राथमिक शिक्षणाचा भाग म्हणून उद्योगधंदे शिकण्यापूर्वी लागणाऱ्या ज्ञानाचा अभ्यासक्रम ठरविण्याबाबत,

२८. सन १९१८ चा मुंबईचा आक्ट १ला रद्द करणें—सन १९१८ चा मुंबईचा प्राथमिक शिक्षणाबाबत ( डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिट्यांसंबंधीं ) आक्ट हा यावरून रद्द केला आहेः

मात्र इतकेंच कीं, त्या आक्टाच्या ३ऱ्या कलमाअन्वयें ज्या कोणत्याही म्युनिसिपल डिस्ट्रिक्टांत जाहिरनामा काढण्यांत आलेला असेल तेथें या आक्टाचे ठराव जणूं सदरहू म्युनिसिपालिटी या आक्टांत वर्णन केलेल्या काम चालविण्याच्या रीतीस अनुसरून वागत आली असल्याप्रमाणें तो आक्ट रद्द झाल्याच्या तारखेपासून अंमलांत येतील.

# मुंबईच्या प्राथमिक शिक्षणाचे नियम.

शिक्षणखातें,

जंजिरे मुंबई, तारीख १० आक्टोबर १९२४ इसवी.

नंबर २५३४–(१) मुलकी खात्याच्या ७ जानेवारी १८८५ च्या ७८ नंबरच्या सरकारी जाहिरातीचा, लोकल बोर्डें आणि शिक्षणखातें यांचें शिक्षणाचे बाबतींत परस्परांचे संबंध नियमित करणाऱ्या नियमांस लागू पडणारा तेवढाच भाग. (२) १८ एप्रिल सन १९२१ ची शिक्षणखात्याची सरकारी जाहिरात नं. २०३३, आणि [३] २६ मे सन १९२२ ची जनरल डिपार्टमेंटची सरकारी जाहिरात नं. ५५ अ.—मुंबई डि. म्यु. आक्ट, १९०१ [ १९०१ चा ३ रा कायदा ], कलम ५८ मधील अट, मुंबई व्हिलेज पंचायत आक्ट, १९२० [ १९२० चा ९ वा कायदा ], कलम २०, पोटकलम २, मुंबई प्रायमरी एज्युकेशन अॅक्ट, १९२३ [ १९२३ चा ४ था कायदा ]. कलम २७, पोटकलम [१], मुंबई लो० बो० अॅक्ट, १९२३ [ १९२३ चा ६ वा कायदा ], कलम १३३ बाब [इ], या कायद्यांनीं दिलेल्या अधिकाराअन्वयें आणि सुरवातीस निर्दिष्ट केलेल्या सरकारी जाहिराती रद्द करून, म्युनिसिपालिट्या आणि डिस्ट्रिक्ट व तालुका लोकल बोर्डें यांच्या शिक्षणाचे बाबतींत स्वतंत्र अधिकाराची मर्यादा घालून देणारे, शिक्षणविषयक बाबतींत सरकारी शिक्षणखात्याशीं आणि परस्पराशीं त्यांचे संबंध आंखून देणारे, खेड्यांतील शाळांवरील पंचायतींची देखरेख या बाबतींतले आणि मुंबई प्रायमरी एज्युकेशन अॅक्ट, १९२३ [ १९२३ चा मुंबईचा ४ था कायदा ] याचें कलम २७, पोटकलम [१] याखालीं सांगितलेल्या बाबींची व्यवस्था लावणारे नियम मुंबई सरकारकडून करण्यांत येत आहेत ते असेः—

## प्रकरण १ लें.

### लोकल अॅथॉरिटीचे अधिकार व कामें.

१. संक्षिप्त नांव– ह्या नियमांस मुंबईच्या प्राथमिक शिक्षणाचे नियम, १९२४, असें नांव द्यावें.

२. व्याख्या–या नियमांमध्यें विषय अथवा संदर्भ यास बाध येत नसेल तर—

[अ] ‘ लोकल अॅथॉरिटी ’ म्हणजे आपल्या शाळांची व्यवस्था पाहण्याचा सरकारांतून ज्यांस अधिकार मिळालेला आहे असें डि. लोकल बोर्ड अथवा म्युनिसिपालिटी;

[ब] 'कायदा' म्हणजे मुंबईचा सन १९२३ चा प्राथमिक शिक्षणाचा कायदा ( मुंबई प्रायमरी एज्युकेशन आक्ट, सन १९२३ );

[क] पसंत केलेली शाळा–' पसंत केलेली शाळा ' म्हणजे ज्या शाळेंत अथवा ज्या एखाद्या शाळेच्या भागांत खालच्या प्रतीचें प्राथमिक शिक्षण देण्यांत येतें, आणि जी मुंबई प्रायमरी एज्युकेशन आक्ट, कलम ३ अन्वयें प्रस्थापित झालेल्या स्कूल बोर्डांकडून अथवा पसंती नाकारणाऱ्या स्कूल बोर्डाच्या निर्णयाविरुद्ध अपील केल्यावरून सरकाराकडून त्या वेळेपुरती पसंत केलेली असेल ती;

[ड] ' मागसलेले ' आणि ' खालचे [ डिप्रेस्ड ] वर्ग ' याचा अर्थ शेडयूल अ मध्यें या नांवानें संबोधिलेले वर्ग असा होईल आणि सरकार लोकल ॲथॉरिटीच्या संमतीनें वेळोवेळीं ज्याचा मागसलेले आणि खालचे वर्ग असा निर्देश करील त्याचा त्यांत समावेश होईल.

[इ] ट्रेंड शिक्षक म्हणजे सरकारी प्राथमिक ट्रेनिंग संस्थेचा दाखला, अथवा सरकाराकडून वेळोवेळीं मान्य केला जाईल असा तशा प्रकारचा दुसरा दाखला, ज्याजवळ आहे असा शिक्षक.

३. (१) प्राथमिक शाळा चालविणें–लोकल ॲथॉरिटी पुरेशा प्राथमिक शाळा चालवील, आणि जातीच्या सबबीवर कोणाहि विद्यार्थ्यास प्राथमिक शिक्षण घेण्याची मनाई राहणार नाहीं.

(२) स्थानिक देशभाषेंतून ज्या शाळांत शिक्षण देण्यांत येतें अशा शाळांखेरीज, स्थानिक देशभाषेखेरीज इलाख्याच्या मान्य असलेल्या इतर देशभाषा म्हणजे मराठी, गुजराथी, कानडी, सिंधी, उर्दू यांपैकीं एखादी देशभाषा बोलणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरितांहि, शक्य असल्यास, शाळा ठेवण्याची तजवीज लोकल ॲथॉरिटीनें करावी; आणि ज्या हद्दींत सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू केलें आहे तेथें साधारणतः कायम वस्ती करून राहणाऱ्या पालकांची आपल्या मुलांस अशा देशभाषेंतून शिक्षण मिळावें अशी इच्छा असेल, आणि अशा विद्यार्थ्यांची संख्या २५ पेक्षां कमी नसेल, आणि त्या क्षेत्रांत अशा देशभाषेंतून शिक्षण देणारी पसंत असलेली दुसरी एखादी शाळा नसेल, तर लोकल ॲथॉरिटीनें अशा शाळा काढाव्यात. परन्तु विशिष्ट प्रसंगीं लोकल ॲथॉरिटीस या पोटनियमांच्या अंमलबजावणीची सरकारांतून कदाचित् माफी मिळेल.

इलाख्यांतील कोणतीहि मान्य असलेली देशभाषा न बोलणाऱ्या हिंदी खिस्ती लोकांकरितां इंग्रजी ही देशभाषा समजण्यास हरकत नाहीं.

(३) [अ] मुसलमान, मागसलेले व खालचे वर्ग यांच्या गरजांकडे लोकल ॲथॉरिटीनें विशेष लक्ष द्यावें, आणि स्वतंत्र शाळा काढून, शिष्यवृत्त्या ठेवून,

अथवा शिक्षकांच्या धंद्यांचें शिक्षण देऊन आणि त्यांस शिक्षकांचे कामावर नेमून अशा वर्गांसाठीं विशेष तजवीज करावी.

[ब] अशा वर्गांना [ पूर्वींच दिलेल्या ] विशेष सवलती, उदाहरणार्थ, मुसलमान व मागसलेले वर्ग यांचेसाठीं मध्यवर्ती शाळा, खालच्या वर्गांसाठीं शिष्यवृत्त्या, आणि अशाच प्रकारच्या ज्या कित्येक योजनांकरितां सरकारनें विशेष देणग्या दिलेल्या आहेत व ज्या देणग्या कायद्याच्या १३ (२) या कलमाअन्वयें लोकल ॲथॉरिटीस द्यावयाच्या वार्षिक देणगींत समाविष्ट झाल्या आहेत, त्या लोकल ॲथॉरिटीनें चालू ठेविल्या पाहिजेत.

[४] अगदीं खालच्या प्रतीच्या प्राथमिक शिक्षणाखेरीज इतर, म्हणजे चौथ्या इयत्तेवरील शिक्षणाचीहि योग्य ती तरतूद लोकल ॲथॉरिटीनें करावी.

४. [१] कामदार मंडळींची नेमणूक—कारभार पाहणारे, देखरेख ठेवणारे, तपासणी करणारे आणि शिक्षण देणारे असे कामदार लोकल ॲथॉरिटीनें पुरेसे कामावर नेमून घेतले पाहिजेत. साधारणपणें अशा सर्व कामदारांचे पगार व नेमणुकीच्या अटी, या नियमांच्याअन्वयें आणि कायद्याचें कलम २७ [३] [ड] याअन्वयें लोकल ॲथॉरिटीनें केलेल्या पोटनियमांप्रमाणें ठरविण्यांत येतील.

[२] अशा रीतीनें कामावर घेतलेले सर्व अधिकारी, शिक्षक, कारकून आणि हलके नोकर यांच्या नेमणुका स्कूल बोर्डाकडून होतील, आणि कायदा अथवा कायद्याखालीं केलेले नियम यांअन्वयें स्कूल बोर्डाचे अधिकार ज्या बाबतींत मर्यादित केले असतील त्या वगळून इतर बाबतींत त्यांनीं त्या मंडळाच्या ताब्यांत राहिलें पाहिजे व त्यांचे हुकुम मान्य केले पाहिजेत.

**स्पष्टीकरण**—" अधिकारी " या शब्दांत कारभार पाहणारे, देखरेख करणारे, तपासणी करणारे कामदार यांचा समावेश होईल.

५. [१] रजा व पेन्शनें यांबाबत सरकारांत जमा करावयाचा भरणा—सरकारकडून मागून घेतलेले अगर घेतले जाणारे अधिकारी व कारकून यांच्या रजा व पेन्शनें या बाबतींत भरावयाच्या रकमा लोकल ॲथॉरिटीनें भरल्या पाहिजेत.

[२] " कायद्याच्या कलम ८ [१] प्रमाणें ताब्यांत घेतलेल्या व कामावर लाविलेल्या प्राथमिक शिक्षकांस ताब्यांत घेतल्याच्या व कामावर लाविल्याच्या तारखेपासून पेंशन देण्याची योग्य तजवीज लोकल ॲथॉरिटी करील. परंतु ज्याची नोकरी १० वर्षांहून अधिक झाली नाहीं अशा शिक्षकांचे बाबतींत पेंशनाचेऐवजीं, त्यासंबंधीं सरकारनें मंजूर केलेल्या नियमांअन्वयें चाललेल्या प्रॉव्हिडंट फंडाचे, किंवा वर नमूद केलेल्या तारखेनंतर नेमून घेतलेले शिक्षक किंवा शिक्षणाचे कामासाठीं ठेविलेल्या एस्टॅब्लिशमेंटवरील इतर इसम, यांच्या फायद्यासाठीं त्यासंबंधीं सरकारनें मंजूर केलेल्या नियमांअन्वयें स्थापन होणाऱ्या प्रॉव्हि

डंट फंडाचे वर्गणीदार होण्याची मुभा सरकारची आगाऊ मंजुरी घेऊन लोकल ॲथॉरिटीनें ठेविली पाहिजे.

अशीं पेन्शनें देण्याची तरतूद, सरकार वेळोवेळीं ठरवील त्याप्रमाणें पेन्शन-बाबत रकम सरकारांत भरून अथवा पेन्शनफंड स्थापन करून करावी. पेन्शनफंडाची स्थापना करण्यास मंजुरी दिली असेल तेथें सरकार ठरवील त्या मुदतीनें आणि दरानें लोकल ॲथॉरिटीनें त्या फंडांत रकमेची भरपाई केली पाहिजे.

६. ट्रेंडशिक्षकांचा पुरवठा–ट्रेंड शिक्षकांचा भरपूर पुरवठा करण्यासाठीं सरकारी ट्रेनिंग संस्थांत पगार देऊन अथवा अन्य तऱ्हेनें योग्य ती तजवीज लोकल ॲथॉरिटीनें करावी.

७. शाळांकरितां इमारती व सामान यांची तरतूद–लोकल ॲथॉरिटीनें आपण चालविलेल्या शाळांकरितां अवश्य लागणाऱ्या इमारती व सामान यांची तरतूद करावी.

८. इतर खर्च देणें–कायद्याअन्वयें लोकल ॲथॉरिटीच्या शिरावर जी जबाबदारी पडते ती योग्य आणि परिणामकारक प्रकारें पार पाडण्यासाठीं प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत जो इतर खर्च बसेल तो तीस द्यावा लागेल.

९. ग्रँट देणें—आपल्या ताब्यांत असलेल्या हद्दींतील आणि लोकल ॲथॉरिटी डि० लो० बो० असेल तर, लोकल ॲथॉरिटी नसलेल्या म्युनिसिपालिटीच्या ताब्यांतील कोणत्याही हद्दींतील, पसंत केलेल्या प्राथमिक शाळांस त्यांनीं केलेल्या अर्जावरून त्यांस मदतीदाखल ( नियम ८६ मधील अट लक्षांत ठेवून ) द्यावयाच्या देणग्या स्कूल बोर्डामार्फत पावत्या करण्याची तरतूद लोकल ॲथॉरिटीनें केली पाहिजे.

१०. सक्तीच्या क्षेत्रांत प्राथमिक शिक्षण मोफत देण्याची तजवीज—सक्तीच्या क्षेत्रांत लोकल ॲथॉरिटीनें कायद्याच्या अमलांत येणाऱ्या सर्व मुलांस मोफत प्राथमिक शिक्षण मिळण्याची योग्य सोय केली पाहिजे.

११. डायरेक्टर ऑफ प० इ० यांजकडे स्थितिदर्शक माहितीचा आंकडेवार तपशील पाठविणें—लोकल ॲथॉरिटीनें स्कूल बोर्डाचें वार्षिक अंदाजपत्रक आणि त्याच्या सर्व वार्षिक जमाखर्चाचे तक्ते डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांजकडे पाठविले पाहिजेत.

१२. अधिकारसमर्पण—लोकल ॲथॉरिटीला आपले अधिकार अथवा कामें यांपैकीं कांहीं स्कूल बोर्डाकडे सोंपविण्यास हरकत नाहीं. मात्र अशा बाबतींत अंदाजपत्रकांत मंजूर असलेल्या रकमेपेक्षां जास्त खर्चाची अथवा पुढील वर्षांत लोकल ॲथॉरिटीवर अधिक खर्चाचा बोजा पाडणारी कोणतीही गोष्ट लोकल ॲथॉरिटीची प्रथम मंजुरी घेतल्याशिवाय स्कूल बोर्डानें करितां कामा नये.

# प्रकरण २ रें

## स्कूल बोर्ड.

### अ.—स्कूल बोर्डाची निवड.

१३. सभासदांची नालायकी—लोकल ॲथॉरिटी जर डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड असेल तर कोणाही इसमास तो त्या जिल्ह्यांत साधारणतः रहाणारा नसेल आणि मुंबई लोकल बोर्ड ॲक्ट, सन १९२३, कलम ९ याअन्वयें तो डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचा सभासद होण्यास नालायक ठरला असेल तर, आणि लोकल ॲथॉरिटी म्युनिसिपालिटी असेल तर तो म्युनिसिपालिटीच्या हद्दींत साधारणतः रहाणारा नसेल आणि मुं० डि० म्यु० ॲ० १९०१, कलम १५ अन्वयें म्युनिसिपालिटीचा सभासद होण्यास नालायक असेल, तर त्याला त्या लोकल ॲथॉरिटीच्या स्कूल बोर्डांत सभासद होतां येणार नाहीं. पण या मागाहून उल्लेखिलेल्या कायद्याचें कलम १५, पोट-कलम १ मधील बाब (सी) यांतील कोणत्याही गोष्टीनें बाध येत असला तरी केवळ स्त्री म्हणून कोणतीही स्त्री स्कूल बोर्डाची सभासद होण्यास नालायक ठरणार नाहीं.

१४. स्कूल बोर्डाची घटना—स्कूल बोर्डाची घटना या नियमांस जोडलेल्या व परिशिष्टांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें असेल.

१५. स्कूल बोर्डाची निवड—स्कूल बोर्डाचा अधिकार चालू होण्याची तारीख कायद्याचे कलम ४ (१) प्रमाणें सरकारांतून जाहीर झाल्यानंतर शक्य तितकें लौकर लोकल ॲथॉरिटीनें स्कूल बोर्डाची निवड करण्याची तजवीज करावी.

आपल्या शाळांची व्यवस्था पाहण्याचा अधिकार असलेल्या एकाद्या नवीन डि० लो० बोर्डाची अथवा म्युनिसिपालिटीची घटना होतांच त्यांनीं आपल्या बैठकींत स्कूल बोर्डाची निवड करावी.

टीपः—स्कूल बोर्डाच्या निवडणुकीचे नमुन्याचे नियम शेड्यूल (क) मध्यें दिले आहेत.

१६. मध्यंतरी झालेल्या रिकाम्या जागा—एकाद्या सभासदाची जागा एकाएकीं रिकामी पडल्यास, तो ज्या वर्गाचा अथवा संस्थेचा प्रतिनिधी असेल व ज्या रीतीनें म्हणजे निवडणुकीनें अगर नेमणुकीनें तो सभासद झाला असेल, त्याच वर्गाचा अथवा संस्थेचा प्रतिनिधी म्हणून व त्याच रीतीनें ती जागा भरली जावी.

### ब.—स्कूल बोर्डाच्या निवडणुकीची पद्धति.

१७. स्कूल बोर्डाच्या निवडणुकीची पद्धति—लोकल ॲथॉरिटीनें स्कूल बोर्डाच्या सभासदांची निवडणूक पुढें दिलेल्या पद्धतीप्रमाणें करावीः—

(१) खालीं नमूद केलेल्या विशेष हितसंबंधाचे प्रतिनिधी म्हणून जे सभासद निवडावयाचे ते जरी लोकल ॲथॉरिटीचे सभासद नसले, तरी असे सभासद मिळण्यासारखे असतील तर त्यांची निवड पुढें दिलेल्या पद्धतीप्रमाणें प्रथम पृथक्पणें केली पाहिजे.

(१) शिक्षणानुभवी इसमः स्पष्टीकरणः—

(अ) जर एकादा इसम कमींत कमी १० वर्षे सरकारी शिक्षण खात्याचा अधिकारी असेल, अथवा

(ब) जर तो सरकारनें चालविलेल्या, मदत दिलेल्या, किंवा मान्य केलेल्या, अथवा लोकल ॲथॉरिटीनें पसंत केलेल्या, शाळेंत कमींत कमी १० वर्षे चालक किंवा शिक्षक असेल, अथवा

(क) कमींत कमी ५ वर्षे लोकल ॲथॉरिटीच्या स्कूल बोर्डाचा ॲड-मिनिस्टेटिव्ह ऑफिसर असेल,

तर तो शिक्षणानुभवी इसम समजला जाईल.

[२] स्त्रिया;

[३] अल्पसंख्याक वर्गाचे प्रतिनिधीः एकाहून अधिक अल्पसंख्याक वर्गाचे प्रतिनिधी निवडावयाचे असतील तर अशा प्रत्येक वर्गाचे प्रतिनिधी वेग-वेगळे निवडावे;

[४] मागसलेल्या वर्गाचे प्रतिनिधी;

[५] खालच्या वर्गाचे प्रतिनिधी;

[६] डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डातून निवडणुकी करावयाच्या असतील तेव्हां फक्त ज्या म्युनिसिपालिट्या लोकल ॲथॉरिटीज नसतील त्यांचे प्रतिनिधी.

[२]वर सांगितलेल्या प्रत्येक सदराखालच्या सभासदांची निवडणुक खालीं सांगितलेल्या रीतीनें लोकल ॲथॉरिटीनें करावीः—

निवडणुकीचे नियम—रिकाम्या जागांपेक्षां जर निवडणुकीस उभे राहि-लेले उमेदवार अधिक असतील तर, मतें घेण्याकरितां गुप्त चिठ्ठ्यांचा उपयोग करण्यांत येईल. आणि लोकल ॲथॉरिटीच्या सभासदांपैकीं सभेस हजर असलेल्या प्रत्येक इसमास रिकाम्या जागाच्या संख्येइतकीं मतें देण्याचा अधिकार राहील, व त्याला कोणत्याही उमेदवारास एक किंवा अधिक मतें देतां येतील. ज्याला सर्वांत अधिक मतें मिळतील तो उमेदवार निवडला जाईल. एकाच जागेकरितां उभे राहिलेल्या उमेदवारांपैकीं दोघांस अथवा दोहोंपेक्षां अधिक उमेदवारांस सारखीं मतें मिळालीं, तर चिठ्ठ्या टाकून निवडणूक केली जाईल. नंतर बाकीच्या सभासदांची निवड वर सांगितलेल्या पद्धतीनें लोकल ॲथॉरिटीनें करावी. वर निर्दिष्ट केलेल्या विशिष्ट वर्गातील जे इसम लोकल ॲथॉरिटीचे सभासद असून

त्या त्या वर्गाचे प्रतिनिधी म्हणून जरी निवडून आले नसतील, तरी स्कूल बोर्डाचे सामान्य सभासद म्हणून त्यांची निवड होण्यास प्रतिबंध नाहीं.

१८. स्त्रियांच्या ऐवजीं निवडणूक—स्कूल बोर्डांत काम करण्यास कोणीही स्त्री पात्र अथवा कबूल नसेल, तर तिच्याऐवजीं मुलींच्या शाळांच्या व्यवस्थेसंबंधीं प्रत्यक्ष अनुभव असलेल्या कोणत्याही पुरुषाची निवड करतां येईल.

१९. म्युनिसिपालिटीच्या प्रतिनिधींची निवडणूक—जिल्ह्यामध्यें लोकल ॲथॉरिटी नसलेल्या म्युनिसिपालिट्यांच्या प्रतिनिधींची निवड करतांना लोकल ॲथॉरिटीनें प्रथम त्या म्युनिसिपालिट्यांचा सल्ला घ्यावा.

अशा रीतीनें निवडून देण्याच्या प्रतिनिधींच्या संख्येपेक्षां एकाद्या जिल्ह्यांत अशा म्युनिसिपालिट्यांची संख्या अधिक असेल, तेव्हां प्रथम म्युनिसिपालिटीचे सभासद निवडून देण्याच्या पाळ्यांचा अनुक्रम दर्शविणारा तक्ता तयार करावा.

२०. निवडून आलेल्या सभासदांचीं नांवें कळविणें आणि जाहीर करणें ही निवड झाल्यानंतर लगेच स्कूल बोर्डाचे सभासद म्हणून निवडून आलेल्या इसमांचीं नांवें, डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांच्या मार्फत लोकल ॲथॉरिटीनें सरकारांत कळविलीं पाहिजेत. निवडून आलेल्या सभासदांचीं आणि कोणी सरकार-नियुक्त असतील तर त्या सभासदांचीं नांवें मुंबई सरकारचें गॅझेट किंवा सिंधचें सरकारी गॅझेट यांपैकीं जरूर असेल त्यांत प्रसिद्ध करावीं.

## क.—चेअरमन आणि व्हाईस-चेअरमन.

### स्कूल बोर्डानें आपला चेअरमन बोर्डाच्या सभासदांतून निवडावा.

२१. चेअरमन व व्हाईस चेअरमन यांची निवडणूक—स्कूल बोर्डाची पहिली बैठक लोकल ॲथॉरिटीच्या अध्यक्षानें भरविली पाहिजे. तें बोर्ड आपल्या पहिल्या बैठकीसच आपल्या सभासदांतून चेअरमन व व्हाईस चेअरमन यांची निवडणूक करील, व त्यांच्या अधिकाराची मुदत बोर्डाच्या मुदतीइतकीच राहील. यांपैकीं कोणी जर आपल्या जागेचा राजीनामा देईल, अगर बोर्डाचा सभासद रहाणार नाहीं तर त्या जागेसाठीं नवी निवडणूक केली जाईल.

२२. सरकारी नोकर निवडणूकीस अपात्र—सरकारचा पगारी नोकर स्कूल बोर्डाचा चेअरमन अथवा व्हाईस चेअरमन म्हणून निवडतां कामा नये.

सूचना—‘ सरकारचा पगारी नोकर ’ या संज्ञेंत पेनशन मिळत असलेल्या रिटायर्ड सरकारी नोकराचा किंवा सरकारकडून पगार किंवा फी मिळत असलेल्या पण सरकारचा पूर्ण वेळ नोकर नसलेल्या इसमाचा समावेश होत नाहीं.

२३. चेअरमनचीं कामें—स्कूल बोर्डाचा चेअरमन हा ( अ )बोर्डाच्या सभांच्या वेळीं अध्यक्ष होईल; ( ब ) बोर्डाच्या पैशासंबंधाच्या बाबतींत व प्रत्यक्ष

कामकाजावर देखरेख करील; ( क ) विशेष अडचणीच्या प्रसंगीं ज्या गोष्टी त्यास करणें अवश्य वाटेल त्या करील; मात्र या गोष्टी कायदा व त्याखालील नियम यांस विरुद्ध असतां कामा नयेत, आणि या गोष्टी व त्यांसंबंधीं कारणें याबद्दलचा रिपोर्ट त्यानें बोर्डाकडे लगेच केला पाहिजे.

२४. व्हाईस चेअरमनचीं कामें—स्कूल बोर्डाचा व्हाईस चेअरमन हा ( अ ) चेअरमनच्या गैरहजेरींत बोर्डाच्या सभांच्या वेळीं अध्यक्ष होईल; ( ब ) चेअरमननें आपल्या कामांपैकीं त्याकडे वेळोवेळीं सोंपविलेलीं कामें करील; आणि ( क ) चेअरमनची निवडणूक होईपर्यंत, अगर चेअरमन रजेवर असल्यास त्याच्या गैरहजेरींत, चेअरमनचीं कामें करील.

२५. चेअरमन, व्हाईस चेअरमन, अगर सभासद रजेशिवाय गैरहजर राहाण्याचा परिणाम—जर चेअरमन अगर व्हाईस चेअरमन बोर्डानें मंजूर केलेल्या रजेवांचून बोर्डाच्या लागोपाठ भरलेल्या तीन साधारण बैठकींस गैरहजर राहील, तर त्याचा अधिकार कमी होईल. तसेंच एकादा सभासद बोर्डानें मंजूर केलेल्या रजेवांचून बोर्डाच्या लागोपाठ असलेल्या तीन साधारण बैठकींस गैरहजर राहील, तर त्याचा सभासत्वाचा हक्क कमी होईल.

## ड.:—स्कूल बोर्डाचें कामकाज चालविण्याची पद्धति.

२६. स्कूल बोर्डाच्या बैठकीः—नेहमींच्या कामांचा निकाल लावण्याकरितां स्कूल बोर्डाची बैठक दर महिन्यांतून निदान एकदां झाली पाहिजे. परंतु जेव्हां एक-तृतीयांशाहून कमी नाहींत इतके सभासद लेखी विनंती करतील तेव्हां किंवा चेअरमनला योग्य वाटेल तेव्हां, स्कूल बोर्डानें ठरविलेल्या मुदतीच्या आंतील तारखेस जादा सभा त्यानें बोलाविली पाहिजे.

२७. बोर्डानें नियम करणें—सभांच्या बैठकी भरविण्यासंबंधानें द्याव_ याच्या सूचनांची मुदत, बैठकींची जागा, दिवस व वेळ नक्की ठरविणें, कोरम होण्यास लागणारी सभासदांची अवश्य संख्या, कामकाज चालविण्याची पद्धति, सभा चालविणें, त्यांची व्यवस्था व तहकुबी, सभेंत झालेल्या कामकाजाची नोंद करणें, आणि सामान्यतः कामाची व्यवस्था करणें, उदाहरणार्थ, सभेपुढें याव-याच्या सूचना सभासदांत फिरविणें, यांबाबतींत स्कूल बोर्डानें कायदा व त्याखालीं येणारे नियम यांशीं विसंगत नसतील असे नियम वेळोवेळीं करावेत.

२८. बैठकीस हजर राहण्याविषयीं ए. इन्स्पेक्टरांस बोलावण्याचा बोर्डाचा अधिकार—जर एज्यु० इन्स्पेक्टर यानें एकाद्या सभेला हजर असणें इष्ट आहे असें स्कूल बोर्डाला वाटेल, तर त्या सभेस हजर राहण्याविषयीं त्यानें निमंत्रण करावें; आणि या बाबतींत पुरेशी अगाऊ सूचना मिळाली असल्यास अजा-

रीपणाची अडचण अगर दुसरें योग्य कारण नसेल तर बैठकीस हजर राहणें त्यास जरूर आहे. इन्स्पेक्टरांस स्वतः हजर राहतां येत नसेल तर, शक्य असल्यास, त्यानें आपल्यातर्फे एक प्रतिनिधी पाठवावा.

२९. बैठकी सर्वांना मोकळ्या—एकाद्या प्रश्नावर चर्चा गुप्तपणें चालली पाहिजे असा निर्णय बैठकीच्या अध्यक्षानें दिला नसेल तेव्हां स्कूल बोर्डाच्या बैठकी सर्वांस खुल्या असतील.

३०. बैठकींत झालेल्या कामकाजाचे नोंदीचे कागद पाहण्यासाठीं मोकळे ठेवणें—स्कूल बोर्डाच्या बैठकीच्या वेळीं झालेल्या कामकाजाच्या नोंदीचे कागद स्कूल बोर्डाचे अथवा लोकल ॲथॉरिटीचे सभासदांस किंवा सरकारी शिक्षण खात्याचे गॅझेटेड अधिकाऱ्यास अथवा अशा गॅझेटेड अधिकाऱ्यानें आपल्या वतीनें लेखी अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास तपासण्यास कोणत्याही योग्य वेळीं उपलब्ध झाले पाहिजेत. ह्या कागदांची नक्कल लोकल ॲथॉरिटीकडे पाठविली पाहिजे. स्कूल बोर्डाच्या खासगी चर्चेच्या वेळीं पास झालेल्या ठरावांशिवाय इतर सर्व ठराव स्कूल बोर्डाच्या ऑफिसांत अगर जवळपास असलेल्या प्रमुख जागीं त्यांची एक प्रत डकवून शक्य तितके लौकर प्रसिद्ध केले पाहिजेत.

३१. विशिष्ट प्रसंगीं सभासदांना द्यावयाचा वाटखर्चाबद्दल भत्ता— जर जिल्हा लोकल बोर्ड हें लोकल ॲथॉरिटी असेल तर स्कूल बोर्डाच्या सभासदांना बोर्डाच्या कामाकरितां करावयास लागलेल्या प्रवासाच्या खर्चाबद्दल जिल्हा लोकल बोर्डाच्या सभासदाच्या स्केलाप्रमाणें या बाबतींत मुंबई लो० बो० १९२३ च्या कायद्याच्या कलम ५० (आय) खालीं केलेल्या नियमांस अनुसरून भत्ता मिळेल.

३२. प्राथमिक शाळांच्या बाबतींत स्कूल बोर्डाची जबाबदारी.—जर लोकल ॲथॉरिटी हें डि० लो० बोर्ड असेल तर ज्या म्युनिसिपालिटया लोकल ॲथॉरिटी नसतील त्यांच्या शाळा व लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या सर्व प्राथमिक शाळा यांची व्यवस्था व ताबा यासंबंधानें स्कूल बोर्ड हे, कायद्यांतील कलमें व हे नियम यांस अनुसरून जबाबदार राहील.

३३. (अ) (१) बोर्डानें योजना तयार करणें. स्कूल बोर्डानें कायद्याच्या १० व्या कलमाप्रमाणें लोकल ॲथॉरिटीनें सरकारकडे पाठवावयाची योजना तयार केली पाहिजे.

(२) स्कूल बोर्डानें सक्तीबरोबरच लोकांच्या खुषीनें प्राथमिक शिक्षणाचा प्रसार कसा करावा याविषयींची योजनाही करावी.

( ब ) एकादी योजना फेरफार करून अगर फेरफार न करितां लोकल ॲथॉरिटीनें व सरकारनें मंजूर केल्यानंतर त्या योजनेंतील व्यवस्था सालोसाल अमलांत आणणें स्कूल बोर्डाचें कर्तव्य आहे. मात्र ह्या कामीं अंदाजपत्रकांत नमूद केलेल्या रकमेपेक्षां जास्त खर्च होतां कामा नये.

( क ) नवीन शाळा कोठें सुरू करावयाच्या हें ठरविण्याचे बाबतींत स्कूल बोर्डानें जिल्ह्यांतील तालुका लोकल बोर्ड आणि लोकल ॲथॉरिटी नसलेल्या म्युनिसिपालिटया यांच्या मतांचा योग्य तो विचार केला पाहिजे.

३४. स्कूल बोर्डाचे अधिकार.—कायद्याच्या २७ ( ३ ) ( ड ) कलमाखालीं लोकल ॲथॉरिटीनें केलेले कानू आणि हे नियम यांस विरोध न येतां स्कूल बोर्ड हें खालीं दिलेले अधिकार चालवील:—

( अ ) ॲड० ऑफिसरशिवाय इतर कारभार पाहणारे, देखरेख करणारे व तपासणी करणारे कामगार, कारकून आणि अटेंडन्स ऑफिसर, यांच्या आणि त्याचप्रमाणें ॲड० ऑफिसरकडून ज्यांची नेमणूक होते त्यांखेरीज इतर शिक्षकांच्या नेमणुका करणें;

( ब ) कारभार पाहणारे व तपासणी करणारे कामगार आणि कारकून यांस ( किरकोळ रजेशिवाय इतर ) रजा देणें, व त्यांच्या कामासाठीं तात्पुरत्या नेमणुका करणें;

( क ) ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरवांचून कोणताही अधिकारी अथवा कारकून यांस पूर्ण चौकशीनंतर शिक्षा करणें, व अक्षम्य गैरवर्तन किंवा अत्यंत नालायकी याबद्दल बडतर्फ करणें; मात्र या शिक्षेवर हा अधिकारी किंवा कारकून यास लोकल ॲथॉरिटीकडे अपील करण्याचा हक्क राहील; व हा अधिकारी किंवा कारकून [ सरकारी नोकर असून ] सरकारकडून मागून घेतला असेल तर त्यास बडतर्फ करण्यापूर्वी सरकारची अगाऊ मंजुरी घेतली पाहिजे;

( ड ) ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरवांचून जो अधिकारी अथवा कारकून सरकाराकडून मागून घेतला असेल त्यास कमी करणें; मात्र त्याबद्दल सरकारास ६ महिने अगाऊ सूचना दिली असली पाहिजे;

( इ ) कायदा अमलांत आल्यानंतर नेमिलेल्या कोणाही शिक्षकास अक्षम्य गैरवर्तन अगर अत्यंत नालायकी यांबद्दल पूर्ण चौकशीनंतर बडतर्फ करणें; मात्र बडतर्फीविरुद्ध लोकल ॲथॉरटीकडे अपील करण्याचा हक्क अशा शिक्षकास आहे.

( फ ) तसें करणें जरूर वाटेल तेव्हां कायद्याच्या ८ ( १ ) कलमाखालीं मागून घेतलेल्या शिक्षकांस बडतर्फ करण्याबद्दल लोकल ॲथॉरिटीला शिफारस करणें.

स्पष्टीकरण---कोणताही अधिकारी, कारकून अथवा शिक्षक बडतर्फ झाला असतां त्यास मिळणारे पेन्शनाचा सर्व अथवा कांहीं भाग अथवा लोकल ॲथॉरिटीनें प्रॉव्हिडंट फंडास त्याचेकरितां भरलेली रक्कम यास तो मुकण्यास पात्र आहे.

३५. स्कूल बोर्ड खालीं दिलेलीं कामें करीलः---

( अ ) स्कूल बोर्डाचीं कामें.---स्थानिक स्कूल कमिटया असल्यास त्यांच्या सल्यानें शाळेचे तास, सुटयांची संख्या व त्यांची मुदत हीं ठरविणें.

( ब ) जर एकाहून अधिक अभ्याक्रम सरकारनें ठरविले असतील तर कोणता अभ्यासक्रम चालवावयाचा हें निश्चित करणें, अभ्यासक्रमांत जरूर ते फेरफार सुचविणें, व सरकारनें मंजूर केलेल्या पुस्तकांच्या यादींतून किंवा सरकारच्या पसंतीनें दुसऱ्या पुस्तकांतून लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या शाळांतून चालविण्याचीं क्रमिक पुस्तकें पसंत करणें;

( क ) पुस्तकें व सामान पुरविण्याबद्दचीं टेंडरें मंजूर करणें.

३६. स्कूल बोर्ड खालीं नमूद केलेलीं कामें करीलः---

[अ] कायद्याचीं १८, २० आणि २२ कलमें यांतलि सक्तीसंबंधाच्या नियमांची अमलबजावणी करणें;

[ब] ज्या मुलासाठीं पसंत केलेल्या शाळेंत जाण्याची माफी मागितली आहे त्यास मिळणारें शिक्षण लायक आहे कीं नाहीं हें ठरविणें, व ज्या मुलाचें प्राथमिक शिक्षण पूर्ण झालें आहे या मुद्यावर कायद्याच्या १९ (ब) कलमाखालीं शाळेंत जाण्याची माफी मागितली आहे त्याची परीक्षा घेण्याची व्यवस्था करणें;

(क) कायद्याच्या १९ (क) कलमाखालीं सरकारनें ठरवावयाचे अंतरासंबंधानें सरकारास शिफारस करणें.

३७. शाळांची तपासणी इ. यांविषयीं स्कूल बोर्डानें नियम करणेंः---लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या शाळांची तपासणी व वार्षिक परीक्षा व पसंत केलेल्या शाळांतील चौथ्या इयत्तेची तपासणी व परीक्षा यांसंबंधानें स्कूल बोर्डानें व्यवस्था केली पाहिजे; आणि नियमांस अनुसरून पसंत केलेल्या शाळांना ग्रँट दिली पाहिजे. चौथ्या इयत्तेच्या वार्षिक परिक्षेची तारीख त्या तारखेपूर्वी एक महिना आगाऊ सरकारी इन्स्पेक्टिंग ऑफिसरास कळविली पाहिजे.

३८. शिक्षणाच्या योजना बोर्डानें तयार करणेंः---कायद्याचें कलम २७ (१) (अ) (ब) (क) (फ) यांत नमूद केलेल्या शिक्षणाच्या विषयांपैकीं एकादा विषय सुरू करण्याची लोकल ॲथॉरिटीची इच्छा असल्यास, त्या विषयाच्या शिक्षणासंबंधानें अवश्य त्या योजना स्कूल बोर्डानें कराव्या.

३९. प्राथमिक शाळांहून अन्य शाळांची व्यवस्थाः—प्राथमिक शाळांशिवाय ज्या शिक्षणविषयक संस्था लोकल ॲथॉरिटीनें त्याच्या ताब्यांत दिल्या असतील त्यांची व्यवस्था स्कूल बोर्डानें केली पाहिजे. प्रौढ स्त्रीपुरुषांच्या म्हणजे मागेंच शाळा सोडलेल्या जुन्या विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रश्नाचा स्कूल बोर्डानें विचार केला पाहिजे, व ह्या बाबतींत जरूर दिसतील त्या सूचना लोकल ॲथॉरिटीस केल्या पाहिजेत.

४०. अधिकार-समर्पणः—स्कूल बोर्ड हे आपले अधिकार व कामें यांपैकीं कांहीं आपल्या हाताखालील कोणत्याहि अधिकाऱ्याकडे सोंपवूं शकेल. मात्र त्या अधिकाऱ्यानें अंदाजपत्रिकेंत मंजूर असलेल्या रकमेपेक्षां जास्त खर्च होईल, अथवा लोकल ॲथॉरिटीवरील खर्चाचा बोजा पुढें कधीं वाढेल अशी कोणतीहि गोष्ट कूल बोर्डाची आगाऊ मंजुरी घेतल्यावांचून करतां कामा नये.

---

# प्रकरण ३ रें.

## स्कूल बोर्डाचा ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर.

ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर हा स्कूल बोर्डाची अमलबजावणी करणारा मुख्य अधिकारी.

टीपः—ह्या प्रकरणांतील नियम ॲक्टाच्या कलम २७ (१) (अ) अन्वयें तयार केले असून ते लोकल ॲथॉरिटीनें ॲक्टाच्या कलम ९ [१] अन्वयें तयार केलेल्या नियमांस सरकारची मंजुरी मिळेपर्यंत चालू रहावयाचे आहेत.

४१. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरचे अधिकारः-ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर हा पुढील कामें करीलः—

[अ] लोकल ॲथॉरिटीच्या शिक्षणाचे कामासाठीं ठेविलेल्या कामगारांवर देखरेख करणें व ताबा चालविणें.

[ब] सर्व असिस्टंट शिक्षक नेमणें, त्यांस बढती देणें किंवा बदलणें, ह्यासाठीं स्कूल बोर्डाची आगाऊ मंजुरी घेण्याची जरूरी नाहीं.

[क ] सुपरवायझराशिवाय दुसरा कोणताही अधिकारी, शिक्षक किंवा कारकून नेमणें, त्यास बढती देणें किंवा बदलणें. ह्यासाठीं स्कूल बोर्डाची प्रत्येक बाबतींत किंवा सर्वसामान्य मंजुरी असली पाहिजे.

(ड) सर्व असिस्टंट शिक्षकांस दंड करणें, त्यांचा पगार कमी करणें, त्यांस सस्पेंड करणें, अथवा बडतर्फ करणें. मात्र अशा शिक्षकांस स्कूल बोर्डाकडे अपील करण्यास हक आहे;

(इ) कोणाही असिस्टंट शिक्षकांस रजा देणें;

(फ) शिक्षणाचे कामासाठीं नोकरीस ठेविलेल्या कोणाही कामगारास किरकोळ रजा देणें;

(ग) शिक्षणाचे कामासाठीं नोकरीस ठेविलेल्या सर्व हलक्या नोकरांस नेमणें, बढती देणें, बदलणें किंवा शिक्षा करणें. मात्र त्यांस अशा बाबतींत स्कूल बोर्डाकडे अपील करण्याचा हक्क आहे.

४२. (अ) शाळेसंबंधीं ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरचीं कामें:—ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरावर पुढील कामांची जबाबदारी राहील:—

(१) लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या सर्व प्राथमिक शाळांची सर्वसामान्य व्यवस्था आणि त्यांची वार्षिक परीक्षा;

[२] पसंत केलेल्या सर्व शाळांची तपासणी;

[ब] त्यानें पसंत असलेल्या शाळांस ग्रँट देण्याबद्दल स्कूल बोर्डाकडे शिफारशी केल्या पाहिजेत.

[क] त्यानें शक्य तितक्या शाळा तपासल्या पाहिजेत व पाहिल्या पाहिजेत.

४३. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरचीं अन्य कामें:—ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरचीं पुढीलप्रमाणें कामें असतील:—

(अ) स्कूल बोर्डाच्या सेक्रेटरीनें काम करणें;

[ब] प्राथमिक शिक्षणाकरितां मिळणारा सर्व पैसा व होणारा सर्व खर्च यांचे हिशेब ठेवणें, नोकरांच्या नोकरीसंबंधाचीं माहितीपत्रकें ठेवणें, व स्कूल बोर्डाचे सर्व कागदपत्र सुरक्षित रीतीनें ताब्यांत ठेवणें;

[क] सर्व अधिकारी, कारकून, शिक्षक व हलके नोकर यांस वेळच्या वेळीं पगार देण्याची व्यवस्था करणें;

[ड] वार्षिक अंदाजपत्रक व जमाखर्चाचे तक्ते तयार करणें.

---

# प्रकरण ४ थें.

## लोकल ॲथॉरिटीनीं नेमावयाचे कामदार.

### अ—सामान्य.

४४. लोकल ॲथॉरिटीनें नेमावयाचे कामदार—स्कूल बोर्डानें कायम लागणाऱ्या कामगारांचा एक तक्ता तयार केला पाहिजे. त्यांत त्या कामगारांपैकीं निरनिराळ्या लोकांचे हुद्दे, ग्रेड आणि पगार हीं नमूद केलीं पाहिजेत. हा तक्ता जशाचा तसा किंवा फेरफार करून लोकल ॲथॉरिटीनें मंजूर केला पाहिजे. या तक्त्याची फेरतपासणी दरवर्षी झाली पाहिजे.

याशिवाय लोकल ॲथॉरिटीच्या मंजुरीनें स्कूल बोर्डानें जरूरीप्रमाणें तात्पुरते जास्त अधिकारी नेमण्यास हरकत नाहीं; मात्र अशा तात्पुरत्या नेमलेल्या नोकरांच्या नोकरीची मुदत सरकारच्या मंजुरीवांचून तीन वर्षांपेक्षां जास्त असतां कामा नये.

४५. [१] कामदारांस रजा व रजेच्या अलावन्सबद्दल भरावयाची रकम–सरकारचे कायम नोकर असलेल्या, व सरकारकडून लोकल ॲथॉरिटीनें मागून घेतलेल्या किंवा मागून घेतले जाणाऱ्या सर्व कामदार व कारकून यांच्या रजेच्या मुदतीच्या पगाराबद्दलची रकम लोकल ॲथॉरिटीनें सरकारांत भरली पाहिजे. असे अधिकारी व कारकून यांस द्यावयाची रजा, ते सरकारी नोकरीच्या ज्या वर्गांत असतील त्यांना लागू असणाऱ्या नियमांप्रमाणें दिली जाईल.

[२] कायद्याच्या ८ (१) या कलमाअन्वयें लोकल ॲथॉरिटीच्या ताब्यांत दिलेल्या प्राथमिक शिक्षक धरून इतर सर्व अधिकारी, कारकून, शिक्षक व हलके नोकर यांना रजा देणें व रजेच्या मुदतीचा अलावन्स हे सरकारच्या मंजुरीनें लोकल ॲथॉरिटीनें केलेल्या नियमांस धरून असेल. हे नियम जाहीर होईपर्यंत, वर सांगितलेले अधिकारी, कारकून, शिक्षक, आणि हलक्या दरज्याचे नोकर ह्यांस रजा देणें, आणि रजेच्या मुदतीचा अलावन्स ठरविणें हे तशा प्रकारच्या सरकारी नोकरांसाठीं सरकारनें जे रजेचे नियम ठरविले आहेत त्यांस अनुसरून असेल.

४६. प्रवास भत्ता–प्रवास भत्त्यासंबंधानें सरकारच्या परवानगीनें करतां येणारे नियम लोकल ॲथॉरिटीनें केले नसतील तोंपर्यंत कारभार पाहणारे, शिक्षण देणारे, तपासणी करणारे व देखरेख करणारे अधिकारी, यांस प्रवास भत्ता सिव्हिल सर्व्हिस रेग्युलेशन्समध्यें मंजूर केलेल्या दराप्रमाणें दिला जाईल.

४७. (१) सरकारकडे पेन्शनबद्दल भरणा. प्रॉव्हिडंट फंडाची योजना[१]जे अधिकारी अथवा कारकून सरकारच्या कायमच्या नोकरींत आहेत, व ज्यांची नोकरी लोकल ॲथॉरिटीकडे सोंपविली असेल किंवा सोंपविली जाईल, अशा सर्वांच्या पेन्शनाबाबत लोकल ॲथॉरिटीला सरकारांत भरणा करावा लागेल.

(२) ॲक्टाच्या ८ (१) कलमाअन्वयें लोकल ॲथॉरिटीनें आपणाकडे घेतलेला व कामावर लावलेला प्रत्येक प्राथमिक शिक्षक अशा रीतीनें घेण्याच्या आणि कामावर लावण्याच्या तारखेस सरकारी शिक्षणखात्यामध्यें चालू असलेल्या नियमांप्रमाणें पेन्शन मिळण्यास पात्र होईल. मात्र वर सांगितलेल्या शिक्षकांपैकीं ज्यांनीं ह्या नियमांच्या नियम ५ (२) अन्वयें पेन्शनच्या ऐवजीं लोकल ॲथॉरिटीनें चालू केलेला प्रॉव्हिडंट फंड पतकरला असेल ते शिक्षक त्या वरील तारखेपासून आणि पुढें फक्त त्या प्रॉव्हिडंट फंडाचा फायदा घेण्यासच पात्र होतील.

लोकल ॲथॉरिटीनें आपल्या ताब्यांत घेऊन नेमणूक केलेल्या प्रत्येक प्राथमिक शिक्षकास त्याच्या पूर्वीच्या नोकरीबद्दल जो पेन्शनचा भाग मिळावयाचा तो सरकाराकडून देण्यांत येईल. ताब्यांत घेऊन नेमणूक केल्याच्या तारखेनंतर मिळावयाच्या पेन्शनचा भाग लोकल ॲथॉरिटीनें दिला पाहिजे.

(३) याशिवाय इतर सर्व अधिकारी, कारकून, शिक्षक व हलक्या दर्जाचे नोकर यासाठीं लोकल ॲथॉरिटीला सरकारनें त्यासंबंधीं मंजूर केलेल्या नियमाअन्वयें पेन्शनची तरतूद अथवा प्रॉव्हिडंट फंडाची योजना करावी लागेल.

**ब —कारभार करणारे, तपासणी करणारे व देखरेख करणारे अधिकारी.**

४८. तपासणी करणारे व देखरेख करणारे अधिकारी यांची नेमणूक— लोकल ॲथॉरिटी तपासणी करणाऱ्या व देखरेख करणाऱ्या अधिकारी वर्गाची नेमणूक खालीं दिलेल्या स्केलाप्रमाणें करील:—

(१) लोकल ॲथॉरिटी जिल्हा लोकल बोर्ड असेल तर, दर १५० पसंत केलेल्या शाळांकरितां किंवा अशा शाळांतील दर ६,००० मुलांकरितां निदान एक सुपरवायझर नेमिला पाहिजे.

सिंध प्रांतांत पसंत केलेल्या दर १०० शाळांस अथवा अशा शाळांतील दर ४,००० विद्यार्थ्यांस कमींत कमी एक सुपरवायझर नेमिला पाहिजे.

[२] लोकल ॲथॉरिटी म्युनिसिपालिटी असेल तर पसंत केलेल्या शाळांची संख्या ७५ हून अधिक अथवा अशा शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या ९,००० हून अधिक झाल्याशिवाय सुपरवायझर नेमण्याची जरूरी नाहीं. पसंत केलेल्या शाळांची किंवा विद्यार्थ्यांची संख्या याहून अधिक होईल, तर दर १०० अधिक शाळांस किंवा अशा शाळांतील दर १२,००० अधिक विद्यार्थ्यांस एक याप्रमाणें सुपरवायझर नेमिले पाहिजेत.

४९. [१] सुपरवायझरची जोड नेमणूक— कोणत्याही प्रकारच्या शाळांतून, उदाहरणार्थ, उर्दू अथवा मुलींच्या शाळांतून विद्यार्थ्यांची संख्या स्वतंत्र सुपरवायझरपुरती नसेल तर दोन अथवा अधिक लोकल ॲथॉरिटी मिळून अशा शाळांसाठीं एक सुपरवायझर नेमिल्यास चालेल. मात्र, जिल्हा लोकल बोर्डाच्या बाबतींत उर्दू शाळांचा सुपरवायझर दोहोंहून अधिक जिल्ह्यांवर नेमतां कामा नये.

[२] पुरुष अधिकाऱ्यानें एखाद्या मुलींच्या शाळेस भेट देण्यास अगर ती तपासण्यास जर धार्मिक अगर सामाजिक हरकती असतील, आणि जर स्त्री-सुपरवायझरपुरती विद्यार्थिनींची संख्या नसेल, अथवा अशी नेमणूक करण्यास योग्य स्त्री मिळत नसेल, तर सरकारी इन्स्पेक्ट्रेस त्या बाजूला असेल व तिला तें काम पत्करितां येईल, तर तिजकडे अशा शाळांची तपासणी सोंपवून दिल्यास चालेल.

५०. देखरेख करणारे व तपासणी करणारे अधिकारी यांचा पगार—सुपरवायझरचा पगार सामान्यतः दरमहा ६० रुपयांपेक्षां कमी अथवा २५० रुपयांपेक्षां अधिक असतां कामा नये.

टीपः—लोकल ॲथॉरिटीनें नेमलेल्या तपासणी करणाऱ्या व देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पगाराचें स्केल खालीं दिल्याप्रमाणें सुचविलें आहेः—

[ १ ] पदवीधरांस—रु० ८०–५–१२०–१०–२५०.

[ २ ] मॅट्रिक्युलेशन किंवा स्कूल लीव्हिंग परीक्षा उतरलेल्या लोकांस—रु.० ७०–४–११०–५–१५८.

[ ३ ] ट्रेंड प्राथमिक शिक्षकांस—रु० ६०–४–१२०. मात्र प्राथमिक शिक्षक म्हणून जो पगार त्यांना असेल त्याहून कमींत कमी रु० १० वाढीवर आरंभीचे नेमणुकीचे वेळीं, ह्या स्केलांत त्यांची सुरवात होईल.

५१. सुपरवायझरची लायकी—खालीं नमूद केल्याप्रमाणें लायकी असल्याशिवाय कोणाही इसमाची सुपरवायझर म्हणून नेमणूक करितां कामा नयेः—

( अ ) सेकंडरी टीचरचें सर्टिफिकेट.

[ ब ] सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजचा डिप्लोमा, किंवा कायद्यानें मान्य असलेल्या एकाद्या विश्वविद्यालयानें दिलेली शिक्षणाबद्दलची पदवी; अथवा

[ क ] दुय्यम प्रतीच्या शाळेंतील शिक्षक म्हणून १० वर्षांचा अनुभव किंवा पसंत असलेल्या अथवा सरकारास मान्य असलेल्या शाळेंत प्राथमिक शिक्षक म्हणून १५ वर्षांचा अनुभव. मात्र हा अनुभव प्राथमिक शाळेंतलाच असल्यास त्यानें सरकारी प्राथमिक टेनिंग कॉलेजचें दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षाचें सर्टिफिकेटही मिळविलें असलें पाहिजे, किंवा सरकारास मान्य असलेल्या प्राथमिक ट्रेनिंग कॉलेजांत ट्रेंड झाला असल्याबद्दलचा दाखलाही त्याचेजवळ असला पाहिजे.

५२. सुपरवायझर म्हणून नेमल्या जाणाऱ्या प्राथमिक शिक्षकांची संख्या-नियम ५१ [ क ] याअन्वयें लायक असलेल्या प्राथमिक शिक्षकांतून निवडलेल्या सुपरवायझरांची संख्या, सुपरवायझरांच्या एकूण संख्येच्या दोन-तृतीयांशाहून अधिक असतां कामा नये.

५३. कारकून व हलके नोकर यांची नेमणूक—लोकल ॲथॉरिटीनें जरूर तितके कारकून, व हलके नोकर नेमावे व त्यांचे पगार आणि कामाच्या अटी ठरवाव्या.

## क.—शिक्षकवर्ग.

५४. [ १ ] लायक प्राथमिक शिक्षक नेमणें—मिळतील तोंपर्यंत लोकल ॲथॉरिटीनें फक्त लायकी असलेल्या अशाच शिक्षकांची नेमणूक करावी.

स्पष्टीकरणः—व्हर्न्याक्यूलर फायनल परीक्षा किंवा तिच्याऐवजीं वेळोवेळीं जी दुसरी परीक्षा सरकारकडून पसंत केली जाईल, ती ज्यांची उतरली असेल तो लायक शिक्षक होय.

( २ ) जर लायक शिक्षक कायमच्या जागेसाठीं मिळण्यासारखा असेल, तर बिनलायक शिक्षक त्या जागेवर कायमचा नेमितां कामा नये.

( ३ ) सरकारची खास परवानगी घेतल्यावांचून पुरुष शिक्षकांच्या एकंदर संख्येच्या शेंकडा ५ ह्या प्रमाणापुढें बिनलायक पुरुष शिक्षकांची संख्या, आणि स्त्री शिक्षकांच्या एकंदर संख्येच्या शेंकडा १५ ह्या प्रमाणापुढें बिनलायक स्त्री शिक्षकांची संख्या केव्हांही जातां कामा नये.

५५. ( १ ) प्राथमिक शिक्षकांच्या वयाची मर्यादा.—स्कूल बोर्डाची परवानगी असल्याशिवाय, ज्याचें वय अठरांहून अधिक पण २५ हून कमी नसेल, अशा इसमास प्राथमिक शिक्षकाचे जागीं कायमचें नेमतां कामा नये.

( २ ) प्राथमिक शिक्षकानें सामान्यतः वयाच्या ५५ व्या वर्षीं रिटायर झालें पाहिजे, परंतु ६० वर्षें होईपर्यंत स्कूल बोर्डानें त्याची नोकरीची मुदत वाढविली तरी चालेल. कायद्याच्या ८ ( १ ) कलमाअन्वयें लोकल ॲथॉरिटीनें आपणाकडे घेतलेल्या शिक्षकांच्या बाबतींत सरकारच्या मंजुरीशिवाय, अथवा कायद्याच्या ४ ( १ ) कलमाअन्वयें सरकार ठरवील त्या तारखेच्या नंतर नेमून घेतलेल्या शिक्षकांच्या बाबतींत लोकल ॲथॉरिटीच्या मंजुरीशिवाय या वयाच्या पुढें नोकरीच्या मुदतीची वाढ देतां कामा नये.

५६. शिक्षकांच्या हंगामी नेमणुका.—हंगामी शिक्षकांची संख्या एकूण संख्येच्या सामान्यतः शेंकडा २० हून अधिक असतां कामा नये. आणि होतां होईल तों, कोणाही शिक्षकास हंगामी जागेवर तीन वर्षांहून अधिक काळ ठेवतां कामा नये. तथापि, कायमच्या रिकाम्या जागेवर स्पष्टपणें नेमणूक केल्याशिवाय कोणाही शिक्षकाची कायमची नेमणूक झाली आहे असें समजूं नये.

५७. ( १ ) विद्यार्थ्यांची संख्या; दुबार पद्धति.—एका वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या ४० च्यापेक्षां जास्त असतां कामा नये, आणि जर एका शिक्षकाकडे एकाहून अधिक वर्ग असतील तर त्याचे ताब्यांत असणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या तीसपेक्षां जास्त असतां कामा नये.

( २ ) ज्या शाळांतून विद्यार्थ्यांची संख्या २०० हून अधिक असेल, त्या शाळांत पोटनियम ( १ ) अन्वयें दिलेल्या नेहमींच्या वर्गशिक्षकांखेरीज अधिक असा एक जादा शिक्षक नेमिला असला पाहिजे.

टीपः—निम्या विद्यार्थ्यांनीं सकाळीं शाळेंत जावें, आणि बाकीच्यांनीं तिसऱ्या प्रहरीं जावें, आणि दोनही वेळीं एकाच शिक्षकानें काम करावें, अशी दुबार पद्धति, ॲक्टाच्या कलम २७ ( ३ ) अन्वयें केलेल्या नियमांस अनुसरून तिसऱ्या इयत्तेपर्यंतच्या वर्गांस लागू केली तरी चालेल. मात्र अशा वेळीं कोणाही शिक्षकाकडे कोणत्याही वेळीं दोहोंपेक्षां अधिक वर्ग असतां कामा नये.

५८. ट्रेंड शिक्षकांचें प्रमाण—लोकल ॲथॉरिटीनें नेमलेल्या शिक्षकांपैकीं, शेंकडा ५० हून कमी नाहींत इतके, अथवा सरकारकडून वेळोवेळीं ठरविलें जाईल त्या प्रमाणाइतके शिक्षक ट्रेंड असावेत आणि लोकल ॲथॉरिटीनें नेमिलेल्या शिक्षकांच्या एकूण संख्येच्या शेंकडा १५ हून कमी नाहींत इतके अथवा ३० हून अधिक नाहींत इतके, दुसरे किंवा तिसरे वर्षांचें ट्रेनिंग कॉलेजचें सर्टिफिकेट घेतलेले असावेत. ट्रेंड शिक्षकांची संख्या सरकारनें ठरविलेल्या किमान मर्यादेहून कमी असेल तर, लोकल ॲथॉरिटीनें जरूर लागतील त्या पगारांची तरतूद करून अथवा अन्य रीतीनें दरसाल पुरेशा शिक्षकांच्या ट्रेनिंगची व्यवस्था करावी, आणि अशा रीतीनें शिक्षणाची वाढ आणि तूट या गोष्टी विचारांत घेऊन सन १९२८–२९ सालापर्यंत कायद्यांत नमूद केलेल्या प्रमाणापर्यंत ट्रेंड शिक्षकांची संख्या नेऊन पोहोंचवावी, आणि पुढें टिकवावी.

५९. ( १ ) शिक्षकांच्या पगाराचे दरः—कायद्याच्या ८ ( १ ) कलमाअन्वयें लोकल ॲथॉरिटीनें आपणांकडे घेऊन कामावर लावलेल्या प्राथमिक शिक्षकांस अशा रीतीनें घेऊन कामावर लावण्याच्या वेळीं सरकारी नोकरीस चालू असलेल्या दरानें पगार मिळेल.

( २ ) लोकल ॲथॉरिटीनें लावून घेतलेल्या इतर प्राथमिक शिक्षकाचे बाबतींत, बिनलायक शिक्षकाचा अथवा जुजबी लायक असिस्टंट शिक्षकाचा पगार दरमहा १५ पेक्षां कमी, अथवा पाहिल्याचा दरमहा २० पेक्षां अधिक आणि दुसऱ्याचा दरमहा २५ पेक्षां अधिक असतां कामा नये.

कायमच्या लायक असिस्टंट शिक्षकाचा आरंभींचा किंवा किमान पगार सरकारच्या मंजुरीवांचून दरमहा १८ रुपयांहून कमी अथवा दरमहा २५ रुपयांहून अधिक असतां कामा नये, आणि शेवटला किंवा कमाल पगार सरकारच्या मंजुरीवांचून दरमहा २५ रुपयांपेक्षां कमी अथवा दरमहा ४० रुपयांहून अधिक असतां कामा नये.

ट्रेंड शिक्षकाच्या पगारांचें किमान व कमाल स्केल खालीं दिल्याप्रमाणें असलें पाहिजे, मात्र सरकारनें बदल करण्याची मंजुरी दिल्यास त्यांत बदल होईलः—

| | आरंभींचा किंवा कमाल पगार. कमींत कमी आणि जास्तींत जास्त. | | शेवटचा किंवा कमाल पगार. कमींत कमी आणि जास्तींत जास्त | |
|---|---|---|---|---|
| | रुपये. | रुपये | रुपये. | रुपये. |
| १ लें वर्ष | २० ... | ३० | ३५ ... | ५० |
| २ रें वर्ष | २५ ... | ३५ | ४५ ... | ६० |
| ३ रें वर्ष | ३० ... | ४० | ५५ ... | ७० |

जास्तींत जास्त २५ वर्षांत शिक्षक शेवटच्या किंवा कमाल पगारापर्यंत चढेल अशा रीतीनें पगाराचें स्केल बसविलें पाहिजे.

ॲक्ट अमलांत येईल त्या तारखेस हेडमास्तरासाठीं सरकारी नोकरींत जर एकादा अलावन्स चालू असेल, तर तसला अलावन्स त्यास मिळेल.

( ३ ) ज्या ठिकाणची राहणी विशेष खर्चाची असेल, अगर जेथील हवा विशेष वाईट असेल अगर जेथें लायक असे स्थानिक शिक्षक मिळूं शकणार नाहींत अशा ठिकाणीं सरकारच्या मंजुरीनें अलावन्स देतां येतील.

टीपः—प्राथमिक शिक्षकांची नेमणूक करतेवेळीं त्यांस स्पष्ट कळविण्यांत येईल कीं, राहणी बरीच कमी खर्चाची झाल्यास हल्लीं देऊं केलेलें पगाराचें स्केल कमी करण्यांत येण्याचा संभव आहे.

६०. उमेदवार शिक्षक—शिक्षक तयार करण्याच्या उद्देशानें लोकल ॲथॉरिटीनें उमेदवार शिक्षकांच्या नेमणुका कराव्यात. अशा उमेदवार शिक्षकांची व्ह० फा० अगर प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरी करण्याची लायकी उत्पन्न करणारी दुसरी एकादी परीक्षा पास झाली असली पाहिजे, व ज्या शाळांवर खास निवडणूक करून नेमलेले हेडमास्तर असतील अशा शाळांत त्यांच्या नेमणुका केल्या जाव्यात. त्यांनीं दिवसांतून निदान चार तास तरी शाळेंत काम केलें पाहिजे व त्यांपैकीं निदान दोन तास तरी शिक्षणकलेच्या अध्ययनांत घालविले पाहिजेत. उमेदवार शिक्षकांची नेमणूक सामान्यतः एक वर्षापुरती करण्यांत यावी. परंतु ही मुदत दोन वर्षांपर्यंत वाढविण्यास हरकत नाहीं. लोकल ॲथॉरिटी ठरवील त्या दरानें त्यांना पगार देण्यांत यावा. उमेदवार शिक्षक म्हणून केलेली नोकरी केवळ हंगामी म्हणून समजली जाईल, आणि रजा, पेन्शन अगर पगारवाढ या बाबतींत ती हिशोबांत धरली जाणार नाहीं.

६१. विद्यार्थी शिक्षक—ज्या ठिकाणीं कोणत्याही एकाद्या प्रकारच्या, उदाहरणार्थ, उर्दु अगर मुलींच्या शाळांसाठीं लायक शिक्षक मिळूं शकणार नाहींत, तेथें लोकल ॲथॉरिटीनें विद्यार्थी शिक्षकांची नेमणूक करावी. उद्देश हा कीं, शाळेंत काम करीत असतां त्यांची व्ह० फा० अगर नोकरीसाठीं लायकी उत्पन्न करणाऱ्या दुसऱ्या एकाद्या परीक्षेची तयारी करून देतां यावी.

अशा शिक्षकांची देशभाषेंतील ६ वी [ स्त्रियांच्या बाबतींत इलाख्यामध्यें पांचवी व सिंधमध्यें चवथी ] इयत्ता पास झाली असली पाहिजे. त्यांनीं शाळेचा सर्व वेळ शाळेंत हजर असावें. परंतु त्यांपैकीं रोज दोन तासांपेक्षां जास्त वेळ शिकविण्याचें काम करूं नये.

विद्यार्थी शिक्षकांची नेमणूक सामान्यतः एक वर्षापुरती करण्यांत यावी, परंतु ही मुदत दोन वर्षांपर्यंत वाढविण्यास हरकत नाहीं. लोकल ॲथॉरिटी ठरवील त्या दरानें त्यांना पगार देण्यांत यावा. विद्यार्थी शिक्षक म्हणून केलेली नोकरी केवळ हंगामी म्हणून समजली जाईल, आणि रजा, पेन्शन अगर पगारवाढ या बाबतींत ती हिशेबांत धरली जाणार नाहीं.

---

# प्रकरण ५ वें.

## जागा, सामान, अभ्यासक्रम आणि हजिरी, इत्यादि.

[ सूचनाः—या प्रकरणाच्या अ, ब आणि क या भागांतील नियम पसंत केलेल्या सर्व शाळांना लागू आहेत. [ प्रकरण ६ पहा ]; मग त्या शाळा लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या अगर मदत केलेल्या असोत अगर नसोत. ]

ड आणि इ भागांतील नियम फक्त लोकल ॲथॉरिटीनेंच चालविलेल्या शाळांना लागू आहेत, परंतु ते इतर पसंत केलेल्या शाळांना मार्गदर्शक म्हणून होऊं शकतील ; मात्र नियम ७८ हा ग्रँट-इन्-एड कोडापुरता सर्व शाळांना लागू आहे.

### "अ" जागा.

६२. वर्गाच्या खोलींतील किमान जागा—वर्गाच्या हजिरीपटावरील प्रत्येक विद्यार्थ्यासाठीं प्रत्येक वर्गाच्या खोलींत [ पडवी सोडून ] आठ चौरस फुटांपेक्षां कमी नाहीं इतकी जागा ठेवावी.

६३. शौचकूप व मुत्र्या यांची सोय.—पुरेसे शौचकूप व मुत्र्या यांची सोय असावी.

६४. खेळण्याच्या जागेची सोय.—खेळण्याच्या जागेची देखील सोय करावी.

### "ब" सामान.

६५. सामानाचा पुरवठा—शाळेला लागणारें जरूर तें सामान, उदाहरणार्थ, खुर्ची, टेबल, फळा, प्रत्येक वर्गाच्या खोलींत पुरवावें.

६६. वर्गाचीं पुस्तकें वगैरेंचा पुरवठा.—शिक्षकांच्या उपयोगासाठीं आवश्यक लागणारीं वर्गाचीं पुस्तकें, नकाशे, चित्रें, आणि उपकरणें हीं देखील पुरवावींत.

६७. लायब्ऱ्या.--पैशाच्या सवडीप्रमाणें शिक्षकांच्या व मुलांच्या लायब्ऱ्यांकरितां पुस्तकें पुरवावींत.

६८. गरीब विद्यार्थ्यांकरितां पुस्तकें वगैरे पुरविणें.—ज्या मुलांचे आईबाप पुस्तकें, पाट्या व शाळेसाठीं लागणारें इतर सामान विकत घेण्यास असमर्थ असतील त्यांस ते जिन्नस पुरविण्यास हरकत नाहीं.

## "क" शिक्षणाचे विषय.

६९. अभ्यासक्रम.--नवीन अभ्यासक्रम प्रसिद्ध होईपर्यंत मराठी, गुजराथी, कानडी, ऊर्दू-व्हर्न्याक्युलर आणि व्हर्न्याक्युलर-ऊर्दू इयत्तापत्रकांमध्यें व सिंधमधील प्राथमिक शाळांच्या इयत्तापत्रकांत दिलेले अभ्यासक्रम चालू राहातील; परंतु सरकारच्या मंजुरीनें त्यांत फेरबदल करून ते चालू करण्यास स्कूल बोर्डास हरकत नाहीं.

७०. मंजूर केलेल्या पुस्तकांचा उपयोग.—सरकारची आगाऊ मंजुरी घेतली असेल तर भाग निराळा; नाहींतर सरकारी शिक्षण खात्यानें मंजूर केलेल्या पुस्तकांच्या यादींत असणाऱ्या पुस्तकांचाच फक्त उपयोग केला पाहिजे.

७१. विशिष्ट अभ्यासक्रमासाठीं सरकारची मंजुरी.—कायद्याचें कलम २७ [३] [अ] [ब] [क] [फ] मध्यें सविस्तरपणें नमूद केलेल्या शिक्षणाच्या विषयांपैकीं कोणत्याहि विषयाचें शिक्षण देण्यास सुरवात करण्याची जर एकाद्या लोकल ॲथॉरिटीची इच्छा असेल तर तिनें त्या संबंधाची योजना प्रथम सरकारकडे मंजुरीकरितां पाठविली पाहिजे, व सरकारची मंजुरी मिळाल्याशिवाय अशा विषयांचे शिक्षणास सुरवात करितां कामा नये. हे विषय म्हणजे (अ) स्थानिक गरजांस अनुरूप असा व्यावहारिक शिक्षणक्रम, (ब) प्रायोगिक शास्त्र, मातकाम, सृष्टिनिरीक्षण, हस्तव्यवसाय आणि गृहव्यवस्थाशास्त्र धरून उद्योगधंद्यास उपयुक्त अशा पूर्वतयारीसंबंधीं प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही वयाच्या मुलासाठीं शिक्षणक्रम, (क) प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही वयाच्या मुलांचें शारीरिक व नैतिक शिक्षण आणि [फ] वरच्या दर्जाच्या प्राथमिक शिक्षणाचा एक भाग म्हणून धंद्यासंबंधाच्या पूर्वतयारीच्या शिक्षणाचे अभ्यासक्रम.

७२. धार्मिक शिक्षण.—लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या शाळांमधून धार्मिक शिक्षण—यांत कुराणाच्या शिक्षणाचाही अंतर्भाव होतो–देतां येईल. मात्र

[१] अशा शिक्षणास स्थानिक हरकत असतां कामा नये;

[२] अशा शिक्षणाचे वेळीं हजर राहणें ऐच्छिक असलें पाहिजे; आणि

[३] सदरहु शिक्षणासाठीं खर्च होणाऱ्या वेळाचा नियम ७३ मध्यें शिक्षणाकरितां नेमून दिलेल्या वेळांत समावेश होतां कामा नये.

७३. शाळेचे तास—स्कूल कमिटी असेल तर तिच्या सल्ल्यानें प्रत्येक शाळा कोणते व किती तास उघडी राहील हें स्कूल बोर्डानें ठरवावें. शिशुवर्गातील व पहिल्या इयत्तेतील मुलांच्या बाबतींत शिक्षणाचा वेळ दररोज तीन तासांपेक्षां कमी अगर चार तासांपेक्षां जास्त असतां कामा नये; इतर मुलांच्या बाबतींत चारपेक्षां कमी अगर सहापेक्षां जास्त असतां कामा नये. कोणत्याही शाळेंत ल.गो-पाठ तीन तासांपेक्षां जास्त वेळ शिक्षण देतां कामा नये. ज्या शाळांमधून 'दुबार' पद्धति सुरू करण्याबद्दल मंजुरी मिळालेली आहे अशा शाळांच्या बाबतींत हे तास कमी केले तरी चालतील.

प्रत्येक शाळेमध्यें रविवार हा सुटीचा दिवस म्हणून पाळला पाहिजे; आणि याशिवाय आठवड्यांतील दुसऱ्या कोणत्यातरी एकाद्या दिवशीं अर्ध्या दिवसाची सुटी दिली पाहिजे. मुसलमानांकरितां असलेल्या शाळांमधून रविवारचे ऐवजीं शुक्रवारी सुटी दिली तरी चालेल; मात्र अशा शाळेंत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांपैकीं निम्याहून जास्त जणांची तशी इच्छा असली पाहिजे.

७४. मोठ्या सुट्या.—प्राथमिक शाळांमधून द्यावयाच्या मोठ्या सुट्यांचा एकंदर काळ एक वर्षांत तीन आठवड्यांपेक्षां कमी अगर ६ आठवड्यांपेक्षां जास्त असतां कामा नये. अशा सुट्यांची वर्षांतील संख्या, प्रत्येकीची मुदत व ती केव्हां द्यावयाची हें स्थानिक स्कूल कमिटी असल्यास तिच्या सल्ल्यानें स्कूल बोर्डानें ठरविलें पाहिजे, मात्र अशी कोणतीही सुटी चार आठवड्यांपेक्षां जास्त मुदतीची असतां कामा नये.

मोठ्या सुट्यांखेरीज एक वर्षांत ३५ दिवसांपेक्षां जास्त नाहींत इतक्या इतर सुट्या स्कूल बोर्डास मंजूर करितां येतील; आणि एखाद्या शाळेची वार्षिक परीक्षा अगर तपासणी झाल्याबरोबर लगेच एक दिवसाची सुटी अॅड्मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर अगर सुपरवायझर यांस देतां येईल.

७५. सक्तीचे प्राथमिक शिक्षणाच्या हद्दींतील हाजिरी–सक्तीनें प्राथमिक शिक्षण सुरू झालेल्या हद्दींत ज्या दिवशीं व ज्या वेळीं शाळा उघडी असेल तेव्हां प्रत्येक मुलास शाळेंत गेलें पाहिजे. आजारीपणाळें अगर दुसऱ्या एखाद्या योग्य कारणामुळें थोडया मुदतीची रजा लागल्यास ती हेडमास्तर यांस देतां येईल.

७६. ग्रँट-इन-एड् कोड व व्हर्न्याक्यूलर शिक्षक शिक्षकिणी यांचे नियम-संग्रह यांचा अंमल—विद्यार्थ्यांचीं नांवें दाखल करणें व काढून टाकणें, वयाची व हाजिरीची नोंद ठेवणें, आणि शाळा सोडल्याचे दाखले देणें यांसंबंधीं ग्रँट-इन-एड् कोड व व्हर्न्याक्युलर शिक्षक व शिक्षकिणी यांचा नियमसंग्रह यांतील नियम चालू राहतील; मात्र प्रायमरी ए. अॅक्ट, कलम २७ (३) (ड) याअन्वयें

लोकल ॲथॉरिटीनें तयार केलेल्या नियमांमुळें वरील नियमांत फेरफार झाला असल्यास ते फेरफार झालेले नियम अंमलांत येतील.

### " इ " फी.

७७. फी—लोकल ॲथॉरिटीला तिनें चालविलेल्या प्राथमिक शाळांतून आणि लोकल ॲथॉरिटी नसलेल्या म्युनिसिपालिटीला जिल्हा लोकल बोर्डानें त्या म्युनिसिपल हद्दींत चालविलेल्या प्राथमिक शाळांतून, फी घेणें केव्हांही बंद करितां येईल.

७८. फीची माफी—लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या प्राथमिक शाळांतून फीची माफी दिलेल्या विद्यार्थ्यांस दिलीच पाहिजेः—

( अ ) सर्व मुली;

( ब ) तक्ता अ प्रमाणें समजले जाणारे खालच्या वर्गांचे मुलगे;

( क ) ज्यांचे आईबाप आपण फी देण्यास असमर्थ आहोंत अशाबद्दल स्कूल बोर्डाची खात्री करून देतील ते मुलगे;

( ड ) महायुद्धांत प्रत्यक्ष लढाईचे वेळीं कामीं आलेल्या अगर पंगू झालेल्या हिंदी शिपायांचे व सैन्याबरोबर असलेल्या इतर हिंदी लोकांचे मुलगे,

( ई ) सैन्याच्या लढाऊ शाखांमधील हिंदी शिपायांचे मुलगे,

( फ ) दरमहा रु. १०० अगर कमी पगार असलेल्या शिक्षकिणींचे मुलगे.

स्कूल बोर्डाला वरील (क) चे बाबतींत असलेला आपला अधिकार स्थानिक स्कूल कमिटीला देतां येईल.

---

# प्रकरण ६ वें

## पसंत केलेल्या शाळा

७९. लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळेचा अगर तिच्या भागाचा " पसंत केलेल्या शाळेंत " समावेश होतो.

८० पसंत केलेल्या शाळा.—पसंत केलेल्या शाळांचे अ आणि ब असे दोन वर्ग करण्यांत येतील.

अ वर्गांत प्राथमिक शाळांच्या सर्व साधारण अभ्यासक्रमाप्रमाणें काम करणाऱ्या शाळा येतील. लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या प्राथमिक शाळा, आणि ग्रँट-इन्-एड कोडाच्या २ ऱ्या भागाप्रमाणें ज्यांना अगोदरच सरकारी मान्यता मिळाली आहे अशा शाळांसारख्या प्राथमिक शाळा या दोहोंचा अंतर्भाव या वर्गांत होईल.

ब वर्गात ज्यांतून कमी प्रतीचा अभ्यासक्रम चालत असेल अशा शाळा येतील. या वर्गात गांवठी शाळांचा अंतर्भाव केला पाहिजे. उदाहरणार्थ, सिंधमधील मुल्ला शाळा, आणि ग्रँट-इन्-एड कोडाच्या ३ ऱ्या भागाप्रमाणें ज्यांना अगोदरच सरकारी मान्यता मिळाली आहे अशा शाळांसारख्या इतर शाळा.

८१. अनिष्ट शिक्षण द्यावयाचें नाहीं.—ज्या शाळेंत कोणत्याही तऱ्हेचें अनिष्ट शिक्षण देण्यांत येत आहे अशी शाळा पसंत केली जाणार नाहीं.

८२. अ वर्गातील शाळेनें करावयाच्या गोष्टी.---या नियमांच्या ४ थ्या प्रकरणाच्या क कलमांत आणि ५ व्या प्रकरणाच्या अ, ब, क कलमांत शिक्षकवर्ग, जागा, सामान, आणि अभ्यासक्रम या बाबतींत ज्या अटी घालण्यांत आलेल्या आहेत, त्या सामान्यतः पाळण्यांत आल्याशिवाय, आणि ग्रँट-इन्-एड् कोडाच्या नियमांप्रमाणें अथवा सरकार आणि लोकल अॅथॉरिटी यांच्या मंजुरीनें स्कूल बोर्डाकडून जे कांहीं असेच इतर नियम करण्यांत येतील, त्या नियमाप्रमाणें वागण्याची शाळांच्या चालकांनीं कबुली दिल्याशिवाय, कोणत्याहि शाळेला स्कूल बोर्डाकडून " अ विभागांतील शाळा " अशी मान्यता मिळणार नाहीं.

८३. ब वर्गातील शाळेनें करावयाच्या गोष्टी—खालील चार गोष्टी अमलांत आणल्याशिवाय कोणत्याही शाळेला स्कूल बोर्डाकडून " ब विभागांतील शाळा " अशी मान्यता मिळणार नाहींः—

[ १ ] सरकारच्या मंजुरीनें स्कूल बोर्डानें पसंत केलेला असा प्राथमिक शिक्षणाचा व्यावहारिक अभ्यासक्रम पतकरणें;

[ २ ] सर्व वर्षभर महिन्याच्या हजेरीची सरासरी निदान १० विद्यार्थी इतकी राखणें;

[ ३ ] ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें हजेरीचें रजिष्टर ठेवणें, व सरकार अथवा लोकल अॅथॉरिटी यांच्याकडून जीं साधीं माहितीपत्रकें मागण्यांत येतील तीं देण्याचें चालकांनीं कबूल करणें;

[ ४ ] सरकार आणि लोकल अॅथॉरिटी यांजकडून होणाऱ्या तपासणीला कबूल असणें.

८४. अ वर्गातील शाळांची पसंती काढून घेणें—ज्या अटींवर शाळेला पसंती मिळाली त्यांपैकीं जर एकादी अट पाळली गेली नाहीं, अथवा शाळेंतील शिक्षणाचा दर्जा लोकल अॅथॉरिटीनें चालविलेल्या शाळांतील शिक्षणाच्या दर्जापेक्षां फारच कमी प्रतीचा होईल तर, अथवा दुसरें एकादें योग्य व पुरेसें कारण दिसेल, तर अ वर्गातील शाळेची ही मिळालेली पसंती स्कूल बोर्डाकडून कोणत्याही वेळीं काढून घेण्यांत येईल. मात्र या बाबतींत प्रथम शाळेच्या चालकांना

योग्य इमारत व स्कूल बोर्डानें दाखविलेल्या सुधारणा अमलांत आणण्यास योग्य मुदत दिली जाईल. स्कूल बोर्डाचे निकालावर सरकारकडे अपील करण्याची मोकळीक ठेवण्यांत येईल.

८५. ब वर्गातील शाळांची पसंती काढून घेणें—कोणतेंही योग्य व पुरेसें कारण दिसेल, तर अथवा ज्या अटींवर शाळा रजिष्टर झाली त्यांपैकीं जर एकादी अट पाळली गेली नाहीं तर, ब वर्गातील शाळेची पसंती स्कूल बोर्डाकडून कोणत्याही वेळीं काढून घेण्यांत येईल. स्कूल बोर्डाचे निकालावर सरकारकडे अपील करण्याची मोकळीक ठेवण्यांत येईल.

८६. लोकल ॲथॉरिटीकडून पसंत केलेल्या शाळांना ग्रँट-इन्-कोड—ग्रँटकरितां अर्ज करणाऱ्या पसंत केलेल्या शाळेला लोकल ॲथॉरिटीकडून ग्रँट मिळेल; मात्र त्या भागांत अशा शाळेची जरूरी असली पाहिजे. परंतु तशा भागांत तशा प्रकारची ती एकच शाळा असून तिच्यांत इतर धर्मातील विद्यार्थ्यांवर एका विशिष्ट प्रकारच्या धर्मशिक्षणाची सक्ती केली जाईल, तर तिला ग्रँट देण्यांत येणार नाहीं.

८७. फायद्याकरितां चालविलेल्या शाळेला ग्रँट द्यावयाची नाहीं—लोकल ॲथॉरिटीच्या मतें जी शाळा फायदा मिळविण्याच्या हेतूनें चालविण्यांत येत असेल अशा कोणत्याही शाळेला ग्रँट मिळणार नाहीं.

स्पष्टीकरणः—या नियमानें एकाद्या इसमास प्रामाणिकपणें शिक्षकाचा धंदा करून शाळा चालविण्यास व त्या शाळेंतील शिक्षक या नात्यानें आपल्या कामाबद्दल योग्य वेतन घेण्यास आडकाठी येत नाहीं.

८८. ग्रँट ठरविणें—पसंत केलेल्या शाळेची ग्रँट ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरचा रिपोर्ट विचारांत घेऊन स्कूल बोर्डाकडून मंजूर केली जाईल; मात्र सिंधमधील मुल्ला शाळांसारख्या विशिष्ट प्रकारच्या शाळांच्या बाबतींत, जर सरकार ठरवील तर, ही ग्रँट सरकारी शाळाखात्याच्या तपासणीदार अमलदारांकडून आकारण्यांत येईल. सरकारकडून मदत मिळत असलेल्या ट्रेनिंग संस्थेचा भाग म्हणून चालविलेल्या प्राथमिक शाळेला द्यावयाची ग्रँट सरकारकडून दिली जाईल.

८९. अ वर्गातील शाळांना कमालीची ग्रँट—अ वर्गातील शाळेला कोणत्याही वर्षी द्यावयाची कमाल ग्रँट मागील वर्षाच्या पटावरील मुलांच्या महिन्याच्या सरासरीवर, म्हणजे त्या वर्षाच्या प्रत्येक महिन्याच्या पंधराव्या तारखेच्या पटावरील मुलांच्या सरासरीवर, अवलंबून राहील, आणि ती खालीलप्रमाणें आकारण्यांत येईलः—

(अ) लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या शाळांतील प्रत्येक विद्यार्थ्यामागें मागील वर्षांत झालेल्या नित्य खर्चाच्या सरासरीच्या दोनतृतीयांश इतकी ग्रँट सामान्यतः प्रत्येक विद्यार्थ्यामागें देण्यांत येईल; मात्र प्रत्येक विद्यार्थ्यामागें

ग्रँटचें कमालीचें प्रमाण १० रु. राहील. शाळेंत फी घेण्यांत येत नसेल तर हें प्रमाण १२ रु. पर्यंत वाढविण्यास हरकत नाहीं; हें कमालीचें प्रमाण सरकारच्या मंजुरातीनें वाढविण्यास हरकत नाहीं.

(ब) मुलींच्या बाबतींत ग्रँटची ही मर्यादा शेंकडा ५० नें वाढविण्यास हरकत नाहीं.

(क) तथापि कोणत्याही शाळेला दिली जाणारी कमालीची ग्रँट ही त्या शाळेच्या मागील वर्षाच्या मान्य केलेल्या वास्तविक निवळ खर्चापेक्षां जास्त असतां कामा नये; हा खर्च म्हणजे प्रत्यक्ष झालेल्या खर्चांतून, फीवसुली, लोकल ॲथॉरिटी नसलेले डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड अथवा म्युनिसिपालिटी यांजकडून मिळालेली ग्रँट, सरकारकडून मिळालेली विशेष प्रकारची ग्रँट, देणग्यांचें उत्पन्न, इतक्या बाबींवर जमा झालेल्या रकमा वजा करून राहिलेली शिल्लक.

स्पष्टीकरणः—' मान्य केलेला खर्च ' म्हणजे स्कूल बोर्डानें मंजूर केलेला खर्च. खर्चाची प्रत्येक बाब योग्य आहे कीं नाहीं तें स्कूल बोर्ड ठरवील.

९०. कमालीची ग्रँट कमी करणें—८९ व्या नियमाच्या अ आणि ब कलमांत नमूद केल्याप्रमाणें आकारण्यांत आलेली आणि त्याच नियमाच्या क कलमाप्रमाणें मर्यादित केलेली अ वर्गांतील शाळेला देण्यास पात्र असलेली कमालीची ग्रँट खालीं नमूद केलेल्या कारणाकरितां योग्य प्रमाणांत कमी करण्यांत येईलः—

(अ) जर मागील वर्षांतील रोजच्या हजेरीच्या सरासरी पटावरील मुलांच्या महिन्याच्या सरासरीपेक्षां शेंकडा ८० नें कमी असेल;

उदाहरणः—जर रोजच्या हजेरीची सरासरी, पटावरील मुलांच्या महिन्याच्या सरासरीच्या शेंकडा ७० असेल तर कमालीच्या ग्रँटचा फक्त सात अष्टमांश हिस्सा ग्रँट मिळेल.

(ब) जर दिलेलें शिक्षण मर्यादा व दर्जा या बाबतींत अपुरें असेल;

उदाहरणः—जर शेंकडा ७५ मुलें वरच्या वर्गांत घालण्यास योग्य आहेत असें आढळेल तर शिक्षण पुरेसें आहे असें समजण्यांत येईल; मात्र मागासलेले व खालच्या वर्गांतील विद्यार्थी यांचे बाबतींत हें प्रमाण कमी करण्यास हरकत नाहीं.

(क) जर वरच्या वर्गांतील मुलांचें प्रमाण अपुरें असेल;

(ड) जर आरोग्याचे दृष्टीनें जागा असमाधानकारक असेल, अगर सामान अपुरें असेल, अथवा शिक्षकवर्ग कमी लायकीचा आणि अपुरा असेल;

(इ) जर शाळेचीं रजिष्टरें, कागदपत्र व हिशेब हीं योग्य प्रकारें राखण्यांत आलीं नसतील, अगर अविश्वसनीय आहेत असें आढळेल; अथवा

(फ) जर लोकल ॲथॉरिटी अगर सरकार यांना जरूर ती माहिती व कागदपत्र चालकांकडून पुरविण्यांत आले नाहींत.

९१. ब वर्गांतील शाळांना कमालीची ग्रँट—ब वर्गांतील शाळेला कोणत्याही वर्षी द्यावयाची कमालीची ग्रँट गत वर्षीच्या रोजच्या हजिरीच्या सरासरीवरून आकारली जाईल; आणि सामान्यतः दर मुलामागें ४ रु. व दर मुलीमागें ६ रु. यापेक्षां ती जास्त असणार नाहीं.

निरनिराळ्या वर्गांतील अगर वेगवेगळ्या जातींतील मुलामागें निरनिराळे दर ठरविण्यास या नियमानें बाध येत नाहीं; उदाहरणार्थ, बालवर्गांतील मुलामागें ३ रु., पहिल्या इयत्तेंतील मुलामागें ४ रु., दुसरींतील मुलामागें ५रु., तिसरींतील मुलामागें ६रु. आणि खालच्या वर्गांतील मुलाकरितां (म्हणजे डिप्रेस्ड क्लासेसच्या मुलाकरितां) हे आंकडे ५रु., ६ रु. याप्रमाणें वाढविण्यास हरकत नाहीं.

ग्रँट ठरवितांना शिक्षणाची मर्यादा व चांगुलपणा ह्यांकडे मुख्यत्वेंकरून लक्ष द्यावें, परंतु जर रजिस्टरें योग्य रीतीनें ठेवलेलीं नसतील, अगर सरकार अगर लोकल ॲथॉरिटी यांस जरूर तीं माहितीपत्रकें पुरविलीं नसतील तर ग्रँटमधून कांहीं रक्कम कापण्यांत यावी.

९२. इमारती वगैरेकरितां ग्रँट—पसंत असलेल्या शाळांना इमारती व इतर नैमित्तिक खर्च यांकरितां सरकार व लोकल ॲथॉरिटी यांची अशा खर्चाकरितां आगाऊ मंजुरी मिळाली असल्यास ग्रँट देण्यास हरकत नाहीं. ही ग्रँट प्रत्यक्ष अगर अंदाजी खर्च यांपैकीं जी रक्कम कमी असेल तिच्या निम्म्यापेक्षां अधिक असतां कामा नये, व इमारतीकरितां द्यावयाची ग्रँट प्रत्येक विद्यार्थ्यास बसावयास १० चौरसफूट जागा याप्रमाणें इमारतींत जितक्या विद्यार्थ्यांची सोय करितां येईल अशा प्रत्येक विद्यार्थ्यामागें साधारणपणें २० रुपयांपेक्षां अधिक असतां कामा नये.

९३. पसंत नसलेल्या शाळांना सार्वजनिक परीक्षेस विद्यार्थी पाठविण्याची मनाई—पसंत नसलेल्या कोणत्याहि शाळेला सरकारी शिक्षण खात्यानें घेतलेल्या कोणत्याहि सार्वजनिक परीक्षेकरितां विद्यार्थी पाठवितां येणार नाहींत.

# प्रकरण ७ वें.

## स्कूल कमिट्या.

१४. (१) पंचायत असलेल्या खेड्यांतील स्कूल कमिट्यांची घटना—मुंबई व्हिलेज पंचायत आक्ट, १९२० अन्वयें ज्या खेड्यांतून पंचायतीची रचना झालेली असेल त्या खेड्यांत प्रत्येक वर्षी पंचायतीनें आपल्या सभासदांमधून निदान तीन व पांचापेक्षां जास्त नाहींत इतक्यांची एक स्कूल कमिटी नेमावी.

(२) जर जिल्हा लोकल बोर्डाच्या मतें एखाद्या खेड्यांतील मुसलमान लोकसंख्या तेथील सर्व लोकसंख्येच्या एकदशांशपेक्षां अधिक असेल, व जर पोट नियम (१) प्रमाणें बनविण्यांत आलेल्या स्कूल कमिटींत मुसलमान सभासद नसेल, तर त्या कमिटीनें त्या खेड्यांतील प्रौढ मुसलमान पुरुषांपैकीं कोणी तरी एकजण निवडून घ्यावा.

[३] जर जिल्हा लोकल बोर्डाच्या मतें एखाद्या खेड्यांतील खालच्या वर्गाची लोकसंख्या तेथील सर्व लोकसंख्येच्या एकदशांशपेक्षां अधिक असेल, व जर पोट नियम [१] प्रमाणें बनविण्यांत आलेल्या स्कूल कमिटींत सदर वर्गातील सभासद नसेल, तर त्या कमिटीनें त्या खेडयांतील सदर वर्गातील प्रौढ पुरुषांपैकीं कोणीतरी एकजण निवडून घ्यावा.

१५. पंचायत नसलेल्या खेडयांतील स्कूल कमिट्यांची घटना—ज्या खेडयांतून लोकल बोर्डाची शाळा आहे, पण जेथें पंचायतीची रचना झालेली नाहीं, अशा खेडयांतून स्कूल बोर्डानें निदान तिन आणि जास्तींत जास्ती सात सभासदांची एक स्कूल कमिटी नेमिली पाहिजे; मात्र ही कमिटी नेमितांना मुसलमान, मागासलेले व खालचे वर्ग यांच्या प्रतिनिधित्वाकडे योग्य लक्ष पुरविलें पाहिजे.

१६. चेअरमन, व्हाइस चेअरमन यांच्या निवडणुकी.—स्कूल कमिटी ही आपल्या सभासदांमधूनच आपला चेअरमन निवडील. तसेंच कमिटी अध्यक्षाच्या गैरहजिरींत त्याचें काम चालविण्याकरितां एक व्हाइस चेअरमन निवडील.

१७. स्कूल कमिट्यांचीं कामें—स्कूल कमिटी पुढील कामें करील:—

[अ] शाळेकरितां योग्य जागा मिळवून देण्याच्या कामीं स्कूल बोर्डास मदत करणें;

[ब] जर लोकल ॲथॉरिटीवर शाळागृहाच्या सालोसाल करावयाच्या दुरुस्तींचा बोजा असेल, तर त्या करणें;

[क] स्वतःच्या देखरेखीखालीं असलेल्या सर्व शाळांची महिन्यांतून निदान एक वेळ तरी पहाणी करणें;

[ड] शाळेचे हजिरीपट चालू तारखेपर्यंत लिहिले आहेत किंवा नाहींत हें पाहणें; शाळेच्या पाहाणीच्या वेळच्या प्रत्यक्ष हजर मुलांची संख्या ही हजेरीपटांत दाखविलेल्या हजर मुलांच्या संख्येशीं जुळते किंवा नाहीं हें पाहाणें, व या बाबतींत कांहीं अनियमितपणा दिसून आल्यास तो स्कूल बोर्डाच्या अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरास कळविणें;

[इ] मास्तराची हजिरी व शाळा उघडणें व बंद करणें या बाबतींत कांहीं अनियमितपणा अगर बेवक्तशीरपणा दिसून आल्यास तो स्कूल बोर्डाच्या अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरास कळविणें.

[फ] शाळेच्या इमारती पूर्णपणें दुरुस्त असून आरोग्यकारक स्थितींत आहेत याविषयीं खबरदारी घेणें.

९८. स्कूल कमिटीच्या सभासदांनीं शाळा पाहाणें—स्कूल कमिटीच्या कोणाही सभासदानें शाळा पाहाण्यास जावें, आणि त्यास कळवावीशी वाटेल ती स्वतःची सूचना त्यानें स्कूल कमिटीस करावी; परंतु त्यानें शिक्षक वर्गाला कोणताहि हुकूम सोडतां कामा नये.

९९. विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचा यत्न स्कूल कमिटीनें करणें—मुख्यत्वेंकरून मागसलेल्या व खालच्या वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचा व हजिरी सुधारण्याचा स्कूल कमिटीनें यत्न करावा.

१००. सक्तीचें शिक्षण सुरू करण्याच्या कामीं स्कूल कमिटीनें मदत करणें—जर एकाद्या हद्दींत सक्तीचें शिक्षण सुरू करण्याचा विचार असेल, तर त्या हद्दींतील शाळांच्या स्कूल कमिटीनें पालकांना ती योजना समजावून देण्याच्या कामीं मदत करावी, आणि स्कूल बोर्डानें सांगितलें असतां, शाळेस जाण्यास योग्य वयाच्या मुलांची मोजणी करण्याच्या कामीं मदत करावी.

१०१. स्कूल कमिटीनें सक्ती अमलांत आणणें—जेव्हां एखाद्या हद्दींत सक्ती सुरू करण्यांत येईल, तेव्हां स्कूल कमिटीनें ती अमलांत आणण्याचे कामीं मदत करावी.

१०२. स्कूल कमिटीनें हेडमास्तरास मदत करणें—आईबापांच्या दारिद्यामुळें पुस्तकें, पाट्या व शाळेचें इतर सामान हीं कोणत्या मुलांस द्यावयाचीं हें ठरविण्याचे कामीं स्कूल कमिटीनें शाळेच्या हेडमास्तरास मदत करावी.

१०३. हेडमास्तराच्या रजेचा चेअरमन यास रिपोर्ट—किरकोळ अगर कोणत्याहि इतर प्रकारच्या रजेवर जाण्यापूर्वी हेडमास्तरानें स्कूल कमिटीचा चेअरमन यास आपला बेत लेखी कळविला पाहिजे.

१०४. हेडमास्तरास रजा देण्याचा चेअरमनास अधिकार–हेडमास्तर एकदम फार आजारी पडेल तर किंवा त्याचा जवळचा नातेवाईक मरण पावला असेल अगर अशाच कांहीं अगदीं तांतडीच्या कारणानिमित्त हेडमास्तरास जाणें भाग असेल, तर हेडमास्तरास चार्ज सोडून जाण्याची परवानगी योग्य वाटल्यास देण्याचा स्कूल कमिटीच्या चेअरमनास अधिकार राहील. चेअरमननें स्कूल बोर्डाच्या अॅडमिनि- स्ट्रेटिव्ह ऑफिसरास ही गोष्ट तावडतोब कळविली पाहिजे.

१०५. परवानगीशिवायच्या गैरहजिरीचा रिपोर्ट करणें–हेडमास्तराच्या अगर असिस्टंटाच्या परवानगीशिवायच्या गैरहजिरीचा रिपोर्ट स्कूल कमिटीच्या चेअरमननें स्कूल बोर्डाच्या अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरास एकदम केला पाहिजे.

१०६. कांहीं प्रसंगीं चेअरमननें शाळेचा चार्ज घेणें–हेडमास्तर मयत झाल्यास व शाळेंत असिस्टंट नसल्यास, स्कूल कमिटीच्या चेअरमननें शाळेचा चार्ज स्वत: घेऊन तसें केल्याचें स्कूल बोर्डाच्या अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरास तावडतोब कळविलें पाहिजे.

१०७. कांहीं प्रसंगीं स्कूल कमिटीनें हजर राहणें–शाळा अगर मुलकी खातें यांतील एखादा अधिकारी अथवा डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड अगर स्कूल बोर्ड यांचा एखादा सभासद अगर अधिकारी शाळेची पाहाणी करण्याकरितां आल्यास स्कूल कमिटीचा चेअरमन व सभासद यांनीं शक्य असल्यास त्या वेळीं हजर असावें.

१०८. कांहीं प्रसंगीं स्कूल कमिटीसमक्ष शाळेचा चार्ज सोडणें–हेड- मास्तरची बदली झाली असतां जर चार्ज सोडणाऱ्या व चार्ज घेणाऱ्या हेडमास्त- रांत शाळेचे हिशेब, कागदपत्र, लांकडी सामान व इतर सामुग्री यांच्या बाबतींत मतभेद असेल, तर स्कूल कमिटीच्या चेअरमनास हजर राहतां आल्यास त्यासुद्धां दोन अगर अधिक मेंबरांच्या देखत चार्ज देणें घेणें झालें पाहिजे. हजर असलेल्या मेंबरांनीं योग्य वाटतील ते शेरे चार्ज रिपोर्टांत करावेत.

# प्रकरण ८ वें.

## लोकल ॲथॉरिटींना ग्रँट.

### अ.—नित्यस्वरूपाची ग्रँट

१०९. ग्रँटची आकारणी—प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या नित्य स्वरूपाच्या खर्चाबद्दल ॲक्टाच्या कलम १३ अन्वयें सरकारकडून मिळावयाच्या ग्रँटची आकारणी सामान्यतः पुढीलप्रमाणें केली जाईल.

### ( १ ) जिल्हा लोकल बोर्ड.

कोणत्याही वर्षी मिळावयाची ग्रँट ही, ह्या कायद्यानें योजिलेली व्यवस्था अमलांत येईल त्या वेळीं प्राथमिक शिक्षणाकरितां सरकारनें ठरविलेली ग्रँट, अधिक त्या सालचा प्राथमिक शिक्षणावरील मान्य असलेला एकंदर नित्य खर्च व ज्या प्रत्यक्ष झालेल्या नित्य खर्चावर ठराविक ग्रँट बसविली असेल तो खर्च या दोहों-मधील अंतराचा दोनतृतीयांश यापेक्षां कमी नसेल.

### लोकल ॲथॉरिटी असलेल्या म्युनिसिपालिट्या.

प्राथमिक शिक्षणाकरितां त्या सालीं झालेल्या खर्चापैकीं मान्य असलेल्या एकंदर नित्य खर्चाचा निम्मा हिस्सा ग्रँट मिळेल.

मात्र या कायद्याच्या कलम १२ मध्यें मंजूर झालेल्या योजनेनें होणाऱ्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाखेरीज इतर प्राथमिक शिक्षणावरील खर्चाकरितां लोकल बोर्ड अगर म्युनिसिपालिटी यांना या दरानें ग्रँट देणें हें सरकारच्या त्या त्या वर्षीच्या सांपत्तिक स्थितीवर अवलंबून राहील.

११०. वर्षाच्या अंदाजीखर्चावर ग्रँट ठरविणें, पुढील वर्षी आवश्य ती वजावाढ करणें—कोणत्याही वर्षी द्यावयाची ग्रँट ही त्या वर्षीच्या अंदाजानें ठरविलेल्या खर्चावर ठरविण्यांत येईल, आणि पुढील वर्षी अवश्य ती वजावाढ केली जाईल. उदाहरणार्थः—एका जिल्हा लोकल बोर्डाची १९२४-२५ ची खर्चाची अंदाजी रक्कम चार पूर्णांक एक द्वियांश लक्ष रुपये आहे, नियम १०९ (अ) मध्यें योजिल्याप्रमाणें सरकारनें दिलेली ठराविक ग्रँट दोन पूर्णांक एक द्वियांश लक्ष रुपये आहे, आणि ज्या खर्चावर ती दिली असें मानण्यांत आलें तो खर्च ३ लक्ष रुपये आहे.

१९२४-२५ मध्यें द्यावयाची ग्रँट ही दोन पूर्णांक एक द्वियांश लक्ष रुपये अधिक दोन तृतीयांश ($४\frac{१}{२}$—३) लक्ष अगर सर्व मिळून तीन पूर्णांक एक द्वियांश लक्ष रुपये होईल.

१९२४-२५ अखेर असें आढळून आलें कीं, त्या वर्षांत जिल्हा लोकल बोर्डाचा खर्च ४,२०,००० रुपये झाला, आणि ग्रँट २,५०,००० रुपये अधिक (४,२०,००० रुपये—३,००,००० रुपये) अगर ३,३०,००० रुपये असावयास पाहिजे होती. ही २०,००० रुपयांची जास्त दिली गेलेली रक्कम १९२५-२६ सालाच्या अंदाजी खर्चावर आकारलेल्या ग्रँटमधून त्या वर्षी कापून घेण्यांत येईल.

१११. ग्रँट केव्हां द्यावयाची—सरकारनें अंदाजलेल्या ग्रँटची निम्मे रक्कम लोकल ॲथॉरिटीला दरवर्षी तारीख १ मे अगर त्याच्या अगोदर देण्यांत येईल, आणि बाकीची नियम ११० मध्यें निर्दिष्ट केलेली बजावाद झाल्यानंतर तारीख १ नोव्हेंबर अगर त्याच्या अगोदर देण्यांत येईल.

११२. ग्रँट आकारावयाच्या खर्चाच्या बाबी—ग्रँट आकारावयाच्या वार्षिक नित्य खर्चांत पुढील बाबींचा समावेश होईलः—

(अ) जरूर ते कायम व हंगामी नेमलेले कारभार पाहणारे, देखरेख करणारे, तपासणी करणारे अधिकारी आणि शिक्षक, कारकून व इतर नोकर, त्याचप्रमाणें मुलांना शाळेंत हजर राहण्यास भाग पाडणें, मुलांची मोजणी करणें व अशींच दुसरीं कामें करण्याकरितां मुद्दाम नेमलेले अधिकारी यांच्यावरील खर्च व रजा, पेन्शन अगर प्राव्हिडेंट फंड यांचे बाबींत लोकल ॲथॉरिटीनें भरावयाच्या रकमा.

(ब) शाळागृहें व कचेरीच्या इमारती यांचें भाडें, घरपट्टी, कर आणि दुरुस्तीवर झालेला खर्च.

(क) लांकडी सामान, शिक्षणविषयक उपकरणें, गरीब मुलांकरितां पुस्तकें व पाट्या आणि वर्गांकरितां लागणारीं पुस्तकें व बक्षिस पुस्तकें यांचेवर झालेला खर्च, मात्र ह्या बाबीवर होणारा खर्च कोणत्याही शाळेंत शाळेच्या सुरवातीचे वर्षीं प्रत्येक विद्यार्थ्यामागें ५ रुपये व नंतर पुढें कोणत्याही वर्षी १ रुपया यापेक्षां जास्त असतां कामा नये. नाहींतर हा खर्च नैमित्तिक समजला जाईल.

(ड) किरकोळ खर्चाकरितां शाळांना दिलेल्या मासिक रकमा (सादिलवार खर्च);

(ई) प्राथमिक शाळांतील शिष्यवृत्ती, आणि ट्रेनिंग अगर अशाच सरकारनें पसंत केलेल्या इतर संस्थांमधून दिलेल्या शिष्यवृत्तींच्या रकमा.

(फ) प्रवासभत्ते;

(ग) स्टेशनरी. तिकिटें, छापणावळ आणि कचेरीच्या कामानिमित्त झालेला इतर खर्च;

( इ ) हद्दींतील पसंत केलेल्या प्राथमिक शाळांच्या ग्रँट्स;

( आय ) सरकाराकडून पसंत केला जाईल असा इतर योग्य खर्च;

मात्र,

( १ ) प्राथमिक शिक्षणाखेरीज इतर शिक्षणावर लोकल ॲथॉरिटीनें खर्च केलेली रक्कम वरील वार्षिक नित्य खर्चांत घालतां कामा नये.

( २ ) रिफंड म्हणजे अगाऊ जास्त दिल्या गेलेल्या व मागाहून वसूल करून घेतलेल्या रकमा वरील खर्चांतून वजा केल्या पाहिजेत.

( ३ ) मुंबई लोकल बोर्ड ॲक्ट, १९२३ च्या ७७ आणि ७९ कलमांअन्वयें जिल्हा लोकल बोर्डानें म्युनिसिपालिटीला अगर कॅन्टोन्मेंटला दिलेली ग्रँट वरील खर्चांत दाखल करितां कामा नये.

११३. कोणत्याही वर्षांतील खर्च अंदाजाबाहेर जातां कामा नये.—सक्तीचें शिक्षण सुरू करावयाच्या योजनेमुळें वार्षिक नित्य खर्चाची होणारी वाढ ही आदल्या वर्षीच्या खर्चापेक्षां लोकल ॲथॉरिटीनें अंदाजलेल्या व सरकारनें मंजूर केलेल्या रकमेपेक्षां जास्त असतां कामा नये.

## ब-नैमित्तिक स्वरूपाची ग्रँट.

११४. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजनेंत ज्याचा समावेश झाला आहे अशा खर्चाबद्दल द्यावयाची ग्रँट—शाळेच्या इमारती नवीन बांधणें, विकत घेणें, वाढविणें अगर पुन्हां बांधणें, आणि जिच्यामुळें शाळेच्या इमारतीच्या किंमतींत नक्की वाढ होईल अशी स्पेशल रिपेर करणें, जागा विकत घेणें, यांप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चासाठीं आणि नियम ११२ [ क ] मध्यें घालून दिलेल्या मर्यादेच्या बाहेर लांकडी सामान, उपकरणें व पुस्तकें यांजवर होणाऱ्या खर्चासाठीं नैमित्तिक स्वरूपाची ग्रँट देण्यांत येईल; मात्र ॲक्टाच्या कलम १० [ २ ] अन्वयें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सोय करण्याच्या योजनेचा एक भाग म्हणून सदरहू खर्चास सरकारकडून मंजुरी मिळालेली असली पाहिजे, आणि लोकल ॲथॉरिटीनें अंदाजिलेल्या रकमेपेक्षां ती खर्चाची रकम जास्त होतां कामा नये. लोकल ॲथॉरिटी म्युनिसिपालिटी असेल तर सदरहू ग्रँट खर्चाच्या निम्म्याएवढी व लोकल ॲथॉरिटी जिल्हा लोकल बोर्ड असेल तर ती खर्चाच्या दोन-तृतीयांशाइतकी असेल.

११५. इतर नैमित्तिक खर्चासाठीं द्यावयाची ग्रँट—सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सोय करण्यासंबंधींच्या योजनेंत न येणाऱ्या इमारती वगैरेप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चासाठीं देखील सरकारला नैमित्तिक स्वरूपाची ग्रँट देतां येईल; मात्र अशा खर्चास सरकारची आगाऊ मंजुरी मिळालेली असली पाहिजे. अशी ग्रँट देणें हें सरकारच्या सांपत्तिक स्थितीवर अवलंबून राहील.

११६. ग्रँट देणें ज्यांवर अवलंबून राहील त्या अटी—इमारतीचा घाट ( डिझाइन ) व बांधणी ह्यांत आरोग्यशास्त्रदृष्ट्या करावयाच्या तरतुदी, तपशील-वार नकाशे व खर्चाचीं अंदाजपत्रकें ह्यांची पसंती, ट्रस्ट डीड्स व करारनामे ह्यांची पूर्तता, ह्या गोष्टींसंबंधानें सरकाराकडून वेळोवेळीं ज्या अटी घातल्या जातील त्या पाळल्या जाण्यावर नियम ११४ व ११५ ह्यांअन्वयें द्यावयाची नैमित्तिक स्वरूपाची ग्रँट अवलंबून राहील.

---

# प्रकरण ९ वें.

## लोकल ॲथॉरिटी नसलेल्या म्युनिसिपालिटच्या.

११७. स्वतःच्या शाळा चालविण्यास अधिकृत नसलेल्या म्युनिसिपालिटीच्या शाळा जिल्हा लोकल बोर्डानें चालविणें—आपल्या हद्दींतील शाळा चालविण्यास अधिकृत नसलेल्या अशा एकाद्या म्युनिसिपालिटीच्या शाळा ज्या जिल्ह्यांत ती म्युनिसिपालिटी असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा लोकल बोर्डानें चालविल्या पाहिजेत, आणि जिल्हा लोकल बोर्डानें त्या हद्दींतील इतर पसंत केलेल्या प्राथमिक शाळांना ग्रँटही दिली पाहिजे.

११८. म्युनिसिपालिटी आणि डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड यांनीं सोसावयाच्या खर्चाचें प्रमाण—लोकल ॲथॉरिटी नसलेल्या म्युनिसिपालिटींतील प्राथमिक शिक्षणाकरितां प्रतिवर्षीं होणाऱ्या नित्य खर्चाचा एकतृतीयांश त्या म्युनिसिपालिटीनें दिला पाहिजे; म्युनिसिपालिटीनें द्यावयाची रक्कम नियम ११७ मध्यें नमूद केल्याप्रमाणें आकारण्यांत येईल.

११९. (१) म्युनिसिपालिटीचा *वांटा ठरविण्याची आणि तो देण्याची रीति—लोकल ॲथॉरिटी नसलेल्या म्युनिसिपालिट्या धरून जिल्हा लोकल बोर्डाच्या हद्दींतील प्रत्येक विद्यार्थ्यामागें व्यवस्था, देखरेख वगैरेबद्दल खर्च धरून अंदाजिलेल्या सरासरी नित्य खर्चाचा एकतृतीयांश आणि त्या वर्षींच्या म्युनिसिपल शाळांतील मुलांची पटावरील अंदाजलेली सरासरी यांच्या गुणाकाराइतकी रक्कम दरसाल म्युनिसिपालिटीला द्यावी लागेल. म्युनिसिपल हद्दींतील इतर पसंत केलेल्या शाळांस त्या वर्षीं द्यावयाच्या ग्रँट-इन-एडकरितां अंदाजिलेल्या रकमेचा एकतृतीयांश या रकमेंत मिळविला पाहिजे. आक्टाच्या कलम ६ (१) अन्वयें म्युनिसिपालिटीकडून जिल्हा लोकल बोर्डास त्या त्या वर्षीं दिल्या जाणाऱ्या रकमा वजा करून, ह्या कलमांत सांगितलेल्या रीतीनें अंदाजिलेली सर्व रक्कम

म्युनिसिपालिटीनें जिल्हा लोकल बोर्डास दर वर्षी दोन सहामाही हप्त्यांनीं आगाऊ दिली पाहिजे. पहिला हप्ता १० एप्रिलपूर्वी व दुसरा हप्ता १० आक्टोबरपूर्वी भरला पाहिजे.

( २ ) प्रत्येक वर्षाच्या शेवटीं पोट नियम ( १ ) प्रमाणें म्युनिसिपालिटीनें द्यावयाची वास्तविक रक्कम ही हजिरीपटावरील विद्यार्थ्यांची वास्तविक संख्या, प्रत्येक विद्यार्थ्यामागें आलेला वास्तविक सरासरी खर्च आणि त्या वर्षी पसंत केलेल्या इतर शाळांस ग्रँट-इन्-एड म्हणून देण्यांत आलेल्या वास्तविक रकमा यांवरून काढण्यांत येईल, आणि आवश्यक ती वजावाट केली जाईल.

उदाहरणार्थः—१९२५-२६ सालांत विद्यार्थ्यांची अंदाजिलेली संख्या १,००० व दर विद्यार्थ्यामागें अंदाजिलेला खर्च २१ रुपये आहे, आणि मदतीच्या प्राथमिक शाळांना द्यावयाची ग्रँट ६०० रुपये आहे; तर सदर सालांत म्युनिसिपालिटीनें द्यावयाची रक्कम रु. $\frac{२१}{३}$×१,०००+रु. $\frac{६००}{३}$ अगर एकंदरीत ७,२०० रुपये होईल.

१९२५-२६ चे शेवटीं असें आढळून आलें कीं, विद्यार्थ्यांची सरासरी संख्या ९५० होती, व प्रत्येक विद्यार्थ्यामागें सरासरी खर्च रुपये १८ च झाला आहे, आणि मदतीच्या शाळांना वास्तविक देण्यांत आलेली रक्कम रु. ७५०आहे. तर म्युनिसिपालिटीनें वास्तविक द्यावयाची रक्कम $\frac{१८}{३}$ ×९५०+ $\frac{७५०}{३}$ रुपये अगर एकंदरींत रु. ५,९५० इतकीच होईल. हा ७,२००—५,९५० रुपयांचा फरक म्हणजे रुपये १,२५० ची रक्कम १९२६–२७ सालाकरितां म्युनिसिपालिटीनें द्यावयाच्या अंदाजी ठरविलेल्या रकमेंतून वजा केली जाईल.

१२०. म्युनिसिपालिटी व सरकार ह्यांनीं सोसावयाच्या इमारतींवरील नैमित्तिक खर्चाचें प्रमाण—शाळेच्या इमारती बांधण्याकरितां अगर वाढविण्याकरितां लागणाऱ्या नैमित्तिक खर्चाचा $\frac{१}{३}$ म्युनिसिपालिटीनें दिला पाहिजे, व इमारती बांधणें सरकारनें मंजूर केलें असेल आणि मदतीदाखल ग्रँट मंजूर केली असेल, तर सरकार ग्रँट-इन्-एड म्हणून बाकीचा $\frac{२}{३}$ खर्च देण्यांत येईल.

१२१. इतर नैमित्तिक खर्च—इतर नैमित्तिक खर्च, उदाहरणार्थ, नियम ११२ ( क ) मध्यें घालून दिलेल्या मर्यादेबाहेरील लांकडी सामान, उपकरणें आणि पुस्तकें यांजवरील अगर स्पेशल रिपेरीवरील खर्चाचा $\frac{१}{३}$ म्युनिसिपालिटीनें दिला पाहिजे.

नित्य खर्च कोणता व नैमित्तिक कोणता या बाबतींतील सरकारचा निर्णय कायमचा मानला जाईल.

१२२. प्राथमिक शाळांतील गोळा होणारी फीची रकम लोकल ॲथॉरिटीचे खातीं जमा करणें—म्युनिसिपालिटीच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकडून आलेली फी लोकल ॲथॉरिटीचे खातीं जमा केली जाईल.

१२३. म्युनिसिपालिटीनें स्कूल कमिटी नेमणें—म्युनिसिपल हद्दींतील प्राथमिक शाळांवर देखरेख करण्याकरितां म्युनिसिपालिटीनें योग्य वाटेल त्याप्रमाणें म्युनिसिपल कौन्सिलरांची अगर कौन्सिलर नाहींत अशा इसमांची एक स्कूल कमिटी नेमावी.

१२४. नोटिफाइड एरिया कमिट्यांना नियम कसे लागू होतील—ह्या प्रकरणांतील नियम म्युनिसिपालिट्यांच्या बाबतींत ज्या प्रकारें आणि ज्या प्रमाणांत लागू होतात, त्याच प्रकारें आणि त्याच प्रमाणांत ते, बॉंबे डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट, १९०१, कलम ५४, पोट-कलम ( १ ), विभाग ( प ) ज्या नोटिफाइड एरिआंना लागू केला आहे त्यांच्या कमिट्यांनाही लागू होतील, आणि या नियमापुरत्या अशा कमिट्या लोकल ॲथॉरिटीज नसलेल्या म्युनिसिपालिट्या समजल्या जातील व ॲक्टाच्या कलम ६ ( १ ) मध्यें नमूद केलेल्या गोष्टी त्यांना लागू होतील.

---

# प्रकरण १० वें.

## सक्तीची अंमलबजावणी.

१२५. मुलांची खानेसुमारीः रजिस्टर प्रसिद्ध करणेंः—कोणत्याही क्षेत्रांत सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करण्यापूर्वी, त्या क्षेत्रांतील सक्तीच्या प्राथमिक शिक्षणास पात्र अशा सर्व मुलांची खानेसुमारी स्कूल बोर्डानें घेवबावी आणि परिशिष्ट ब यांत दिलेल्या नमुन्याप्रमाणें अशा मुलांचें रजिस्टर प्रसिद्ध करावें. मुलींना सक्तीचें प्राथमिक शिक्षण देण्याचें योजिलें असेल, तर मुलींचेंहि निराळें रजिस्टर तयार करावें. ह्या रजिस्टरांत सालोसाल दुरुस्ती करण्यांत यावी.

१२६. शाळेच्या रजिस्टरांत जन्मतारखेची नोंदः—१२५ नियमांत उल्लेखिलेल्या रजिस्टरांत दिलेली प्रत्येक मुलाची जन्म-तारीख तें मूल ज्या शाळेंत जाईल त्या शाळेच्या जनरल रजिस्टरांत नोंदिली जावी आणि स्कूल बोर्डाच्या मंजुरीवांचून या तारखेंत बदल होऊं नये.

१२७. शाळेंत हजर राहण्याबद्दल सूचना देणेंः—अमुक तारखेस मुलास पसंत केलेल्या शाळेंत दाखल करावें व त्या तारखेपासून पुढें तो शाळेंत हजर राहील अशी तजवीज करावी अशा प्रकारची नोटीस प्रत्येक मुलाच्या बापास देणें

हें स्कूल बोर्डाचें किंवा या कायद्याच्या २० [२] कलमाप्रमाणें ज्या कमिटीस किंवा इसमास अधिकार दिला असेल त्याचें कर्तव्य आहे. नोटिशींत जी तारीख नमूद करावयाची तिच्या निदान तीन महिने अगोदर अशी नोटीस दिली पाहिजे व ती परिशिष्ट ब मध्यें दिलेल्या नमुन्याप्रमाणें असली पाहिजे.

टीपः—नोटीशीची प्रत आईबापांच्या अगर पालकाच्या हातीं समक्ष दिली असतां अथवा आईबाप अगर पालक ज्या घरांत शेवटीं राहात असतील त्या घरावर चिकटविली असतां, ती नोटीस योग्य रीतीनें बजावण्यांत आली आहे असें मानण्यांत येईल.

१२८. आईबापांचें म्हणणें ऐकून घेणें:—एखाद्या मुलाच्या बापानें ॲक्टाच्या १९ व्या कलमाखालीं माफीचा अर्ज केला, तर स्कूल बोर्ड अथवा ज्या इसमास किंवा कमिटीस स्कूल बोर्डानें या बाबतींत अधिकार दिला असेल ती, एकादा हुकुम सोडण्यापूर्वी त्यास आपलेपुढें बोलावील व त्याच्या अर्जाचा निकाल त्यास लेखी कळवील.

१२९. शाळेंत हजर राहण्याविषयींच्या हुकुमांतील तपशील हेडमास्तरांना कळविणें:—ज्या मुलांना शाळेंत हजर ठेवण्याविषयीं त्यांचे बापांना हुकूम केला असेल त्या सर्व मुलांचीं नांवें व ज्या तारखेपासून त्यांनीं शाळेंत हजर राहणें सक्तीचें आहे त्या तारखा त्या त्या शाळांच्या हेडमास्तरांस कळविण्यांत येतील.

१३०. गैरहजेरीबद्दल रिपोर्टः—१२७ नियमांत सांगितल्याप्रमाणें एकादें मूल शाळेंत न येईल तर त्याविषयीं स्कूल बोर्डाकडे अथवा या कायद्याच्या २० [२] कलमाखालीं स्कूल बोर्डानें ज्या कमिटीस अथवा इसमास अधिकार दिले असतील त्याकडे, हेडमास्तरानें लागलाच रिपोर्ट करावा.

१३१. मूल अथवा त्याचा बाप दुसऱ्या ठिकाणीं राहण्यास गेल्यास त्याबद्दल स्कूल बोर्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर यास कळविणें:—शाळेंत जाणाऱ्या मुलाच्या बापानें राहाण्याचें शहर अथवा गांव सोडल्यास, मूल दुसरीकडे राहण्यास गेल्याबद्दल स्कूल बोर्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर यास कळविणें हें ज्या शाळेंत मूल जात असेल त्या शाळेच्या हेडमास्तराचें काम आहे. राहाण्याचें नवीन ठिकाण दुसऱ्या एखाद्या सक्तीच्या क्षेत्रांत असेल तर, त्या क्षेत्रांतील शाळेत मुलास हजर ठेवण्याबद्दल ठराविक नोटीस त्याचे बापावर बजावण्याची स्कूल बोर्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरनें व्यवस्था केली पाहिजे.

# प्रकरण ११ वें

## सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासंबंधीं योजना तयार करणें.

१३२. योजनेंत असावयाच्या बाबीः—या कायद्याच्या ११ व्या कलमाखालीं केलेल्या योजनेंत असावयास पाहिजे असलेल्या बाबी पुढील तीन सदरांखालीं दिल्या पाहिजेतः—.

[अ] तरतूद करावयाच्या मुलाची अंदाजिलेली संख्या.

[ब] कांहीं मुदतीच्या अवकाशांत—ही मुदत १० वर्षांपेक्षां अधिक नसावी—सक्ती कशी लागू करीत जावयाची हें दाखविणारा ढोकळ कार्यक्रम व त्याचा अंदाजिलेला खर्च.

[क] या कार्यक्रमाच्या प्रत्येक वर्षासाठीं सविस्तर योजना.

१३३. मुलांच्या अंदाजिलेल्या एकंदर संख्येविषयीं ज्या नमुन्याप्रमाणें माहिती द्यावी तोः—१३२ व्या नियमाच्या [अ] पोटकलमाखालीं लागणारी माहिती क, ड, इ, फ परिशिष्टांतील तत्तघाच्या नमुन्याप्रमाणें तयार केली पाहिजे.

१३४. साधारण कार्यक्रमांत असावयाच्या बाबी—१३२ व्या नियमाच्या (ब) पोटकलमाखालीं उल्लेख झालेल्या ढोकळ कार्यक्रमांत ज्या तत्वांप्रमाणें सक्ती करावयाची तीं तत्त्वें, ज्या मुदतींत तो कार्यक्रम पुरा करावयाचे योजिलें आहे ती मुदत आणि खर्चाच्या आपल्या वांटयाची तरतूद करण्यासाठीं लोकल ॲथॉरिटी जे उपाय योजूं म्हणते ते उपाय, ह्यांचा समावेश झाला पाहिजे.

ग, ह् व आय परिशिष्टांत दाखविलेल्या नमुन्याप्रमाणें तक्तेहि तयार केले पाहिजेत व ते सरकारकडे सादर केले पाहिजेत; ग परिशिष्ट **दरसालकरितां वेगळें** करावयाचें.

१३५. तपशीलवार योजना—नियम १३२ च्या पोटकलम (क) मध्यें ज्याचा उल्लेख आहे त्या कार्यक्रमाच्या तपशीलवार योजना प्रत्येक वर्षाची सविस्तर योजना परिशिष्ट ज मध्यें दाखविलेल्या नमुन्याप्रमाणें तयार करून ती निदान एक वर्ष आगाए सरकाराकडे सादर केली पाहिजे. उदाहरणार्थः १९२६-२७ साठीं केलेली योजना तारीख १ एप्रिल १९२५ च्या पूर्वी सरकारकडे सादर करण्यांत यावी. ह्याचप्रमाणें पुढील वर्षांचें समजावयाचें.

# प्रकरण १२ वें.

## ऐच्छिक तत्त्वावर प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं योजना तयार करणें.

१३६. योजनेचे मुद्दे पाडणें—प्राथमिक शिक्षणाचा ऐच्छिक तत्वावर प्रसार करण्यासाठीं तयार केलेल्या योजनेंत पुढील तीन मुद्यांसंबंधीं माहिती असावी:—

(अ) ज्या मुलांसाठीं तरतूद करावयाची त्यांची अंदाजी एकूण संख्या.

(ब) प्रसाराचा कांहीं मुदतीचा—ही मुदत १० वर्षांहून अधिक नसावी—ठोकळ कार्यक्रम.

(क) कार्यक्रमाच्या प्रत्येक वर्षासाठीं खुलासेवार योजना.

१३७. मुलांची अंदाजी एकुण संख्या—१३६ व्या नियमाच्या (अ) पोटकलमाप्रमाणें लागणारी माहिती ह्या नियमांच्या शेवटीं जोडलेलीं परिशिष्टें क, ड, इ आणि फ ह्यांत दर्शविलेल्या तक्त्यांच्या रूपांत तयार करून सरकारकडे पाठविण्यांत यावी.

१३८. सामान्य कार्यक्रम—१३६ व्या नियमाच्या (ब) पोट कलमांत सांगितलेल्या ठोकळ कार्यक्रमांत, ज्या तत्वांवर शाळा उघडण्याचें योजिलें असेल तीं तत्त्वें, ज्या मुदतींत तो कार्यक्रम पुरा करावयाचा असेल ती मुदत आणि आपल्या वांटयास येणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यासाठीं लोकल ॲथॉरिटीचा जे उपाय योजण्याचा विचार असेल ते, ह्यांबद्दल माहिती असावी.

ह्या नियमांस जोडलेलीं परिशिष्टें ग, ह व आय् ह्यांत दाखविलेले तक्तेहि तयार करून सरकारास सादर केले पाहिजेत. ग परिशिष्टांत दाखविलेला तक्ता **प्रत्येक वर्षाबद्दल निराळा केला पाहिजे.**

१३९. खुलासेवार योजना—१३६ व्या नियमाच्या (क) पोटकलमांत ज्याचा उल्लेख आहे त्या कार्यक्रमाच्या प्रत्येक वर्षाची सविस्तर योजना परिशिष्ट के मध्यें दिलेल्या सूचनांप्रमाणें तयार करून ती निदान एक वर्ष आधी सरकारकडे सादर केली पाहिजे. उदाहरणार्थ, १९२६-२७ साठीं केलेली योजना तारिख १ एप्रिल १९२५ च्या पूर्वी सरकारकडे सादर करावी. याचप्रमाणें पुढील वर्षांचें समजावयाचें.

# प्रकरण १३ वें.

## बजेट (खर्चाचें अंदाजपत्रक) तयार करणें.

### (अ). बजेट

१४०. (१) बजेट स्कूल बोर्डानें तयार करावयाचें—सरकार ठरवील त्या प्रकारच्या नमुन्याप्रमाणें प्रत्येक वर्षाकरितां कच्चें बजेट स्कूल बोर्डानें तयार करावें व तें लोकल ॲथॉरिटीकडे मंजुरीसाठीं आदल्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेपूर्वी पाठवावें.

(२) त्या त्या वर्षाकरितां मिळणारी प्रांतिक ग्रँट मंजूर होतांच स्कूल बोर्डानें बजेटांत अवश्य ते फेरफार करावे व तें सुधारलेलें बजेट लोकल ॲथॉरिटीकडे कायमची मंजुरी मिळविण्यासाठीं पाठवावें. लोकल ॲथॉरिटीला ह्या बजेटांत आवश्यक वाटतील ते फेरफार करितां येतील. लोकल ॲथॉरिटीनें हें सुधारलेलें बजेट मार्चच्या १ ल्या तारखेपर्यंत मंजुर केलें पाहिजे.

### (ब) हिशेब

१४१. (१) प्राथमिक शिक्षण फंड स्थापणें—प्रत्येक लोकल ॲथॉरिटीच्या स्कूल बोर्डानें प्राथमिक शिक्षण फंड स्थापिला पाहिजे. फंडाची रक्कम इंपिरियल बँक ऑफ इंडियाची स्थानिक शाखा असल्यास त्या शाखेंत, अगर सरकार पसंत करील अशा दुसऱ्या एकाद्या बँकेंत, किंवा को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, १९१२, अन्वयें रजिस्टर झालेल्या अगर रजिस्टर झाली असें मानण्यांत येणाऱ्या एखाद्या को-ऑपरेटिव्ह सोसायटींत, किंवा सरकारी खजिन्यांत ठेविली पाहिजे.

(२) पुढील बाबींचा समावेश अगर भरणा प्राथमिक शिक्षणफंडांत केला जाईलः—

(अ) प्राथमिक शिक्षण फंडांत समाविष्ट होणाऱ्या बाबीः—लोकल ॲथॉरिटी डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड असेल तर त्या बोर्डाजवळ हा कायदा अमलांत येण्याचे वेळीं एज्युकेशनल लोकल फंडाची असलेली शिल्लक; लोकल ॲथॉरिटी म्युनिसिपालिटी असेल तर तिजजवळ हा कायदा अमलांत येण्याचे वेळीं स्कूल फंडाची असलेली शिल्लक.

(ब) प्राथमिक शिक्षणाकरितां लोकल ॲथॉरिटीनें द्यावयाची ग्रँट; लोकल ॲथॉरिटी डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड असेल तर मुंबई लोकल बोर्ड ॲक्ट १९२३च्या ८० व्या कलमाअन्वयें शिक्षणाकडे द्यावयाचा उत्पन्नापैकीं भाग;

(क) प्राथमिक शिक्षणाकरितां सरकारनें द्यावयाच्या ग्रँट्स;

(ड) डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड जेव्हां लोकल ॲथॉरिटी असेल तेव्हां तीस लोकल ॲथॉरिटी नसलेल्या अशा जिल्ह्यांतील म्युनिसिपालिट्यांकडून खर्चादाखल मिळावयाची रक्कम;

(इ) प्राथमिक शाळांतील फी व दंड यांबाबत उत्पन्न;

(फ) प्राथमिक शिक्षणासाठीं म्हणून वेळोवेळीं ज्या इतर रकमा मिळत जातील त्या.

१४२. फंडांतून पैसे कसे काढावे—स्कूल बोर्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरनें सही केलेला व ज्यावर स्कूल बोर्ड चेअरमनची किंवा त्याचे गैरहाजिरींत व्हाइस चेअरमनची किंवा चेअरमननें चेक्स अथवा लेटर्स ऑफ क्रेडिट ह्यावर जोड सही करण्याचा अधिकार ज्यास दिला असेल असा स्कूल बोर्डाचा मेंबर ह्याची जोड सही आहे असा चेक किंवा लेटर ऑफ क्रेडिट हजर केल्याशिवाय बँकेंत किंवा सरकारी खजिन्यांत असलेल्या प्राथमिक शिक्षण फंडांतून पैसे काढतां येणार नाहींत. अशा प्रकारचा अधिकार दिल्याबद्दल प्राथमिक शिक्षण फंड ज्या बँकेंत किंवा सरकारी खजिन्यांत ठेविला असेल त्या बँकेस किंवा खजिन्यास योग्य सूचना चेअरमननें दिली पाहिजे.

१४३. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर ह्यावर योग्य तपासणीची जबाबदारी—चेक अगर लेटर ऑफ क्रेडिट तयार करण्यापूर्वी सर्व पावत्या अथवा बिलें तपासून पाहाण्याची जबाबदारी स्कूल बोर्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरवर राहील; व ज्या खर्चाच्या बाबीसाठीं ती रक्कम काढली जात असेल, तींत कांहीं विलक्षणपणा असल्यास ती गोष्ट, चेकवर अगर लेटर ऑफ क्रेडिटवर जोड सही करणारा जो स्कुल बोर्डाचा चेअरमन, व्हाइस चेअरमन अगर इतर मेंबर ह्याच्या मुद्दाम नजरेस आणणें हें त्याचें कर्तव्य समजलें जाईल.

१४४. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरचे हस्तें खर्च व्हावयाचा—सर्व खर्च स्कूल बोर्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसराच्या हस्तें केला जाईल.

१४५. आदा व खर्च यांच्या हिशेबाचा नमुना—लोकल ॲथॉरिटीच्या स्कूल बोर्डाचा आदा व खर्च यांचा हिशेब सरकारनें ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें ठेविला जावा.

१४६. जमाखर्चाचा गोषवारा डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्टशन यांजकडे पाठवावयाचा—प्रत्येक हिशेबी वर्षाच्या जमाखर्चाचा गोषवारा वर्ष संपतांच, शक्य तितक्या लवकर, सरकार ठरवील त्या नमुन्याप्रमाणें भरून डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांजकडे रवाना केला पाहिजे.

## ( क ) हिशेबतपासणी

१४७. हिशेबतपासणी—प्राथमिक शिक्षण फंडाचा आदा व खर्च यांचा हिशेब सरकार ठरवील त्या मुदती मुदतीनें, त्या तऱ्हेनें आणि त्या ऑडिटरकडून अगर त्याच्या देखरेखीखालीं तपासिला जाईल.

१४८. ऑडिटरास जमाखर्च, वह्या वगैरे पाहण्याची मुभा—१४७ व्या कलमाअन्वयें नेमिलेल्या प्रत्येक ऑडिटरास स्कूल बोर्डाच्या ताब्यांतील अगर हुकमतीखालील जमाखर्च आणि वह्या, दस्तऐवज, करारनामे, पावत्या व इतर सर्व कागदपत्र आणि दप्तर पाहाण्याची मुभा राहील.

१४९. अडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरानें ऑडिटरास मदत करावी—स्कूल बोर्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरानें ऑडिटरास, त्यानें जे शक काढिले असतील त्या सर्वांचा निकाल लावण्यास, मदत करावी आणि ऑडिटर बरोबर चर्चा करून ज्या शकांचा निकाल झाला नसेल ते तपासणींतील सर्व शक स्कूल बोर्डाची लगेच जी सभा भरेल त्या सभेपुढें ठेवावे.

१५०. ऑडिटरचा रिपोर्ट कोणाकडे पाठवावयाचा—प्रत्येक स्कूल बोर्डाच्या हिशेबाविषयीं ऑडिटरचा रिपोर्ट सरकारकडे पाठविला जाईल आणि त्याच्या नकला लोकल ॲथॉरिटीचा अध्यक्ष, स्कूल बोर्डाचा चेअरमन, डायरेक्टर ऑफ पब्लिक इनस्ट्रक्शन आणि त्या जिल्ह्याचे कलेक्टर यांजकडे पाठविण्यांत येईल.

१५१. तपासणींतील शकांस उत्तर दिलें पाहिजे—ऑडिटरनें हिशेबतपासणीचे वेळीं किंवा हिशेबतपासणीसंबंधीच्या रिपोर्टांत काढिलेल्या सर्व शकांचें उत्तर स्कूल बोर्डानें रिपोर्ट पोहोंचल्यापासून दोन महिन्यांचे आंत दिलें पाहिजे.

## शेडयूल अ.

| मागसलेले | डिप्रेस्ड | मागसलेले | डिप्रेस्ड |
|---|---|---|---|
| अगसा | अडवीचंचर | दर्जी | चमठा |
| अगेर | आलीकार | धनगर | चंडलगार |
| अग्री | बहुरुपी | धावड | छपरबंद |
| अहिर | बजानिआ | धोबी | चारण |
| अलकारी | बालसंतोषी | गाबित | चित्रकाठी |
| अंबिग | बांदी | गाम वक्कल | चोध्रा |
| अरिर | बर्दा | गंधारिया | चुहार |
| अतारी | बत्तल | गाणीग | दास |
| अत्ते वक्कल | बावा | गावडा | देपला |
| बावरीया | बवचा | गवळी | धेड |
| बढाई | बाजिगार | गवंडी | धोडिआ |
| बडीग | बेलदार | घाडी | ढोर |
| बागडी | बेरड (बेडर) | घांची | दुबळा |
| बजीर | भांवी | गोला | गांटा |
| बकुद | भांपटा | गोल्ला | गंभ्रप |
| बंधारा | भांड | गोंगडीकर | गारुडी |
| बारी | भंगी | गुडिगार | घडशी |
| भडबुंजा | भराडी | गुरव | घिसाडी |
| भंडारी | भाट किंवा बारोट | हब्बु | गोंड |
| भरवाड | भवय्या | हजाम | गोंधळी |
| भावसार | भाविण | हळेपैक | गोपाळ |
| भोई | भिल | हल्लीर | हालसर |
| बोगार | भिस्ती | हळवाक्कि वक्कल | हेळव |
| चतुर्थ | भुत | हणवर | होलिया |
| चौकळशी | बुरुड | हरिदास | जागरीया |
| दवगर | चांभार | हरकांत | जगियासी (सिंध) |

| मागसलेले | डिप्रेस्ड. | मागसलेले | डिप्रेस्ड. |
|---|---|---|---|
| हती | जजाक (सिंध) | खेत्री | लमाणी |
| ईळिगेर | जातिया | खत्री | महार |
| जाजरी | जोगी | खित्री (सिंध) | मैराळ |
| जाट | जोगीण | किराड | मानभाव |
| जिनगर | जोशी | गुजराथचा कोळी | मांग आणि मडिग |
| कम्बलीगार | जोहारी | कोळी, सोन | मांग गारुडी |
| काचरी | कहार | कोमारपैक | मांगेला |
| कच्छिया | कैकाडी | कोष्टी | मे |
| काची | कंजारी | कोट | मिआना |
| कलाल | कातकरी | क्षती | मेघवार |
| कलावंत | कापडी | कुढवक्कल | मोची |
| कामाठी | कटाई | कुलमा | मुकरी |
| कम्मार | खालपा | कुंभार | मुरळी वाघ्या |
| कामळी | खाटी (सिंध) | कुणबी आणि-कणबी | नायकाडा |
| कनड | खवास | | नंदिवाले |
| कंचगार | किलिकेत | कुंचवक्कल | नांगा |
| कनसारा | कोकणा | कुर्मी | नट |
| करे वक्कल | कोल्हाटी | कुरुब | नाथ |
| कसाई | कोळी, महादेव | लाड | ओड |
| कासार | कोळी, मल्हार | लाडक | पघारिआ |
| कातारी | कोळी ढोरे | लखेरी | पडिआर |
| काठी | कोरव | लिंगायत | पांगुळ |
| केळशी | कोरचार | लोढा | पात्रादवरु |
| खराडी | कोरी (सिंध) | लोहार | पाथरवट |
| खारक | कोटीगार | मच्छी | पवैया |
| खर्व | कछरिया (सिंध) | महिआ | फांसेपारधी |

| मागसलेले | डिप्रेस्ड. | मागसलेले | डिप्रेस्ड. |
|---|---|---|---|
| माळी | फुदगी | रावत | तुरी |
| मराठा | पोमला | सागर | उदासी |
| मसंद (सिंध) | राचेवा | साळी | वडुर |
| मेर | रायकरी | सणगर | वडी |
| मोगर | रामोशी | सारेकरी | वावरी |
| नाडोर | रावळिया | साम्वान | वैदु |
| नाघोरी | सहदेव जोशी | सातारकर | वैती |
| नाईकवाडी | सलाट | साथवारा | वाजंत्री |
| नायर | सणगर | शिरोगार | वल्हार |
| न्हावी | संजोगी | शिंपी | वंजारी |
| निलारा | संन्याशी | शुद्र (शुदिर) | वारली |
| ओशतमा | सप्पालिग | सुतार | वासुदेव |
| ओतारी | सरणीया | सुवार | वीर |
| पदमसाळी | सारोडी | तांबट | विटोलिया |
| पडती | सरवदे | तांबोळी | झारेकरी |
| पगी | शिकारी | तारू | |
| पांचोळी | सींध्वा | तेलगु बणजिग | |
| परीट | सोची | तेली | |
| पटेलिया | सूळेर | ठाकोर (सिंध) | |
| पटेगार | सुथीया (सिंध) | थोरी | |
| पटवेकरी | टकारी | टिगळ | |
| पेंढारी | ठाकर रत्नागिरी | टिमालिआ | |
| पिंजारी | ठाकूर (उत्तर-कोंकण) | तिरगुळी | |
| रबारी | | उणपर | |
| रड्डी | तिर्गार | वाघेर, वंज्या | |
| रजपुत | तिरमळी | वानहण, यक्कार | |

## शेडयूल ब.

**प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९२३ अन्वयें स्कूल बोर्डांची घटना दाखविणारा तक्ता —(१) जिल्हा लोकल बोर्ड.**

| जिल्हा लोकल बोर्डाचें नांव. | शिक्षणांतील अनुभविक. | स्त्रिया | अल्पसंख्याक मुसलमान. | मागसलेले वर्ग * | खालचे वर्ग * | म्युनिसिपालिट्या. | सार्वत्रिक. | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अहमदाबाद .... | १ | १ | १ | २ | १ | २ | ६ | १४ |
| भडोच .... | १ | १ | २ | २ | १ | २ | ३ | १२ |
| खेडा .... | १ | १ | १ | २ | १ | २ | ४ | १२ |
| पंचमहाल .... | १ | १ | १ | २ | १ | २ | ४ | १२ |
| सुरत ... | १ | १ | १ | १ | १ | १ | ६ | १२ |
| ठाणें .... | १ | १ | १+१ (ख्रिस्ती) | २ | १ | २ | ४ | १३ |
| अहमदनगर .... | १ | १ | १+१ (ख्रिस्ती) | २ | १ | १ | ४ | १२ |
| पूर्व खानदेश .... | १ | १ | १ | ३ | १ | ३ | ५ | १५ |
| पश्चिम खानदेश .... | १ | १ | १+१ (भिल्ल) | २ | १ | १ | ४ | १२ |
| नाशिक .... | १ | १ | १ | २ | १ | २ | ४ | १२ |
| पुणें .... | १ | १ | १ | २ | १ | २ | ४ | १२ |
| सातारा .... | १ | १ | १ | ३ | १ | २ | ५ | १४ |
| सोलापूर .... | १ | १ | १ | २ | १ | २ | ४ | १२ |
| बेळगांव .... | १ | १ | १+१ (जैन) | ३ | १ | २ | ४ | १४ |

| जिल्हा लोकल बोर्डाचें नांव. | शिक्षणांतील अनुभविक | स्त्रिया | अल्पसंख्याक मुसलमान. | मागसलेले वर्ग * | खालचे वर्ग * | म्युनिसिपालिट्या | सार्वत्रिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विजापूर .... | १ | १ | १ | २ | १ | २ | ४ | १२ |
| धारवाड .... | १ | १ | १ | २ | १ | २ | ४ | १२ |
| कानडा .... | १ | १ | १+१ (ख्रिस्ती) | २ | १ | २ | ३ | १२ |
| कुलाबा .... | १ | १ | १ | २ | १ | २ | ४ | १२ |
| रत्नागिरी .... | १ | १ | १ | ३ | १ | १ | ५ | १३ |
| हैदराबाद .... | | | | | | | | |
| कराची .... | | | | | | | | |
| लारखाना .... | १ | १ | .... | .... | ... | ... २ | ‡९ | १३ |
| नवाबशाह .... | | | | | | | | |
| सक्कर .... | | | | | | | | |
| थर आणि पारकर .... | | | | | | | | |
| अपर सिंध फ्रांटिअर .... | | | | | | | | |
| बॉंबे सबर्बन डिस्ट्रिक्ट.... | १ | १ | १ | १ | १ | २+१ (नोटिफाईड) एरिआकमिट्या | ४ | १२ |

* मागसलेले वर्ग व खालचे वर्ग ह्यांचे प्रतिनिधी स्वतः त्याच त्याच वर्गापैकीं असले पाहिजेत.

‡ ह्यांपैकीं दोन हिंदु असले पाहिजेत.

## (२) लोकल ॲथॉरिटी मानल्या जाणाऱ्या म्युनिसिपालिट्या.

| म्युनिसिपालिट्या. | शिक्षणांतील अनुभविक | स्त्रिया. | मागसलेले वर्ग+ | खालचे वर्ग+ | अल्पसंख्याक मुसलमान. | सार्वत्रिक | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुणें .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| सोलापूर .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| अहमदाबाद .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| सुरत .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| भडोच .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| हुबळी .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| गदग बेट्टीगिरी .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| अहमदनगर .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| सातारा शहर ... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| जळगांव .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| धुळें .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| नाशिक .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| बांदरें .... | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |

| म्युनिसिपालिट्या. | शिक्षणांतील अनुभविक | स्त्रिया. | मागासलेले वर्ग× | खालचे वर्ग× | अल्प-संख्याक मुसलमान. | सार्वत्रिक. | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विजापूर | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| धारवाड | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| पंढरपूर | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| कराची | २ | १ | .... | .... | .... | ६ | ९ |
| हैदराबाद | १ | १ | .... | .... | २ | ३ | ७ |
| शिकारपूर | १ | १ | .... | .... | २ | ३ | ७ |
| सक्कर | १ | १ | .... | .... | २ | ३ | ७ |
| रोहरी | १ | १ | .... | .... | २ | ३ | ७ |
| विरमगांव | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| टँडो ॲडॅम | १ | १ | .... | .... | २ | ३ | ७ |
| बार्शी | १ | १ | १ | १ | १ | ४ | ९ |
| लोणावळें | १ | १ | १ | १ | १+१ (ख्रिस्ती) | ३ | ९ |
| ठाणें | १ | १ | १ | १ | १+१ (ख्रिस्ती) | ३ | ९ |

× मागसलेले वर्ग व खालचे वर्ग यांचे प्रतिनिधी स्वत: त्याच त्याच वर्गांपैकीं असले पाहिजेत.

## परिशिष्ट ड.

(नियम १३३ पहा.)

(म्युनिसिपालिट्यांकडून) ज्यांची तरतूद व्हावयाची अशा मुलांची संख्या.

एक मुलांसाठीं व एक मुलींसाठीं असे दोन तक्ते प्रत्येक म्युनिसिपालिटीसाठीं करावे-मग ती म्युनिसिपालिटी लोकल ॲथॉरिटी असो वा नसो.

———————म्युनिसिपालिटी

———————जिल्हा.

---

१. वस्ती करणारे/करणाऱ्या एकूण पुरुष/स्त्रिया

२. शाळेंत जाण्यास लायक अशा वयाचे/वयाच्या मुलगे/मुली

३. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं म्युनिसिपल प्राथमिक शाळेंतील पटावर असलेल्या मुलांची/मुलींची सरासरी महिन्याची संख्या.

४. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं दुसऱ्या पसंत केलेल्या शाळांतील पटावर असलेल्या मुलांची/मुलींची सरासरी महिन्याची संख्या.

५. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं शाळेंत जाणारे/जाणाऱ्या एकूण मुलगे/मुली [(३) अधिक (४)].

६. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं शाळेंत असलेले/असलेल्या शाळेंत जाण्यास लायक अशा वयाचे मुलगे./वयाच्या मुली. *

---

* हा आंकडा शाळांतून मिळवावा.

७. ज्यांची तरतूद करावयास हवी $\frac{\text{असे मुलगे}}{\text{अशा मुली}}$ [ (२) उणे (६) ]
८. ह्यांतून वजा ‡
९. ज्यांची तरतूद करावयास हवी $\frac{\text{असे}}{\text{अशा}}$ निव्वळ एकूण $\frac{\text{मुलगे}}{\text{मुली}}$

‡ ज्या वर्गास वगळावें असें योजलें असेल त्यासंबंधीं वजावाट करावी.

---

## परिशिष्ट ई.

(नियम १३३ पहा.)

### जिल्हा लोकल बोर्ड संबंधीं एकंदरीचा तक्ता.

जिल्हा.

| | ज्यांची तरतूद करावयास हवी असे मुलगे. | ज्यांची तरतूद करावयास हवी अशा मुली. |
|---|---|---|
| तालुका ... | | |
| एकूण ... | | |
| म्युनिसिपालिटी ... | | |
| एकूण ... | | |
| सर्व मिळून एकुणात ... | | |

## परिशिष्ट फ.

( नियम १३३ पहा. )

एक मुलांसाठीं व एक मुलींसाठीं असे दोन तक्ते प्रत्येक जिल्हा लोकल बोर्डाबद्दल किंवा म्युनिसिपालिटीबद्दल तयार करावे.

विद्यार्थ्यांची जातवारी.

जिल्हा लोकल बोर्ड.
म्युनिसिपालिटी.

| | पुढारलेले हिंदू. | जैन. | इंटरमीजिएट हिंदू २ | मागासलेले हिंदू १ | मुसलमान. | ख्रिश्चन. | इतर. | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. वस्तींतील एकूण पुरुष / स्त्रिया .... | | | | | | | | |
| २. शाळेंत जाण्यास लायक अशा वयाचे मुलगे / वयाच्या मुली | | | | | | | | |
| ३. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं प्राथमिक शाळांच्या पटावर असलेल्या मुलांची / मुलींची महिन्याची सरासरी संख्या. | | | | | | | | |

| | पुढारलेले हिंदू. | जैन. | इंटरमीजिएट हिंदू. २ | मागासलेले हिंदू. १ | मुसलमान. | ख्रिश्चन. | इतर. | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं शाळेत जाणारे / जाणाऱ्या शाळेंत जाण्यास लायक अशा वयाचे / वयाच्या मुलगे / मुली. १ | | | | | | | | |
| ५. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं शाळेंत असलेल्या शाळेंत जाण्यास लायक अशा वयाच्या मुलांची / मुलींची शेंकडावारी $\left[\frac{(४)\times १००}{(२)}\right]$ | | | | | | | | |

१ हा आंकडा शाळेंतून चटकन न मिळेल तर शाळेंत जाणाऱ्या मुलांच्या एकूण संख्येपैकीं $\frac{२}{३}$ संख्या शाळेंत जाणाऱ्या वयाच्या मुलींची समजावी.
२ ह्या जातींच्या व्याख्या "सेन्सस आफ इंडिया" ह्या रिपोर्टाचें पुस्तक ८ वें, भाग २ रा, ह्याच्या शेवटीं पुरवणी पानें ९ व १० यांत पहा.

# परिशिष्ट अ.

( १२५ वा नियम पहा. )

## खानेसुमारीचा नमुना.

येथील मुलांचें / मुलींचें रजिस्टर.

| अनुक्रमांक. | खेडेगांवचें नांव किंवा शहरांतील अथवा खेडेगांवांतील म्युनिसिपालिटीच्या वॉर्डाचें नांव. | बापाचें नांव व वहिवाट असेल तर आडनांव यांसह मुलाचें / मुलीचें नांव | जात. | मातृभाषा. | जन्म तारीख. | ७ वें वर्ष लागण्याची तारीख. | १४ वें वर्ष लागण्याची तारीख. | बापाचें किंवा पालकाचें किंवा मूल ज्याच्या प्रत्यक्ष ताब्यांत असेल त्या इसमाचें नांव. | शेरा.* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

*येथें ज्या शाळेंत मूल पाठवावयाचें आहे त्या शाळेचें नांव लिहावें: किंवा मुलाला माफी मिळाली असेल तर तसा शेरा मारावा.

## परिशिष्ट ब. ( १२७ वा नियम पहा. )

रा. रा. यांस

तारीख

रोजीं $\frac{\text{तुमचा-ची मुलगा}}{\text{तुमच्या देखरेखी खालील मुलगी}}$ ६ वर्षांचा-ची $\frac{\text{होईल}}{\text{झाला-ली}}$ तेव्हां मुंबई प्रायमरी एज्युकेशन ॲक्टच्या + १८ व्या कलमाच्या शर्तीप्रमाणें $\frac{\text{तो}}{\text{ती}}$ या तारखेपासून नियमितपणानें शाळेंत जाईल अशी तजवीज तुम्हीं केली पाहिजे. वर लिहिलेल्या शाळेखेरीज दुसऱ्या शाळेंत $\frac{\text{त्यानें}}{\text{तिनें}}$ जावें अशी तुमची इच्छा असल्यास, ज्या शाळेंत $\frac{\text{त्यानें}}{\text{तिनें}}$ जावें अशी तुमची इच्छा असेल त्या शाळेचें नांव देऊन तुम्हीं मजकडे अर्ज करावा. जर या कायद्याच्या १९ व्या कलमाप्रमाणें तुम्हांला $\frac{\text{तुमचा ची}}{\text{तुमचे देखरेखी खालीं}}$ $\frac{\text{मुलगा}}{\text{मुलगी}}$ शाळेंत न पाठविण्यास योग्य सबब आहे असें वाटत असेल, तर $\frac{\text{त्याला}}{\text{तिला}}$ शाळेंत जाण्याची माफी मिळण्याचें कारण दाखवून तुम्हीं मजकडे एक महिन्याच्या आंत अर्ज करावा.

तारीख १९२ .

स्कूलबोर्ड
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर,
म्युनिसिपालिटी.

( ज्या म्युनिसिपालिट्या लोकल ॲथॉरिटीज आहेत त्यांचे बाबतींत. )

चेअरमन,
स्कूल कमिटी

( डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डस् आणि ज्या म्युनिसिपालिट्या लोकल ॲथॉरिटीज नाहींत त्याच्या बाबतींत. )

---

+ या नोटिशीच्या पाठीवर १८ व १९ हीं कलमें पुनः छापावींत.

# परिशिष्ट क.

( नियम १३३ पहा. )

( डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाकडून ) ज्यांची तरतूद व्हावयाची अशा मुलांची संख्या.

एक मुलांसाठीं व एक मुलींसाठीं असे दोन तक्ते प्रत्येक तालुक्यासाठीं तयार करावे.

तालुका———— जिल्हा————

| | अ<br>१,००० वर वस्ती. | ब<br>५००-१,००० वस्ती. | क<br>५०० हून कमी वस्ती. | एकूण. |
|---|---|---|---|---|
| १. खेडेगांवांची संख्या. | | | | |
| २. सदर खेड्यांत वस्ती करणारे/करणाऱ्या एकूण पुरुष/स्त्रिया | | | | |
| ३. वस्तीच्या शेंकडा १५ इतके/इतक्या शाळेंत जाण्यास लायक अशा वयाचे मुलगे/वयाच्या मुली | | | | |
| ४. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं ज्यांत लोकलबोर्ड शाळा आहेत अशीं खेडीं. | | | | |
| ५. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं ह्या लोकल बोर्ड शाळांतील पटांवर असलेल्या मुलांची महिन्याची सरासरी संख्या. | | | | |
| ६. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं दुसऱ्या पसंत केलेल्या शाळांतून जाणारे मुलगे/जाणाऱ्या मुली यांची सरासरी महिन्याची संख्या. | | | | |

| | अ<br>१,००० वर वस्ती. | ब<br>५००-१,००० वस्ती. | क<br>५०० हून कमी वस्ती. | एकूण. |
|---|---|---|---|---|
| ७. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं शाळेंत असलेले/असलेल्या एकूण मुलगे/मुली. | | | | |
| ८. ता. ३१ मार्च १९२४ रोजीं (७) च्या एकूण संख्येच्या $\frac{१}{३}$ इतके/इतक्या शाळेंत जाणारे/जाणाऱ्या शाळेंत जाण्यास लायक अशा वयाचे मुलगे/वयाच्या मुली. | | | | |
| ९. ज्यांची तरतूद करण्यास हवी, [(३) उणे (८)] असे/अशा शाळेंत जाण्यास लायक अशा वयाचे मुलगे/वयाच्या मुली. | | | | |
| १० यांतून वजा* | | | | |
| ११. ज्यांची तरतूद करावयास हवी असे/अशा निव्वळ एकूण मुलगे/मुली. | | | | |

* जेथें शाळा उघडण्याइतकी मुलांची संख्या भरणार नाहीं अशा लहान खेड्यांबाबद वजावाट करावी. बहुधा ५०० हून कमी वस्तीच्या खेड्यांतील मुलांपैकीं निम्मीं अशा रीतीनें वगळलीं जातील. तसेंच ज्यांवर सक्ती करण्यांत येऊं नये असे योजिलें असेल अशा टापूसंबंधीं व वर्गासंबंधीं वजावाट करावी.

## परिशिष्ट ग.

नियम ( १३४ पहा )

सन १९    साली होणारा कार्यक्रमाबद्दलचा जादा अंदाजी खर्च.

( १ ) मुलगे आणि मुली यांसंबंधीं निरनिराळे तक्ते तयार करावे.

( २ ) जिल्हा लोकल बोर्डाच्या बाबतींत ज्या म्युनिसिपालिट्यांच्या शाळांची व्यवस्था त्या बोर्डाकडे असेल अशा प्रत्येक म्युनिसिपालिटीचा निरनिराळा तक्ता तयार करावा.

जिल्हा
म्युनिसिपालिटी

| | विद्यार्थी | रुपये. |
|---|---|---|
| १. नवीन उघडावयाच्या शाळांची संख्या | | |
| २. नव्या शाळांत येतील अशा मुलांची / मुलींची अंदाजी संख्या ... | | |
| ३. हल्लीं चालू असलेल्या शाळांतून अधिक येतील अशा मुलांची / मुलींची अंदाजी संख्या | | |
| ४. मुलगे / मुली एकूण अधिक वाढतील त्यांचा अंदाजी आंकडा .... | | |

| | विद्यार्थी | रुपये |
|---|---|---|
| ५. (सर्व बाबींचा खर्च धरून) दर मुला/मुली मागें रुपयेप्रमाणें येणाऱ्या सालोसालच्या खर्चाचा अंदाजी आंकडा. | | |
| ६. दुसऱ्या पसंत केलेल्या शाळांतून मुलगे/मुली अधिक जाऊं लागतील त्यांचा अंदाजी आंकडा. | | |
| ७. ग्रँट-इन् एड् बद्दल प्रत्येक मुला/मुली मागें रुपये दराप्रमाणें येणाऱ्या खर्चाचा अंदाजी आंकडा. | | |
| ८. प्रासंगिक× (म्हणजे सालोसालचा नव्हे, एकवारच करावयाचा अशा) खर्चाचा अंदाजी आंकडा .... .... .... .... .... | | |
| ९. एकूण ... | | |

* सालोसाल न येणाऱ्या खर्चांत इमारती, सामान, सामुग्री, खानेसुमारी वगैरेच्या खर्चाचा समावेश व्हावा.

**परिशिष्ट ह.**–नियम ( १ ३४ पहा. )–विद्यार्थ्यांची अंदाजी वाढ.–मुलगे व मुली यांसंबंधीं निरनिराळे तक्ते तयार करावे.

| वर्ष. | आधल्या वर्षी लोकल ॲथॉरिटीच्या शाळांतून असलेले विद्यार्थी | आधल्या वर्षी दुसऱ्या शाळांतून असलेले विद्यार्थी. | आधल्या वर्षीचे एकूण विद्यार्थी. | लोकल ॲथॉरिटीच्या शाळांतून वाढलेले विद्यार्थी | दुसऱ्या शाळांतून वाढलेले विद्यार्थी. | एकूण वाढ. | सर्व मिळून एकूणांत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९२३—२४ (प्रत्यक्ष असलेले)* | | | | | | | |
| १९२४—२५ | | | | | | | |
| १९२५—२६ | | | | | | | |
| १९२६—२७ | | | | | | | |
| १९२७—२८ | | | | | | | |
| १९२८—२९ | | | | | | | |
| १९२९—३० | | | | | | | |
| १९३०—३१ | | | | | | | |
| १९३१—३२ | | | | | | | |
| १९३२—३३ | | | | | | | |
| १९३३—३४ | | | | | | | |

*सन १९२३–२४ साठीं एकूणांत ह्या सदराखालीं त्या सालीं प्रत्यक्ष असलेल्या विद्यार्थ्यांचा आंकडा मांडावा. दुसरीं सदरें भरूं नयेत.

## परिशिष्ट आय.—( नियम १३४ पहा. )—कार्यक्रमाचा अंदाजी खर्च.

| वर्ष. | आघल्या वर्षीचा खर्च. | सालोसाल होणारा जादा खर्च. | एकूण सालोसाल होणारा खर्च. | सालोसाल न होणारा खर्च. | प्रांतिक ग्रँट सालोसालची. | प्रांतिक ग्रँट सालोसाल न होणाऱ्या खर्चासाठीं. | फी व इतर जमा. | म्युनिसिपालिटीनें दिलेली रकम+ | लोकल ॲथॉरिटीनें तरतूद करावयाची रकम. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९२३—२४ (प्रत्यक्ष झालेला.)* | | | | | | | | | |
| १९२४—२५ | | | | | | | | | |
| १९२५—२६ | | | | | | | | | |
| १९२६—२७ | | | | | | | | | |
| १९२७—२८ | | | | | | | | | |
| १९२८—२९ | | | | | | | | | |
| १९२९—३० | | | | | | | | | |
| १९३०—३१ | | | | | | | | | |
| १९३१—३२ | | | | | | | | | |
| १९३२—३३ | | | | | | | | | |
| १९३३—३४ | | | | | | | | | |

* सन १९२३-२४ साठीं प्रत्यक्ष आंकडे भरावेत. पहिलीं दोन सदरें भरूं नयेत.

+जिल्हा लोकल बोर्डाकडून ज्यांच्या शाळांची व्यवस्था होते अशा म्युनिसिपालिट्यांनीं दिलेल्या रकमेसंबंधींच फक्त हें सदर आहे.

# परिशिष्ट ज.

( नियम १३'१ पहा. )

सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करण्यासंबंधाची इ. स १९२ करितां सविस्तर योजना.

सक्तीच्या प्रत्येक क्षेत्राकरितां आणि त्याचप्रमाणें प्रत्येक म्युनिसिपालिटीकरितां--मग ती लोकल ॲथॉरिटी असो वा नसो--एक तक्ता तयार करण्यांत यावा.

मुलींकरितां तजवीज करण्याचें योजिलें असेल तर मुलांकरितां आणि मुलींकरितां असे वेगवेगळाले तक्ते तयार करावेत.

१. ज्या क्षेत्रांस सक्ती लागू करावयाचें योजिलें असेल त्याचें नांव.

२. चौरस मैलांत क्षेत्रफळ.

३. लोकसंख्या — पुरुष / स्त्रिया

| | १,०००च्या वर लोकसंख्या. | | ५०० ते १,००० पर्यंतची लोकसंख्या. | | ५०० पेक्षां कमी लोकसंख्या. | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. ×खेड्यांची संख्या | | | | | | |
| ५. ... | अ पुढारलेले हिंदू. | ब इंटरमीजिएट हिंदू. | क मागसलेले हिंदू. | ड मुसलमान. | ई ख्रिस्ती | फ इतर |
| शाळेंत जाण्याच्या लायकीचें वय असलेल्या $\frac{\text{मुलांची}}{\text{मुलींची}}$ खानेसुमारी प्रमाणें संख्या. | | | | | | |
| शाळेंत जाण्याच्या लायकीचें वय असून अगोदरच पसंत केलेल्या शाळांमध्यें जात असणाऱ्या $\frac{\text{मुलांची}}{\text{मुलींची}}$ संख्या. | | | | | | |
| शाळेंत जाण्याच्या लायकीचें वय असून सक्तीपासून वगळलेल्या $\frac{\text{मुलांची}}{\text{मुलींची}}$ संख्या. | | | | | | |
| शाळेंत जाण्याच्या लायकीचें वय असून ज्यांची तरतूद करावयाची आहे अशा $\frac{\text{मुलांची}}{\text{मुलींची}}$ संख्या. | | | | | | |

×म्युनिसिपालिट्यांच्या बाबतींत वगळा.

६.

| | अ मराठी. | ब गुजराथी | क कानडी | ड सिंधी | ई ऊर्दू | फ इंग्रजी | ग इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शाळेंत जाण्याच्या लायकीचें वय असून खानेसुमारीप्रमाणें ज्यांची देशभाषा पुढीलप्रमाणें आहे अशा मुलांची / मुलींची संख्या. | | | | | | | |
| शाळेंत जाण्याच्या लायकीचें वय असून पसंत केलेल्या शाळांमध्यें अगोदरच जात असलेल्या मुलांची / मुलींची संख्या. | | | | | | | |
| शाळेंत जाण्याच्या लायकीचें वय असून सक्तीपासून वगळावयाच्या मुलांची / मुलींची संख्या. | | | | | | | |
| शाळेंत जाण्याच्या लायकीचें वय असून ज्यांची तरतूद करावयाची आहे अशा मुलांची / मुलींची संख्या. | | | | | | | |

७. हल्लीं असलेल्या शाळा व मुलें—

| | लोकल अॅथॉरिटीनें चालविलेल्या | | लोकल अॅथॉरिटीनें पसंत केलेल्या | | एकंदर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शाळांची संख्या | पटावर असलेल्या मुलांच्या सरासरीची संख्या | शाळांची संख्या | पटावर असलेल्या मुलांच्या सरासरीची संख्या | शाळांची संख्या | पटावर असलेल्या मुलांच्या सरासरीची संख्या |
| सामान्य प्राथमिक शाळा ... | | | | | | |
| उर्दू शाळा ... | | | | | | |
| इतर + ... | | | | | | |
| एकूण ... | | | | | | |

+ज्या शाळांमधून जिल्ह्याच्या देशभाषेशिवाय इतर देशभाषेंतून शिक्षण दिलें जातें त्यांच्यासंबंधीं हें सदर आहे.

## ८. योजिलेल्या नवीन शाळा.

| | लोकल अॅथॉरिटीनें चालविलेल्या | | लोकल अॅथॉरिटीनें पसंत केलेल्या | | एकूण. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शाळांची संख्या | पटावर असलेल्या मुलांच्या सरासरीची संख्या | शाळांची संख्या | पटावर असलेल्या मुलांच्या सरासरीची संख्या | शाळांची संख्या | पटावर असलेल्या मुलांच्या सरासरीची संख्या |
| सामान्य प्राथमिक शाळा ... | | | | | | |
| ऊर्दू शाळा ... | | | | | | |
| इतर* ... | | | | | | |
| एकूण ... | | | | | | |

* ज्या शाळांमधून जिल्ह्याच्या देशभाषेशिवाय इतर देशभाषेंतून शिक्षण दिलें जातें त्यांच्यासंबंधीं हें सदर आहे.

९. हल्लीं असलेल्या शाळांत येऊं शकणाऱ्या जादा मुलांची अंदाजिलेली संख्या--

| | लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या | लोकल ॲथॉरिटीनें पसंत केलेल्या | एकूण. |
|---|---|---|---|
| | जादा मुलांची अंदाजिलेली संख्या | जादा मुलांची अंदाजिलेली संख्या | |
| सामान्य प्राथमिक शाळा ... | | | |
| ऊर्दू शाळा ... | | | |
| इतर* ... | | | |
| एकूण ... | | | |

* ज्या शाळांमधून जिल्ह्याच्या देशभाषेशिवाय इतर देशभाषेंतून शिक्षण दिलें जातें त्यांच्यासंबंधीं हें सदर आहे.

१०. (सक्तीच्या क्षेत्रांत) लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या शाळांतील हल्लींचा शिक्षकवर्ग—

| | | शिक्षकांची संख्या. |
|---|---|---|
| तिसऱ्या वर्षांची ट्रेनिंग कॉलेजची परीक्षा पास झालेले | ... | |
| दुसऱ्या " " | ... | |
| पहिल्या " " | ... | |
| (व्ह. फा.) पास झालेले | ... | |
| (व्ह. फा.) पास न झालेले | ... | |
| स्टुडंट टीचर | ... | |
| प्यूपिल टीचर | ... | |

११. लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या शाळांत नेमणुकीकरितां योजिलेला जादा शिक्षकवर्ग—

| | शिक्षकांची संख्या. | | एकूण. | एका शिक्षकाचा दरमहा सरासरी खर्च. | वर्षाचा एकंदर खर्च. |
|---|---|---|---|---|---|
| | नवीन शाळांत. | हल्लीं असलेल्या शाळांत. | | | |
| | | | | रुपये | रुपये |
| तिसऱ्या वर्षाची ट्रेनिंग कॉलेजची परीक्षा पास झालेले ... | | | | | |
| दुसऱ्या " " ... | | | | | |
| पहिल्या " " ... | | | | | |
| (व्ह. फा.) पास झालेले ... | | | | | |
| (व्ह. फा.) पास न झालेले ... | | | | | |
| स्टुडंट टीचर ... | | | | | |
| प्यूपिल टीचर ... | | | | | |
| एकूण ... | | | | | |

१२. जादा खर्च--

| | | नित्याचा खर्च (वार्षिक). | प्रासंगिक खर्च. |
|---|---|---|---|
| १. लोकल ॲथॉरिटीनें चालविलेल्या शाळांत-- | | | |
| (अ) वरीलप्रमाणें जादा शिक्षक वर्ग | .... | | |
| (ब) पेन्शन कांट्रिब्यूशन् (सरकारनें पेनशन् द्यावयाचें असल्यास) | .... | | |
| (क) प्रॉव्हिडंट फंड | .... | | |
| (ड) भाडें आणि कर | .... | | |
| (ई) सादिलवार | .... | | |
| (फ) लांकडी सामान, इतर सामुग्री वगैरे | .... | | |
| (ग) इतर खर्च | .... | | |
| २. पसंत केलेल्या शाळांकरितां---- | | | |
| ग्रँट्स | .... | | |
| ३. देखरेख करणारे जादा कामगार (तपशीलवार) | .... | | |
| एकूण | ... | | |

१३.

| | सालोसाल होणारा. | प्रासंगिक. |
| --- | --- | --- |
| एकूण जादा खर्च .... | | |
| हल्लींच्या शाळांच्या खर्चांत कांहीं काटकसर होण्याजोगी असल्यास ती अंदाजी बचत. | | |
| निव्वळ जादा खर्च .... | | |
| अंदाजी प्रांतिक ग्रँट १/२ अगर २/३ ह्या दरानें .... | | |
| शिल्लक .... | | |
| फीपैकीं सूट .... | | |
| लोकल ऑथॉरिटीनें पुरवावयाची एकूण रक्कम .... | | |

१४. लोकल ऑथॉरिटीनें जादा खर्चापैकीं आपल्या वांट्यास आलेली रक्कम पुरविण्याचें कसें योजिलें आहे तें. ( डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डानें जिच्या शाळा चालविल्या आहेत अशी एखादी म्युनिसिपालिटी जर सक्तीचें क्षेत्र असेल, तर जादा खर्चाचा एक तृतीयांश त्या म्युनिसिपालिटीस पुरवावा लागेल. )

# परिशिष्ट के.

( नियम १३९ पहा. )

ऐच्छिक तत्त्वावर प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यासंबंधाची सन १९२  ची सविस्तर योजना.

प्रत्येक तालुक्याकरितां आणि त्याचप्रमाणें प्रत्येक म्युनिसिपालिटीकरितां----मग ती लोकल ॲथॉरिटी असो वा नसो----एक तक्ता तयार करावा.

मुलांकरितां व मुलींकरितां निरनिराळे तक्ते तयार करावेत.

परिशिष्ट ज मधील नमुन्याचा उपयोग करावा व त्यांतील फक्त नंबर ८ ते १४ ही सदरें भरावींत. ज्या क्षेत्रांत सक्तीचें तत्त्व अमलांत आणिलें नसेल तेथील हल्लींचा शिक्षक वर्ग नंबर १० च्या सदरांत नमूद करावा.

## शेड्युल क.

### स्कूल बोर्डाचे निवडणुकीकरितां नमुन्याचे नियम.

[ प्राथमिक शिक्षणाचे नियमांपैकीं पंधरावा नियम पहा. ]

१. **निवडणुकीकरितां स्थल व तारखा अध्यक्षांनीं मुक्रर करणें**:—स्कूल बोर्डाचे [ १ ] विशिष्ट हितसंबंधनिदर्शक सभासद व [ २ ] इतर सभासद यांचे निवडणुकीकरितां लोकल ॲथॉरिटीचे अध्यक्षांकडून तारीख ठरविली जाईल. तसेंच या प्रत्येक निवडणुकीसंबंधानें नॉमिनेशन पेपर्सची पोंच, त्यांची चिकित्सा व मतांची नोंद व मोजणी, अशा ज्या निवडणुकीच्या क्रमिक पायऱ्या आहेत, त्यांसाठीं अध्यक्षांकडून तारीख, वेळ व जागा ठरविली जाईल. नॉमिनेशन पेपर्स घेण्याची तारीख निवडणुकीसाठीं ठरविलेल्या तारीखेच्या निदान एक आठवडा तरी अगोदरची ठरविली पाहिजे.

२. **विशिष्ट हितसंबंधनिदर्शक सभासदांकडून मागवावयाचे अर्जः**— निवडणुकीसाठीं ठरविलेल्या तारखेच्या निदान सहा आठवडे अगोदर स्कूल बोर्डाचे विशिष्ट हितसंबंधनिदर्शक सभासद म्हणून जे गृहस्थ निवडून येऊं इच्छित असतील, त्यांचे अर्ज अध्यक्षांनीं जाहीर नोटिशीनें मागवावे. अशा अर्जदारांनीं आपले अर्ज निवडणुकीच्या तारखेच्या निदान चार आठवडे तरी अगोदर अध्यक्षांकडे जाऊन पोंचतील अशा बेतानें पाठविले पाहिजेत; तसेंच त्यांनीं आपल्या लायकीची हकीकत अर्जांत दिली पाहिजे व १९२४ च्या बॉंबे प्रायमरी एज्युकेशन नियमांतील तेराव्या नियमाअन्वयें आपण निवडणुकीला पात्र असल्याबद्दलचा पुरावा दिला पाहिजे. लोकल ॲथॉरिटीज बसलेल्या म्युनिसिपालिटींच्या प्रतिनिधींखेरीज इतर विशिष्ट हितसंबंधनिदर्शक सभासदांसाठीं राखून ठेवलेल्या जागांकरितां योग्य अशा उमेदवारांचीं नांवें स्थानिक संस्थांकडूनहि अध्यक्षांनां मागवितां येतील. तसेंच ज्या म्युनिसिपालिट्या लोकल ॲथॉरिटीज नाहींत अशा म्युनिसिपालिट्यांकरितां राखून ठेविलेल्या जागांकरितां उमेदवारांचीं नांवें त्या म्युनिसिपालिट्यांकडून अध्यक्षांनां मागवितां येतील.

३. **निवडणुकीची तारीख, जागा वगैरेंची नोटीसः**—निवडणुकीसाठीं ठरविलेल्या तारखेच्या निदान २१ दिवस अगोदर अध्यक्षांनीं पहिल्या नियमाअन्वयें होणाऱ्या निवडणुकीच्या सर्व क्रमिक पायऱ्यांकरितां जागा, तारखा व वेळा, तसेंच निवडणुकीची तारीख, ह्यासंबंधाची लेखी नोटीस—[ अ ] लोकल ॲथॉरिटीच्या प्रत्येक सभासदाकडे पाठवावी; [ ब ] अध्यक्षाचे ऑफिसांत ठळकपणें दिसेल अशा जागीं चिकटवावी.

तसेंच २ ऱ्या नियमांत उल्लेख केलेल्या नोटिशीप्रमाणें ज्यांचे अर्ज आले असतील, अशा अर्जदारांची त्यांचे लायकीसुद्धां, यादी, तसेंच स्थानिक संस्थांनीं व लोकल ॲथॉरिटी नसलेल्या म्युनिसिपालिट्यांनीं जर कांहीं उमेदवारांचीं नांवें सुचविलीं असतील तर त्यांचीहि यादी, वरील नोटिशीला अध्यक्षांनीं जोडावी.

४. उमेदवारांचें नॉमिनेशनः— [ १ ] या शेडयुलच्या परिशिष्ट १ मध्यें दिलेल्या नमुन्याप्रमाणें नॉमिनेशन पेपर पुरा करून, आपण नॉमिनेनशला कबूल आहों हें दाखविण्यासाठीं त्यावर स्वतः सही करून व आणखी दोन सभासदांच्या-एक नांव सुचविणारा व दुसरा अनुमोदन देणारा म्हणून—सह्या घेऊन तो पेपर प्रत्येक उमेदवारानें, नॉमिनेशन पेपर्स पोंचण्याबद्दल १ ल्या नियमाअन्वयें जी तारीख व वेळ नेमिली जाईल त्या तारखेला व वेळेला किंवा अगोदर, अध्यक्षांचे स्वाधीन केला पाहिजे. ठरविलेल्या नमुन्याचे नॉमिनेशन पेपर्स जो कोणी सभासद मागेल त्यास अध्यक्षांकडून मिळतील.

[ २ ] नांव सुचविणारा व अनुमोदन देणारा अशा दोघांनींहि नॉमिनेशन पेपर अध्यक्षांचे स्वाधीन करितेवेळीं हजर असलें पाहिजे. अध्यक्षांनीं जागच्या जागीं त्या दोघांनीं नॉमिनेशन पेपरवर खुशीनें सह्या केल्या आहेत किंवा नाहींत हें विचारून घ्यावें. जर नांव सुचविणारा किंवा अनुमोदन देणारा यांपैकीं कोणीहि नॉमिनेशन पेपरवर सही केल्याचें कबूल करण्यास नाखूष असेल, तर उमेदवारास नवीन नॉमिनेशन पेपर हजर करितां येईल.

५. नॉमिनेशन पेपरची चिकित्साः— नॉमिनेशन पेपराचे चिकित्सेकरितां नेमिलेल्या तारखेस उमेदवार, प्रत्येक उमेदवाराचा एक नांव सुचविणारा व एक अनुमोदन देणारा, तसेंच प्रत्येक उमेदवारानें ज्या कोणा एकाला योग्य रीतीनें लेखी अधिकार दिला असेल असा इसम, इतक्यांनाच फक्त ठरलेल्या वेळीं व ठरलेल्या ठिकाणीं हजर राहतां येईल आणि या सर्वांना अध्यक्षांकडून ४ थे नियमांत सांगितलेल्या रीतीनें व ठराविक मुदतींत आलेले सर्व उमेदवारांचे नॉमिनेशन पेपर्स तपासून पाहण्यास योग्य त्या सवलती देण्यांत येतील.

६. तक्रारींचा निकालः— नॉमिनेशन रद्द करणेंः— [ १ ] अध्यक्ष नॉमिनेशन पेपर तपासून पाहतील व जर एकाद्या नॉमिनेशनला हरकती घेतल्या असतील तर त्यांचा निकाल लावतील आणि अशा तक्रारींवरून किंवा स्वतःच्या मनास वाटल्यावरून, जरूर तर आवश्यक वाटेल ती चौकशी तावडतोब करून, त्यांस एकादें नॉमिनेशन पुढीलपैकीं एकाद्या मुद्यावर रद्द करितां येईल—:

[ अ ] ज्या रिकाम्या जागेकरितां किंवा जागांकरितां उमेदवाराचें नांव सुचविण्यांत आलें आहे त्या जागेसाठीं किंवा जागांसाठीं उमेदवार होण्यास तो पात्र नाहीं.

[ब] घालून दिलेल्या अटींपैकीं एखादी अट त्याजकडून पाळली गेली नाहीं.

[क] उमेदवाराची सही किंवा एकादा नांव सुचविणारा अगर अनुमोदन देणारा याची सही खरी नाहीं अगर ती फसवून मिळविली आहे.

[२] जर कोणी सभासद नांव सुचविणारा म्हणून अथवा अनुमोदन देणारा म्हणून, रिकाम्या असलेल्या जागांहून अधिक नॉमिनेशन पेपर्सवर सही करील, तर जितक्या जागा असतील तितकेच प्रथम आलेले नॉमिनेशन पेपर्स कायदेशीर धरले जातील.

[३] ज्यांत मुळींच चूक नाहीं अशा दुसऱ्या नॉमिनेशन पेपरनें जर एकाद्या उमेदवाराचें नांव योग्य वेळीं सुचविण्यांत आलें तर पहिल्या नॉमिनेशन पेपरमध्यें चूक आहे या सबबीवर पोटनियम २ मधील कोणत्याहि गोष्टीचे आधारें त्याचें नॉमिनेशन नामंजूर ठरविण्याचा अधिकार नाहीं.

७. **चिकित्सेची पूर्तताः**—[१] प्रत्येक नॉमिनेशन पेपरवर तो स्वीकारला किंवा नाकारला याबद्दल अध्यक्षांकडून शेरा मारण्यांत यावा व जर नॉमिनेशन पेपर नाकारला असेल, तर तो कां नाकारला ह्याचीं थोडक्यांत कारणें नमूद करण्यांत यावीं.

[२] चिकित्सेकरितां जो दिवस मुक्रर केला असेल त्याच दिवशीं तिचें काम पुरें करण्यांत यावें, व चिकित्सेचें एकदां चालू केलेलें काम मध्येंच तहकूब करतां कामा नये.

८. **योग्य ठरलेल्या नॉमिनेशन्सची यादी तयार करणेंः**— नॉमिनेशनची चिकित्सा पुरी झाल्यानंतर अध्यक्षांनीं योग्य ठरलेल्या नॉमिनेशन्सची यादी लागलींच तयार करून व तीवर आपली सही करून ती यादी स्वतःचे ऑफिसांत ठळकपणें दिसेल अशा ठिकाणीं आणि निवडणुकीच्या जागीं चिकटवावी.

९. **ज्यांत स्पर्धा नाहीं अशा निवडणुकींचे वेळीं स्वीकारावयाची पद्धत**-नॉमिनेशनचे चिकित्सेनंतर जर असें आढळून आलें कीं, एकाद्या वर्गाखालीं असलेल्या रिकाम्या जागांपेक्षां नॉमिनेशन्सची संख्या जास्त भरत नाहीं तर तो किंवा ते नॉमिनेटेड गृहस्थ निवडून आले असें समजण्यांत यावें आणि अशा वेळीं अध्यक्षांनीं त्या वर्गापुरता निवडणुकीचा निकाल जाहीर करावा.

१०. **दोन किंवा अधिक जागांकरितां उमेदवार म्हणून नांव सुचविलें जाण्याचा हक्कः**—जेव्हां दोन किंवा जास्त तऱ्हेच्या रिकाम्या जागांकरितां निवडणूक एकाच वेळीं किंवा त्याच सुमारास व्हावयाची असेल, तेव्हां अशा

वऱ्हेच्या प्रत्येक जागेकरितां उमेदवार म्हणून एकाच इसमाचें नांव सुचवितां येईल, मात्र त्याची त्या जागांना इतर रीतींनीं लायकी असली पाहिजे.

११ उमेदवारानें नांव काढून घेणें:— ४ थ्या नियमाअन्वयें उमेदवार म्हणून ज्याचें सुचविलेलें आहे अशा कोणाहि गृहस्थास १ ल्या नियमाअन्वयें ठरलेल्या निवडणुकीचे तारखेस किंवा त्यापूर्वी कोणत्याहि वेळीं स्वतःच्या सहीची लेखी नोटीस अध्यक्षास देऊन आपली उमेदवारी काढून घेतां येईल. ह्या रीतीनें नांव काढून घेतल्यानें त्याचें नॉमिनेशन फुकट जाईल. जेव्हां अशी नोटीस मतें देण्याला सुरवात होण्यापूर्वी दिली जाईल आणि तेणेंकरून निवडणूक स्पर्धाविरहित होईल, तेव्हां अध्यक्षांनीं तो किंवा ते कोणी प्रतिस्पर्धी नसलेले उमेदवार निवडून आले असें जाहीर करावें.

१२. (१) मतदान.—प्रत्येक वर्गाखालीं जेवढ्या जागा असतील त्यापेक्षां त्या जागाकरितां जास्त उमेदवार उभे असतील व मत देण्याचा प्रश्न उपस्थित होईल, तेव्हां अध्यक्षांनीं मत नोंदण्याच्या जागीं अध्यक्ष म्हणून हजर रहावें, तेथें मतें नोंदवावीं व तीं मतें घेऊन ठेवण्यासाठीं आपल्याजवळ एक पेटी तयार ठेवावी.

(२) मत नोंदणीला सुरुवात होण्यापूर्वी अध्यक्षांनीं जे उमेदवार तेथें हजर असतील किंवा उमेदवार नसलेले असे लोकल ॲथॉरिटीचे जे मेंबर हजर असतील, त्यांना मतांची पेटी रिकामी असलेली दाखवावी व नंतर तिला कुलूप घालून त्यावर अशा रीतीनें सील करावें कीं, तें सील फोडल्याशिवाय ती पेटी उघडतांच येऊं नये. नंतर ती पेटी पडद्याआड ठेवावी.

(३) ज्याला आपलीं मतें नोंदण्याची इच्छा असेल अशा लोकल ॲथॉरिटीचे प्रत्येक सभासदानें १ ल्या नियमाअन्वयें ठरविलेल्या निवडणुकीच्या तारखेला ठरलेल्या वेळीं व जागीं आपलीं मतें नोंदण्याकरितां हजर रहावें. पोलिंग स्टेशनवर ( म्हणजे निवडणुकीचे जागीं ) असा सभासद आला असतां ह्या शेड्यूलच्या परिशिष्ट २ मध्यें दिलेल्या २ नमुन्यांपैकीं मतपत्रिकेच्या योग्य तो नमुना अध्यक्षांनीं त्यास द्यावा. मतपत्रिका घेण्यापूर्वी प्रत्येक सभासदानें तिच्या प्रत्येक स्थलप्रतीवर सही केली पाहिजे. १ ल्या नियमाअन्वयें निवडणुकीकरितां जी वेळ ठरविली असेल ती होऊन गेल्यानंतर मतपत्रिका कोणासहि देतां कामा नये. परंतु ज्या कोणास वेळ भरण्यापूर्वी मतपत्रिका मिळाली असेल, त्याला मत नोंदण्यास जेवढा योग्य वेळ लागेल तेवढा देण्यांत यावा.

(४) मतपत्रिका मिळाल्यानंतर सभासद पडद्याचे आंत जाऊन तेथें आपलीं मतें देईल. तो ज्या उमेदवाराला आपलें मत देऊं इच्छित असेल, त्या

उमेदवाराच्या नांवासमोर प्रत्येक मतागणिक एक फुली पेन्सिलीनें करील. जर एकाद्या सभासदाची कोणत्याहि एका अगर अधिक उमेदवारांस आपलें मत किंवा मतें देण्याची इच्छा नसेल किंवा कोणत्याहि एका अगर अधिक वर्गा· संबंधानें आपलें मत किंवा मतें नमूद करण्याची त्याची इच्छा नसेल, तर त्यानें आपल्या मतपत्रिकेचा योग्य तो भाग कोरा ठेवावा. मतें टाकण्याच्या खोलींत एका वेळीं फक्त एका सभासदास सोडिलें जाईल.

(५) प्रतिनिधिमार्फत मत देतां येणार नाहीं.

[६] एकाद्या सभासदास कांहीं व्यंग असल्यामुळें ठराविक पद्धतीनें मत देण्यास त्यास अडचण पडत असेल, तर ह्या कामीं अध्यक्ष त्यास जरूर ती मदत देतील.

१३. [१] मतांची मोजदाद.—पहिल्या नियमाअन्वयें मतांची मोजदाद करण्यासाठीं ठरविलेल्या तारखेस ठरविलेल्या वेळीं व ठरविलेल्या ठिकाणीं अध्यक्षांनीं लोकल ॲथॉरिटीच्या सभासदांपैकीं उमेदवार म्हणून उभे नसलेल्या अशा दोन गृहस्थांच्या आणि हजर असलेल्या उमेदवारांच्या समक्ष मतांची पेटी उघडावी व ज्या मतपत्रिका त्यांस कायदेशीर वाटतील त्या कायदेशीर न वाटणाऱ्या मतपत्रिकांपासून वेगळ्या कराव्या. बेकायदेशीर ठरविलेल्या पत्रिकांवर "नाकारिली" असा शब्द व नाकारण्याचें कारण अध्यक्षांनीं लिहावें.

[२] मतपत्रिकेवर अगर तिच्या योगानें मतदारानें आपणास अधिकार असेल त्याहून अधिक मतें नोंदिलीं असल्यास, अथवा ती ओळखिली जावी म्हणून त्या पत्रिकेवर कांहीं लिहून ठेविलें असावें अगर खूण केली असावी असा अध्यक्षांस संशय आल्यास, अथवा पत्रिकेवर खूणच केलेली नसल्यास किंवा अनिश्चितपणामुळें पत्रिका रद्द झाली असल्यास ती मतपत्रिका अध्यक्षांनीं नाकारावी.

(३) नंतर अध्यक्ष प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या मतांची मोजदाद करतील.

(४) मोजदाद पुरी झाल्यावर अध्यक्षांनीं मोजदाद केल्या गेलेल्या मतपत्रिका व नाकारिलेल्या मतपत्रिका निरनिराळ्या पाकिटांत घालाव्या व तीं पाकिटें मोहोरबंद करून व प्रत्येक पाकिटावर आंत कोणते कागद आहेत, ते कोणत्या सालच्या निवडणुकीचे आहेत, किती मतपत्रिकांची मोजदाद केली, किती मतपत्रिका नाकारल्या गेल्या ह्यांची नोंद करावी. तसेंच त्यांनीं मतपत्रिकांचा हिशेब तयार केला पाहिजे व वर सांगितल्याप्रमाणें मोजदाद केलेल्या किंवा नाकारिलेल्या मतपत्रिकांची संख्या आणि कोऱ्या राहिलेल्या मतपत्रिकांची संख्या ह्यांच्याशीं ताडून पाहून त्या हिशेबाचा मेळ पाहिला पाहिजे.

(५) नंतर त्यांनीं एक तक्ता तयार करावा व त्यावर पुढील बाबतींत दाखला द्यावा:—(१) पोट-नियम ४ ह्यांत सांगितल्याप्रमाणें मेळ कितपत जुळला;

(२) ज्यांना योग्य रीतीनें मतें मिळालीं अशा गृहस्थांचीं नांवें;

(३) प्रत्येक इसमास योग्य रीतीचीं मतें किती किती मिळालीं;

(४) अयोग्य म्हणून ठरविलेलीं मतें किती.

ह्या तक्त्याची नक्कल किंवा उतारा करून घेण्यास कोणाहि उमेदवारास अध्यक्षांकडून परवानगी देण्यांत येईल.

(६) ह्या नियमाअन्वयें चाललेलें कामकाज अध्यक्षांस वाटेल त्यावेळीं तहकूब करितां येईल; पण तहकूब करण्यापूर्वी कोणत्या तारखेस, किती वाजतां तें पुढें सुरू व्हावयाचें ह्याबद्दल त्यांनीं उमेदवारांस किंवा हजर असलेल्या लोकल ॲथॉरिटीच्या सभासदांस सूचना द्यावी.

१४. निवडणुकीचा निकाल.—मतांची मोजदाद पूर्ण झाल्यावर जास्तींत ज्यास्त मतें मिळालेला असा एक अधिक उमेदवार निवडून आल्याचें अध्यक्षांकडून तेथल्या तेथें जाहीर करण्यांत येईल.

१५. (१) एकाहून अधिक जागांकरितां निवडणुकी.—जर एकाद्या इसमाची निवडणूक स्कूल-बोर्डांतील एकाहून अधिक जागांकरितां झाली असेल, तर अशा निवडणुकीचा निकाल नियम १४ प्रमाणें सांगितल्या दिवसापासून तीन दिवसांचे आंत सदर इसमानें त्यांपैकीं कोणत्या जागीं काम करण्याचें आपण ठरविलें आहे तें आपल्या सहीनिशीं लेखी लिहून ती नोटिस अध्यक्षांचे स्वाधीन करावी. अशा रीतीनें त्यानें आपला निश्चय ठरविल्यानंतर इतर ज्या जागांकरितां त्या उमेदवाराची निवड झाली असेल, त्या जागांसाठीं त्यास जणूं काय मतेंच मिळालीं नाहींत असें समजून त्या निवडणुकीचा निकाल ठरविण्यांत येईल.

(२) पोट-नियम १ प्रमाणें अशा उमेदवारानें जर आपला निश्चय ठरविला नाहीं, तर त्याच्या निवडणुकी रद्द करण्यांत येतील व त्यास मतें मिळा-लींच नाहींत असें समजून निवडणुकींचा निकाल ठरविण्यांत येईल.

१६. निकालाची सरकारास खबर.—त्यानंतर अध्यक्षांकडून विलंब न लावितां निवडणुकीचा निकाल लोकल ॲथॉरिटीस कळविला जाईल व डायरे-क्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन ह्यांच्या मार्फत सरकारास कळविला जाईल. तसेंच त्यांच्याकडून आपल्या कचेरींत एकाद्या ठळक ठिकाणीं तो निकाल चिकटविला जाईल.

१७. निवडणुकीच्या कागदांचा ताबा.—१३ व्या नियमांत सांगित-लेल्या माहितीचा तक्ता व मतपत्रिकांचीं पाकिटें आणि निवडणुकीसंबंधाचे इतर सर्व कागदपत्र अध्यक्षांकडून आपल्या ताब्यांत ठेविले जातील.

१८. निवडणुकीसंबंधाचे कागदपत्र हजर करणें व त्यांची तपासणी.-(१) मोजदाद केल्या गेलेल्या अगर नाकारिलेल्या मतपत्रिका व त्यांच्या स्थळप्रती ह्यांचीं पाकिटें अध्यक्षांचे ताब्यांत असतांना तीं ह्या बाबतींत ज्यास अधिकार आहे असें कोर्ट किंवा सरकार ह्यांच्या हुकुमाशिवाय उघडण्यांत येणार नाहींत व त्यांतील कागदपत्र तपासिले अगर हजर केले जाणार नाहींत.

(२) अध्यक्षांच्या ताब्यांत असलेले निवडणुकीसंबंधाचे इतर सर्व कागदपत्र लोकल ॲथॉरिटीच्या सभासदांस किंवा ह्या कामासाठीं योग्य अधिकार दिलेल्या कोणाही सरकारी कामदारास तपासितां येतील.

(३) निवडणुकीच्या कागदांचा नाश.—निवडणुकीचा निकाल जाहीर केल्याच्या तारखेपासून एक वर्ष लोटल्यावर ह्या बाबतींत अधिकार असलेल्या कोर्टानें अगर सरकारानें मनाई केली नसल्यास, निवडणुकीसंबंधाचे सर्व कागदपत्र अध्यक्षांकडून नष्ट केले जातील.

## शेड्यूल कचें परिशिष्ट १ लें.
### नॉमिनेशन पेपरचा नमुना.
( शेड्यूल कचा ४ था नियम पहा. )

डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड / म्युनिसिपालिटी येथील.

ज्या रिकाम्या जागेसाठीं उमेदवाराचें नांव सुचविलें आहे त्या जागेचें वर्णन—

उमेदवाराचें नांव—

बापाचें नांव—

वय आणि पुरुष किंवा स्त्री हें—

पत्ता—

जात ( मुसलमान, हिंदी-खिस्ती, युरोपिअन, अँग्लो-इंडियन, अथवा जैन किंवा मागसलेल्या वर्गांपैकीं अगर खालच्या वर्गांपैकीं, तें लिहावें )—

सुचविणाराचें नांव—

सुचविणाराची सही—

अनुमोदन देणाराचें नांव—

अनुमोदन देणाराची सही—

### उमेदवाराचा प्रतिज्ञालेख.

ह्या लेखाच्याद्वारें मी असें दर्शवितों कीं, माझी निवडणूक झाल्यास मी काम करण्यास कबूल आहें.

तारीख ( उमेदवाराची सही. )

## शेड्यूल कचें परिशिष्ट २ रें.
### मतपत्रिकांचे नमुने.
( शेड्यूल कमधील १२ वा नियम पहा. )

१.

विशिष्ट हितसंबंध निदर्शक सभासदासाठीं असलेल्या रिकाम्या जागांकरितां मतपत्रिकेचा नमुना.

डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड / म्युनिसिपालिटी येथील

मतपत्रिका.

| स्थळप्रत | फाडून देण्याचा भाग |
|---|---|
| अनुक्रम नंबर | ( वरील बाजू ) |

| | रिकाम्या जागांच्या वर्गाचें वर्णन. | उमेदवारांचीं नांवें. | फुली |
|---|---|---|---|
| १. निवडणाराचें नांव ... | १. शिक्षणानुभवी इसम (*) | १<br>२ | |
| | २. स्त्रिया (*) | १<br>२ | |
| २. निवडणाराची सही ... | ३. अल्पसंख्याकांचे प्रतिनिधिः—<br>(१) मुसलमान (*)<br>(२) ख्रिस्ती (*)<br>(३) भिल्ल (*)<br>(४) जैन (*) | | |
| | ४. मागासलेल्या वर्गांचे प्रतिनिधि (*) | १<br>२<br>३<br>४ | |
| | ५ खालच्या वर्गांचे प्रतिनिधि (*) | १<br>२<br>३ | |
| | ६. म्युनिसिपालिट्यांचे प्रतिनिधि (*) | १<br>२<br>३ | |

(*) रिकाम्या जागांची संख्या येथें भरावी.

(फाडून देण्याच्या भागाची मागील बाजू.)

मतें नमूद करण्यासंबंधीं सूचनाः----

१. रिकाम्या जागांच्या प्रत्येक वर्गासाठीं त्या वर्गाच्या वर्णनापुढें कंसांत दाखविलीं आहेत तितकीं मतें तुम्हांस द्यावयाचीं आहेत.

२. ज्यांना मत देण्याची तुमची इच्छा असेल त्या उमेदवाराच्या / प्रत्येक उमेदवाराच्या नांवापुढें एक फुली अगर फुल्या काढा.

३. त्या वर्गाच्या वर्णनापुढें कंसांत जो आंकडा मांडलेला असेल त्याहून अधिक फुल्या रिकाम्या जागांच्या कोणत्याहि वर्गापुढें तुम्हीं काढतां कामा नये.

| अनुक्रम नंबर. |
| --- |
| |

## २

साधारण सभासदांसाठीं असलेल्या रिकाम्या जागांकरितां मतपत्रिकेचा नमुना.

डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड / म्युनिसिपालिटी येथील

### मतदानपत्रिका.

| स्थळप्रत / अनुक्रम नंबर | | फाडून देण्याचा भाग (वरील बाजू) |
|---|---|---|
| | उमेदवारांचीं नांवें. | फुली X. |
| १. निवडणाराचें नांव... | १ | |
| | २ | |
| २. निवडणाराची सही... | ३ | |
| | ४ | |
| | ५ | |
| | ६ | |

( फाडून देण्याच्या भागाची मागील बाजू. )

१. तुम्हांला मतें आहेत.

२. ज्याला मत देण्याची तुमची इच्छा असेल त्या उमेदवाराच्या / प्रत्येक उमेदवाराच्या नांवापुढें फुली किंवा फुल्या काढा.

३. मतपत्रिकेवर तुम्हीं एकंदर फुल्यांपेक्षां अधिक फुल्या काढतां कामा नये.

| अनुक्रम नंबर. |
|---|

# गांवपंचायती स्थापण्यासाठीं ठराव करण्याबाबत ॲक्ट.

## सन १९२० चा मुंबईचा ॲक्ट ९ वा.

[ सन १९२४ चा मुंबईचा गांवपंचायतींबाबत सुधारणाबाबत आक्ट १ ला व १९२५ चा मुंबईचा आक्ट १४ वा यांनीं सुधारलेला.]

(गव्हर्नर जनरल यांची मंजुरी मिळाल्यानंतर मुंबई सरकारी गॅझेटांत तारीख ११ माहे नोव्हेंबर सन १९२० रोजीं पहिल्यानें प्रसिद्ध केला.)

ज्याअर्थीं कित्येक लहान प्रदेशांतील रहिवाशांना स्थानिक स्वराज्यांत लक्ष घालण्यास उत्तेजन देण्याच्या हेतूनें अशा प्रदेशांत पाण्याचा पुरवठा, आरोग्य व सार्वजनिक उपयुक्ततेचीं दुसरीं कामें यांसंबंधाच्या जरूरीच्या गोष्टींसाठीं तरतूद करण्याची संधि त्यांना देणें योग्य आहे व ज्याअर्थीं हा आक्ट पास करण्यासाठीं सन १९१५ चा हिंदुस्थान सरकारसंबंधीं आक्ट याचें कलम ७९, पोटकलम (२) याअन्वयें लागणारी गव्हर्नर जनरल यांची अगाऊ मंजुरी मिळालेली आहे; त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) लहान सरनामा:—या आक्टास सन १९२० चा मुंबईचा गांवपंचायतींबाबत आक्ट असें म्हणावें.

(२) व्याप्ति:—तो सगळ्या मुंबई इलाख्यास लागू आहे.

२. व्याख्या:—या आक्टांत विषयास अगर संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर:—

(अ) "गांव" या शब्दाचा अर्थ, या आक्टाच्या कारणासाठीं गांव म्हणून योग्य रीतीनें जाहीर केलेला कोणताहि स्थानिक प्रदेश असा समजावा.

(ब) "ठरविलेलें" या शब्दाचा अर्थ, या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंत ठरविलेलें असा समजावा.

(क) "सरपंच" या शब्दाचा अर्थ, १२ व्या कलमाच्या ठरावांबरहुकूम निवडलेल्या पंचायतीचा चेअरमन असा समजावा.

३. प्रदेश जाहीर करणें:-कलेक्टरास अगाऊ नोटीस दिल्यानंतर जिल्हा-लोकल बोर्डानें किंवा जिल्हा लोकल बोर्डाला अगाऊ नोटीस दिल्यानंतर कले-

क्टरानें लेखी अर्ज केल्यानंतर मुंबई सरकारी गॅझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून कमिशनरः—

(अ) कोणताहि स्थानिक प्रदेश या आक्टाच्या कारणासाठीं गांव आहे असें जाहीर करण्यास मुखत्यार आहे.

(ब) कोणत्याहि प्रदेशाचा एखाद्या गांवांत समावेश करण्यांत यावा किंवा त्यांतून तो काढून टाकण्यांत यावा असें जाहीर करण्यास मुखत्यार आहे; किंवा

(क) असा कोणताहि जाहीरनामा रद्द करण्यास मुखत्यार आहे.

४. पंचायतींची स्थापनाः—प्रत्येक गांवांत एक पंचायत स्थापण्यांत येईल व तींत जिल्हा लोकल बोर्ड ठरवील असे पांच इसमांपेक्षां कमी नाहींत इतके इसम असतील.

५. पंचायतीचे सभासदः—ऑफिशिएटिंग पाटील कोणताहि असल्यास किंवा एकापेक्षां जास्त असतील तर ऑफिशिएटिंग मुलकी पाटील किंवा एकापेक्षां जास्त ऑफिशिएटिंग मुलकी पाटील असतील तर वरिष्ठ दर्जाचा पाटील हा हुद्याच्या नात्यानें पंचायतीचा सभासद असेल.

संशयाच्या किंवा तक्रारीच्या बाबतींत, जिल्हा लोकल बोर्डाचा अध्यक्ष, वरिष्ठ दर्जाचा ऑफिशिएटिंग मुलकी पाटील कोण आहे याचा निकाल करील आणि त्याचा हा निकाल अखेरचा असेल.

सदरीं सांगितलें आहे तें खेरीजकरून पंचायतीचा प्रत्येक सभासद निवडण्यांत येईल.

६. नालायक्या—जो कोणी इसमः—

(अ) स्त्री असेल, किंवा

(ब) एकवीस वर्षांपेक्षां कमी वयाचा असेल, किंवा

(क) साधारणतः त्या गांवांत राहत नसेल, किंवा

(ड) फौजदारी कोर्टानें सहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाबद्दल कैदेची शिक्षा किंवा फटक्यांची शिक्षा किंवा काळेपाण्याची शिक्षा दिलेली असेल किंवा सन १८९८ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्याअन्वयें चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण देण्यास हुकूम झालेला असेल व अशी शिक्षा किंवा हुकूम मागाहून फिरविण्यांत किंवा माफ करण्यांत आला नसेल किंवा अपराध्यास माफी देण्यांत आली नसेल, आणि जो हुकूम करण्याचा अधिकार यावरून गव्हर्नर–इन्–कौन्सिल यांस दिलेला आहे असा हुकूम करून त्याची नालायकी काढून टाकण्यांत आली असेल तें

खेरीजकरून, अशी शिक्षा संपली नसेल तर व तेथपर्यंत किंवा अशी शिक्षा अमलांत असेल तर व तेथपर्यंत; किंवा

(इ) लायक दिवाणी कोर्टानें जो वेडा असल्याबद्दल ठराव केलेला असेल व असा ठराव अद्यापि अमलांत असेल, किंवा

(फ) लायक कोर्टानें जो नादार आहे असा ठराव केला असेल व तो ऋणमुक्त झाला नसेल, किंवा

(ग) १५ व्या कलमाअन्वयें ज्यास हुद्यावरून दूर करण्यांत आलेलें असेल, आणि जो हुकूम करण्याचा अधिकार यावरून जिल्हा लोकल बोर्डास दिलेला आहे असा हुकूम करून त्याची नालायकी काढून टाकण्यांत आली असेल तें खेरीजकरून, असें हुद्यावरून दूर करण्याच्या तारखेपासून पांच वर्षें लोटलीं नसतील तर;

त्या इसमास पंचायतीचा निवडलेला सभासद असण्याचा किंवा चालू राहण्याचा अधिकार नाहीं.

टीपः—कलम ६ हें १९२५ चा मुंबईचा आक्ट १४ ह्या आक्टाअन्वयें सुधारून छापलें आहे.

७. निवडणुकी—सदरील ठरावांस व गव्हर्नर इन् कौन्सिल हे ज्या कानू करतील त्या कानूंस पात्र राहून, प्रत्येक गांवांत असिस्टंट कलेक्टराच्या किंवा डेप्युटी कलेक्टराच्या अथवा या बाबतींत कलेक्टरनें नेमलेल्या दुसऱ्या अंमलदाराच्या अथवा इसमाच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेंत त्या गांवच्या प्रौढ वयाच्या पुरुष रहिवाशांनीं निवडणुकी केल्या पाहिजेत आणि त्यांचा निकाल त्यानें कलेक्टराला व जिल्हा लोकल बोर्डाला कळविला पाहिजे.

८. निवडणुकींचा कायदेशीरपणा—जर चौकशी केल्यानंतर कलेक्टराची अशी खात्री होईल कीं, ६ व्या कलमाच्या ठरावांचा भंग करून कोणताहि सभासद निवडण्यांत आला आहे अथवा कोणत्याहि सभासदाच्या निवडणुकी-संबंधानें जी कोणतीहि लांचलुचपतीची अथवा गैरशिस्तपणाची कृति कलेक्टराच्या मतें कशी निवडणुक बेकायदेशीर ठरविणारी आहे असें समजलें पाहिजे अशी लांचलुचपतीची अथवा गैरशिस्तपणाची कृति करण्यांत आली आहे तर अशा सभासदाची निवडणुक बेकायदेशीर आहे असें कलेक्टरनें ठरविलें पाहिजे व असा ठराव अखेरचा असेल.

९. निवडणूक गैरकायदेशीर होईल तर नव्यानें निवडणूक करणें—जर कलेक्टर कोणत्याहि सभासदाची निवडणूक बेकायदेशीर आहे असें जाहीर करील तर रिकाम्या झालेल्या जागेसाठीं सदरील ठरावांबरहुकूम नव्यानें निवडणूक केली पाहिजे.

१०. हुद्याची मुदत—या आक्टाअन्वयें नियतकालिक निवडणुकीमध्यें निवडून आलेले सभासद, साधारणपणें तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत हुद्यावर राहतील व पुन्हां निवडून येण्यास लायक असतील.

११. सेक्रेटरी—प्रत्येक पंचायतीनें एक सेक्रेटरी नेमला पाहिजे. अशी नेमणूक जिल्हा लोकल बोर्डाच्या मंजुरीस पात्र असेल.

१२. सरपंच—( १ ) पंचायतीच्या सभासदांनीं आपल्यांपैकीं एकास सरपंच निवडलें पाहिजे.

( २ ) सरपंच हा साधारणपणें एक वर्षपर्यंत आपले हुद्यावर राहील, परंतु पुन्हां निवडून येण्यास लायक असेल.

१३. सभांच्या वेळीं काम चालविण्याची रीत—पंचायतीच्या सभेच्या वेळीं काम चालविण्याची रीत गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं या बाबतींत केलेल्या कानूस अनुसरून असली पाहिजे.

१४. पंचायतीची अंमलबजावणी करणारा अधिकारी—पंचायतीच्या ठरावांची अंमलबजावणी सरपंचानें केली पाहिजे, व त्याच्याकडे पंचायतीचा सर्व अंमलबजावणीचा अधिकार असेल व तो या आक्टावरून किंवा या आक्टाअन्वयें पंचायतीवर लादलेलीं कामें योग्य रीतीनें पुरीं करण्याबद्दल प्रत्यक्ष जबाबदार असेल.

१५. सभासद, सरपंच किंवा सेक्रेटरी यांस दूर करणें—एखाद्या पंचायतीचा जो कोणताही निवडलेला सभासद किंवा सरपंच, जिल्हा लोकलबोर्डाच्या मतें प्रसंगाप्रमाणें, सभासद किंवा सरपंच असण्यास नालायक असेल, किंवा जो असा सभासद किंवा सरपंच या नात्यानें आपलीं कर्तव्यें करण्याच्या कामांत दुराग्रहानें हलगर्जीपणा करीत असेल, त्यास दूर करण्याचा, पंचायतीचें म्हणणें ऐकून घेतल्यानंतर जिल्हा लोकलबोर्डास अधिकार आहे, आणि अशा रीतीनें दूर करण्यांत आलेल्या सरपंचास जर तो हुद्याच्या नात्यानें पंचायतीचा सभासद नसेल तर सदरहू बोर्डाच्या मर्जीस येईल तर पंचायतींतूनहि दूर करण्याचा अधिकार आहे. अशाच कारणासाठीं पंचायतीच्या सेक्रेटरीस देखील दूर करण्याचा जिल्हा लोकलबोर्डास अधिकार आहे.

१६. सभासदाचें राहण्याचें ठिकाण कलेक्टरनें ठरवावयाचें—एखादा सभासद साधारणपणें त्या गांवांत राहतो किंवा रहात नाहीं यासंबंधानें कोणतीहि

तक्रार उपस्थित होईल, तर कलेक्टरानें चौकशी करून अशा तक्रारीचा निकाल केला पाहिजे व त्याचा निकाल अखेरचा असेल.

१७. (१) निवडलेल्या सभासदांची नालायकी वगैरेमुळें खालीं झालेली जागा—एखादा निवडलेला सभासद पंगू झाल्यामुळें, मरण पावल्यामुळें, त्यानें राजीनामा दिल्यामुळें, तो नालायक झाल्यामुळें, किंवा त्याला हुद्यावरून दूर करण्यांत आल्यामुळें रिकामी झालेली कोणतीहि जागा सोयीनें शक्य तितक्या लवकर कोणी मनुष्य त्या जागेसाठीं सदरील ठरावांबरहुकूम निवडणूक करून भरली पाहिजे; आणि सदरील मनुष्य, ज्या सभासदाच्या जागीं त्यांस निवडलें असेल, तो सभासद ती जागा रिकामी झाली नसती तर तिजवर जेवढ्या मुदतीपर्यंत असता, तितके दिवस मात्र त्या जागेवर राहील.

(२) एखादा सरपंच पंगू झाल्यामुळें, मरण पावल्यामुळें, त्यानें राजीनामा दिल्यामुळें, तो नालायक झाल्यामुळें, किंवा त्याला हुद्यावरून दूर करण्यांत आल्यामुळें रिकामी झालेली कोणतीहि जागा, सोईनें शक्य तितक्या लवकर एखादो सभासद निवडून भरली पाहिजे, व तो ज्या सरपंचाचे जागीं त्यास निवडलें असेल, तो सरपंच, ती जागा रिकामी झाली नसती तर तिजवर जेवढ्या मुदतीपर्यंत असता, तितके दिवस मात्र त्या जागेवर राहील.

"(३) जागा रिकामी पडल्यामुळें पंचायतीच्या कामास बाध येत नाहीं—पंचायतींत कोणतीहि जागा रिकामी पडली असेल त्या मुदतींत ती जागा जणुं रिकामी पडलीच नाहीं असें समजून चालू मेंबरास काम करण्याचा अधिकार आहे" आणि

टीपः—हें पोट-कलम १९२४ च्या मुंबईच्या गांवपंचायतीबाबत आक्ट सुधारण्याबद्दल आक्टाचें कलम २, पोट-कलम २ वरून दाखल केलें आहे.

(४) जर एखादा सरपंच पंचायतीचा सभासद म्हणून नालायक होईल तर तो सरपंच म्हणून नालायक होईल.

१८. (१) पंचायतीचीं कर्तव्यें—खालील बाबतींपैकीं जितक्या बाबतींसंबंधानें जिल्हा लोकल बोर्ड फर्मावील तितक्या संबंधानें गांवच्या जरूरीच्या गोष्टी पुऱ्या करण्यासाठीं हातीं असलेल्या फंडाच्या मर्यादेंत वाजवी तजवीज करणें हें पंचायतीचें कर्तव्य असेल, म्हणजेः—

(अ) घरखर्चासाठीं पाण्याचा पुरवठा;

(ब) सार्वजनिक रस्ते, मोऱ्या आणि (केवळ इरिगेशनच्या कामासाठीं उपयोग करण्यांत येत असलेलीं तळीं व विहीरी खेरीजकरून इतर) तळीं व विहिरी आणि गांवांतील इतर सार्वजनिक जागा व बांधकामें स्वच्छ करणें.

(क) दुय्यम प्रतीचे रस्ते, मोऱ्या व पूल हे बांधणें, चांगल्या स्थितींत राखणें व दुरुस्त करणें; मात्र इतकेंच कीं, सदरहू रस्ता, मोरी किंवा पूल ज्या इसमाच्या किंवा अधिकाऱ्याच्या ताब्यांत असतील त्या इसमाची किंवा अधिकाऱ्याची परवानगी घेतल्याशिवाय अशीं कामें हातीं घेतां कामा नयेत.

(ड) आरोग्य, झाडलोट आणि पीडा न होऊं देणें व ती कमी करणें.

(इ) सार्वजनिक आरोग्य राखणें व त्यांत सुधारणा करणें.

(फ) पंचायतींत निर्दिष्ट होणाऱ्या सार्वजनिक इमारती, कुरणें ( केवळ इरिगेशनच्या कामासाठीं उपयोग करण्यांत येत असलेलीं तळीं व विहिरी खेरीज करून इतर ) तळीं व विहिरी हीं चांगल्या स्थितींत राखणें व त्यांच्या उपयोगाचें नियमन करणें, आणि

(ग) गांवांत दिवे लावणें.

(२) जिल्हा लोकल बोर्डानें पसंत केलेल्या दुसऱ्या कोणत्याहि बाबतीं-संबंधानें गांवच्या गरजा पुऱ्या करण्यासाठीं देखील तरतूद करण्याचा पंचायतीस अधिकार आहे.

१९. जादा कर्तव्यें—जिल्हा लोकल बोर्ड पंचायतीच्या संमतीनें कोणत्याही वेळीं, अशा पंचायतीकडे कोणत्याहि संस्थेची व्यवस्था सोंपविण्यास, किंवा १८ व्या कलमांत ठराव न केलेलें कोणतेंहि काम करण्याचें सोंपविण्यास मुखत्यार आहे, आणि त्यानंतर अशा पंचायतीनें अशा संस्थेची व्यवस्था हातीं घेणें किंवा असें काम करणें कायदेशीर असेल; मात्र इतकेंच कीं, अशा प्रत्येक बाबतींत, अशा व्यवस्थेसाठीं किंवा काम करण्यासाठीं जरूर असलेला पैसा जिल्हा लोकल बोर्डानें पंचायतीच्या हवालीं केला पाहिजे.

२०. [१] इतर कर्तव्यें—या आक्टाअन्वयें जिल्हा लोकल बोर्डानें केलेल्या कानूंस पात्र राहून पंचायतीनें खालील गोष्टी म्हणजे:——

(अ) गांवच्या शाळेवर देखरेख करणें;

(ब) गांवांत लोकल बोर्डानीं कामावर लावलेल्या मजुरांवर देखरेख करणें.

(क) कोंडवाड्याची व्यवस्था ठेवणें व ते चालविणें.

(ड) गव्हर्नर इन् कौन्सिल हे मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून वेळोवेळीं जीं कारभारासंबंधीं दुसरीं कामें तिजकडे सोंपवतील तीं कामें करणें.

या गोष्टी केल्या पाहिजेत.

(२) या कलमाअन्वयें जिल्हा लोकल बोर्डानें करावयाच्या कानू हा आक्ट पास झाल्यापासून सहा महिन्यांच्या आंत केल्या पाहिजेत. जर त्या मुदतींत त्या करण्यांत आल्या नाहींत तर त्या बाबतींत कानू करण्याचा गव्हर्नर इन् कौंसिल यांस अधिकार आहे.

२१. (१) पंचायतीची मिळकत—जिल्हा लोकल बोर्डास जिल्हा लोकल बोर्डात निविष्ट होणारी कोणतीहि मिळकत पंचायतींत निविष्ट होईल असें वेळोवेळीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

(२) पंचायतीनें केलेलें प्रत्येक बांधकाम अशा पंचायतींत निविष्ट होईल.

२२. नोकरांची यादी—ह्या आक्टावरून किंवा ह्या आक्टाअन्वयें पंचायतीवर लादलेलीं कामें पार पाडण्यासाठीं जरूर असलेल्या आपल्या नोकरांची संख्या व त्यांचा पगार ३२ व्या कलमाच्या ठरावांस पात्र राहून, ठरवून त्याची एक यादी पंचायतीनें जिल्हा लोकल बोर्डाकडे पाठविली पाहिजे.

२३. (१) नोकरांची नेमणूक—सरपंचानें पंचायतीच्या नोकरांस नेमिलें पाहिजे व त्यांच्या हातीं असलेल्या फंडांतून त्यांचा पगार दिला पाहिजे. तसेंच त्यास आवश्यक वाटतील असे हंगामी नोकर निकडीच्या प्रसंगीं ठेवण्याचा त्यास अधिकार आहे. सरपंच, त्यानें नेमलेल्या कोणत्याही नोकरांस लेखी हुकूम करून वेळोवेळीं दंड करण्यास, सस्पेंड करण्यास किंवा बडतर्फ करण्यास मुखत्यार आहे.

(२) या कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याही हुकमावर बडतर्फीच्या हुकमाविरुद्ध पंचायतीकडे केलेल्या अपिलाशिवाय इतर अपील चालणार नाहीं.

२४. (१) बजेट—पंचायतीनें जिल्हा लोकल बोर्ड ठरवील त्या तारखेस किंवा त्या तारखेपूर्वी व त्या नमुन्याप्रमाणें—

(अ) पुढील वर्षासाठीं गांवफंडाची सुरवातीस असलेली शिल्लक व अंदाजलेली प्राप्ति;

(ब) एस्टाब्लिशमेंटसाठीं व १८ व्या कलमाच्या (१) ल्या पोटकलमांत निर्दिष्ट केलेलीं कामें पुरीं करण्यासाठीं योजलेला खर्च;

(क) १८ व्या कलमाच्या (२) ऱ्या पोटकलमाअन्वयें योजिलेला खर्च, यांचें एक पत्रक दरवर्षी ठरविलें पाहिजे व तें जिल्हा लोकल बोर्डाकडे पाठविलें पाहिजे.

(२) जिल्हा लोकल बोर्डानें असें पत्रक पोंचल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आंत तें पसंत केलें पाहिजे किंवा १८ व्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या कामांपैकीं कोणत्याही कामाचा योजिलेला खर्च वाढविला पाहिजे किंवा कमी केला पाहिजे असें फर्माविलें पाहिजे. मात्र इतकेंच कीं, पुढच्या वर्षासाठीं गांवफंडाच्या अंदाजलेल्या प्राप्तीपेक्षां योजिलेला एकूण खर्च जास्त व्हावा असें फर्माविण्यास जिल्हा लोकल बोर्डास अधिकार असणार नाहीं.

२५. गांवफंड.—प्रत्येक गांवासाठीं पंचायतीच्या ताब्यांत एक गांवफंड असेल आणि—

(अ) सन १९०१ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट याच्या १९१ व्या कलमाच्या ठरावाअन्वयें गव्हर्नर इन् कौन्सिल हे गांवफंडास जी कोणत्याही पैशाची रक्कम नेमून देतील अशी रक्कम;

(ब) कलम २६ अथवा कलम २७ याअन्वयें बसविलेल्या कोणत्याही कराचें उत्पन्न;

(क) या आक्टाअन्वयें केलेल्या पोटकायद्यांचा भंग केल्याबद्दलच्या खटल्यांत वसूल झालेल्या दंडाच्या सगळ्या रकमा;

(ड) गांवफंडाच्या खातीं जमा करण्यासाठीं कोर्टानें हुकूम केलेल्या सर्व इतर रकमा;

(इ) गांव नोकरांनीं गोळा केलेली सगळी धूळ, घाण, शेण अथवा कचरा ( यांत जनावरांच्या प्रेतांचा समावेश होतो ) यांच्या विक्रीचें उत्पन्न, कोणत्याही इसमाचा त्या सगळ्यावर किंवा त्याच्या भागावर जेथवर हक्क असेल तें खेरीज करून;

(फ) जिल्हा लोकल बोर्डानें गांवफंडाला दिलेल्या रकमा;

(ग) सरकारपासून कर्जाच्या रूपानें घेतलेल्या अथवा देणगीच्या रुपानें मिळालेल्या सर्व रकमा;

(ह) गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या कोणत्याही सामान्य किंवा विशेष हुकुमावरून ज्या दुसऱ्या रकमा गांवफंडाला देण्यांत येतील त्या रकमा, आणि

(आय्) २१ व्या कलमाअन्वयें पंचायतींत निर्दिष्ट होणाऱ्या कोणत्याहि मिळकतींचें उत्पन्न;

हीं सदरहु गांवफंडाच्या खातीं जमा करण्यांत येतील.

२६. घरपट्टी—गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं केलेल्या कानूंबरहुकूम प्रत्येक गांवांत घरपट्टी बसविण्यांत येईल.

२७. (१) जादा कर—गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या निर्बंधास पात्र राहून, कोणत्याही पंचायतीस जिल्हा लोकल बोर्डाच्या मंजुरीनें व त्या बोर्डानें केलेल्या कानूंबरहुकूम, त्या गांवच्या हद्दीच्या आंतील घरांच्या अथवा जमिनीच्या मालकांवर किंवा त्यांच्या भोगवटा करणारांवर कोणताही कर बसविण्याचा अधिकार आहे. जिल्हा लोकल बोर्डाकडे अशा कोणत्याही मालकास अथवा भोगवटा करणारास अशा कोणत्याही कराच्या आकारणीविरुद्ध किंवा तो वसूल करण्याविरुद्ध अपील.

करण्याचा अधिकार आहे, आणि जिल्हा लोकल बोर्डाचा निकाल अखेरचा असेल.

(२) अशा निर्बंधास पात्र राहून, अशी मंजुरी घेऊन आणि अशा कानू-बरहुकूम आक्ट्राय कर बसविण्याचा अधिकार पंचायतीस आहे.

गांवच्या कोणत्याही राहिवाशास असा आक्ट्राय कर बसविण्याविरुद्ध जिल्हा लोकल बोर्डाकडे अपील करण्याचा अधिकार आहे व त्या बोर्डाचा निकाल अखेरचा असेल.

२८. (१) प्राप्तीची वाढ–पंचायतीची नियमित प्राप्ति १८ व्या कलमांत निर्दिष्ट केलेलीं कामें योग्य रीतीनें पुरीं करण्यासाठीं आवश्यक असणाऱ्या प्राप्तीपेक्षां कमी आहे असें जर कोणत्याहि वेळीं जिल्हा लोकल बोर्डाचें मत असेल तर जिल्हा लोकल बोर्डास आवश्यक वाटेल इतक्या रकमेपर्यंत सहा महिन्यांच्या आंत आपली प्राप्ति वाढविण्याची तजवीज करण्याबद्दल पंचायतीस सांगण्यास त्या बोर्डास अधिकार आहे. जरूर असणाऱ्या रकमेपर्यंत आपली प्राप्ति वाढविण्याबद्दल योग्य तजवीज करण्यास जर पंचायत चुकेल तर तिला घरपट्टी वाढविण्यास भाग पाडण्याचा अधिकार जिल्हा लोकल बोर्डास आहे.

मात्र इतकेंच कीं, गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं ठरविलेल्या कमाल दरापेक्षां जास्त घरपट्टी कोणत्याहि परिस्थितींत वाढविण्यास भाग पाडण्याचा अधिकार जिल्हा लोकल बोर्डास असणार नाहीं.

(२) कमिशनरकडे आपली प्राप्ति वाढविण्याच्या विरुद्ध अपील करण्याचा अधिकार कोणत्याही पंचायतीस आहे, आणि अशा अपिलाचा निकाल होईतोंपर्यंत जिल्हा लोकल बोर्डानें अशी वाढ अमलांत आणण्याची कोणतीही तजवीज करतां कामा नये.

२९. (१) कर वसूल करणें—कोणताही इसम कोणताही कर किंवा त्याचा हप्ता अथवा कोणतीही देणें असलेली रक्कम, तिची अदा करण्याच्या निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा त्यापूर्वी देण्यास चुकल्यास रकम न देणारावर मागणीचा हुकूम पंचायतीनें बजावला पाहिजे, आणि असा हुकूम बजावल्यापासून १५ दिवसांच्या आंत रकम भरण्यांत आली नाहीं तर त्याची जंगम मिळकत जप्त करून व विकून ती वसूल करण्याचा अख्त्यार त्या पंचायतीस आहे.

(२) जर पंचायत तिला येणें असलेला कर अथवा दंड वसूल करण्यास चुकेल किंवा सदरील पोट कलमाच्या किंवा ४१ व्या कलमाच्या ४थ्या पोट-कलमाच्या ठरावांअन्वयें इलाज घेण्यास हयगय करील तर जमीनमहसुलाची बाकी म्हणून कलेक्टरास ते वसूल करण्यास सांगण्याचा अधिकार जिल्हा लोकल बोर्डास आहे,

आणि कलेक्टर जी त्यास योग्य वाटेल अशी चौकशी ( कोणतीही असल्यास ) केल्यानंतर तसें करूं लागण्यास मुखत्यार आहे.

३०. मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट—सन १८८४ चा मुंबईचा लोकल बोर्ड आक्ट यांत कांहींहि मजकूर असला तरी, या आक्टाच्या ठरावासंबंधीं खर्चासाठीं पंचायतीला लोकल फंडाचा कांहीं भाग देण्याचा अधिकार जिल्हा अथवा तालुका लोकल बोर्डास आहे.

३१. (१) तपासणीचा अधिकार—जिल्हा लोकल बोर्डास—

(अ) कोणत्याही पंचायतीच्या वहिवाटींतील कोणत्याही स्थावर मिळकतीवर किंवा तिच्या निर्बंधाखालीं अथवा तिच्या हुकमतीखालीं चालत असलेल्या कोणत्याही कामावर प्रवेश करण्याचा व तीं तपासण्याचा किंवा त्यांत प्रवेश करविण्याचा व तीं तपासविण्याचा;

(ब) पंचायतीनें चालविलेल्या कामाचा कोणताही उतारा, पंचायतीच्या कबजांतील किंवा निर्बंधाखालील कोणतेंही बूक अगर दस्तऐवज हीं आणि अशा पंचायतीकडून मागविणें त्यास योग्य वाटेल असें कोणतेंही पत्रक, तपशील, हिशेब किंवा रिपोर्ट हीं मागविण्याचा;

(क) जी कोणतीहि गोष्ट पंचायत करणार असेल किंवा करीत असेल तिजविषयीं कोणतीहि हरकत असल्याचें जिल्हा लोकल बोर्डास दिसत असेल त्या हरकतीचा, किंवा जी कोणतीहि माहिती जिल्हा लोकल बोर्ड देऊं शकत असेल व जिच्यामुळें त्या पंचायतीनें अमुक एक गोष्ट करणें अवश्य आहे असें त्यास वाटत असेल, त्या माहितीचा विचार करण्यास पंचायतीस सांगण्याचा आणि अशी गोष्ट करण्याचें बंद न करण्याचीं किंवा अशी गोष्ट न करण्याचीं आपलीं कारणें असतील तीं लिहून वाजवी वेळाच्या आंत जिल्हा लोकल बोर्डाकडे लेखी जबाब पाठविण्यास लावण्याचा अधिकार असेल.

[२] सदरील पोट-कलमाअन्वयें जिल्हा लोकल बोर्डास दिलेल्या अधिकारांपैकीं सर्व अगर कोणतेही अधिकार त्याच्या अध्यक्षास, उपाध्यक्षास, चीफ ऑफिसरांस, पब्लिक हेल्थ ऑफिसरांस अथवा एक्झिक्यूटिव्ह इंजिनियरांस सोंपून देण्यास तें बोर्ड मुखत्यार आहे.

३२. नोकरमंडळी ठेवण्याच्या कामीं उधळेपणा—पंचायतीनें आपले अमलदार किंवा नोकर म्हणून ज्या मनुष्यास ठेविलें असेल किंवा ठेवण्याचें योजिलें असेल त्या मनुष्यांची संख्या किंवा अशा मनुष्यांस पंचायतीनें दिलेला किंवा देण्याचें योजिलेला मेहनताना फाजील आहे असें जिल्हा लोकल बोर्डाचें मत

असेल तर जिल्हा लोकल बोर्डानें फर्माविलें असतां अशी संख्या किंवा मेहनताना पंचायतीनें कमी केला पाहिजे.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, अशा कोणत्याही हुकुमाविरुद्ध त्या पंचायतीस गव्हर्नर इन् कौंसिल यांकडे अपील करण्याचा अधिकार आहे, आणि गव्हर्नर इन् कौंसिल यांचा ठराव अखेरचा असेल.

३३. [१] हुकुम बजावण्याचें तहकूब करणें—जर पंचायतीच्या कोणत्याहि हुकुमाची किंवा ठरावाची अमलबजावणी केल्यानें किंवा पंचायतीनें किंवा तिच्या वतीनें जी कोणतीहि गोष्ट करण्यांत येणार असेल किंवा करण्यांत येत असेल अशी गोष्ट करण्यानें लोकांस इजा किंवा त्रास होत असेल अगर होण्याचा संभव असेल अगर स्वस्थतेचा भंग होण्याचा संभव असेल असें जिल्हा लोकल बोर्डास वाटेल तर आपल्या अध्यक्षाच्या सहीच्या लेखी हुकुमानें त्याची अमलबजावणी करण्याचें तहकूब करण्यास किंवा ती करण्याची मनाई करण्यास सदरहू बोर्ड मुख्त्यार आहे.

[२] जेव्हां जिल्हा लोकल बोर्ड सदरील पोट–कलमाअन्वयें कोणताहि हुकूम करील तेव्हां त्यानें त्या हुकूमाची नक्कल तो करण्याच्या कारणांच्या यादीसहित गव्हर्नर इन् कौंसिल यांजकडे व तो हुकूम लागू असलेल्या पंचायतीकडे, लागलींच पाठविली पाहिजे, आणि तो हुकूम रद्द करणें किंवा तो फेरफारानिशीं किंवा फेरफारावांचून नेहमीं किंवा त्यास योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत चालू राहील असें फर्माविणें गव्हर्नर इन् कौंसिल यांच्या नजरेवर राहील.

३४. [१] निकडीच्या प्रसंगीं काम करणें—जिल्हा लोकल बोर्डास असा अधिकार आहे कीं, जें कोणतेंही काम किंवा कृत्य करण्याचा पंचायतीस अधिकार दिलेला असेल, व जें तावडतोब करणें बोर्डाच्या मतें लोकांचे आरोग्यास व सलामतीस अवश्य असेल, तें काम किंवा कृत्य निकडीच्या प्रसंगीं करण्याची बोर्डानें तजवीज करावी; आणि तें काम किंवा तें कृत्य करण्याचा खर्च, त्या पंचायतीनें लागलाच दिला पाहिजे असें फर्मावावें.

[२] सदरहू खर्च याप्रमाणें देण्यांत न आला तर, ज्या तिजोरींत गांवफंड ठेविला असेल ती तिजोरी स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें असा खर्च किंवा देतां येईल तेवढा त्याचा भाग, अशा अमलदाराच्या हातीं अशा गांवफंडाची बाकी असेल तींतून द्यावा असें त्या अमलदारास फर्माविण्याचा अधिकार जिल्हा लोकल बोर्डास आहे.

[३] पोट–कलम [१] यावरून आपणास दिलेल्या अधिकारांचा जिल्हा लोकल बोर्ड ज्या बाबतींत उपयोग करील त्या प्रत्येक बाबतीविषयीं त्यानें गव्हर्नर इन् कौन्सिल यांजकडे लागलाच रिपोर्ट केला पाहिजे.

३५. [१] कर्तव्य करणें–जर कोणत्याही वेळीं १८ व्या कलमांत निर्दिष्ट केलेलें कोणतेंही काम करण्यास एखादी पंचायत चुकली आहे असें जिल्हा लोकल बोर्डाच्या नजरेस येईल, तर तें काम निर्दिष्ट केलेल्या मुदतींत झालें पाहिजे असा हुकूम करण्याचा बोर्डास अधिकार आहे आणि जर तें काम निर्दिष्ट केलेल्या मुदतींत करण्यांत आलें नाहीं, तर बोर्डास असा अधिकार आहे कीं, तें काम करण्यासाठीं कोणा तरी मनुष्यास त्यानें नेमावें, आणि तें करण्याचा खर्च, कसूर करणाऱ्या पंचायतीनें जिल्हा लोकल बोर्ड ठरवील त्या मुदतीच्या आंत दिला पाहिजे असें फर्मावावें.

[२] सदरहू खर्च याप्रमाणें देण्यांत न आला तर, ज्या तिजोरींत गांवफंड ठेविलेला असेल ती तिजोरी स्वाधीन असणाऱ्या अंमलदारानें, असा खर्च किंवा देतां येईल तेवढा त्याचा भाग अशा अंमलदाराच्या हातीं अशा गांवफंडाची बाकी असेल तींतून द्यावा असें त्या अंमलदारास फर्मावणेचा अधिकार जिल्हा लोकल बोर्डास आहे.

[३] पोट–कलम [१] यावरून आपणांस दिलेल्या अधिकारांचा जिल्हा लोकल बोर्ड ज्या बाबतींत उपयोग करील त्या प्रत्येक बाबतीविषयीं बोर्डानें गव्हर्नर इन् कौन्सिल यांजकडे लागलाच रिपोर्ट केला पाहिजे.

३६. (१) पंचायत बंद ठेवणें.–एखादी पंचायत आपल्या अधिकाराबाहेर चालते, किंवा आपल्या अधिकाराचा गैरउपयोग करिते किंवा कलम १८ मध्यें नमूद केलेलीं कर्तव्यें दुराग्रहानें करीत नाहीं असें जर गव्हर्नर इन् कौंसिल यांस वाटेल तर, जिल्हा लोकल बोर्डास विचारल्यानंतर मुंबई सरकारी गॅझेटांत हुकूम प्रसिद्ध करून सदरहू हुकुमांत निर्दिष्ट केलेल्या मुदतीपर्यंत अशी पंचायत बंद ठेवण्याचा गव्हर्नर इन् कौंसिल यांस अधिकार आहे.

(२) जेव्हां एखादी पंचायत याप्रमाणें बंद ठेविली जाईल तेव्हां—

[अ] त्या पंचायतीचे सर्व सभासद आपल्या सभासद या नात्याच्या हुद्यावरून सरपंचास तो हुकूम कळविल्याच्या तारखेपासून दूर होतील.

[ब] पंचायतीचे सर्व अधिकार व कामें, पंचायत बंद ठेविली असेल त्या मुदतींत, याबाबद ज्या मनुष्यास किंवा मनुष्यांस जिल्हा लोकल बोर्ड वेळोवेळीं नेमील त्या मनुष्यानें किंवा मनुष्यांनीं चालविलीं व केलीं पाहिजेत; आणि

[क] जितक्या मुदतीपर्यंत पंचायत बंद ठेविली असेल ती मुदत संपल्यावर त्या पंचायतीची पुनः रचना केली जाईल व रकम [अ] अन्वयें आपल्या जागा सोडणारे सभासद पुनः निवडून येण्यास लायख असतील.

३७. गव्हर्नर इन् कौंसिल यांचा अधिकार-सन १८८४ चा मुंबई लोकल बोर्ड आक्ट याअन्वयें जिल्हा लोकल बोर्डावर गव्हर्नर इन् कौंसिल जे अधिकार व नियंतृत्व धारण करितात व चालवितात तोच अधिकार व नियंतृत्व या आक्टाशीं संबंध असलेल्या सर्व गोष्टींत जिल्हा लोकल बोर्डावर, गव्हर्नर इन् कौंसिल धारण करितील व चालवितील.

३८. [१] पोट-कायदे-गव्हर्नर इन् कौंसिल यांच्या आगाऊ मंजुरीनें खालील बाबतींसाठीं ठराव करणारे पोट-कायदे करण्याचा जिल्हा लोकल बोर्डास अधिकार आहे, म्हणजे—

[अ] पिण्यासाठीं उपयोगांत असलेल्या पाण्याचीं सर्व साधनें शुद्ध करणें आणि तीं दूषित होऊं न देणें.

[ब] कोणत्याही ओढ्यांतून, तळ्यांतून, विहिरींतून किंवा दुसऱ्या साधनांतून पिण्यासाठीं पाणी काढून नेण्यानें किंवा उपयोग केल्यानें रोग होतो किंवा आरोग्यास अपाय होतो किंवा रोग होण्याचा अगर आरोग्यास अपाय होण्याचा संभव असेल असें कोणतेंही पाणी काढून नेण्याची किंवा त्याचा उपयोग करण्याची मनाई करणें आणि असें तळें किंवा विहीर बुजवून टाकून किंवा त्यावर आच्छादन घालून अगर जी दुसरी कोणतीहि रीत योग्य आहे असें वाटेल अशा रीतीनें असें पाणी काढून नेण्याची किंवा त्याचा उपयोग करण्याची मनाई करणें;

[क] सार्वजनिक आरोग्य व सुखसोयी यांना बाधक अशा रीतीनें किंवा अशा ठिकाणीं खत, केरकचरा किंवा इतर घाणेरडी वस्तु ठेवण्याची किंवा सांठा करून ठेवण्याची मनाई करणें.

[ड] अपायकारक धंदे किंवा व्यापार यांचें नियमन करणें;

[इ] जाळून किंवा पुरून प्रेतांची व्यवस्था लावणें;

[फ] आरोग्यास अपायकारक किंवा आसपासच्या लोकांस त्रासदायक अशी माती खणून काढणें व खड्डे व खळगे भरून काढणें;

[ग] अपायकारक झाडेंझुडपें काढून टाकणें;

[ह] धोक्याचे किंवा मोडकळीस आलेले इमले दुरुस्त करणें व पाडून टाकणें;

[आय्] हवा खेळण्यासाठीं किंवा स्ट्रीटांच्या आंखणीसाठीं व त्यांची जागा ठरविण्यासाठीं योग्य तरतुदीशिवाय इमारती बांधण्याची मनाई करणें;

[जे] मार्केटें व कसाईखाने यांचें नियमन करणें; आणि

[के] आरोग्य व झाडलोट यांचें सर्वसाधारण नियमन करणें.

आणि तशीच मंजुरी घेऊन अशा कोणत्याहि पोटकायद्याचा भंग केल्या-बद्दल दहा रुपयांहून जास्त नाहीं इतकी गुन्हेगारीची रक्कम ठरविण्याचा अधिकार आहे.

[२] ह्या पोटकायद्यांपैकीं सर्व किंवा कोणतेहि पोटकायदे कोणत्याहि गांवास लागू करण्याचा जिल्हा लोकल बोर्डास अधिकार आहे.

[३] असे पोटकायदे करणें हें अगाऊ प्रसिद्ध केले जाण्याच्या शर्तीस पात्र असेल.

३९. [१] पोटकायद्यांच्या भंगाबद्दल पंचायतीनें इन्साफ करणें:—या आक्टाअन्वयें केलेल्या पोटकायद्याच्या प्रत्येक भंगाचा, डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटानें इतर रीतीनें फर्माविलें नसेल तर इन्साफ हातीं घेण्याचा अधिकार पंचायतीस आहे.

[२] पंचायतीनें आरोपित मनुष्याच्या समक्ष किंवा सदरहू मनुष्यावर नोटीस बजाविली असून देखील तो हजर राहण्यास चुकेल तर त्याच्या गैरहजेरींत करण्यांत आला आहे असें म्हणणें असलेल्या भंगासंबंधानें पुरावा घेतला पाहिजे. आणि सदरहू मनुष्यानें आपल्या बचावासाठीं हजर केलेला कोणताहि पुरावा घेतला पाहिजे आणि त्यानंतर त्या आरोपित मनुष्यास दोषमुक्त केलें पाहिजे किंवा त्याच्यावर अपराधाच्या शाबितीचा ठराव केला पाहिजे, आणि जर त्याच्यावर अपराधाच्या शाबितीचा ठराव करण्यांत येईल तर पंचायतीस वाजवी वाटेल त्याप्रमाणें या आक्टाअन्वयें किंवा पोटकायद्याअन्वयें अधिकार दिलेली शिक्षा त्यास देण्याचा तिला अधिकार आहे.

[३] आरोपित मनुष्याच्या वतीनें कोणताहि आडव्होकेट, अटॉर्नें, प्लीडर, वकील किंवा मुखत्यार यानें पंचायतीपुढें हजर होतां कामा नये.

[४] पंचायतीनें अपराधाच्या शाबितीचा ठराव केलेल्या इसमास, त्याला शिक्षा देण्यांत आल्यानंतर दहा दिवसांच्या आंत कोणत्याहि वेळीं, डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटाकडे किंवा डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट गव्हर्नर-इन्-कौन्सिल यांच्या हुकुमास पात्र राहून ह्या बाबतींत वेळोवेळीं अशा पंचायतीचा सभासद नसलेल्या ज्या दुसऱ्या माजिस्ट्रेटास नेमील अशा दुसऱ्या कोणत्याहि माजिस्ट्रेटाकडे तपासणी-करितां अर्ज करण्याचा अधिकार आहे.

[५] तपासणींत पंचायतीचा निकाल कायम करण्याचा, फिरविण्याचा किंवा त्यांत फेरफार करण्याचा अधिकार माजिस्ट्रेटास आहे; आणि जी शिक्षा देण्याचा पंचायतीस अधिकार असेल अशा शिक्षेसंबंधानें कोणताहि हुकूम करण्याचा त्यास अधिकार आहे. त्याचा हुकूम, पंचायतीचा हुकूम ज्या रीतीनें अमलांत आणण्यांत येतो त्याच रीतीनें अमलांत आणला पाहिजे.

[६] अशा माजिस्ट्रेटास, अर्जांचा निकाल होईपर्यंत शिक्षेची बजावणी तहकूब करणें जरूर किंवा योग्य आहे असें दिसून येईल तेव्हां त्याला योग्य वाटतील अशा अटींवर अशी बजावणी तहकूब करण्याचा अधिकार आहे.

४०. माजिस्ट्रेटानें इन्साफ करणें:—जेव्हां डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट विशेष किंवा सामान्य हुकूम करून असें फर्मावील तेव्हां अशा पोटकायद्यांच्या कोणत्याहि भंगाचा ३९ व्या कलमाअन्वयें पंचायतीस इन्साफ हातीं घेतां येणार नाहीं; परंतु तो कोणत्याहि माजिस्ट्रेटास हातीं घेतां येईल आणि या आक्टांत ठरविल्याप्रमाणें त्याबद्दल शिक्षा देतां येईल.

४१. [१] शिक्षा:—या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याहि पोटकायद्याच्या भंगाबद्दल, अशा पोटकायद्यांत कोणत्याहि बाबतींत एकादी कमी शिक्षा सांगितली नसेल तर, पराकाष्ठा दहा रुपयांपर्यंत दंड करण्याचा अधिकार आहे, आणि भंग करण्याचें चालू राहील त्या बाबतींत, पहिल्या भंगाबद्दल अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यानंतर किंवा भंग करण्याचें बंद करण्याबद्दल पंचायतीकडून नोटीस मिळाल्यानंतर जितके दिवस भंग करण्याचें चालू राहील अशा प्रत्येक दिवसाबद्दल पराकाष्ठा दोन रुपयांपर्यंत दंड करण्याचा अधिकार आहे.

[२] भंग केल्याबद्दल किंवा भंग करण्याचें चालू ठेवल्याबद्दल माजिस्ट्रेटाकडून अपराधाच्या शाबितीचा ठराव करण्यांत आलेल्या इसमास दंड न दिल्यास पराकाष्ठा ४ दिवस नुसत्या कैदेची शिक्षा देण्याचा अधिकार आहे.

[३] पंचायतीनें दंडाची शिक्षा दिलेल्या मनुष्यास तिला तो दंड अदा करण्यास योग्य वाटेल अशी चार दिवसांहून जास्त नाहीं इतकी मुदत तारणासंबंधानें ज्या अटी लादणें पंचायतीस जरूर वाटेल अशा अटींवर देण्याचा पंचायतीस अधिकार आहे.

[४] पंचायतीनें केलेले दंड गुन्हेगाराची जंगम मिळकत जप्त करून व विकून वसूल करून घेतले पाहिजेत. जर दंडाची रक्कम पूर्णपणें वसूल झाली नाहीं, तर पंचायतीस, तो दंड किंवा त्याचा वसूल झाला नसेल तेवढा भाग वसूल करण्यासाठीं, माजिस्ट्रेटाकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे, आणि त्या माजिस्ट्रेटानें, जणूं तो दंड आपण स्वतःच बसविला असल्याप्रमाणें तो वसूल करण्यास लागलें पाहिजे.

४२. [१] कानू:—गव्हर्नर इन् कौन्सिल यांस मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून खालील बाबतींसंबंधानें कानू करण्याचा अधिकार आहे:—

[अ] कलम ७ अन्वयें पंचायतींच्या सभासदांच्या निवडणुकींचें नियमन करणें;

[ब] कलम १३ अन्वयें, पंचायतीच्या सभेच्या वेळीं काम चालविण्याच्या रीतीचें नियमन करणें, सरपंचाचे निर्णायक मताची तरतूद करणें व कोरम ठरविणें;

[क] कलम २० अन्वयें, जिल्हा लोकल बोर्डानें कसूर केल्यास त्यांत सांगितलेलीं कामें पंचायतींनीं करण्याचें नियमन करणें;

[ड] कलम २६ अन्वयें, घरपट्टी बसविण्याचें नियमन करणें;

[इ] कलम २८ अन्वयें, घरपट्टीचा कमाल दर ठरविणें;

[२] जिल्हा लोकल बोर्डास.पोटकलम [१] यांत ठराव केलेल्या बाबती खेरीजकरून गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या अगाऊ मंजुरीनें या आक्टाचे हेतु सिद्धीस नेण्यासाठीं कानू करण्याचा अधिकार आहे. विशेषेंकरून व सदरील ठरावाच्या सामान्यतेस बाध न येतां अशा कानू खालील बाबतींसाठीं करण्याचा अधिकार आहे, म्हणजे—

(अ) कलम २० अन्वयें, त्यांत सांगितलेलीं कामें पंचायतीनें करण्याचें नियमन करणें;

(ब) कलम २४ अन्वयें, त्यांत सांगितलेलें पत्रक सादर करण्यासाठीं वेळ व त्या पत्रकाचा नमुना ठरविणें;

[क] कलम ९७ अन्वयें, जादा कर बसविण्याचें नियमन करणें.

अशा कानू करणें त्या पूर्वी प्रसिद्ध केल्या पाहिजेत या शर्तीस पात्र असतील.

४३. अधिकार सोंपवून देणें—गव्हर्नर इन् कौन्सिल यांस जाहिरनामा प्रसिद्ध करून या आक्टावरून पंचायतींसंबंधानें त्यांस प्राप्त झालेल्या किंवा जिल्हा लोकल बोर्डास दिलेल्या अधिकारांपैकीं कोणताहि अधिकार चालविण्यास कोणत्याहि इसमास अधिकार देण्याचा अखत्यार आहे आणि कोणत्याहि वेळीं त्याच रीतीनें अशा अधिकारांत फेरफार करण्याचा किंवा तो रद्द करण्याचा अखत्यार आहे.

४४. गांवफंडाची शिल्लक—कोणताहि प्रदेश गांव असल्याचें बंद झाल्यावर, गांवफंडाची खर्च न झालेली शिल्लक रकम, आणि पंचायतीस प्राप्त झालेली मिळकत, जिल्हा लोकल बोर्डास प्राप्त होईल व जिल्हा लोकल बोर्डास योग्य वाटेल त्याप्रमाणें त्या प्रदेशांतील रहिवाशांच्या फायद्यासाठीं त्यांचा उपयोग केला पाहिजे.

## सातव्या कलमाखालील

# निवडणुकीच्या पद्धतीबाबत नियम

निवडणुकीच्या पद्धतीसंबंधीं सातव्या कलमाखालीं सरकारनें खालील नियम मंजूर केले आहेत:—

१. या आक्टाच्या तिसऱ्या कलमाखालील जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डानें जी पंचायत बनवावयाची असेल तिच्यांत किती मेंबर असावयाचे हें या आक्टाच्या ४ थ्या कलमाअन्वयें ठरविलें पाहिजे व कलेक्टरास कळविलें पाहिजे.

२. असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टर किंवा या कामीं कलेक्टरानें नेमिलेला दुसरा कोणी अधिकारी किंवा इसम यानें या आक्टाच्या तिसऱ्या कलमाअन्वयें एखाद्या खेडेगांवीं पंचायत स्थापण्यासंबंधीं जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर या आक्टाच्या सातव्या कलमाप्रमाणें ज्यांना पंचायतीच्या मेंबरांच्या निवडणुकीच्या वेळीं मत देण्याचा अधिकार आहे अशा त्या खेड्यांतील वयांत आलेल्या पुरुष रहिवाशांची यादी या आक्टाच्या कलम ३ प्रमाणें तयार केली पाहिजे. या यादीच्या संबंधांत आलेल्या शब्दांच्या व्याख्या:—

(अ) वयांत आलेले पुरुष या शब्दांत या यादीच्या तयार करण्याच्या तारखेच्या आधीं ज्यांना एकवीस वर्षें पुरीं झालीं असतील त्या सर्वांचा अंतर्भाव होतो.

(ब) रहिवाशी म्हणजे ज्या तारखेला मतदारांची यादी प्रसिद्ध झाली असेल व त्याच्या आधीं जे त्या खेड्यांत तीन महिने राहिले असतील व ज्यांनीं तेथें या तीन महिन्यांपैकीं प्रत्येक महिन्यांत निदान २० रात्री घालविल्या असतील ते सर्व.

३. अशा तऱ्हेनें तयार केलेली यादी तिला येथें मतदारांची यादी म्हटलें आहे तिची नक्कल त्या खेड्याच्या चावडींत किंवा असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टरानें नेमिलेल्या त्या खेड्यांतील सार्वजनिक स्थळीं चिकटवून ती प्रसिद्ध केली पाहिजे.

त्या खेड्यांत स्थापावयाच्या पहिल्या पंचायतीचे मेंबर निवडण्यासाठीं नेमलेल्या तारखेच्या निदान दोन महिने आधीं त्या तालुक्याच्या देशी भाषेंत मतदारांची यादी प्रसिद्ध केली पाहिजे आणि त्यानंतर ज्या मेंबरांची मुदत सरली असेल त्यांच्या जागा भरण्यासाठीं व्हावयाच्या निवडणुकीच्या नेमलेल्या तारखेच्या निदान दोन महिने आधीं प्रसिद्ध केली पाहिजे.

४. असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टर किंवा यासंबंधांत कलेक्टरनें नेमलेला दुसरा अधिकारी किंवा इसम यानें, पंचायतीच्या मेंबरांच्या निवडणुकीच्या वेळीं आपणाला मतदानाचा हक्क आहे असें म्हणणाऱ्या कोणाही इसमाकडून मतदारांची यादी प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत त्याच्याकडे अर्ज आल्यावर त्या यादींतील एखादी चुकीची नोंद दुरुस्त केली पाहिजे किंवा जो कोणी अर्जदार माझें नांव मतदारांच्या यादींत असलें पाहिजे अशी त्याची खातरी करील त्याचें नांव त्या यादींत दाखल केलें पाहिजे.

५. निवडणुकीच्या तारखेच्या निदान आठ दिवस आधीं दुरुस्त केलेली मतदारांची यादी प्रसिद्ध होईल. त्या यादींत ज्याचें नांव नसेल तो पंचायतीचा मेंबर होण्यास नालायक असेल, व पंचायतीच्या मेंबरांच्या निवडणुकीचे वेळीं मत देण्यासहि नालायक असेल.

६. निवडणुकीची जागा, तारीख व वेळ कलेक्टर ठरवील व कोणत्या अधिकाऱ्यानें निवडणुक घडवून आणावी तेंहि कलेक्टर ठरवील. प्रत्येक निवडणुकीची लेखी नोटीस त्या खेड्याच्या देशी भाषेत, खेड्यांतील चावडींत किंवा दुसऱ्या एखाद्या सार्वजनिक ठिकाणीं निवडणुकीच्या तारखेच्या कमींतकमी १५ दिवस आधीं दिली व प्रसिद्ध केली पाहिजे.

नेमलेल्या दिवशीं व वेळीं चावडींत किंवा दुसऱ्या नेमलेल्या ठिकाणीं त्या खेड्यांतील सर्व वयांत आलेल्या पुरुष रहिवाशांनीं हजर राहावें अशी दवंडी पिटवून नोटीस प्रत्येक निवडणुकीचे निदान तीन दिवस आधीं दिली पाहिजे.

७. नेमलेल्या दिवशीं, ठिकाण नेमलेल्या वेळीं, व नेमलेल्या ठिकाणीं निवडणुक करविण्यास नेमलेल्या अधिकाऱ्यानें सभेच्या जागेंतून ज्यांना मत देण्याचा अधिकार नाहीं अशांना बाहेर काढलें पाहिजे व ते परत येणार नाहींत अशी तजवीज केली पाहिजे.

८. नंतर निवडणुकीच्या उमेदवारांना पुढें येण्यास त्यानें सांगितलें पाहिजे व या ॲक्टाच्या ६ व्या कलमाखालीं जे अपात्र नसतील त्यांच्या नांवांची नोंद त्यांनीं केली पाहिजे.

९. नंतर त्यानें मतदारांना खालीं दिलेली निवडणुकीची पद्धत समजवून दिली पाहिजे, व किती इसम निवडावयाचे तेंहि समजवून दिलें पाहिजे.

१०. निवडावयाच्या मेंबरांच्या संख्येपेक्षां जर अधिक उमेदवार उभे नसतील तर जे उभे राहिले असतील व निवडण्यास पात्र असतील, ते निवडून आले असें जाहीर केलें पाहिजे.

११. नाहींतर हात वर करून, किंवा बाजूचे व विरुद्ध अशा मत देणाऱ्यास वेगवेगळ्या खोल्यांत जावयास सांगून किंवा दुसऱ्या एखाद्या सोईच्या रीतीनें मतें मोजण्यासाठीं उमे असलेल्या प्रत्येक इसमाचें नांव मतासाठीं पुढें ठेविलें पाहिजे. दोन किंवा अधिक उमेदवारांना सारखीं मतें मिळाल्यास त्यांपैकीं एकाची निवड चिठ्या टाकून केली पाहिजे.

१२. निवडणुकीचा अधिकारी यानें निवडणुकीच्या कामाची हकीगत लिहून ठेवली पाहिजे.

१३. प्रत्येक निवडणुकीचा निकाल योग्य दिसेल त्या रीतीनें कलेक्टरनें प्रसिद्ध केला पाहिजे व तो डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाला त्यानें कळविला पाहिजे.

बॉ. ग. गॅ. १९२२, भाग १, पानें २२५–२२६.

---

# पंचायतींच्या सभांच्या वेळीं काम चालविण्याच्या रीतीसंबंधानें कानू

सेक्रेटेरिएट, फोर्ट मुंबई, तारीख ७ माहे मार्च सन १९२२.

नं. ५५ —गांवपंचायतीबाबत आक्टाच्या १३ व्या कलमाअन्वयें पंचायतींच्या सभांच्या वेळीं काम चालविण्याच्या रीतीसंबंधानें खालील कानू सरकारनें मंजूर केल्या आहेत:—

१. पंचायतीनें आपल्या सभा गांवच्या चावडींत किंवा जेथें सर्व लोकांस जाण्यायेण्याची मोकळीक असेल अशा दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं भरविल्या पाहिजेत. साधारण सभा सरपंचानें ठरवावयाच्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांतील कोणत्याही दिवशीं भरविली पाहिजे. विशेष सभा कोणत्याही विशेष कारणासाठीं, सरपंचास, आपण स्वतः होऊन किंवा पंचायतीच्या कोणत्याहि दोन सभासदांनीं विनंति केली असतां, किंवा जिल्हा लोकल बोर्डाच्या प्रेसिडेंटाकडून सांगण्यांत आलें असतां अशा विनंतीच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आंत बोलविण्याचा अधिकार आहे.

२. मामूल साधारण सभेची निदान तीन दिवसांची व विशेष सभेची निदान निदान एक दिवसाची नोटीस सभासदांत फिरविली पाहिजे व गांवच्या चावडीवर लावून ठेविली पाहिजे. अशा नोटिशींत ज्या वेळीं व ज्या जागीं अशी सभा भरावयाची असेल ती वेळ व जागा व तेथें व्हावयाचें कामकाज हीं निर्दिष्ट केलीं पाहिजेत.

३. कोणत्याहि सभेच्या वेळीं, अशा सभेच्या आरंभापासून तों अखेरपर्यंत निम्म्याहून अधिक सभासद हजर असल्याशिवाय कोणतेंहि कामकाज करतां कामा नये. जर कोरम होत नसेल तर सरपंचानें आपणास योग्य वाटेल त्या वेळेपर्यंत सदरहू सभा तहकूब ठेविली पाहिजे. तहकूब केलेल्या सभेस कोरमची जरूरी असणार नाहीं; मात्र इतकेंच कीं, अशा तहकूब केलेल्या सभेची योग्य नोटीस सर्व सभासदांस दिलेली असली पाहिजे.

४. सभेच्या वेळीं सरपंचानें अध्यक्षस्थान स्वीकारलें पाहिजे. तो गैरहजर असल्यास, हजर असलेल्या इतर पंचांनीं त्या सभेकरितां चेअरमन निवडला पाहिजे.

५. चेअरमनानें प्रश्नांवर मतें घेतलीं पाहिजेत. प्रत्येक सभासदास फक्त एक मत असेल; परंतु मतें सारखीं पडतील त्या प्रसंगीं चेअरमनास एक जादा किंवा निर्णायक मत असेल.

६. चेअरमनास हजर असलेल्या सभासदांच्या बहुमतानें सभा तहकूब ठेवण्याचा अधिकार आहे.

७. पंचायतीच्या प्रत्येक सभेंत चाललेलें कामकाज देशी भाषेंत किंवा कलेक्टरानें पसंत केलेल्या कोणत्याही भाषेंत बांधलेल्या बुकांत नमूद केलें पाहिजे. ह्या बुकांत प्रत्येक सभेच्या वेळीं हजर असलेल्या सभासदांचीं नांवें, केलेले निर्णय व कोणताहि निर्णय एकमतानें झाला नसल्याच्या बाबतींत, बहुमताच्या व अल्पमताच्या बाजूस असणाऱ्या सभासदांचीं नांवें दाखल केलीं पाहिजेत. सदरहू चाललेल्या कामकाजावर सरपंचानें किंवा त्या सभेकरितां नेमिलेल्या चेअरमनानें व सभेच्या वेळीं हजर असलेल्या सभासदांनीं सह्या केल्या पाहिजेत. चाललेल्या कामकाजाची एक नक्कल जिल्हा लोकल बोर्डाच्या प्रेसिडेंटास सादर केली पाहिजे.

---

# सरकारनें घरपट्टी बसविण्यासंबंधींच्या कानू

सेक्रेटेरिएट, फोर्ट, मुंबई, तारीख ७ माहे मार्च सन १९२२.

नंबर ५५–अ. गांवपंचायतीबाबत आक्टाच्या २६ व्या कलमाअन्वयें सरकारनें घरपट्टी बसविण्यासंबंधींच्या खालील कानू मंजुर केल्या आहेत:—

१. ह्या कानूंत विषयास किंवा संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर—

(अ) घरासंबंधानें "मालक" या शब्दाचा अर्थ, त्याचें भाडें ज्यास मिळत असेल किंवा घर भाड्यानें दिल्यास ज्यास मिळण्याचा हक्क असेल असा इसम असा समजावा.

( ब ) घरासंबंधानें " भोगवटा करणारा " या शब्दाचा अर्थ, मालक म्हणून गुमास्ता म्हणून किंवा भाडेकरी म्हणून तें घर प्रत्यक्ष ताब्यांत असणारा इसम असा समजावा, व त्यांत अशा इसमाचा समावेश होतो.

( क ) घराच्या किंवा मिळकतीच्या संबंधानें "वार्षिक भाड्याची किंमत" या शब्दांचा अर्थ, तें घर किंवा मिळकत ज्या भाड्यास वाजवी रीतीनें दिली जाण्याचा संभव असेल असें वार्षिक भाडें असा समजावा.

खुलासा—वार्षिक भाड्याची किंमत नक्की करतांना दुरुस्तीचा खर्च विचारांत घेतां कामा नये.

( ड ) " घर " या शब्दाचा अर्थ, एकाच आवारांतील व मनुष्य-वस्तीची जागा म्हणून किंवा कोणताहि धंदा चालविण्याची जागा म्हणून किंवा मिळकत ठेवण्याची जागा म्हणून किंवा कोणतीहि इमारत बांधण्याची जागा म्हणून एकाच भोगवटा करणाराच्या वापरांत असलेली कोणतीहि इमारत किंवा इमारतींचा समुदाय असा समजावा.

२. मुद्दाम माफी देण्यांत न आलेल्या गांवांतील प्रत्येक घराच्यासंबंधानें भोगवटा करणारानें, मालक या नात्यानें किंवा इतर नात्यानें घराच्या मुद्दल किंमतीच्या दर शंभर रुपयांस खुद्द इलाख्यांत ४ आण्यांहून व सिंधमध्यें २ आण्यांहून कमी नाहीं अशा प्रत्येक बाबतींत पंचायतीनें ठरवावयाच्या दरानें कर एप्रिलच्या ३० व्या तारखेस किंवा त्यापूर्वीं दरवर्षीं आगाऊ भरला पाहिजे. मात्र इतकेंच कीं, खुद्द इलाख्यांत १०० रु. हून व सिंधमध्यें २०० रु. हून कमी मुद्दल किंमत असलेल्या घरास कर माफ असेल.

३. जिल्हा लोकल बोर्डास, कोणत्याही गांवाच्या संबंधानें मागील शेवटल्या कानूंत सांगितल्याप्रमाणें, घरपट्टी, घराच्या मुद्दल किंमतीवरील दरानें आकारली जाऊं नये, तर वार्षिक भाड्याच्या किंमतीच्या खुद्द इलाख्यांत दर शेंकडा सव्वासहाहून कमी नसलेल्या व सिंधमध्यें दर शेंकडा ४ हून कमी नसलेल्या दरानें आकारली जावी असें फर्माविणें कायदेशीर असेल; मात्र इतकेंच कीं, खुद्द इलाख्यांत रु. २ किंवा त्याहून कमी वार्षिक भाड्याच्या किंमतीचीं घरें व सिंधमध्यें रु. १२ किंवा त्याहून कमी वार्षिक भाड्याच्या किंमतीचीं घरें ह्यांस कर माफ असेल.

४. आकारणी करतांना पाव आण्याचे अपूर्णांक हिशेबांतून वगळण्यांत आले पाहिजेत.

५. घराची किंमत पंचांनीं दर तीन वर्षांनीं केली पाहिजे किंवा तपासली पाहिजे व ती जिल्हा लोकल बोर्डाकडे अपील केलें जाण्यास पात्र असेल, व

जिल्हा लोकल बोर्डानें अपिलांचा निकाल करण्याकरितां एक खास कामिटी नेमिली पाहिजे.

६. (अ) देवळें, मशिदी, चर्चें, शाळा, धर्मशाळा, दवाखाने अशांसारख्या केवळ धार्मिक, शिक्षणविषयक किंवा धर्मदायाच्या कारणासाठीं वापरण्यांत असलेल्या किंवा ज्या पैसे न भरतां सर्वसामान्य लोकांस वापरण्याचा हक्क असेल अशा सर्व इमारती यांस घरपट्टी माफ असेल.

(ब) केवळ सार्वजनिक कामासाठीं वापरांत असलेल्या सर्व सरकारी व लोकल बोर्डाच्या इमारती यांना हा कर माफ असेल.

७. पंचायतीनें आकारणीची यादी तयार करून तींत खालील गोष्टी दाखविल्या पाहिजेत, म्हणजे—

(अ) घराचा नंबर;
(ब) मालकाचें व भोगवटा करणाराचें नांव, माहित असल्यास तें;
(क) वार्षिक भाड्याच्या किंमतीची ठोक रकम; आणि
(ड) तीवर बसलेल्या कराची रकम.

८. यादी तयार झाल्यानंतर पंचायतीनें तिची एक नक्कल एक महिन्याहून कमी नाहीं इतकी मुदत ठेवून, गांवच्या चावडींत चिकटवून ती प्रसिद्ध केली पाहिजे; सदर मुदतीनंतर ती यादी अखेरची असेल.

९. किंमतीसंबंधानें व आकारणीसंबंधानें सर्व हरकती पंचायतीमार्फत, ८ व्या कानूअन्वयें जाहीर केलेल्या वेळाच्या आंत जिल्हा लोकल बोर्डाकडे सादर केल्या पाहिजेत.

---

# सरकार शाळांवरील देखरेखीसंबंधानें कानू.

सेक्रेटेरिएट, फोर्ट, मुंबई, तारीख २६ माहे मे सन १९२२.

नंबर ५५ अ.—गांवपंचायतींबावत ॲक्टाच्या २० (२) कलमांत दिलेला अधिकार चालवून सरकार शाळांवरील देखरेखीसंबंधानें खालील कानू मंजूर करीत आहे:—

१. गांवपंचायतीनें दरवर्षी आपणांमधून तिहींहून कमी नाहीं व पांचांहून जास्त नाहीं इतक्या सभासदांची एक स्कूल कामिटी नेमिली पाहिजे.

२. जिल्हा लोकल बोर्डाच्या मतें गांवांतील मुसलमान लोकसंख्या एकंदर लोकसंख्येच्या शेकडा १० हून अधिक असेल, आणि जर कोणताहि मुसल-

मान १ ल्या कानूअन्वयें सदरहू कमिटींत निवडून आलेला नसेल, तर कमिटीनें गांवच्या प्रौढ वयाच्या पुरुष रहिवाशांमधून एक मुसलमान सभासद नेमून घेतला पाहिजे.

३. जिल्हा लोकल बोर्डाच्या मतें गांवांतील मागासलेल्या वर्गाची लोकसंख्या एकंदर लोकसंख्येच्या शेंकडा १० हून अधिक असेल आणि जर त्या वर्गातला कोणताहि इसम १ ल्या कानूअन्वयें सदरहू कमिटींत निवडून आलेला नसेल तर कमिटीनें गांवच्या प्रौढ वयाच्या पुरुष रहिवाशांमधून मागसलेल्या वर्गांतील एक सभासद नेमून घेतला पाहिजे.

४. कमिटीच्या सभासदांनीं आपणांपैकीं एकास आपला चेअरमन म्हणून निवडलें पाहिजे.

५. कमिटीच्या देखरेखीखालीं दिलेल्या सर्व शाळा तिनें महिन्यांतून निदान एकदां तरी जाऊन पाहिल्या पाहिजेत.

६. त्यांचीं कामें खालील प्रकारचीं असतील, म्हणजे:—

[अ] शाळेचें रजिस्टर व इतर कागदपत्र चालू तारखेपर्यंत भरण्यांत आले असल्याचें पाहणें, व तें तसें नसल्यास त्याबद्दल डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टराकडे रिपोर्ट करणें;

[ब] शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या बाबतींत व शिक्षकांच्या हजिरीच्या बाबतींत त्यास दिसून आलेल्या कोणत्याहि अनियमितपणाबद्दल डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टराकडे रिपोर्ट करणें;

[क] शाळेचें आवार आरोग्यकारक स्थितींत ठेवण्यांत आलें असल्याचें पाहणें; आणि

[ड] शाळागृहाच्या चालचलाऊ दुरुस्ती करणें.

७. त्यांत शाळेच्या वर्षाच्या आरंभीं खालील गोष्ट ठरविण्याचा देखील अधिकार असेल, म्हणजे:—

[१] (शाळाखात्यानें ठरविलेल्या कमाल व किमान मर्यादेस पात्र राहून) शाळांचे तास ठरविणें, [२] शाळाखात्यानें ठरविलेल्या मर्यादांच्या आंत शाळांच्या सुट्यांच्या तारखा ठरविणें, आणि [३] शाळाखात्यानें ठरविलेल्या मर्यादांच्या आंत सुट्यांशिवाय इतर सणाचे दिवस ठरविणें.

८. त्यांनीं शाळेच्या सर्वसाधारण व्यवस्थेसंबंधानें आणि विशेषेकरून खालील गोष्टीसंबंधानें आपले शेरे व्हिजिट बुकांत लिहिले पाहिजेत:—

[१] गांवच्या लोकसंख्येच्या मानानें पाहतां, हजिरीपटावरील विद्यार्थ्यांची संख्या पुरेशी आहे किंवा नाहीं यासंबंधानें;

[२] हजिरीपटावरील विद्यार्थ्यांच्या संख्येच्या मानानें पाहतां, शाळेंत हजर असणारांची संख्या समाधानकारक आहे किंवा नाहीं यासंबंधानें;

[३] शाळेची इमारत चांगल्या स्थितींत आहे किंवा नाहीं यासंबंधानें; आणि

[४] ज्या गोष्टीमुळें शाळेचा कारभार अधिक चांगल्या रीतीनें चालवितां येईल व शिक्षण अधिक चांगल्या रीतीनें देतां येईल असें त्यांना वाटेल अशा दुसऱ्या गोष्टींसंबंधानें.

९. हेड मास्तरानें ह्या शेऱ्यांची नक्कल एक आठवड्याच्या आंत डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टराकडे पाठविली पाहिजे. सदरहू शेऱ्यांची एक नक्कल जिल्हा लोकल बोर्डाचे प्रेसिडेंटाकडे पाठविणें कमिटीस इष्ट वाटत असेल तर तिनें ती पाठवावी.

१०. कमिटीनें विद्यार्थ्यांची संख्या, विशेषतः मागसलेल्या वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या, वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

११. कमिटीनें खरोखर गरीब असतील अशा विद्यार्थ्यांस नादाऱ्या देण्यासाठीं डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टराकडे शिफारस करावी.

१२. एखाद्या हेड मास्तराची बदली होईल तेव्हां चार्ज देताना, चार्ज देणारा मास्तर व चार्ज घेणारा मास्तर यांच्या दरम्यान शाळेचे हिशेब, कागदपत्र, सामानसुमान किंवा इतर जिनसा यांसंबंधीं कोणताहि मतभेद असेल तर कमिटीचे कोणतेहि दोन किंवा अधिक सभासद बोलावण्यांत यावे व त्यांच्या समक्ष चार्ज देण्यांत यावा. हजर असलेल्या सभासदांस, चार्जाच्या कागदांवर आपणास योग्य वाटतील असे शेरे लिहिण्याचा अधिकार आहे.

१३. हेड मास्तर एकाएकी आजारी पडेल त्या बाबतींतच फक्त किंवा खालील विशिष्ट परिस्थितींतच फक्त म्हणजे, हेड मास्तराचा कोणी जवळचा नातेवाईक एकाएकीं मरण पावल्यास किंवा त्याचें स्वतःचेंच लग्न असल्यास, कमिटीच्या चेअरमनास, त्याच्या मर्जीस आल्यास त्याला आपला चार्ज सोडण्यास परवानगी देण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. चेअरमनानें ताबडतोब सदर गोष्टीबद्दल डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टराकडे रिपोर्ट केला पाहिजे.

१४. हेड मास्तर मरण पावल्याच्या प्रसंगीं, कोणीहि असिस्टंट नसेल तर कमिटीच्या चेअरमनानें शाळा ताब्यांत घ्यावी व डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरास रिपोर्ट सादर करावा.

१५. कमिटीच्या सभासदांनीं हेडमास्तरास शाळेंत शिस्त राखण्याच्या कामीं व विद्यार्थी नियमितपणें हजर राहतील असें करण्याच्या कामीं मदत करावी.

१६. कमिटीनें, शाळेकरितां एखादी चांगली इमारत मिळवून देण्याचे कामीं शाळाखात्यास मदत करावी व शाळेची इमारत शाळेच्या कारणासाठींच फक्त वापरली जात आहे अशाबद्दल लक्ष पुरवावें.

१७. चेअरमनानें हेड मास्तर किंवा असिस्टंट मास्तर रजेशिवाय गैर-हजर राहिल्यास त्याबद्दल डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टराकडे तावडतोब रिपोर्ट केला पाहिजे. ( किरकोळ किंवा इतर ) रजेवर जाण्याच्या पूर्वी हेड मास्तरानें ती गोष्ट कमिटीचे चेअरमनास लिहून कळविली पाहिजे.

१८. स्कूल्स कमिटीचा चेअरमन व तिचे सभासद यांनीं एज्युकेशनल, किंवा रेव्हिन्यू खात्याचा कोणताहि अमलदार किंवा जिल्हा अगर तालुका लोकल बोर्डाचा कोणताहि सभासद किंवा अमलदार शाळेस भेट देईल त्या वेळीं, शक्य असेल तर तेथें हजर रहावें.

---

## सरकारनें घरपट्टीचे ठरविलेले कमाल दर.

सेक्रेटरिएट, फोर्ट, मुंबई, तारीख ७ माहे मार्च सन १९२२.

नंबर ५५–ब—गांवपंचायतीबाबत आक्टाच्या २८ व्या कलमान्वयें सरकारनें घरपट्टीचे खालील कमाल दर ठरविले आहेतः—

[१] घरांच्या मुद्दल किंमतीवर आकारलेली घरपट्टी मुद्दल किंमतीच्या दर शंभर रुपयांस खुद्द इलाख्यांत ६ आणे व सिंधमध्यें ४ आणे.

[२] घरांच्या वार्षिक भाड्याच्या किंमतीवर आकारलेली घरपट्टी, खुद्द इलाख्यात अशा किंमतीच्या शेंकडा १० टक्के व सिंधमध्यें शेंकडा ६–४-० टक्के.

---

## सरकार गांवांतील कामांवर लोकल बोर्डांनीं लाविलेल्या मजुरांवरील देखरेखीसंबंधीं कानू.

सेक्रेटेरिएट, फोर्ट, मुंबई, तारीख २६ माहे मे सन १९२२

नंबर ५५–ब.—गांवपंचायतीबाबत आक्टाच्या २० (२) कलमांत दिलेला अधिकार चालवून, सरकार गांवांतील कामांवर लोकल बोर्डांनीं लाविलेल्यामजु-रांवरील देखरेखीसंबंधानें खालील कानू मंजूर करीत आहेः—

१. गांवपंचायतीनें, जरूर तर दरवर्षी, गांवांतील कामांवर लोकल बोर्डांनीं लाविलेल्या मजुरांवर देखरेख करण्याकरितां एक वर्क्स कमिटी बनवावी. सदरहू वर्क्स कमिटींत तीन समासद असतील, व त्यांपैकीं एक सरपंच असेल.

२. पंचायतीच्या किंवा वर्क्स कमिटी बनविण्यांत आली असेल तर तिच्या समासदांनीं:—

[अ] कामांकरितां मजूर मिळविण्याच्या कामीं मदत केली पाहिजे, आणि काम चाललें असेल त्या ठिकाणीं सामानसुमान वाजवी दरानें नेण्यासाठीं तजवीज केली पाहिजे.

[ब] काम चांगल्या प्रकारें व फाजील खर्च न होतां चाललें आहे, अशाबद्दल लक्ष पुरविलें पाहिजे.

[क] लोकल बोर्डांनीं खात्याकडून करविलेलीं सर्व कामें तीं चालू असतांना आठवड्यांतून निदान एकदां तरी पाहिलीं पाहिजेत व तीं योग्य रीतीनें मंजूर केलेले प्लान व अंदाज यांबरहुकूम करण्यांत आलीं आहेत किंवा कसें याबाबत खात्री करून घेतली पाहिजे.

[ड] हजिरीपट व मोजमापाचीं बुकें आठवड्यांतून निदान एकदां तरी तपासलीं पाहिजेत व आपल्या समक्ष दिलेल्या पैशाच्या संबंधानें मखलाशी केली पाहिजे.

३. तसेंच त्यांनीं, कंत्राटानें दिलेलीं कामें पंधरवड्यांतून निदान एकदां तरी जाऊन पाहिलीं पाहिजेत, तीं मंजूर केलेले प्लान व अंदाज यांबरहुकूम करण्यांत येत असल्याबद्दल लक्ष्य पुरविलें पाहिजे, व त्यांत कोणतेहि दोष असल्यास त्याबद्दल संबंध असलेल्या जिल्हा लोकल बोर्डाच्या किंवा तालुका लोकल बोर्डाच्या प्रेसिडेंटास कळविलें पाहिजे.

४. त्यांनीं सुरू असलेल्या प्रत्येक कामाची मधून मधून पाहणी केली पाहिजे व पाहणींत काय दिसून आलें तें संबंध असलेल्या जिल्हा लोकल बोर्डाच्या किंवा तालुका लोकल बोर्डाच्या प्रेसिडेंटास कळविलें पाहिजे.

५. कमिटीनें, मिळालेलें सामानसुमान जरूर त्या प्रतीचें असल्याबद्दल व तें केलेल्या मागणीपेक्षां कमी नसल्याबद्दल पाहिलें पाहिजे.

६. संबंध असलेल्या तालुका लोकल बोर्डाच्या प्रेसिडेंटानें किंवा व्हाइस प्रेसिडेंटानें, गांवपंचायतीस जीं कामें तिच्या क्षेत्राच्या आंत असतील अशा कामांसाठीं मंजूर केलेले प्लान व अंदाज यांच्या नकला पुरविल्या पाहिजेत व लोकल बोर्डांच्या ओव्हरसिअरास किंवा मेस्त्रीस, ते ज्या ज्या वेळीं हीं कामें पाहण्यास

बातीळ त्या त्या वेळीं सरपंचाची गांठ घेण्याबद्दल जरूर त्या समजुती दिल्या पाहिजेत.

७. काम चांगलें चाललें आहे व तें चांगल्या प्रकारचें आहे अशा-बद्दल पंचायतीनें किंवा वर्क्स कमिटीनें आपली खात्री करून घेतली असल्या-शिवाय व तशा अर्थाचा दाखला दिला असल्याशिवाय त्या कामाबद्दल पैसा देत कामा नये.

८. प्रत्येक कामाच्या ठिकाणीं एक व्हिजिटर बुक ठेविलें पाहिजे व त्यांत काम तपासणाऱ्या वर्क्स कमिटीच्या सभासदानें किंवा सभासदांनीं त्यासंबं-धानें आयते शेरे लिहिले पाहिजेत.

---

## सन १९२० चा गांवपंचायतींबाबत आक्ट याच्या २४ व्या कलमान्वयेंच्या नमुन्याच्या कानू.

१. पंचायतीचें कामकाजासंबंधीचें वर्ष तारीख १ माहे एप्रिलपासून सुरू होऊन तारीख ३१ माहे मार्चला संपेल.

२. पंचायतीनें, दरवर्षीं तारीख १० आक्टोबर रोजीं किंवा त्यापूर्वीं, जिल्हा लोकल बोर्डाकडे यासोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणें खालील बाबतींचें एक पत्रक सादर केलें पाहिजे. त्या बाबती येणेंप्रमाणें:—

[अ] पुढील नगदी सालासाठीं गांवच्या फंडाची सुरवातीची शिल्लक व अंदाजलेलें उत्पन्न.

[ब] नोकरवर्गासाठीं व कलम १८ चें पोट–कलम (१) यांत निर्दिष्ट केलेलीं कर्तव्यें पार पाडण्यासाठीं योजलेला खर्च; आणि

[क] कलम १८ चें पोट–कलम (२) याअन्वयें गांवच्या जरूरीच्या गोष्टी भागाविण्यासाठीं दुसऱ्या कोणत्याही कामासाठीं योजलेला खर्च कोणताही असल्यास.

जिल्हा तालुका मौजे येथील गांवपंचायतीचें सालाबद्दल अंदाजपत्रक.

| अंदाजलेल्या उत्पन्नाचा तपशील. | | | | खर्चाचा तपशील. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सन १९२१-२२ च्या बजेटाप्रमाणें अंदाज | सन १९२०-२१ चा सुधारलेला अंदाज | सन १९१९-२० चें प्रत्यक्ष उत्पन्न | | सन १९२१-२२ च्या बजेटाप्रमाणें अंदाज | सन १९२०-२१ चा सुधारलेला अंदाज | सन १९१९-२० चा प्रत्यक्ष खर्च |
| तारीख १ एप्रिल रोजींची सुरवातीची शिल्लक<br>सदर सालांतील अंदाजलेल्या जमा:—<br>(१) मुंबईच्या डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्टाच्या १९१ च्या कलमाअन्वयें सरकारनें गांवफंडास नेमून दिलेली रक्कम<br>(२) कलम २६ किंवा २७ यांअन्वयें बसाविलेल्या कोणत्याहि करांचें उत्पन्न<br>(३) पोट-कायद्यांच्या भंगाबद्दलच्या खटल्यांत वसूल झालेले दंड.<br>(४) गांवफंडाच्या खातीं जमा करण्याविषयीं कोर्टानें हुकूम केलेल्या रकमा. | | | | १. सामान्य नोकरवर्ग:—<br>(अ) सेक्रेटरी<br>(ब) इतर नोकर कोणतेहि असल्यास.<br>२. ऑफिसाकरितां सादिलवार रकमा.<br>३. पाणीपुरवठा<br>(अ) नवीं कामें कोणतींहि असल्यास<br>(ब) दुरुस्त्या—<br>तळ्यांच्या<br>विहिरींच्या<br>४. दळणवळणाचे मार्ग:—<br>(अ) दुय्यम प्रतीच्या सडका किंवा पूल बांधणें. | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (५) गांव नोकरांनीं गोळा केलेली सर्व धूळ, शेण किंवा केरकचरा, यांच्या विक्रीचें उत्पन्न.<br>(६) जिल्हा बोर्डानें दिलेली रक्कम.<br>(७) सरकारकडून कर्जाच्या रूपानें घेतलेल्या रकमा किंवा देणगीच्या रूपानें मिळालेल्या रकमा<br>(८) सरकारनें गांवफंडाला दिलेल्या दुसऱ्या कोणत्याहि रकमा.<br>(९) पंचायतीकडे आलेल्या मिळकतीचें उत्पन्न.<br>(१०) जिल्हा लोकल बोर्डानें १९ व्या कलमाअन्वयें लावून दिलेला फंड.<br>एकूण ...... | | | (ब) दुय्यम प्रतीच्या सडका किंवा पूल व्यवस्थित राखणें.<br>५. आरोग्य व झाडलोट.<br>६. पंचायतीकडे आलेल्या सार्वजनिक इमारती व्यवस्थित राखणें.<br>७. दिवाबत्तीचा खर्च.<br>८. किरकोळ.<br>९. हत्यारें व यंत्रसामुग्री.<br>१०. १९ व्या कलमाअन्वयें जिल्हा लोकल बोर्डानें सोंपवून दिलेलीं कामें.<br>अखेरची शिल्लक<br>एकूण. | | |